Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

# SHODH VISHLESHAN

## SPECIAL ISSUE

Lokmanya Mahavidyalaya, Warora, Dist- Chandrapur

February -2021

ISSUE No- (CCLXXII) 272



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr. Subodhkumar Singh
Principal
Lokmanya Mahavidyalaya,
Warora,
Dist- Chandrapur (MS)442907

Executive Editor:
Prof.T.S.Mane
Dr.Ravindra B.Shende
Lokmanya Mahavidyalaya,
Warora,
Dist- Chandrapur (MS)442907

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Aadhar International Publications
Amaravati (M.S)

© All rights reserved with the authors & publisher

Impact Factor – 7.675 ISSN – 2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed Indexed

***Multidisciplinary International Research Journal***

## February - 2021

**ISSUE No – CCLXXII (272)**

# SHODH VISHLESHAN

**Chief Editor :**
**Prof. Virag.S.Gawande**
**Director**
**Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.**

**Editor :**
**Dr. Subodhkumar Singh**
**Principal**

**Executive Editor:**
**Prof.T.S.Mane**
**Dr.Ravindra B.Shende**
**Lokmanya Mahavidyalaya, Warora, Dist- Chandrapur (MS)**

## Aadhar International Publications

For Details Visit To : **www.aadharsocial.com**

© **All rights reserved with the authors & publisher**

ISSN : 2278-9308
Fabruary, 2021

माननीय प्राचार्य,
लोकमान्य महाविद्यालय, वरोरा

आपल्या महाविद्यालयातील प्राध्यापकवृंदाने संशोधनपर लेख लिहून, त्यातील सर्व लेखांचे एकत्रित प्रकाशन आपण करणार आहात, हा खरेच एक स्तुत्य उपक्रम आहे. अध्यापनाच्या कामासोबतच संबंधित विषयातील विविध संशोधनपर लेख प्रकाशित होण्यामुळे प्राध्यापकांच्या संशोधनवृत्तीला अधिक चालना मिळेल. यात आपल्या महाविद्यालयाने पुढाकार घेतला ही खरोखरच आनंदाची बाब आहे. या उपक्रमात सातत्य राहील याबाबत मला विश्वास आहे.

मी आपल्या या उपक्रमास सुयश चिंतितो.

दिनांक २६ जानेवारी २०२१

श्रीकांत पाटील
वरोडा

प्रा. श्रीकांत पाटील / राममंदिर वार्ड,/ वरोडा -४४२ ९०७ जि. चंद्रपूर दुरध्वनी - ९९६०१३१४०९

# From Principal's Desk............

Lokmanya Mahavidyalaya, Warora, Dist. Chandrapur, run by Lok Shikshan Sanstha, Warora and affiliated to Gondwana University, Gadchiroli faced NAAC and was assessed and accredited with C status in the first cycle in 2010 and B in the second cycle in 2017. It gives me immense pleasure that Lokmanya Mahavidiyalaya is going to publish Research Journal".

Today, education and research are highly interdisciplinary. Research is careful critical inquiry or examination in seeking facts or principles or new knowledge through a systematic scientific and analytical approach in any branch of knowledge. Lokmanya Mahavidyalaya has constituted a research committee to promote, monitor and address the issue of research.

I am sure that the ideas expressed in the research paper will open up new areas of quality enhancement of higher education.

**Dr. S. K. Singh**
Principal
Lokmanya Mahavidyalaya, Warora

# संपादकीय

लोक शिक्षण संस्थेद्वारा संचालित लोकमान्य महाविद्यालयाची स्थापना १९९८ साली झाली असून संस्थेने अमृत महोत्सावाकडे तर महाविद्यालयाने रौप्य महोत्सवाकडे वाटचाल सुरू केली आहे. महाविद्यालयातील प्रत्येक विभागाने महाविद्यालयाच्या प्रथम आणि दुसऱ्या दशकात विद्यार्थी केंद्रित तसेच संशोधनपर उपक्रम राबिविले आहे. महाविद्यालयातील पूर्णवेळ तसेच अर्धवेळ प्राध्यापकांकडून संशोधन पेपर मागवून ते प्रकाशित केल्यास वाचकांना, विद्यार्थ्यांना आणि सर्वांनाच त्याचा फायदा मिळेल या हेतूने संशोधन निबंध मागवून प्रकाशित करण्यात येत आहे, ही आम्हा सर्वांसाठी आनंदाची गोष्ट आहे.

भारतासाठी वर्ष २०२०-२०२१ हे अत्यंत त्रासाचे, कष्टाचे आणि विशेष म्हणजे विकासावर अत्यंत प्रतिकूल परिणाम करणारे अनुभवास येत आहे. कोवीड-१९ ची लागण नियंत्रित करण्यासाठी आपण स्वीकारलेल्या टाळेबंदीचे अत्यंत प्रतिकूल परिणाम भारतीय समग्र जीवनावर होत आहे. या पार्श्वभूमीवर तसेच स्वतंत्र भारताच्या आधुनिक रणसंग्रामात ज्या उपलब्धता उपलब्ध होत आहे, ज्या मर्यादा आपली व्याप्ती वाढवत जात आहे. त्यातील प्रातिनिधीक काही समस्यांसाठी निवडक उपाययोजना लेखकांनी उलगडल्या आहे. हा छोटा प्रयत्न सर्वांसाठी खरोखर मोठी संधी निर्माण करणारा आहे.

लोक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. प्रा. श्रीकांत पाटील सर, लोक शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी, लोकमान्य महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. सुबोधकुमार सिंग, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद या सर्वांच्या सार्थक प्रयत्नांमुळे या शोधनिबंधाना प्रसिद्धी मिळते आहे. हा प्रयत्न नावीन्यपूर्ण आणि वेगळी वाट दाखविणारा आहेत असे आम्हाला मनापासून वाटते.

प्रस्तुत अंकासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी वृंदाने सर्वतोपरी मदत केलेली आहे, त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. सरतेशेवटी एवढेच सांगू इच्छितो, प्रस्तुत अंकातील चांगले असेल ते तज्ज्ञांचे असून उणीवा या संपादकद्वयांच्या आहेत. सदर उणीवा निर्देशनास आणून दिल्यास आनंद तर होईलच परंतु सुधारण्यास देखील संधी मिळेल.

प्रा. तानाजी माने
प्रा. डॉ. रविंद्र शेंडे

# Editorial Board

**Chief Editor -**
**Prof.Virag S.Gawande,**
**Director,**
Aadhar Social Research &,
Development Training Institute, Amravati. **[M.S.] INDIA**

**Executive-Editors -**

- **Dr.Dinesh W.Nichit** - Principal, Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, **Walgaon.Dist. Amravati.**
- **Dr.Sanjay J. Kothari** - Head, Deptt. of Economics, G.S.Tompe Arts Comm,Sci Collage Chandur Bazar Dist. Amravati

**Advisory Board -**

- **Dr. Dhnyaneshwar Yawale** - Principal, Sarswati Kala Mahavidyalaya , Dahihanda, Tq-Akola.
- **Prof.Dr. Shabab Rizvi** ,Pillai's College of Arts, Comm. & Sci., New Panvel, Navi Mumbai
- **Dr. Udaysinh R. Manepatil** ,Smt. A. R. Patil Kanya Mahavidyalaya, Ichalkaranji,
- **Dr. Sou. Parvati Bhagwan Patil** , Principal, C.S. Shindure College Hupri, Dist Kolhapur
- **Dr.Usha Sinha** , Principal ,G.D.M. Mahavidyalay,Patna Magadh University.Bodhgay Bihar

**Review Committee -**

- **Dr. D. R. Panzade,** Assistant Pro., Yeshwantrao Chavan College, Sillod. Dist. Aurangabad (MS)
- **Dr.Suhas R.Patil** ,Principal ,Government College Of Education, Bhandara, Maharashtra
- Dr. **Kundan Ajabrao Alone** ,Ramkrushna Mahavidyalaya, Darapur Tal-Daryapur, Dist-Amravati.
- **DR. Gajanan P. Wader** Principal , Pillai College of Arts, Commerce & Science, Panvel
- **Dr. Bhagyashree A. Deshpande**, Professor Dr. P. D. College of Law, Amravati
- **Dr. Hrushikesh Dalai** , Asstt. Professor K.K. Sanskrit University, Ramtek

*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responcible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

- **Executive Editor**

**Published by -**
**Prof.Virag Gawande**
**Aadhar Publication ,**Aadhar Social Research & Development Training Institute, New Hanuman Nagar, In Front Of Pathyapustak Mandal, Behind V.M.V. College,Amravati
( M.S ) India Pin- 444604 **Email :** aadharpublication@gmail.com
**Website :** www.aadharsocial.com **Mobile :** 9595560278 /

# Editorial Board

**Editor**
**Dr. Subodhkumar Singh**
**Principal**

**Executive Editor**
**Prof.T.S.Mane**
**Dr.Ravindra B.Shende**

## Associated Editor

Dr.J.P Shastri

Dr.S.N.Pilgulwar

Dr.D.P.Lonkar

Prof..U.R.Deulkar

Ku.L.N.Puppalwar

Prof.S.N.Puri

## INDEX



| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | आत्मनिर्भर भारत अभियानात मराठीचे योगदान आणि संधी **प्रा.डॉ. जयश्री प्र. शास्त्री** | 1 |
| 2 | विदर्भ का क्षेत्रवादी आन्दोलन, क्षेत्रीय असंतुलन की उपज: समाजशास्त्रीय अध्ययन **डॉ.श्रीनिवास पिलगुलवार** | 9 |
| 3 | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने:राजकारणाचे गुन्हेगारीकरण **प्रा. तानाजी संभाजी माने** | 19 |
| 4 | आधुनिक इतिहासलेखनाचे नवीन प्रवाह **प्रा.डॉ. दीपक पां. लोणकर** | 23 |
| 5 | भारतीय योग पध्दती व मानवाची रोगप्रतिकार शक्ति:आत्मनिर्भर भारताच्यासंदर्भात **प्रा. उत्तम रामचंद्र देउळकर** | 34 |
| 6 | आत्मनिर्भर भारत : एक दृष्टीक्षेप **प्रा.डॉ. रवींद्र बापुराव शेंडे** | 40 |
| 7 | कौमार्यावस्थेतील विदयार्थीनींच्या स्व:संकल्पनेचा त्याच्या भावनिक बुद्धिमत्तेशी संबंध **प्रा. योगिता गोरे** | 48 |
| 8 | IT-Base Best Practices in College Libraries **Leena N. Puppalwar** | 58 |
| 9 | Expressionismin Mahesh Elkunchwar's*Old Stone Mansion* **Shrikant Niranjan Puri** | 62 |
| 10 | The Theme of Patriotism in *Lashkar* by Mukul Deva **Alka A. Kulkarni** | 68 |
| 11 | एकविसाव्या शतकात गृहव्यवस्थापणाचे बदलले स्वरूप (गृहव्यवस्थापनामध्ये स्वयंपाकघरातील गृहिणीची बदलती भूमिका) **प्रा.जयश्री जाधव** | 72 |
| 12 | मराठी संत पंचकातील एकांतवास आणि जागतिक महामारीतील विलगीकरण **डॉ. पल्लवी ताजने** | 79 |
| 13 | कापूस उत्पादन व विपणन व्यवस्थापन **प्रा.नितेश गुलाब जोगी** | 88 |
| 14 | वस्तू व सेवा कराचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम **प्रा.कु. प्रिती दिलीपराव पोहाणे** | 93 |
| 15 | वस्तू व सेवा कर आणि परिणाम **प्रा. कु. प्रियंका रमेश येडे** | 98 |
| 16 | पिक विमा योजनेचा शेतकरी वर्गावर झालेला आर्थिक परिणाम **प्रा.विकास सुरेश ढुमणे** | 102 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) –7.675, Issue NO, 272(CCLXXII)
ISSN : 2278-9308
Fabruary, 2021

# आत्मनिर्भर भारत अभियानात मराठीचे योगदान आणि संधी

प्रा.डॉ. जयश्री प्र. शास्त्री
सहयोगी प्राध्यापक
मराठी विभागप्रमुख वरोरा जि. चंद्रपूर

भा–रत म्हणजे प्रकाशात राहणारे लोक. प्रकाशात राहणारे लोक हे उज्ज्वल भवितव्याचे प्रतीकच जणू मानले जातात. प्राचीन काळापासून समृध्द वारसा लाभलेल्या भारत देशावर वर्षानुवर्षे अनेक प्रकारची आक्रमणे झाली. तसेच आमचा भारत देश विविध प्रकारच्या नैसर्गिक–अनैसर्गिक आपत्तींना सामोर गेला आणि त्यातुनही तो स्वयंभू कौशल्याने, प्रयत्न–चिकाटीने बाहेर पडला.डिसेंबर २०१९ पासून कोविड– १९ च्या आपत्ती जनक परिस्थितीत देश ज्या परिस्थितीतून जात आहे त्यात आर्थिक, सामाजिक, व्यावसायिक, शैक्षणिक, आध्यात्मिक आत्मनिर्भरता हा एक महत्वाचा चिंतनीय कालावधी होय.प्रत्येक क्षेत्राच्या योगदानातूनच संधीचा उगम होणार आहे. त्यानुसार सत्र २०१९–२० मध्ये चाललेल्या आत्मनिर्भर भारत अभियानात मराठी भाषेचे योगदान आणि निर्माण होणाऱ्या संधी या विषयावर प्रकाश टाकणे हा या शोधनिबंधाचा विषय होय.

**प्रस्तावना :**

भाषा हे संप्रेषणाचे फार प्रभावी माध्यम मानले जाते. जगात जेवढ्या भाषा आहेत तेवढ्या भाषांची संप्रेषण प्रणाली देखील अस्तित्वात आहे. परंतु प्रत्येक भाषेला तिची अशी बोली भाषा आणि प्रमाणभाषा असे दोन लक्षणीय महत्वाचे भाग असतात. भारतीय भाषांमध्ये प्रादेशिक भाषिक विचार केला तर महाराष्ट्रातील मराठी भाषेचा भाषिक व्यवहार बोली आणि प्रमाण या दोन्ही बाजुंनी समाज विकासात योगदान देणारा ठरतो. सर्वसामान्यत: कोणत्याही विद्यापीठामध्ये भाषा विषयाचा अभ्यास म्हणजे त्यातील साहित्याचा अभ्यास असे समीकरण रूढ झालेले आढळते. वाङ्मयाच्या (ललित व वैचारिक) वाचन, अभ्यासामुळे कलात्मक सौंदर्य चिंतनशीलता व स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता हे गुण वाढीस लागतात अशी मान्यता आहे. ही धारणा सर्वच भारतीय आणि प्रादेशिक भाषांबद्दल दिसते. मात्र पारंपरिक रूढ प्रकारच्या पुस्तकी शिक्षणातून विद्यार्थी सर्वांगीण भाषिक विकास पावत नाही. अशा वेळी जीवन आणि शिक्षण या दोहोंची सांगड घालून समाज जीवनात आज कशाची गरज आहे ते ओळखून त्याप्रकारचे शिक्षण विद्यार्थ्याला मिळाले पाहिजे याचा विचार संध्याच्या शैक्षणिक अभ्यासक्रमातून केला जाऊ लागला. ज्याप्रमाणे आपले सामाजिक व्यवहार वाढलेले आहेत व्यक्तीच्या नकळतही अनेक व्यवहारक्षेत्र आपल्या जीवनाला स्पर्श करीत आहेत. साधारणपणे त्या त्या क्षेत्रातील व्यवहार करताना वापरण्याच्या व्यवहारिक भाषेची किमान ओळख असणेही प्रत्येक व्यक्तीची आजची गरज झालेली आहे. या गरजेला लक्षात घेऊनच मराठी अभ्यास मंडळाने प्रत्येक विद्यापीठांतर्गत 'प्रयोजन मूलक हिंदी' किंवा 'Functional English' च्या धरतीवर 'व्यावहारिक मराठीच्या पत्रिकेचा समावेश करण्याचा निर्णय अमलात आणला.हा निर्णय अमलात आणताना विद्यार्थ्यांनी अध्ययन, अध्यापन, व्यावसायिकदृष्ट्या स्वत:च्या आयुष्यात समाजासाठी आणि उपजीविकेसाठी 'आत्मनिर्भर' व्हावे हे एक मूलभूत प्रयोजन होय. तेव्हा मराठी भाषेला असलेल्या बहुविध दिशा बघता कोविड–१९ च्या आपत्तीजनक काळानंतर विशेषत्वाने आत्मनिर्भर भारत अभियानात मराठीचे योगदान आणि संधी याबद्दल विस्ताराने विचार करणे क्रमप्राप्त आहे. सर्वप्रथम 'मराठीची व्यवहार क्षेत्रे'कोण कोणती आहेत ती जाणून घेऊ.

**मराठीभाषेची व्यवहार क्षेत्रे :**

डॉ.ल.रा. नसिराबादक यांनी,"व्यावहारिक आणि सार्वजनिक जीवनाच्या विविध क्षेत्रांत आणि माध्यमांतून आपले विचार नेमक्या व नेटक्या शब्दांत प्रभाविपणे प्रकट करण्यासाठी विद्यार्थीमन समर्थ बनवावे, या दृष्टीने कार्यालयीन टिप्पणी, बातमी लेखन, जाहिरात मसुदालेखन पत्रलेखन' [१]इ. लेखन प्रकारांची गरज मान्य केली आहे. व्यवहारिक आणि सार्वजनिक जीवनाच्या विविध क्षेत्रांत तसेच विविध माध्यमांतून आपले विचार नेमक्या व नेटक्या शब्दांत प्रभावीपणे प्रकट करण्यासाठी विद्यार्थीमन आणि कौशल्ये समर्थ बनविल्या खेरिज ते आत्मनिर्भर होऊ शकणार नाहीत. त्यामुळे बोलावे कसे ? या

भाषिक कौशल्यांबरोबरच " आंशयलेखन, कथालेखन, संवादलेखन,शब्दांकन, प्रासंगिक पद्यरचना हे लेखनाविष्कार म्हणजे निर्मितीच्या दिशेने नेणाऱ्या वाटा होत. ज्यापुढे चरित्र आत्मकथन, पटकथा–अनुबोध पट, नभोनाट्य, श्रुतिका प्रबोधनपर संवाद इ. लेखनाच्या क्षेत्रांना जाऊन मिळतात."[२] एकूणच मराठीच्या व्यवहार क्षेत्राला खूप आयाम आहेत असे आपल्या लक्षात येते. जीवनाचे अविभाज्य अंग असलेल्या वृत्तपत्राचे वृत्तसंपादन असो, बातमीलेखन असो, अग्रलेख, वृत्तलेख, वृत्तांत, विविध विषयावरील लेख असो, मुलाखत असो, साहित्य–क्रीडा–रंगभूमी–कला–चित्रपट–संमालोचन इ. विविध प्रकारचे लेखन करणाऱ्यांची नियतकालिकांना खूप गरज असते. यातिल तंत्र आत्मसात करून माहितीपूर्ण लेखन करणाऱ्यांना या भाषिक क्षेत्रात भरपूर वाव मिळू शकतो.

**आत्मसात करण्यासारखे आणखी काही व्यवहार क्षेत्र :**

व्यावहारिक मराठीचा अभ्यास हा नेमक्या शब्दांची निवड अर्थच्छटांची जाण, शब्द–शब्दार्थांची जाण व्याकरणदृष्टया निर्दोष पण प्रभावी रीतीने भाषेचा उपयोग कसा करावा याचे भान जागृत होण्यासाठी आवश्यक ठरतो. सामान्यत: स्वत:चे भाषिक कौशल्य वाढविण्यासाठी भाषेला वजन, सौंदर्य व वेधकपणा येण्यासाठी भाषेतील वाक्प्रचार, म्हणी, अलंकार यांचाही अभ्यास आवश्यक आहे. मुख्य म्हणजे भाषा कधीही शुध्द वा अशुध्द अशी नसते. तर ती सदोष वा निर्दोश अशा स्वरूपात प्रगटते. अशा वेळी लेखन व्यवहारात असणाऱ्या प्रत्येकाने लेखन व्यवहाराची निर्दोषता शुध्दलेखनावर अवलंबून असते हे समजून घेण्याची विशेषत्वाने गरज आहे.

आज मनुष्य मिश्र युगात, मिश्र भाषिक संस्कृतीत वावरतो आहे. अशावेळी सारलेखन आणि भाषांतर या प्रगत भाषिक कौशल्यांना अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे मनुष्याचे संज्ञापनक्षेत्र फक्त एखाद्याच भाषेपुरते मर्यादित राहिलेले नाही. दैनंदिन व्यवहाराचा बहु–आयामी क्षेत्रात जिथे जिथे भाषा कळण्याची अडचण निर्माण होते तिथे तिथे मूळ भाषेतून स्वत:ला अथवा जाणून घेणाऱ्यास कळणाऱ्या भाषेत अनुवाद करून घेऊन अशा अडचणीचे निराकरण करता येते. अशा प्रकारच्या अन्य भाषिक अनुवादक्रियेसच भाषांतर असे म्हणतात.आजच्या जाहिरातीच्या युगात भाषिक देवाण घेवाणी चा व्यापार इतक्या मोठ्या प्रमाणावर वाढला आहे आणि त्याची अपरिहार्यता इतकी वाढली आहे की, पूर्वी कधीही नव्हते इतके महत्व आज भाषांतराला प्राप्त झाले आहे. त्या दृष्टीने अशी एक अभ्यासकांची मान्यता आहे की, आंतरराष्ट्रीय व्यवहाराची भाषा म्हणून इंग्रजीचे चांगले ज्ञान असणे आवश्यक आहे. राष्ट्रभाषा म्हणून हिंदीचे तर प्रादेशिक भाषा म्हणून महाराष्ट्र राज्यात तरी मराठीचे उत्तम ज्ञान असणे आवश्यक आहे.

त्यामुळे भाषांतर विद्येत नैपुण्य मिळविण्यासाठी विशेषत्वाने प्रयत्न करणे अगत्याचे ठरते. कुठल्याही गोष्टीचे लेखन वा पुनर्लेखन करण्यासाठी सर्वप्रथम साराचे आकलन होणे आवश्यक ठरते. तेव्हा अभ्यासकांच्या मते" सारांशलेखन ही एक आकलनप्रक्रिया आहे ; आपल्या दैनंदिन जीवनातील नित्याची गरज आहे. एखाद्या विस्तृत लिखाणातले नेमके मुद्दे व त्याचा गाभा हेरून मूळ आशयाला धक्का न लावता सारांश करता येणे, हेही महत्वाचे भाषिक कौशल्य होय."[३]

पत्रलेखनाचे कौशल्य कमावणे ही देखील काळाची गरज होय. जरीही आता स्मार्टफोनचा काळ असला तरीही त्यावर पत्र लेखन म्हणजे एस.एम.एस.ने पण दीर्घ संदेश लिहिता येणे अथवा कधी तरी आपल्याला पत्रलेखनाची निकड निर्माण होते. अशा वेळी आपले विचार आणि भावना व्यक्त करण्याचा साधा, सोपा आणि उत्तम मार्ग म्हणजे पत्रलेखन होय हे लक्षात ठेवणे गरजेचे. परस्परांमधील संवाद साधण्यास पत्र हे महत्वाचे माध्यम मानले जाते.व्यावहारिक किंवा औपचारिक पत्रे लिहिण्यास अचूक शब्दांची आणि वस्तुनिष्ठ मांडणीची गरज असते. तर अनौपचारिक पत्रांमध्ये भावनिष्ठ मांडणीची आवश्यकता असते.

**प्रसारमाध्यमे आणि मराठीभाषा :**

दैनंदिन जीवनात आपण बोलतो तसे सहजतेने लिहावे कसे ? आणि कृत्रिमतस, ग्रांथिकता व बोजडपणा हे दोष कसे टाळायचे या दृष्टीने अभ्यास आणि सराव केल्यास प्रसारमाध्यमांसाठी लेखन करतायेणे शक्य होते. जसे श्रवणाच्या सहाय्याने भाषेतून श्रुतिका ऐकताना दृक्प्रत्यय देणे या गुणाची नभोवाणीवर गरज असते तर चित्रवाणीसाठी मुळातच दृयचित्रातून बरेच काही व्यक्त होत असल्याने आवश्यक तसेच भाषेचा उपयोग करणे योग्य ठरते.

जाहिरात या क्षेत्राबाबत विचार करायचा झाल्यास जाहिरातींसाठी परिणामकारक लेखन करता येणे हे सर्वात लाभदायक भाषिक कौशल्य होय. ''नाविन्याचा शोध, परंपरेतले जे चांगले आहे ते स्विकारण्याची तत्परता, शब्दाची

काटकसर,चटकदारपणा आणि औचित्यपूर्ण अभिरूची हे विशेष प्रगट करता आल्यास वेधक आणि यशस्वी जाहिरात नक्कीच करता येते''[४] सध्याचे युग जाहिरातीचे युग म्हणून ओळखले जाते.जाहिरात हे उपजीवीकेचे उत्तम असे माध्यम होय. त्यातील कौशल्य हस्तगत केल्यास आजच्या आपत्तीजनक परिस्थितीतही आत्मनिर्भर होऊन योगक्षेम चालविण्यास हे एक उत्तम क्षेत्र होय. श्री.ल.रा.नासिराबादकरांनी म्हटले आहे की ''उत्पादित वस्तूच्या वापरासाठी मागणी निर्माण करणाऱ्या कलेला जाहिरात असे म्हणतात. वैज्ञानिक प्रगतीच्या बदलत्या युगाने लोकांपर्यंत पोहचण्यासाठी जाहिरातीला अनेक माध्यमे उपलब्ध करून दिली आहेत. रोजची वर्तमानपत्रे, मासिके, भिंतीवरील पोस्टर्स, विजेच्या खांबावरील फलक, घराच्या रंगविलेल्या भिंती, सिनेमातील स्लाइडस, आकाशवाणी आणि दूरचित्रवाणी अशा कितीतरी माध्यमाद्वारे जाहिरातीचे स्वरूप बदलते.''[५] पूर्वीच्या जाहिरातीच्या तुलनेत आज जाहिरातींचे स्वरूप खरोखरच स्थूल स्वरूपाकडून सूक्ष्मतेकडे वळले आहे. ज्यांच्या ठिकाणी जशी प्रतिभा आणि प्रगटीकारण असेल त्यानुसार जाहिरातक्षेत्रात आपले स्थान परिश्रमाने निश्चित करून आत्मनिर्भर होता येऊ शकेल. जाहिरातीचे भाषांतर हेही उपक्षेत्र ज्यांना अनुवादित कौशल्य आजमावयाचे असेल त्यांच्यासाठी एक उत्तम संधी म्हणून उपलब्ध आहे. आकाशवाणीवरील जाहिरातीसुध्दा लेखन आणि दूरचित्रवाणीवरील संहितालेखन या दोन्हीमध्ये मितींचा फरक पडतो. या दोन्ही दृकश्राव्य माध्यमात खरी कसरत अल्पवेळेत संपूर्ण आशय मसुद्यात बसविणे यात असते तेव्हा हे एक प्रसिध्दी व पैसा मिळवून देणारे आव्हानात्मक क्षेत्र होय.

प्रसारमाध्यमे आणि मराठी भाषा यांच्या परस्परानुबंध व्यक्त करतांना डॉ. भास्कर शेळके म्हणतात, ''प्रसारमाध्यमे ही समाजाचा आरसा आहेत. समाजात घडलेली प्रत्येक घडामोडी टिपून तिला घराघरात पोहोचविण्याचा व्यवसाय ती करत असतात. येथे व्यवसाय हा शब्द जाणीवपूर्वक वापरायचे कारण म्हणजे, आर्थिक उत्पन्न हेच प्रत्येक प्रसारमाध्यमाचे उद्‌दिष्ट असते. सकाळी उठल्यावर आपल्यासमोर वृत्तपत्र येते याशिवाय व्यवसाय, ज्ञान, संवाद आणि मनोरंजन या अनुषंगाने कॉम्प्युटर व इंटरनेटच्या माध्यमातून प्रत्येक माणूस आज जगाला जोडला गेलेला आहे. आकाशवाणी दुरदर्शन, वृत्तपत्र, इंटरनेट, फोन, चित्रपट, नाटक आणि लेखन ग्रंथ ही सारी प्रसारमाध्यमे आपल्या रोजच्या जीवनाशी प्रत्यक्ष संबंध प्रस्थपित करतात. आपल्या विचाराला आणि कृतीला ती जोडली जातात. एक गोष्ट खरी की, ही सारी प्रसारमाध्यमे भाषेच्या कौशल्यावर उभी आहेत.भाषा हेच या माध्यमांचे बलस्थान आहे.''६

**मुलाखत लेखन, घोषणापत्रके, संहिता आणि स्मरणिका संपादनातील संधी.**

मानवी व्यक्तिमत्वाच्या साक्षात अभिव्यक्तीचा एक प्रकार म्हणजे मुलाखत. केवळ वृत्तपत्रे नियतकालिके यातच नव्हे तर आकाशवाणी, दूरदर्शन आता तर यू टयूब, फेसबुक, ट्विटर, ब्लॉगर यासरख्या सोशल नेटवर्किंगच्या साइटस्‌वर देखील मुलाखत हा एक लोकप्रिय प्रकार आहे. मुलाखत हे व्यक्तीला समजून घेण्याचे एक माध्यम म्हणता येते. राजकीय नेते मोठे साहित्यिक, कलावंत, अभिनेते, सामाजिक कार्यकर्ते, उद्योगपती प्रगतीशील शेतकरी, शास्त्रज्ञ, कर्तृत्वान महिला इ. अशाच व्यक्तीची नव्हे तर होतकरू तरूण कामगार स्त्री पुरूष, विद्यार्थी, युवा, बाल अशी विविध व्यक्तिमत्वे मुलाखतीचा विषय होऊ शकतात. तेव्हा मुलाखतकाराने ज्याची मुलाखत घ्यायची आहे त्यांच्या कार्याचा पूर्वाभ्यास करून, त्या व्यक्तिच्या आवडत्या विषयावर बोलणे सुरू करून तिचा विश्वास संपादन करीत अनौपचारिक वातावरणात तिला बोलके करणे आणि कोणत्या क्षेत्रातील व्यक्ती आहे ते जाणून सावधतेने त्याची मुलाखत खुलवायची हे कौशल्य आहे. यात लिहू बोलू शकणाऱ्यांनी संधी मिळताच तिचे सोने करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्यासाठी विविध माध्यमांची अधिक दालने खुली होऊ शकतात.

घोषणापत्रके' ज्याला म्हटले जाते त्याला जाहीर निवेदन हे नाव अधिक रूढ आहे. 'काही कामाच्या बाबतीत एखादी कंपनी संस्था कार्यालय यांनी घेतलेले निर्णय सर्व संभासदांपर्यत आणि काही वेळा सर्व जनतेपर्यंत पोहोचविणे आवश्यक असते. विशेषत: निवडणूक खरेदी–विक्री, मालाचा लिलाव, नव्या योजनांबद्दल निर्णय माहिती जाहीर स्वरूपात प्रकट करणे, केवळ सोय म्हणून नव्हे तर कायद्याच्या दृष्टीनेदेखील, आवश्यक असते,'' [७] जाहीर निवेदनाची कामे कार्यालयात काम करणाऱ्या कर्मचारी शिक्षकांना तर यावीच लागतात परंतु अशा प्रकारची कामे कंत्राटदारीने घेता येऊ शकतात. हा एक चांगला व्यवसाय आहे. यातील व्यवसायात माहितीपत्रक किंवा प्रसिध्दी पत्रकाच्या कामांना फार मोठया प्रमाणात मागणी असते. जसे ''सांस्कृतिक संस्था, सहकारी संस्था, बॅका, सरकार, उत्पादन करणाऱ्या वेगवेगळ्या कंपन्या यांना

आपल्या नवनव्या योजनांची/उत्पादनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविणे आवश्यक असते. त्यासाठी माहितीपत्रकांचा उपयोग केला जातो. यांना निर्देशपुस्तिका असेही म्हणतात.''[८]

व्यावहारिक मराठीच्या भाषा–प्रकाशन व्यवहारात संहिता संपादन प्रक्रियेला महत्वाचे स्थान आहे. सामान्यपणे लेखन जे काही लिखित रूपात निर्माण करतो त्याला संहिता असे म्हणतात. एखाद्या लेखकाने लिहिलेले लिखितरूप प्रकाशित होण्यापूर्वी ज्या अनेक गोष्टीच्या प्रक्रियेत संहिता संपादकाकडून संहितेचे सखोल परीक्षण, पुस्तक माध्यमासाठी आशय भाषेवरील संपादकीय संस्कार, मुखपृष्ठ ते पाठपृष्ठापर्यंतची सगळी मांडणी एवढा सगळा भाग येतो. एखाद्या ग्रंथाच्या मजकुराच्या हस्तलिखित प्रतीचे मुद्रणप्रत तयार करणे, लेखन विषयक नियम व शुध्दलेखन, संदर्भ लेखन, सूची कोशांचा वापर अशा प्रकारे संपादित कामांची व्याप्ती असते.

स्मरणिकेचे संपादन हे देखील अत्यंत कौशल्याचे कल्पकतेचे आणि समन्वयाचे काम असते. ग्रंथलेखन आणि ग्रंथसंपादन यापेक्षा स्मरणिका संपादन हा प्रकार निराळा असतो. व्यक्ती किंवा संस्था यांचे कार्य व यशसंपादन लक्षात राहील अशा स्वरूपात समाजापुढे ठेवण्याचे चांगले माध्यम म्हणजे स्मरणिका. काही वेळा तिचा उल्लेख 'गौरविका' असाही केला जातो असे श्री. ल.रा. नसिराबादकर यांनी व्यावहारिक मराठी या ग्रंथात म्हटले आहे. व्यक्ती किंवा संस्था यांच्या जीवनातील विशिष्ट महत्वाच्या प्रसंगी स्मरणिका प्रकाशित केली जाते उदा. व्यक्तीच्या जीवनातील षष्टयाब्दिपूर्ती समारंभ, अमृत महोत्सव, सुवर्णमहोत्सव, शताब्दी महोत्सव इ. त्या त्या स्मरणिकेच्या स्वरूपानुसार संपादकाला स्वत:चे स्वरूप वर्गीकरण,छायाचित्रे, जाहिराती इ. अशा अनेक पैलुंवर विचार करत स्मरणिका संपादन पूर्णत्वास न्यावे लागते.

प्रकाशन व्यवसायात प्रकाशकाच्या सोबत अथवा स्वत: निर्माता म्हणून या क्षेत्रात कल्पकतेची संधी आहे. डी.टी.पी. चा व्यवसाय करणारे कितीतरी कल्पक प्रकाशक उत्तम संपादित बांधणीमुळे यशस्वी होतात. त्यांच्याकडे अक्षरजुळणीसाठी कार्यरत असलेले कितीतरी कर्मचारी उत्तम आकलनामुळे स्वत: संधी शोधत एक आत्मनिर्भर प्रकाशक म्हणून उदयाला येतात.

**ग्रंथ परीक्षण आणि मुद्रितशोध :**

आज शिक्षणाच्या प्रसारामुळे शहराप्रमाणे ग्रामीण भागातही वाचक वर्ग वाढलेला दिसतो. वाचक वाढल्यामुळे ग्रंथनिर्मितीही मोठया प्रमाणावर होऊ लागली आहे. परंतु असा वाचकवर्ग एखद्या विशिष्ट विषयाचा सखोल अभ्यास करणारा किंवा संशोधनासाठी वाचक करणारा असतोच असे नाही. परंतु प्रकाशित होणाऱ्या विविध ग्रंथाबद्दल त्याला कुतूहल असते. त्याला काय वाचायचे हे कळत नाही अशा वेळी पुस्तके आणि वाचक यांच्यामधील दुवा निर्माण करण्याचे काम ग्रंथपरीक्षणे ,रसग्रहणे करीत असतात. विविध वृत्तपत्रांतून, मासिकांतून प्रसिध्द होणारी परीक्षणे किंवा पुस्तक परिचय त्या वाचकाला लक्षणीय पुस्तकांतील विषयाकडे वेधण्यास प्रवृत्त करतात. अशा ग्रंथपरीक्षकांची देखील भाषा व्यवहारात मागणी असते. ज्यांना ग्रंथ चाळताच विषयाचे चटकन आकलन होऊन सुलभ भाषेत सार मांडता येतो. त्या ग्रंथपरीक्षकांसाठी वृत्तपत्र, नियतकालिके, प्रकाशन संस्थामध्ये भरपूर कामाच्या संधी उपलब्ध आहेत.

भाषा आणि लिपीव्यवहार हा मुद्रणव्यवस्थापनावर चालतो हे ज्यांना व्यावसायिकदृष्टया या क्षेत्रात उभे राहायचे आहे त्यांनी लक्षात घेणे आवश्यक आहे. मराठीतील मुद्रणपर्वाचा विषय अभ्यासल्यास असे लक्षात येते की, ''जॉन गेटनबर्गपासून मुद्राक्षरांच पर्व सुरू झालं. माणसाच्या आकलनशक्तीत त्यामुळे जे काही क्रांतिकारक बदल झाले.,ते काही प्रमाणात मुद्रणकला ही ज्या रेनेसान्स आणि नंतरच्या यंत्रयुगाचा भाग होती त्या युगाचा परिपाक होती. युरोपात मुद्रणकलेची सुरूवात धर्मप्रसाराचा भाग म्हणून झाली. आपल्या इथेही प्रथम खिस्ती मिशनऱ्यांनी भारतीय भांषांमध्ये मुद्रण करायला प्रारंभ केला. मुद्रणपर्व आपल्या इथे सुरू झाल्यानंतर इथेही आपल्या आकलनक्षमतेत लक्षणीय बदल झाले,'' मुद्रण आणि भाषाव्यवहार यांचा अनुबंध व्यक्त करताना दीपक घारे या लेखकाने 'मुद्रणपर्व' या ग्रंथात असे चिंतन व्यक्त केले आहे की, ''जावजी दादाजी चौधरी आणि राणोजी रावजी आरू यांनी देवनागरी टाइप तयार केल्यानंतर पंचांग पोथ्या–पुराणे, संस्कृतग्रंथ यांचा अधिक मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला. मुद्रणामुळे उच्चवर्णीयांनाच उपलब्ध असलेलं ज्ञानभांडार सर्वांसाठी खुले झाले. मॅकलुहान यांनी सांगितलेली पाश्चात्य मुद्रणसंस्कृतीची वैशिष्ट्ये येथे.रूजण्यापूर्वी मुद्रणाने इथले पारंपारिक भावविश्व अधिक व्यापक आणि दृढ केल.''[९]

यावरून आपल्या हे निश्चितच लक्षात येईल की भाषा व्यवहारात मुद्रणकला हे एक सांस्कृतिक धन आहे. ज्या देशात मुद्रणकलेचा विकास घडतो तेथेच संस्कृतीच्या प्रगतीची प्रसादचिन्हे अनूभवता येतात. अभ्यासकाच्या मते, जसे आपले उच्चार आणि लेखनातले शब्द शुध्द, अचूक आणि नेमके असायला हवे असते, तसेच मुद्रणही शुध्द, अचूक आणि नेटके असावे लागते. अचूक,नेमके,शुध्द आणि सुबक मुद्रण हे सुसंस्कृतता, गुणवत्ता, दर्जेदारपणाचे आणि प्रतिष्ठेचे द्योतक मानले जाते. 'म्हणूनच ग्रंथनिर्मितीच्या कार्यात ग्रंथमुद्रणास महत्वाचे स्थान आहे. सुंदर मांडणी व शुध्द आणि स्वच्छ मुद्रण हा त्यावरचा एक महत्वाचा संस्कार असतो. त्यामुळे प्रकाशन मुद्रण व्यवहारात मुद्रित शोधनाचे स्थान आणि कार्य सर्वात जास्त महत्वाचे आणि जबाबदारीचे आहे. कारण मुद्राक्षर योजना जुळणी हा जसा उपजीविकेचा व्यवसाय आहे. तसाच मुद्रितशोधन हा देखील एक महत्वपूर्ण व्यवसाय होय. मुख्य म्हणजे मुद्रितशोधन हा घरबसल्या व्यवसाय आहे. महिला प्रौढ,ज्येष्ठ लोकांनी मुद्रितशोधक म्हणून काम स्वीकारल्यास त्यांना कामाच्या ठिकाणी जाऊन कार्य करावे लागणार नाही. सद्यस्थितीत कोरोनाच्या आपत्तीजनक परिस्थितीत प्रकाशन व्यहारातील कागदी वापर जवळजवळ बंद होता. तो हळूहळू सुरूही झाला. मात्र या काळात तांत्रिक माध्यमाच्या आधारे डिजिटल प्रकाशन व्यवहार सुरूच होता. स्वाभाविकच विनामुद्रितशोधन करता कोणतेही साहित्य प्रकाशित झाले नाही. कारण मुद्रितशोधन न करता कोणतेही प्रकाशन झाले तर अर्थाचे अनर्थ होण्याच्या संभांवना वाढतात. तसेच छापून आलेले सर्वच शुध्द असते.' अशी लोकांची समजूत असते. त्यामुळे कळतनकळत लिहितांना त्यांचेच अनुकरण करण्याची प्रवृत्ती होत राहते. अशा वेळी अक्षरजुळणी प्रमाणबध्द व शुध्द असण्यासाठी मुद्रितशोधन अत्यंत महत्वाचे असते. मुद्रितशोधनाच्या खुणांचा नीट सराव करून शुध्दलेखनाचे कौशल्य हस्तगत केले तर या भाषिक व्यवसायात आत्मनिर्भर होण्याची संधी उपलब्ध आहे.

**मराठी भाषा,संगणक संवाद आणि इंटरनेट :**

आजचे युग हे माहितीतंत्रज्ञानाचे नेट युग म्हणून ओळखले जाते. व्यवहारातील सर्वच क्षेत्रांमध्ये संगणक वेगवेगळ्या कामासाठी वापरला जातो. मराठी भाषेच्या माध्यमातून संगणकावरून चालणाऱ्या संदेश व्यवहाराबरोबर त्याचा ज्ञानक्षेत्रात वापर कसा करून घेतला जातो याची जाण ठेवणे काळाची गरज आहे.

मनुष्याची संवादाची गरज पूर्ण करण्यासाठी संगणकाचा विविध पध्दतीने वापर होतो. जसे इंटरनेटचे महाजाल,लाखोच्या संख्येतील वेबसाईट्स आणि नेटच्या माध्यमातून माहितीचे मोठ्या प्रमाणात होणारे वहन संगणक संवादाची गरज लक्षात येते. उदा. 'गुगल'सर्च सारखे सर्च इंजिन आपल्याला अचूक माहितीपर्यंत पोहोचवते, एखाद्या साईटच्या अनेक पर्यायी लिंक देते. तसेच 'विकिपीडिया' सारखे मुक्त ज्ञानकोश आपल्याला माहितीच्या सागरात नेतात.

**मराठी विकिपीडिया:**

''मराठी विकिपीडिया हा मुक्त ऑनलाईन ज्ञानकोश प्रकल्पातील, मराठी भाषेतला ज्ञानकोश आहे. घरी–ग्रंथालयात ज्ञानकोशाचे खंड सांभाळणे, हाताळणे फारच जिकिरीचे असते. अशा अडचणीवर मात करणारा आणि वापरायला अधिक सोपा असा इंटरनेटची क्षमता वापरून निर्माण करणारा विकिपीडिया हा ज्ञानकोश आहे.'' [१०]

सर्वात महत्वाचे म्हणजे विकिपीडियात स्वत:चे खाते उघडून त्यात अनेक नोंदी रोज अद्ययावत करता येतात आणि केल्या जातात त्यामुळे या नेटकोशाची दररोज आवृत्ती निघते असे निश्चित म्हणता येते. आपण विकिपीडिया सारख्या असंख्य वेबसाईटमधून माहितीची गंगा अनुभवत असतो. आत्मनिर्भरतेसाठी विद्यार्थी, अध्यापक, रसिक आणि व्यावसायिक कोणत्याही स्तरावर आपल्याला अशा वेबसाइटवरून ज्ञान मिळवणे, विकिपीडीयालाही अद्ययावत करणे महत्वाचे आहे. मराठी भाषेत आता अनेक संकेतस्थळे हे काम करीत आहे. मराठी ई साहित्य संमेलनेही भरवली जात आहेत.

जगाच्या कानाकोपऱ्यात असलेल्या मराठी माणसांना एकत्र आणण्यासाठी १९९६ मध्ये 'मायबोली'[११] हे पहिले मराठीतले संकेतस्थळ सुरू झाले. या साईटने पुढे पत्रव्यवहार सुविधा, वधूवर सूचक केंद्र दिवाळी अंक, विक्री इ. सोयीही उपलब्ध करून दिल्या मराठी पुस्तकांच्या संमग्र गाथा–साहित्य त्यांच्या 'तुकाराम'[१२] संकेतस्थळावर आहे'महाराष्ट्राचे आधुनिक वाल्मिकी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ग.दि.माडगूळकर[१३] यांचे संपूर्ण साहित्य इंटरनेटवर आहे.' कवी कुसुमाग्रजांचे[१४] किंवा लोकप्रिय साहित्यिक पु.ल. देशपांडे योच्या विषयीचे संपूर्ण साहित्य संकेत स्थळांवर उपलब्ध आहे. व्यावहारिक मराठी भाषा व साहित्य व्यवहार करणाऱ्यांसाठी ही उपयुक्त स्थळे होत.

मराठी मुलांना ज्या प्रकारे इंग्रजी शिकविण्यास येते त्याच धर्तीवर अमराठी भाविकांना मराठी भाषा शिकविणारे 'मराठीमित्र'[१५] संकेतस्थळ आहे. महाराष्ट्रातील व्यसनमुक्तीविषयक एक महत्वाचा चालणारा उपक्रम म्हणजे मुक्तांगण व्यसनमुक्तीकेंद्र त्यात डॉ. अनिल अवचटांच्या विविध लेखनामधून रूग्णांचे अनुभव, प्रश्नावली किंवा डॉ. अनिता अवचटांचा परिचय दर्शन घडते.[१६] अशा प्रकारच्या कितीतरी संकेत स्थळांवर भाषाव्यवहाराची कामे आहेत. ऑनलाइन पुस्तक विक्रीचे महत्वपूर्ण संकेतस्थळ म्हणून www. Pustak.com , www. Bookganga. Com यावर इ–पुस्तके उपलब्ध होतात. संगणकावरील मराठी 'लोकायत' नावाचे स्वतंत्र संकेत स्थळ उपलब्ध आहे. या प्रत्येक संकेतस्थळावरून अभिव्यक्त होण्यास काही मर्यादा आहेत. म्हणून खास संवादासाठी मनोगत डॉट कॉम आणि उपक्रम डॉट कॉम असे कित्येक संकेतस्थळ उपलब्ध आहेत.

**इंटरनेटवरील संवाद माध्यमांतून उपलब्ध संधी :**

सद्यस्थितीत आपण क्षणोक्षणी ज्याचा अनुभव घेतो तो म्हणजे इंटरनेट वरील सोशल नेटवर्किंग किंवा मिडीयाचा. जसे ट्विटर, ब्लॉगर, वर्डप्रेस या ब्लॉग्ज साईट, फेसबुक सारख्या सोशल नेटवर्किंगच्या साइट्स, यू ट्यूब सारखी व्हिडीओ स्ट्रीमिंग साईट ही सर्वच इ–संवाद माध्यमे सध्या होतकरूंना काम मिळवून देत आहेत. लॉकडाऊन सारख्या आपत्तीजनक परिस्थितीत तर कितीतरी व्यावसायिक कार्यक्रम तिकिट लावून आभासी पध्दतीने मोबाईल, लॅपटॉपवर सादर झालेत. खरेदीविक्री ही इंटरनेटवर चालणारी फार मोठी सुविधा असून ऑनलाइन शॉपिंग सध्या शहरापासून तळागाळापर्यंत मोठ्या प्रमाणात उपलब्ध सेवा आहे. ही तांत्रिकता न कळणाऱ्यासाठी ही हजारो दुकान ग्राहकांच्या मदतीला उभी आहेत. त्यामुळे तंत्रज्ञानाने फार मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करून दिला आहे. याखेरिज जगभरातील पाच हजाराहून अधिक वर्तमानपत्रे इंटरनेटवर उपलब्ध आहेत.

अनेक संकेत स्थळावर गद्य साहित्य, कथा,कादंबरी कविता अशा लिंक आहेत. खास मराठी वाचकांसाठी काही लिहिणाऱ्यांसाठी मराठी माती डॉटकाम, मराठी माया, मनोगत अनामिका, मराठी वाचनालय, शब्दगंध,मराठी जगत, इये मराठीचिये नगरी किंवा खुद्द महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा संचालनालयाचे संकेतस्थळ किंवा मराठी शब्दकोश अशा कितीतरी माहितीचे आणि कामांचे स्त्रोत उपलब्ध असणाऱ्या संकेतस्थळांना भेटी देता येतात. लेखन, वाचन, प्रकाशन, मुद्रण या सर्वच व्यवहारात इंटरनेटवरील संवाद माध्यमे ही पूरक ठरतात. सूत्रसंचालन, निवेदन, व्याख्यान अशा कितीतरी ठिकाणी या संवाद माध्यमांचा उपयोग होतो.

**आत्मनिर्भर भारत अभियानात मराठी भाषेच्या संधी:**

आत्मनिर्भर भारत अभियान ही भारत सरकारची अशी महत्तम योजना आहे, जी महामारीच्या काळात लॉकडाऊनच्या परिस्थितीत देश जेव्हा आर्थिक संकटात सापडला तेव्हा या अभियानाचा आरंभ झाला. ''विद्यमान पंतप्रधन मा. नरेंद्र मोदी यांनी कोव्हिड १९ विरूध्दच्या लढ्याच्या पार्श्वभूमीवर ११ मे २०२० रोजी पहिल्यांदा 'आत्मनिर्भर म्हणजेच स्वयंपूर्ण किंवा self reliant आपल्या गरजा आपणच पूर्ण करायच्या, असा याचा ढोबळमानाने अर्थ होतो.''[१७] आत्मनिर्भर भारत२०२० योजनेचे जे पाच आधारस्तंभ सांगितले गेले. त्यात,'' १. अर्थव्यवस्था– संख्यात्मक वाढीव भर,२. पायाभूत सुंविधा– आधुनिक भारताची ओळख

३. सरकारी यंत्रणा (सत्ताधारी आणि प्रशासन)– तंत्रज्ञानधिष्ठीत

४. तरूण पिढी– मनुष्यबळ विकास, कौशल्यविकास

५. मागणी– क्षमतेचा पुरेपूर वापर ''[१८]

या उपरोक्त पाच स्तंभापैकी तरूण पिढीने मनुष्यबळ विकास, कौशल्य विकास यावर जरी लक्ष केंद्रित केले तरी ही योजना कष्टकरी, नियमित कर भरणारे, कुटीरोद्योग, गृहउद्योग, लघू आणि मध्यम स्वरूपाच्या उद्योगासाठी उपयुक्त आहे असे लक्षात येईल. देशात आर्थिक स्थितीला वेग मिळावा म्हणून आत्मनिर्भर भारत अभियान २०२० मध्ये सर्वात जास्त जोर स्वयंरोजगारावर दिला गेला आहे. यासाठी भारत सरकारने अनेक प्रकारचे लोन तसेच सब्सिडी योजनांचा शुभारंभ केला. मराठी भांषा व्यवहाराच्या कोणत्याही प्रकारच्या लघुउद्योगासाठी जसे,डीटीपी.केंद्र, इंटरनेट माध्यमे प्रस्तुती केंद्र, जाहिरात केंद्रासाठी आत्मनिर्भर भारत अभियान पॅकेज २०२१ अंतर्गत ऑनलाइन कर्ज प्राप्ती होऊ शकते. त्यासाठी होतकरू तरूणांनी instapdf.in वर विस्तृत माहिती बघितल्यास भविष्यकालीन काही आराखडे निश्चित होऊ शकतात.

एकूणच भाषाव्यवहारात व्यावहारिक मराठी आणि मराठी साहित्य अंतर्गत पुढे दिलेले व्यवसाय उभे करता येऊ शकतात.

१. डीटीपी ची केंद्र स्थापन करून मुद्रण व्यवसाय करणे.
२. मुद्रणशोधनाची कामे व्यवसाय म्हणून स्वीकारणे.
३. हस्तलिखिताचे निर्दोष प्रमाण लेखन करून देणे.
४. बातमी लेखन, वृत्तसंपादन, पत्रकरिता, वृत्तांत.
५. स्वतंत्ररित्या लेखक म्हणून काम करणे.
६. सूत्रसंचालन, निवेदन, शोकसंदेश लेखन, सन्मानपत्र लेखन.
७. ग्रंथपरीक्षण— संपादन.
८. आकाशवाणी— दूरदर्शनसाठी विविध स्वरूपाचे लेखन प्रस्तुतीकरण.
९. संस्था, विद्यालये, कंपन्यांच्या संकेत स्थळांसाठी मजकूर लेखन.
१०. अध्ययन – अध्यापन आणि जाहिरातीसाठी ब्लॉगर्स म्हणून लेखन आणि प्रस्तुती.
११. काव्यगुण असल्यास लेखी आणि दृकश्राव्यमाध्यमातील जाहिरातीसाठी लेखन मुद्रण करून देणे.
१२. ललितकलेचे उत्तम आकलन असल्यास मुखपृष्ठ – पाठपृष्ठांचे आकर्षक आयोजन करून देणे,
१३. वाढदिवस— पुण्यस्मरणानिमित्त लेखन – मुद्रण प्रकाशनाचे काम स्वीकारणे इ. असे कितीतरी भाषिक व्यवहार आज उपजीविकेसाठी खुले आहेत.

**समारोप:**

मराठी भाषेचा वाङ्मय व्यवहार हा फार प्राचीन आहे. मराठी भाषेला प्राचीन काळापासून ते वर्तमान परिस्थितीपर्यंत विविध आयाम आणि दालने उपलब्ध आहेत. परिवर्तनाच्या प्रत्येक क्षणी मराठी भाषेने काळानुरूप पहिलेच पावले उचलली. त्यामुळे साहित्य व्यापारापासून तर आजच्या व्यावहारिक मराठी भाषेच्या काळापर्यंत मराठीचे योगदान नेहमीच महाराष्ट्राला आणि जिथे जिथे मराठी भाषा नांदते त्या सर्वच प्रदेशाला समृध्द करत आला आहे. मूलत: मराठी लवचिक असल्यामुळे तिने स्वत:ला समृध्द करताना कोणत्याही मर्यादा घालून घेतल्या नाहीत. ती कालप्रवाहात प्रत्येक संकटांचे संधीत रूपांतर करत गेली. स्वातंत्र्यापूर्वी जशी स्वदेशीची चळवळ भारताला अधिक स्वावलंबी करून गेली त्याचप्रमाणे इतिहासातून चांगल्या गोष्टी स्वीकारत कोरोना या संसर्गजन्ये रोगाच्या आपत्तीतून बाहेर पडण्यास 'आत्मनिर्भर' भारत अभियानांतर्गत' ज्या योजना भारत सरकारने उपलब्ध करून दिल्या आहेत,त्या योजनांचा लाभ वर्तमान परिस्थितीत स्वयंरोजगार आणि रोजगार निर्मितीसाठी होऊ शकतो असा विश्वास वाटतो.

**संदर्भ :**

१. – व्यावहारिक मराठी: ल.रा. नसिराबादकर, प्रस्तावना, २००८
२. – उ.नि.
३. – साहित्यसरिता: व्यावहारिक मराठी, पृ. २ मे
४. – उ.नि.
५. – व्यावहारिक मराठी: ल.रा. नसिराबादकर, फडके प्रका. पृ. २११
६. – प्रसारमाध्यमे आणि मराठी भाषा: डॉ. भास्कर शेळके कर्मवीर प्रका. पृ.२७
७. – mr. m. Wikipedia.org
८. – साहित्यसरिता: व्यावहारिक मराठी, पृ.७०
९. – मुद्रणपर्व, दीपकघारे, परममित्र पब्लिकेशन्स, पृ.१३
१०. – Mr. m Wikipedia. Org
११. – www.maayboli.com
१२. – www tukaram. Com

१३. – www gadima. Com
१४. – www. Puldeshpande.net
१५. – www. Marathimitra. Com
१६. – www. Miktangan. Org
१७. – आत्मनिर्भर भारत bbc.com 14 मे 2020
१८. – Timesnowmarathi.com; 13 मे 2020

# विदर्भ का क्षेत्रवादी आन्दोलन, क्षेत्रीय असंतुलन की उपजः समाजशास्त्रीय अध्ययन

डॉ.श्रीनिवास पिलगुलवार
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
लोकमान्य महाविद्यालय, वरोरा. जि. चंद्रपूर

प्रस्तावना :

"क्षेत्रवाद किसी भी देश के लिए हमेशा से बुरा प्रभाव नही दिखता, यदि उस देश मे रहने वाले नागरिक या सरकार अपना राष्ट्रहित सही तौर तरीकों के व्दारा संचलित करने में सफल हो। इस अवस्था में भी देश के विकास में अहम भूमिका निभाता है। हम यह गलत नही मानते कि किसी व्यक्ती या नागरिक का अपने राज्य, देश या स्थान से लगाव होना, उसके प्रति अथह प्रेम की भावना उत्पन्न होना ठीक नही है, बल्कि यह तो उसके सम्मान की बात है। यह कथन स्वयं महात्मा गांधीजी ने सन 1904 मे कहा थे। उन्होने बताया कि मैं भारतीय होने के साथ गुजराती कहलाने में भी गौरवान्वित होता हूँ। क्षेत्रवाद की शुरूवात दूसरे विश्वयुद्ध से मानी जाती है। चाहे इसमें विकसित देश हो, चाहे विकसनशील या फिर अविकसीत देश। क्षेत्रवाद का नकारात्मक दृष्टीकोण तब सार्थक होता है, जहाँ यह राष्ट्र हितों का विरोध करे। क्षेत्रवाद किसी भी देश में उन्ही परिस्थितियों में उभरकर सामने आता है, जब किसी स्थान, प्रदेश या समुदाय के हितों की निरन्तर अनदेखी हो रही हो। किसी समुदाय के प्रती सामाजिक, आर्थिक, भौगोलिक संस्कृती के आधार पर भेदभाव हो, तो इन हालातों में आम जनमानस स्थानीय हितों की मांग करना आरम्भ कर देते है।"(चन्द्र :2002)

भूतकाल में हमारे देश में एकता का बड़ा अभाव रहा है और राष्ट्रीय एकता के अभाव के कारण अनेक बार विदेशियों से पराजित होना पड़ा। भारत अनेक छोटे–छोटे राज्यों में विभाजित रहा और वे राज्य प्रायः एक दूसरे से लड़ते रहते थे। इससे देश का पतन होता रहा फिर भी आदिकाल में भारत की सांस्कृतिक और भावात्मक एकता बनी रही है।(mukherjee:1992)वैदिक काल में राष्ट्रीयता और राष्ट्रभक्ति की प्रबल भावना विद्यमान थी। विविधताओं के होते हुए भी प्राचीन भारतीय संस्कृती ने भौगोलिक एकीकरण और समुच्चय की भावना को बनाए रखा। आज भारत में 29 राज्य और 7 संघीय प्रदेश है। इसका मुख्य कारण यह है कि, भारत ने स्वतंत्रता के बाद संघ–राज्यात्मक शासन पद्धती का स्वीकार किया है। भारत जैसे विशाल देश में जहाँ विभिन्न राज्य की संस्कृती, भाषा, जाति, धर्म, रहन–सहन, आर्थिक, सामाजिक स्थिती, परंपरा, प्रथाएं आदि घटकों में अन्तर है। वहाँ प्रादेशिकता या क्षेत्रियता की भावना मिलना स्वाभाविक है। यह भावना महाराष्ट्र में स्थित विदर्भ प्रदेश के लोगो के मन में भी दिखाई देती है। मगर क्षेत्रीयता की यह भावना राष्ट्रीय एकता के लिए खतरनाक है, धोखा है और इस क्षेत्रीयता के भावना से देश के टुकडे–टुकडे हो जाएंगे यह सोचना निराशावादी भावना एवं संकुचित दृष्टिकोण होगा।

"किसी भी देश में क्षेत्रवाद तभी फलता फूलता है, जब क्षेत्र के लोग यह महसूस करने लग जाए कि उनके साथ भेदभाव हो रहा है, या उनकी संस्कृती खतरे में हो। व्दितीय विश्वयुद्ध की समाप्ती के बाद से क्षेत्रीयता की समस्या दो अलग–अलग देशों में राजकीय कारको की वजह से बढ़ती जा रही है। क्षेत्रवाद की समस्या दो राष्ट्रो के अंदर मतलब आंतरराष्ट्रीय स्तर पर बढ़ रही है। साथ ही क्षेत्रवाद देश कें अंतर्गत किसी अलग–अलग प्रदेशों के लोगों के मन में भी प्रदेशवाद यह भावना बढ़ती जा रही है। भारत एक विशाल क्षेत्रफल और विशालकाय जनसंख्या वाला राष्ट्र है। लेकिन दुर्भाग्यवश इसके सभी क्षेत्र भौगोलिक भिन्नताओं के साथ–साथ इसके विभिन्न क्षेत्र सामाजिक , आर्थिक, राजनितीक दृष्टी

से समान रूप से विकसीत नही हो पाए है। और इसलिए इन क्षेत्रों में गहरा क्षेत्रीय असंतुलन बना हुआ है। ऐसा ही एक प्रदेश विकास के क्षेत्रीय असंतुलन का शिकार हुआ है, वह है महाराष्ट्र का विदर्भ प्रांत। प्रस्तुत शोध पत्र में महाराष्ट्र के विदर्भ क्षेत्र के असंतुलीत विकास के कारण वहाँ के लोगों के मन मे बढ़ रही क्षेत्रीयता का वस्तूनिष्ठ, यथास्थित एवं तटस्थ अध्ययन समाजशास्त्रीय दृष्टीकोण से करने का प्रयास किया जा रहा है।

क्षेत्र व क्षेत्रवाद की अवधारणा :

"मनुष्य एक सामाजिक प्राणी है। उसका अपने पास की भुमि से भावात्मक संबंध स्थापित हो जाता है, और कालान्तर में अपने पूरे क्षेत्र के प्रति उसकी निष्ठा विकसित हो जाती है। श्री राम माहे"वरी ने क्षेत्र को एक समाजशास्त्रीय अभिधारणा कहा है। किसी भूभाग को क्षेत्र कहने के लिए कुछ तत्वो का होना अनिवार्य है। लेकिन अभी तक उन तत्वो का निर्धारण ठिक प्रकार से नही हो पाया है। यदि भौगोलिक रूप से निश्चित किसी स्थान पर कुछ प्रक्रियांए एवं धारणाएँ समाज के अन्य भागो से भिन्न हो और लगातार काफी समय से चाहे अलग – अलग मात्रा में भी आ रही हो तो उस भाग को एक अलग क्षेत्र कहा जाता है।"(नागरः 2015)

"किसी भी भूभाग को क्षेत्र कहने के लिए कतिपय तत्वों का होना आवश्यक है। किंतू आज उन तत्वों का ठीक तरह से निर्धारण नही हो सका।ये प्रतिक्रियाँए और धारणाएँभौगोलिक, धार्मिक, भाषाई, रीति रिवाज सम्बधी सांस्कृतिक, आर्थिक और राजनितीक विकास कि स्थिती, रहन–सहन के ढंग और ऐतिहासिक पृष्ठभूमि इत्यादि पर आधारित हो सकती है। परन्तु किसी भी क्षेत्र के प्रथक स्वरुप के लिए प्रमुख बात वहाँ के लोगों में आपसी समरसता और एकरुपता तथा अन्य क्षेत्रो से अलगाव की भावना है।"(Reddy G. & Sharma B. :1979)क्षेत्रवाद के अर्थ में हम कह सकते है कि एक देश में या देश के किसी भाग में निवास करने वालेलोगो के छोटे समूह से है, जो आर्थिक, भौगोलिक, सामाजिक आदि कारणो से अपने प्रथक अस्तित्व के लिए जागरुक हो। साधारण से अर्थ में क्षेत्रवाद किसी क्षेत्र के लोगो की उस भावना एवं प्रयत्नो से है, जिनके व्दारा वे अपने क्षेत्र विशेष के लिए आर्थिक, राजनितीक तथा सामाजिक हितों में वृद्धि चाहते है। क्षेत्रवाद की अवधारणा कों अधिक विस्तृत एवं व्यापक रुप से स्पष्ट करने के लिएकुछ समाजशास्त्रज्ञ एवं राजनितीज्ञ के अध्ययन कर्ताओं ने क्षेत्रवाद की परिभाषा व्यक्त कि है।

1. हेविड हिन्टेजः का कहना है कि"सामान्य रुप से क्षेत्रीयतावाद को एक प्रतिक्रियात्मक आन्दोलन माना जा सकता है, जो की बढ़ा–चढ़ाकर प्रस्तुत कि गयी अथवा उग्र केन्द्रीकरण के विपरीत है।" आगे हिन्टेज कहते है, क्षेत्रीयतावाद एक गतीशील एवं व्यावहारिक अवधारणा है। यह शायद किसी एक कारक से निर्धारित होता है। बल्की क्षेत्रीयतावाद के पुनःनिर्माण एवं समर्थन के लिए आर्थिक पिछडेपन के रुप में
   राजनीतिकरण सहित अनेक परिस्थितीयाँ और कारक मौजूद रहते है।
2. इकबाल नारायणःका कहना है कि"भारतीय राजनिती का एक प्रमुख निर्धारण तत्व क्षेत्रीयवाद है, जिसकेकारण लोग भारतीय संघ की तुलना में उस राज्य क्षेत्र के विशेष को अधिक महत्व देते है, जिसमें वह रहते है।"
3. एस. के. खन्ना.: का कहना है कि "क्षेत्रीयतावाद राजनीतिक रुप से विभाजित जनसंख्या को समान
   भाषा, धर्म और ऐतिहासिक पृष्ठभूमी के आधार पर भाईचारा पैदा करने के लिए प्रोत्साहित करती है।"

साहित्य का परिक्षणः

1. श्याम देशमुख(2016):

आपने आचार्य पदवी के लिए "महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल आणि राजकारण: मराठवाड्याचा चिकित्सक अभ्यास" ईस विषय पर शोध कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विश्वविद्यालय में किया है। आपने आपके अध्ययन में भारतीय समाज में स्थित क्षेत्रीय असंतूलन की समस्या की चर्चा कि है। साथ में महाराष्ट्र राज्य में स्थित मराठवाडा प्रांत के क्षेत्रीय असंतूलन की अवस्था एवंउससे निर्माण हुई समस्या का यथार्थ अध्ययन अपने शोधकार्य के व्दारा किया है। क्षेत्रीय असंतूलन का परिणाम प्रांत के विकासपर कैसे नकारात्मक तरह पड़ता है।(श्याम देशमुख:2016)यह स्पष्ट करने का प्रयास किया है। आपने प्रस्तुत अध्ययन में महाराष्ट्र स्थित विदर्भ, मराठवाडा, कोकण एवं उत्तर महाराष्ट्र आदी प्रांतो में क्षेत्रीय असंतूलन की वजह से बढ़ता जन आक्रोश और अलगाव(Alination) की भावना लोगों के भितर उत्पन्न ही रही है, यह निष्कर्ष बताया है।(देशमुख:2016)

2. डॉ. भालचंद्र मुणगेकर(1999):

विश्वविद्यालय अनुदान आयोग के अवकाश प्राप्त पूर्वाध्यक्ष डॉ. भालचंद्र मुणगेकर ने 'A Paradox in Maharashtra'इस शिर्षक का एक संपादकीय लेख 'TheHindu' वर्तमान पत्र में प्रकाशित किया था। आपने आपके इस लेख में यह स्पष्ट किया कि महाराष्ट्र राज्य देश के दूसरे राज्यो से औद्योगीकरणमें प्रगत है। परन्तु महाराष्ट्र के सभी प्रांतो में औद्योगीकरण के विकास में अन्तर है यह स्पष्ट किया। आपका यह भी कहना है की महाराष्ट्र के विदर्भ और मराठवाडा क्षेत्र में विकास के अभाव के कारण प्रादेशिक असमतोल बढ़ रहा है। इसका परिणाम यह हो रहा है कि अलग राज्य के निर्माण की भावना हर क्षेत्र एवं प्रांत के लोगो के मन में उद्दीपीत हो रही है।(मूणगेकर:1999)

3. राज्य नियोजन मंडल का अहवाल(1993):

महाराष्ट्र राज्य सरकारने अपने राज्य का नियोजन पूर्वक एवं संतूलित विकास करने के लिए राज्य नियोजन आयोग का गठन किया है। इस आयोग के पदसिध्द् अध्यक्ष माननीय मुख्यमंत्री होते है।इस आयोग ने 1993 में राज्य नियोजन मंडल के सन्माननीय सदस्य श्री भुजंगराव कुलकर्णी इनकी अध्यक्षता में "महाराष्ट्र प्रदेश में स्थित पिछड़ें विभागों का विकास"इस विषय पर अध्ययन करने के लिए समिती का गठन किया। इस अध्ययन समिती ने महाराष्ट्र के सभी जिलों का प्रगत एवं पिछड़ा ऐसा वर्गीकरण किया। इसके लिए समितीने 12 प्रमुख तत्वों का आधार लिया था। इस समितीने जब अपना अहवाल राज्य सरकार को सौंप दिया, तब उस अहवाल में उन्होनें यह स्पष्ट कह दिया कि महाराष्ट्र के 36 जिलों में 17 जिलें विकास की दृष्टी से पिछड़े है। उसमें कोकण प्रदेश के 5 में से 3, मराठवाडा प्रांत के 8 में से 6 और विदर्भ के 11 में से 08 आदि। इस समिती का अहवाल यह निष्कर्ष दिखाता है कि महाराष्ट्रमेंमराठवाडा और विदर्भ क्षेत्र सबसे अधिक पिछड़े है।(SPC:1993)

अध्ययन का सैंध्दांतिक परिप्रेक्ष्य:

ऐतिहासिक रुप से भारत में क्षेत्रीय शक्तियों का उदय और विकास अपनी प्रारंभिक अवस्था में 19 वी शताब्दी के मध्य ब्रिटिश काल से प्रारंभ हो जाता है। बंगाल में साहित्य सुधार और सांस्कृतिक पुनर्जागरण की गतिविधियाँ इसकी प्रारंभिक अवस्था थी। भारतीय समाज में क्षेत्रीयतावाद एक सामाजिक शक्ती के रुप में हमेशा विद्यमान रहा है। इसके बारे अनेक समाजशास्त्रज्ञोंने अपने अध्ययन कें आधारपर स्पष्ट किये सिध्दांतोसे ज्ञापीत होता है।

1. रषीदुदीन खान:

इस समाजशास्त्री का यह तर्क है कि क्षेत्रवाद भारतीय संघवाद की संकल्पना के लिए सर्वाधिक अधिक महत्व का है। भारत का एक बहुक्षेत्रीय संघ के रुप में उल्लेख करते समय, खान तर्क देते है कि राष्ट्रीयता तथा नृजानीयता की अवधारणाएँ देश की सामाजिक–सांस्कृतिक विविधताओं की व्याख्या करणे के लिए पर्याप्त नही है। भारत में क्षेत्रो के विशिष्ट सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक, भाषायी आर्थिक और राजनितीक संकेतार्थ है और 'क्षेत्रीय पहचान'शब्दभारतीय समाज की बहुलता की एक बोधगम्य अभिव्यक्ती के रुप में लिया जाता है।

2. डी. सी. बर्मनः

डी. सी. बर्मन भारत में क्षेत्रवाद को इस रुप में देखतें हैं, एक सिध्दांत जो एक समूह के भितर एक क्षेत्रीय आधार पर प्रशासन के विकेंद्रीकरण को सूचित करता है। एक नितान्त एकसार राष्ट्रीय एकता के थोपे जाने के विरुध्द एक सामाजिक–सांस्कृतिक प्रति आन्दोलन, प्रतिनिधी सांस्कृतिक क्षेत्र हेतु और अधिक स्वायत्तता प्राप्त करने पर अभिलक्षित एक राजनीतिक प्रति–आन्दोलन। इस संदर्भ में यह गौर करना सुसंगत होगा कि क्षेत्रवाद एक जटिल दृश्यघटना है और इसे केन्द्र के सम्मुख एक स्वायत्ततार्थ आन्दोलन के रुप में अथवा संघीय प्रशासनीक असंतुलनों के विरुध्द एक प्रतिक्रिया के रुप में उतारना अति साधारणीकरण करने के समान ही है।

अध्ययन के उद्देषः

1. विदर्भ के क्षेत्रीय असंतुलन की समस्या का अध्ययन करना।
2. विदर्भ के क्षेत्रवादी आन्दोलन की ऐतिहासिक पार्श्वभूमी, वास्तविकता और प्रासंगिकता जानने हेतु।
3. महाराष्ट्र में विदर्भ राज्य निर्माण के संम्बध में हुए राजनिती का यथार्थ अध्ययन करने हेतु।

उपकल्पनाः

1. महाराष्ट्र के विदर्भ में क्षेत्रीय असंतुलन की समस्या क्षेत्रवाद की भावना को प्रोत्साहित कर रही है।
2. विदर्भ निर्माण का क्षेत्रवादी आंदोलन ऐतिहासिक पार्श्वभूमी की वजह से राज्य निर्माण के लिए आज भी अपनी वास्तविक प्रासंगिकता अलग–अलग आंदोलनोंसें स्पष्ट कर रहे है।

अध्ययन पध्दतीः

अनुसंधान एवं शोध एक ऐसी व्यवस्थित विधी है। जिसके व्दारा नये तथ्यों की खोज तथा पुराने तथ्यों की पुष्टी की जाती है, और उनके अनुक्रमों, परस्पर सम्बधों, कारणात्मक व्याख्याओं एवं प्राकृतिक नियमों जो उन्हे संचालित करते है, ऐसे अध्ययन को अनुसंधान कहा जाता है। समाजशास्त्रज्ञ ड्रेवर(Drever) के अनुसार "शोध का तात्पर्य किसी क्षेत्र में ज्ञान या पुष्टीकरण के लिए किया गया व्यवस्थित अनुसंधान है।" किसी भी अनुसंधान कर्ता को अगर अनुसंधान करना है, तो उसे वैज्ञानिक पध्दती का आधार लेना ही पड़ता है। अध्ययन कर्ता कोकिसी भी अध्ययन समस्या के सम्बध में स्पष्ट जानकारी प्राप्त करने का एक ही साधन है कि घटना का वैज्ञानिक विधी से ही अध्ययन किया जाये। वैज्ञानिक विधी ही वास्तविक ज्ञान प्राप्ती का सार्थक और स्पष्ट साधन है। अध्ययन कर्ता को वस्तुनिष्ठ अध्ययन के लिए तथ्यों का संकलन करना पड़ता है। तथ्यों का संकलन स्वयं मे एक महत्वपूर्ण तथ्य है। तथ्यों के संकलन के बिना कोई भी शोध कार्य संम्भव नही है। इसलिए प्रस्तुत शोध कार्य के लिए अनुसंधान कर्ता ने व्दितीय तथ्य संकलन विधी का उपयोग तथ्य संकलन के लिए किया है। व्दितीयक तथ्य संकलन विधी में सरकारी अहवाल, प्रकाशित शोध प्रबंध, अध्ययन विषय से सम्बधित प्रकाशित एवं अप्रकाशित लेख, संदर्भ ग्रंथ, वर्तमान पत्र, वेबसाईट आदि तंत्रो का उपयोग करके तथ्यों का संकलन किया गया है। संकलित तथ्यों का विश्लेषण एवं निर्वचन करके निष्कर्ष निकाले गये है।

तथ्यों का विष्लेषण एवं निर्वचनः

1 मई 1960 को संयुक्त महाराष्ट्र राज्य का निर्माण हुआ है। महाराष्ट्र में अभी 5 क्षेत्रीय प्रांत है, उसमे विदर्भ, मराठवाडा, कोंकण, उत्तर महाराष्ट्र और पश्चिम महाराष्ट्र आदि है। महाराष्ट्र राज्य में 6 प्रशासकीय विभाग और कुल 36 जिलें है। इन प्रशासकीय विभागों का संक्षिप्त विवेचन देखेंगे, पहिला विदर्भ–विदर्भ में दो प्रशासकीय विभागों का समावेश होता है। (अ) नागपूर प्रशासकीय विभाग–इस विभाग में नागपूर, भंडारा, गोंदिया, वर्धा, चंद्रपूर और गडचिरोली आदि 6 जिलों का समावेश है। (ब) अमरावती प्रशासकीय विभाग–इस विभाग में कूल 5 जिलों का समावेश होता है, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा और वाशिम आदि। इन प्रशासकीय विभागोंमें कूल 11 जिलें के क्षेत्र को विदर्भ प्रांत माना जाता है। महाराष्ट्र में दूसरा प्रांत है मराठवाडा, इस प्रांत में एक प्रशासकीय विभाग है, जिसका मुख्यालय औरंगाबाद है। मराठवाडा प्रशासकीय विभाग में कुल 8 जिलों का समावेश होता है, औरंगाबाद, जालना, परभणी, उस्मानाबाद, लातूर, नांदेड, हिंगोली और बीड आदि। महाराष्ट्र का तिसरा प्रांत कोंकण है, इस प्रांत में एक प्रशासकीय विभाग आता है। इस विभाग में मुंबई, ठाणे, नई मुंबई, रायगड, सिंधूदुर्ग, रत्नागिरी और पनवेल आदि 6 जिलों का समावेश होता है। महाराष्ट्र का चौथा प्रांत है उत्तर महाराष्ट्र, इस प्रांत में एक प्रशासकीय विभाग है। उसमें नाशिक, धुळे, नंदूरबार और जलगांव आदि 4 जिलों का समावेश होता है। पांचवा प्रांत है पश्चिम महाराष्ट्र, इस प्रांत में एक प्रशासकीय विभाग और कूल 6 जिलों का समावेश होता है। इसमें पूणे, अहमदनगर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर आदि।

उपर वर्णित सभी 5 प्रांत और 6 प्रशासकीय विभाग मिलाकर महाराष्ट्र राज्य का निर्माण हुआ है, महाराष्ट्र की कुल आबादी 112372972 है। राज्य का हर आदमी का औसत उत्पन्न 180596=00रु है। देश के विकसीत राज्यों की सूची में महाराष्ट्र का 5 वा नंबर है। देश के सकल घरेलू उत्पादन में 1रु की बढ़ोतरी होती है तो उसमें महाराष्ट्र का 13 पैसे का हिस्सा होता है। उसमें भी केवल मुंबई से देश के 1रु के उत्पन्न में 6 पैसे की हिस्सेदारी होती है। मतलब देश को मिलनेवाले कूल उत्पन्न में महाराष्ट्र का 13 प्रतिशत का योगदान होता है। महाराष्ट्र में सबसे अधिक विकसित प्रदेश पश्चिम महाराष्ट्र और कोकण है और बाकी प्रदेश जिसमें विदर्भ, मराठवाडा और उत्तर महाराष्ट्र यह विकास से आज भी कोसो दूर है। इनका विकास न होने की वजह से इन प्रदेशो में से खासकर विदर्भ में प्रदेशवाद के आंदोलन के माध्यमसे अलग राज्य निर्माण की मांग की जा रही है।

"विदर्भ प्रदेश का उल्लेख पौराणिक धर्मग्रंथो में मिलता है, प्राचीन धार्मिक कथाओं में, रामायण, श्रीकृष्ण–रुक्मिणी के स्वयंवर की कहानी में, इस कथा में कहा गया है कि रुक्मिणी विदर्भ की कन्या है। इस के अलावा नल–दमयंती, सातवाहन शासनकाल में, महाकवी कालीदास के शाकुंतल काव्य में, सम्राट अशोक के अनेक कथाओं में स्वतंत्र विदर्भ प्रदेश का उल्लेख मिलता है। विदर्भ का इतिहास प्राचीन काल से आज तक का गौरवशाली रहा है। ब्रिटिश सल्तनत के समय में विदर्भ की पहचान भारत के सबसे अधिक उपजाऊ प्रदेश में थी। ब्रिटिश राज में 1888 में तत्कालीन महसूल आयुक्त ने अलग विदर्भ राज्य निर्माण का प्रस्ताव ब्रिटिश सरकार को सौंप दिया था। 1905 में मध्य प्रांत के राज्य सचिव श्री मॉंटेग्यू इनके कार्यकाल में भी अलग विदर्भ राज्य निर्माण की मांग कि गयी थी। 1918 में ब्रिटिश सरकार की ओर से Constitutional Commission On Reforms के अहवाल में विदर्भ और ओरिसा राज्य निर्माण की बात कि गयी थी। 20-oct-1936 में ब्रिटिश सरकारने Central Provisence and Berar(C.P.& Berar) निर्माण करके विदर्भ को उसमें संम्मिलित किया।"(अणे:2016)1920 कें राष्ट्रीय कॉंग्रेस के नागपूर अधिवेशन में स्वतंत्र विदर्भ राज्य निर्माण का प्रस्ताव सर्व संमतीसे मंजूर किया गया था। 1-Oct-1938 में तत्कालीन सी. पी. ॲन्ड बेरार विधानसभा में विदर्भ प्रदेश के 8 जिलों के लिए नविनतम राज्य निर्माण का ठराव मंजूर किया गया था। यह प्रस्ताव बॅरिस्टर रामराव देशमुख इन्होने विधानसभा में प्रस्तुत किया था। विदर्भ राज्य के निर्माण के बारें में

अलग विदर्भ राज्य के गठन को विरोध करनेवाले लोगों का यह कहना है कि विदर्भ राज्य की मांग यह वहाँ के जनता की न होकर वहाँ के नेताओं की है। विदर्भवादीयों का यह कहना है, अगर यह मांग जनता की न होती तो महाराष्ट्र का निर्माण होने से पहले अलग विदर्भ का प्रस्ताव विधानसभा, काँग्रेस का अधिवेशन और ब्रिटिश सरकार की तरफ से मंजूर नही हुआ होता।

भारत की स्वतंत्रता के बाद 1948 में भारतीय राष्ट्रीय काँग्रेस का अधिवेशन जयपूर में संपन्न हुआ था। उस अधिवेशन में राज्य पुनर्रचना पर चर्चा की गयी थी। इस अधिवेशन में राज्य पुनर्रचना का अध्ययन करने के लिए जवाहरलाल नेहरु, सरदार वल्लभभाई पटेल और डॉ. पट्टाभी सीतारामय्या इन तीनों की(जेविपी)कमिटी स्थापन कि गयी थी। इस कमिटीने मुंबई इस नाम से नये राज्य का निर्माण का प्रस्ताव रखा था। "साथ ही इस समितीने यह भी कहा था की महाराष्ट्र और विदर्भ को अपना राज्य चूनने का अधिकार होना चाहिए। राज्य पूनर्रचना आयोग जिसे फजली अली कमीशन के नाम से जानते है, इस कमीशन ने बाकी राज्यों की कल्पना भाषावार प्रांत में की, लेकिन विदर्भ के बारें में उन्होने खास पूरा एक चैपट्र लिखा है। इस चैपट्र में उन्होने कुछ बातें साफ बताई, उन्होनें कहा कि विदर्भ एक संपन्न भाग है। और इस संपन्न भाग को अगर महाराष्ट्र के साथ शामिल कर दिया जाए तो इसपर सतत अन्याय होता रहेगा और महाराष्ट्र सुधरता रहेगा।"(चक्रवर्ती:2014)ब्रिटिश शासनकाल से स्वतंत्र भारत के समय तक अनेकोबार अलग विदर्भ राज्य निर्माण की बात जनता और राजनेताओं की तरफसे कह गयी है। लेकिन उसे मूर्त रुप जैसा होना चाहिए था, वैसा नही मिला इस कारण विदर्भ राज्य निर्माण का आन्दोलन शिथिल होता चला गया।

8 ऑगस्ट 1947 को एक करार किया गया, उस करार को अकोला करार के नाम से जाना जाता है। इस करार में यह निश्चित किया गया कि, मुंबई विभाग के 11 जिलो का डेक्कन और विदर्भ के 8 जिलों का विदर्भ ऐसे दो मराठी भाषिक अलग राज्य बनाए जाएंगे ऐसा करार कांग्रेस ने किया था। लेकिन इस करार को स्थापित करने में तत्कालीन पश्चिम महाराष्ट्र के नेताओंने बाधा लाई थी। इस करार में यह तय किया गया था कि, मुक्त संघ–राज्यीय रचना को मान्यता दी जाएगी, जिसमें दोनों राज्यों का स्वतंत्र विधान मंडल, स्वतंत्र न्यायव्यवस्था, स्वतंत्र कार्यकारी सरकारे और अलग–अलग मंत्रालय स्थापन करने की मान्यता दी गयी थी। लेकिन इसे कार्यान्वित करने में बाधा निर्माण करने का काम पश्चिम महाराष्ट्र के इतर राजनेताओं ने किया था। 28-Sep-1953 को नागपूर करार किया था। इस करार की वजह थी कि मुंबई के साथ समग्र मराठी भाषी बोलने वाले लोगों का एकही राज्य होना चाहिए, यह मांग संयुक्त महाराष्ट्र निर्माण का आंदोलन कर रहें नेताओं की थी। इन नेताओं की यह मनशा थी कि विदर्भ, मराठवाडा, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र और मुंबई यह सब प्रदेश मिलाकर संयुक्त महाराष्ट्र का निर्माण किया जाना चाहिए। इस कारण सर्व प्रथम 1953 में विदर्भ के नेतृत्व के साथ चर्चा करके, विदर्भ को संयुक्त महाराष्ट्र में संम्मेलित करने के लिए कुछ विशेष प्रावधानों की सुविधा देके संयुक्त महाराष्ट्र का निर्माण करने का प्रयास किया गया था। नागपूर करार में विदर्भ के लिए कुछ विशेष प्रावधान किये गये थे, उसमें यह कहा गया था कि महाराष्ट्र के निर्माण के बाद विदर्भ की जनसंख्या के अनुपात में विकासनिधी दिया जाएगा। विदर्भ में पिछड़े एवं अविकसीत क्षेत्र(गडचिरोली और मेळघाट) की तरफ विशेष ध्यान दिया जाएगा। प्रदेश के अनुसार निधी का वाटप किया गया जाएगा। इस क्षेत्र के विकास पर किये गयें खर्च का अहवाल विधानसभा के पटल पर रखकर उसपर चर्चा कि जाएगी। इस प्रदेश की जनसंख्यानूसार प्रदेश के नौजवानो को शिक्षा एवं सरकारी नौकरीयों में आरक्षण का प्रावधान किया गया था। इसका यह अर्थ था कि विदर्भ की जनसंख्याा 23 प्रतिशत थी। तो इस अनुपात में विदर्भ को 23 प्रतिशत नौकरियाँ 23 प्रतिशत राज्य मंत्रिमंडल में मंत्री, 23 प्रतिशत बजट का भाग और 23 प्रतिशत उच्च शिक्षा और अन्य तांत्रिक एवं वैद्यकीय शिक्षा संस्थाओंमें प्रवेश मिलना तय था। लेकिन संयुक्त महाराष्ट्र के निर्माण के बाद महाराष्ट्र के कुछ राजनेताओं ने राजनीति के वजहसे आज तक विदर्भ के विकास के लिए 23 प्रतिशत निधी का प्रावधान नही किया गया। इस कारण अलग

विदर्भ राज्य निर्माण का आंदोलन आये दिन उग्र स्वरुप धारण करता जा रहा है। पश्चिम महाराष्ट्र के नेता हीं हमारे विदर्भ के विकास में सबसे बड़ी बाधा निर्माण करते है, यह विदर्भ–वादी आंदोलन का नेतृत्व कर रहेनेताओं का मानना है।

" आज क्षेत्रीयता की भावना सारे देश में पूर्ण रुप से व्याप्त है, जोकि प्रायः सुनियोजित एवं सुव्यवस्थित आंदोलनों तथा अभियानों के रुप में प्रकट होती है। राजनितीक क्षेत्र में यह चार प्रकार से प्रकट होती है। जिन्हें हम इसके प्रकारों के रुप में ले सकते है। (1) कुछ राज्यों की जनता व्दारा भारतीय संघ से प्रथक होने की मांग। (2) जनता व्दारा प्रथक राज्य का दर्जा दिये जाने की मांग। (3) पूर्ण राज्य का दर्जा दिये जाने की मांग। (4) अन्तर–राज्यीय विवाद आदी।"(Khanna:1998)महाराष्ट्र के विदर्भ का क्षेत्रवाद का प्रकार यह दूसरे क्रमांक का क्षेत्रवाद है। यहाँ के जनता की मांग है कि विदर्भ को प्रथक राज्य का दर्जा दिया जाए। इस मांग की प्रमुख वजह क्षेत्रीय असंतुलन और स्वार्थी राजनेताओंकी राजनीति है। क्योंकि विदर्भ के साथ राज्य के अन्य क्षेत्र के नेताओंने धोखाधडी कि इस कारण विदर्भ क्षेत्र विकास से कोसो दूर रहा है, ऐसा विदर्भवादी नेताओंका कहना है।

"भारत देश को स्वतंत्रता मिलने से पहले भारत में जात, धर्म, भाषा, संस्कृती, प्रदेश आदि समस्याएँ विशेष प्रभावशाली नही थी। उस समय सबके सामने एकही लक्ष था कि किसी भी हाल में भारत को आजाद करना है। परन्तु भारत को स्वतंत्रता मिलने के बाद अपना प्रदेश, उसका विकास, अपनी भाषा, संस्कृती इन मुद्दों को विशेष महत्व प्राप्त होने के कारण अलगाववादी वृत्ती को बढ़ावा मिला इस कारण एकात्मता की समस्या निर्माण होकर क्षेत्रवाद का उदय हुआ। इस समस्या को रोखने के लिए कुछ हद तक केंद्रसरकारने पंचवार्षिक नियोजन के माध्यम से सभी क्षेत्रों का समान विकास करने का प्रयास भी किया लेकिन इसमें देश को सफलता हासील न होने के कारण देश में क्षेत्रीय असंतुलन की नयी समस्या निर्माण हो गयी।"(भोले:2011)

"जिस उदात्त भाव से प्रेरित होकर संयुक्त महाराष्ट्र के निर्माण के लिए 105 महानुभावों ने अपना बलिदान दिया था। उनको आज सब लोग भूल गये है। इस संयूक्त महाराष्ट्र आन्दोलन के इतिहास को महाराष्ट्र के संस्कृती, भाषा, समाज आदि गौरवास्पद एवं उन्नत विचारों को महत्व नहीं मिल रहा है। इस के अलावा न्याय और समान विकास यह मूद्दा महाराष्ट्र में अधिक परिणामकारक हो रहा है। जिस उदात्त भाव से प्रेरित होकर महाराष्ट्र में मराठवाडा और विदर्भ प्रांत शामिल हो गये थे। उनकी आशा आकांक्षाएँ और सपने सफल नहीं हुए है। इनकी आकांशाएँ विफल होने के कारण महाराष्ट्र निर्माण के 58 साल बाद भी यह प्रदेश विकास की दृष्टी से पिछड़े रहे है। इस कारण महाराष्ट्र में आज तेजीसे क्षेत्रीय असंतुलन बढ़ रहा है। राज्य पिछड़े प्रदेश के लोगों के मन में विकास निधी का वाटप और सिंचाई एवं खेती के लिए जल का उपयोग इसके कारण असंतोष जनता में बढ़ रहा है। इस बढ़ते असंतोष और बढ़ते क्षेत्रीय असंतुलन के कारण इस राज्य में हमें न्याय नहीं मिलेगा यह भावना लोगों के मन में दृढ़ हो रही है। इसका परिणाम विदर्भ जैसे विभाग में अलग राज्य निर्माण की मांग तेजीसे बढ़ रही है।"(दातार:2012)

महाराष्ट्र राज्य में बढ़ते क्षेत्रीय असंतुलन से विकास के अभाव की वजह बढ़ रहे अनुशेष का अध्ययन करने के लिए महाराष्ट्र सरकारने समय–समय पर समितीयों का गठन किया था।इन समितीयों में प्रमुखतः श्री दांडेकर समिती, निर्देशांक एवं अनूशेष समिती, केळकर समिती आदि समितीयों का समावेश होता है। ऐसे समितीयों का गठन राज्य का राज्यपाल कर सकते है। भारतीय संविधान के कलम 371(2) के तहत महाराष्ट्र विधानसभा ने 1984 में मुख्यमंत्री श्री वसंतदादा पाटील की सरकारने महाराष्ट्र राज्य के पिछड़े क्षेत्र के विकास के लिए "वैधानिक विकास महामंडल" की स्थापना कि जाएगी ऐसा कहा। इस योजना के तहत मराठवाडा, विदर्भ, और उर्वरीत महाराष्ट्र के लिए एक ऐसे तीन वैधानिक विकास महामंडल की स्थापना कर संतूलित विकास का प्रयास किया जाएगा, यह आशा थी। 9 मार्च 1994 को महाराष्ट्र में 'वैधानिक विकास महामंडल' की स्थापना कि गयी। लेकिन विकास का बढ़ता

असंतुलन क्षेत्रीयवाद को बढ़ावा देता चला गया। महाराष्ट्र सरकारने असंतूलित सामाजिक विकास के अध्ययन के लिए जिन समितीयों का गठन किया था। उनमें अनुशेष और निर्देशांक समिती(1994) ने क्षेत्रनिहाय विकास का जो अनुशेष बताया है, वह निम्नलिखित कुछ आकड़ों से अधिक स्पष्ट होता है।

टेबल क्र. 1

अनुशेष एवं निर्देशांक समिती(1994) के अध्ययन से निकला विभाग निहाय और क्षेत्रनिहाय अनुशेष(1994)

| अ.क्र. | विकास क्षेत्र | मराठवाडा | | विदर्भ | | उर्वरित महाराष्ट्र | | महाराष्ट्र राज्य | | क्षेत्रनिहाय अनुशेष का प्रतिशत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कोटी रु | % | कोटी रु | % | कोटी रु | % | कोटी रु | % | |
| 1. | सिंचन | 3023 | 34 | 4420 | 51 | 1324 | 15 | 8767 | 100 | 57 |
| 2. | सडक | 554 | 24 | 991 | 43 | 776 | 33 | 2321 | 100 | 15 |
| 3. | सामान्य शिक्षा | 36 | 21 | 40 | 22 | 101 | 57 | 177 | 100 | 01 |
| 4. | तांत्रिक शिक्षा | 96 | 18 | 112 | 21 | 326 | 61 | 534 | 100 | 3.5 |
| 5. | आरोग्य सेवा | 359 | 29 | 213 | 17 | 650 | 54 | 1223 | 100 | 08 |
| 6. | पाणीपुरवठा | 99 | 31 | 173 | 55 | 45 | 14 | 316 | 100 | 02 |
| 7. | भूविकास | 162 | 21 | 308 | 39 | 319 | 40 | 789 | 100 | 05 |
| 8. | पशुसंवंधन | 01 | 19 | 1.35 | 25 | 03 | 56 | 54 | 100 | 0.04 |
| 9. | कृषी पंप विद्युतीकरण | 296 | 24 | 703 | 57 | 224 | 19 | 1213 | 100 | 08 |
| | कुल | 4626 | 30 | 6961 | 45 | 3768 | 25 | 15355 | 100 | 100 |

स्त्रोतः जाधव या. रा. : महाराष्ट्र जल संपत्ती आणि विकासाचा प्रादेशिक असमतोल

अनुशेष और निर्देशांक समितीने अपने अध्ययन के आधार पर लिखे अहवाल में कहा कि समितीने 9 क्षेत्रो में स्थित विभागवार अनुशेष का अध्ययन किया है। इस अहवाल में 1994 की वस्तू के मूल्यों के अनुसार समग्र महाराष्ट्र का अनुशेष 15355 कोटी बतलाया गया है। इसमें विदर्भ के 9 विभागों के अनुशेष की बात कि गयी है। सिंचन विभाग का अनुशेष 4420 कोटी(51%), सडक एवं परिवहन विभाग 991 कोटी(43%), सामान्य शिक्षा 40 कोटी(22%), तांत्रिक शिक्षा 122 कोटी(21%), आरोग्य सेवा 213 कोटी(17%), जलपुरवठा 173 कोटी(55%), भूविकास 308 कोटी(39%), पशु संर्वधन 1.35 कोटी(25%), कृषी पंपो का विद्युतीकरण 703 कोटी(57%) का है। यह सब आकड़े 1994 में गठित अनुशेष एवं निर्देशांक समिती के है। आज यह आकड़े अधिक बढ़ गए है। विदर्भ जैसे प्रदेश के विकास की तरफ महाराष्ट्र के नेतृत्वने शुरू से ही अनदेखी कि है। महाराष्ट्र में सबसे अधिक उत्पादन विदर्भमें इन चिजों का होता है, उसमें खनिज, उर्जा, जंगल, वनोपज, कपास, सोयाबीन आदि। अनेक उत्पादन के साधन प्रचूर मात्रा में विदर्भ में उपलब्ध है। इन साधनों से संपन्न होते हुए भी विदर्भ के साथ यह अन्याय पूर्ण व्यवहार महाराष्ट्र का नेतृत्व करता आ रहा है।यह भावना विदर्भवादी लोगों से मन में पनप रही है। उत्पादन के अनेक स्त्रोत हमारे पास उपलब्ध होते हुए क्षेत्रीय असंतुलन और असंतुलीत विकास के शिकार हम क्यूँ? यह सवाल और यह भाव विदर्भ के नेता और लोगों के मन में जग रहा है। इस कारण विदर्भ में क्षेत्रवाद का आन्दोलन तेजीसे गांव–गांव तक पहुँच रहा है। इससे यह निष्कर्ष निकाला जाता है कि विकास के क्षेत्रीय असंतुलन एवं असंतुलीत विकास की उपज विदर्भ का क्षेत्रवादी आन्दोलन है।

अध्ययन केनिष्कर्ष :

1. भारत के सभी राज्य समान रूपसे विकसीत न होने के कारण क्षेत्रवाद बढ़ रहा है।
2. अपने प्रदेश के प्रती एकरूपता और समरसता के कारण प्रदेशवाद बढ़ रहा है।
3. विदर्भ का औसत उत्पादन महाराष्ट्र के विकसीत प्रांतों से कम है।
4. विदर्भ प्रदेश विकास में पिछड़ा होने के कारण क्षेत्रवाद बढ़ रहा है।
5. विदर्भ की अलग राज्य निर्माण की मांग ब्रिटिश समयसे चली आ रही है।
6. 1880 में पहली बार ब्रिटिश राज में विदर्भ राज्य निर्माण की मांग की गयी थी।
7. 1920 में कॉंग्रेस ने विदर्भ राज्य का प्रस्ताव नागपूर अधिवेशन में मंजूर किया था।
8. कॉंग्रेस की कथनी और करनी में फरक के कारण अलग विदर्भ निर्माण नही हो सका।
9. अलग विदर्भ की मांग विदर्भ के जनता और नेताओंकी है।
10. राजकीय पार्टीयाँ सत्ता में आने पर विदर्भ राज्य निर्माण की तरफ नजरअंदाज करते है।
11. आजतक विदर्भ के पिछड़ेपन का अध्ययन करनेवाले सभी समितीने अलग विदर्भ राज्य निर्माण का समर्थन किया है।
12. राजनीतिक साज़िश का शिकार विदर्भ होता आया है।
13. पश्चिम महाराष्ट्र के नेताओं पर विदर्भवादीयोंकी नाराजगी है।
14. विदर्भवादी अपनी सबसे बढ़ी भूल नागपूर करार को मानते है।
15. नागपूर करार के तहत किये गये प्रावधानो का अमंल सकारात्मक रूप से नहीं हुआ है।
16. जनसंख्याके अनुपात से विदर्भ का अनुशेष पूरा नही किया गया है।
17. महाराष्ट्र के प्रदेशों मे असंतुलीत विकास के कारण प्रदेशवाद बढ़ रहा है।
18. क्षेत्रीय असंतुलन की समस्या क्षेत्रवाद की भावना को विदर्भ में प्रोत्साहित कर रहें है।
19. विदर्भ निर्माण का क्षेत्रवादी आन्दोलन अपनी प्रासंगिकता सिद्ध कर रहा है।
20. पंचवार्षिक योजनाओंके विफलता के कारण देश में प्रदेशवाद बढ़ रहा है।

सुझावः

1. विदर्भ में बढ़ते प्रदेशवाद से महाराष्ट्र के अलग प्रदेशों में इसका लोन न फैले यह देख जाए।
2. महाराष्ट्र के सभी प्रदेशों के लोगों का औसत उत्पादन समान हो ऐसा प्रयास किया जाए।
3. विदर्भ और मराठवाडा जैसा राजनीति का शिकार दूसरे प्रदेश न हो इसके तरफ ध्यान दिया जाए।
4. क्षेत्रीय असंतुलन दूर करने के लिए इमानदारीसे और कारगर प्रयास किया जाए।
5. नागपूर करार का अमंल तटस्थ तरह से होना चाहिए।
6. महाराष्ट्र के बाकी प्रदेशो के विकासपर भी विशेष ध्यान दिया जाए।
7. छोटे राज्यों का निर्माण विकास की दृष्टी से अच्छे होते है, इसलिए जहाँ जरूरत हो वहाँ छोटे राज्य निर्माण किये जाए।
8. पिछड़े प्रदेशों में औद्योगीकरण का विकास किया जाए।
9. सत्ता में भागीदारी पिछड़े प्रदेशों के नेताओं को भी दी जानी चाहिए।
10. राजकीय नेताओंको निष्पक्ष होकर सभी प्रदेशों के विकास के लिए प्रयास करना चाहिए।

संदर्भ ग्रंथः

1. Khanna, S.,(1998).*Caste in Indian* Politics. New Delhi, Commonwealth publishers. PP.77,94.

2. Mukherjee, B.,(1992). *Regionalism In Indian Perspective*. Delhi, KP Bagchi and Company. P.15.
3. Reddy, G., &Sharma, B.,¼1979½.*Regionalism in India:*A Study of Teangana.New Delhi,Concept Publishing Company. pp.4,5&6-
4. Regionalism- its dimensions, meaning &issues(2014,November-14).
5. Obulpathi, M.,& Raman Janeyulu, C., (2016). *Regionalism in India: its different diamensions, meaning & suggestive measures.* International Journal of multidisciplinary research & development. PP 116-120.
6. Sanmathi ,K.,(2017). *Regionalism Vs Nationalism- in India.*International journal of humanities & Social Science Studies.Vol.3, issue-5,PP120-128.
7. अणे,श्री.,(2016). *विदर्भ गाथा.* नागपूर,विसा बुक्स, पृ.कृ.9,10,11.
8. आगलावे,पी.,(2009). *भारतीय समाज प्रश्न आणि समस्या.* नागपूर, श्री साईनाथ प्रकाशन.
9. ओमन,टी.,(2011). *भारतीय समाजातील समस्या व वाद.* पूणे, डायमंड पब्लिकेशन्स्.
10. कोलारकर,श.,& पुरंदरे,गो.,(1997). *विदर्भाचा इतिहास.* नागपूर, विदर्भ संशोधन मंडल.
11. कोलारकर,श.,(2003).*आधुनिक विदर्भाचा इतिहास(1885–1947).* नागपूर, श्री मंगेश प्रकाशन.
12. गुप्ता,म.,आणि शर्मा,डी.,(2003). *समाजशास्त्र खंड–II.*आगरा, साहित्य भवन पब्लिकेशन्स्.
13. चन्द्र,बि.,(2002).*आजादी के बाद का भारत 1947–2000.* दिल्ली, विश्वविद्यालय प्रकाशन, पृ.165.
14. चक्रवर्ती,प्र.,(2014). *राजनैतिक साजिश का शिकार विदर्भ,(मुलाकात).*31–जुलै–2014,(9:03पृ.कृ.)
15. दातार,मा.,(2012). महाराष्ट्र एका संकल्पनेचा मागोवा. पुणे, राजहंस प्रकाशन प्रा.लि. पृ.कृ.13.
16. देशमुख,शा.,(2016). *महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोल आणि राजकारण: मराठवाडा चिकित्सक अभ्यास,* आचार्य पदवी शोध प्रबंध.
17. नागर,न.,(2015).*शब्द–ब्रम्ह.* पीअर रिव्यूड रिसर्च जनरल.ISSN 2320-0871, Vol.3, Issue-4.
18. भोले,भा.,(2011). *भारताचे शासन आणि राजकारण.* नागपूर, पिंपळापुरे पब्लिशर्स ॲन्ड कंपनी पृ.क्र.275.
19. भांडवलकर,आर.,(2019). *लहान राज्याची संकल्पना आणि आव्हाने.*भिवापूर, भिवापूर महाविद्यालय.
20. मूणगेकर,भा.,(1999). *A Paradox in Maharashtra*.The Hindu, 26 Dec.2009.PP.05.
21. महाजन,ध.,एवं महाजन,क.,(2013). *भारतीय समाज: मुद्दे एवं समस्याएँ.* नई दिल्ली, विवेक प्रकाशन.
22. माथुर,जी.,(2009). *रिसर्च मेथडॉलॉजी.* जयपूर, युनीक ट्रेडर्स.
23. *राज्य नियोजन मंडल का अहवाल–1993महाराष्ट्र शासन.*
24. सिंह,क.,(2010). *भारत में सामाजिक समस्या.* जयपूर, इशिका पब्लिशींग हाऊस.

# भारतीय लोकशाही समोरील आव्हाने:राजकारणाचे गुन्हेगारीकरण

प्रा. तानाजी संभाजी माने
लोकमान्य महाविद्यालय,वरोरा. जी चंद्रपूर

**गोषवारा:—**

जगातील सर्वात मोठी लोकशाही असणाऱ्या भारतीय लोकशाहीला नानाविध आव्हाने आहेत. त्यापैकी एक महत्त्वपूर्ण आव्हान म्हणजे राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाचे आहे. समाजातील होत असलेले नैतिकतेचे अध:पतन, गरिबी, बेरोजगारी आणि राजकीय पक्षाची सत्तेची लालसा इ. कारण त्यास कारणीभूत आहेत. याचा दुष्परिणाम निवडणुका,राज्यविधिमंडळे,संसद,प्रशासन आणि पोलीस यंत्रणेवर पडत आहे. या समस्येवर मात करण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकांनी घेतली पाहिजे.

**१) प्रस्तावना:—**

भारतीय राजकारणातील वाढत्या गुन्हेगारीकरणाचे वर्णन अतिशय कमी शब्दात करावयाचे झाल्यास ते म्हणजे, "राजकारण हे बदमाशांचे अखेरचे आश्रयस्थान असते,"[१] असे करता येईल. एकीकडे आपण जगात 'सर्वात मोठी लोकशाही असलेले राष्ट्र' म्हणून भारताचा गौरव करतो, तर दुसरीकडे या लोकशाही समोर धर्म, जात, प्रांतवाद, भाषा, घराणेशाही, भ्रष्टाचार आणि राजकारणाचे गुन्हेगारीकरण या स्वरूपाचे आव्हान निर्माण झाले आहे. याचा परिणाम असा झाला की, "प्रजासत्ताकाची सात दशके पूर्ण करणाऱ्या भारताची लोकशाही सुचकांकात गेल्या वर्षीच्या तुलनेत दहा अंकांनी घसरण झाली."[२] नागरी स्वातंत्र्य, राजकीय संस्कृती, लोकांचा राजकीय प्रक्रियेतील सहभाग, निवडणुकांमधील बहुविधता आणि प्रशासन या सुचकांकाच्या कसोट्याच्या आधारे हे मूल्यमापन केले जाते. भारताच्या या लोकशाही सुचकांकातील घसरणीला भ्रष्टाचार आणि निवडणूकातील वाढता खर्च हे महत्त्वपूर्ण कारणे कारणीभूत आहेत. यामुळे भारताच्या राजकारणात गुन्हेगारीकरण या अपप्रवृत्तीचा मोठ्य प्रमाणात शिरकाव झाला आहे.

विद्यमान भारतीय राजकारणाचे अवलोकन केल्यास असे लक्षात येते की, केंद्रापासून ते स्थानिक पातळीपर्यंतच्या व्यवस्थेत राजकीय गुन्हेगारांचा मोठ्या प्रमाणात सहभाग वाढला आहे. सामान्यत: १९७० च्या दशकापासून राजकारणात गुन्हेगारांचा महापूर आला, तेव्हापासून ही प्रक्रिया थांबलेली नाही. आज राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाने अक्राळविक्राळ रूप धारण केले आहे. कोणत्याही परिस्थितीत सत्ताप्राप्ती याला राजकीय पक्षाने अधिक महत्त्व दिल्याने निवडणुकीच्या काळात 'उमेदवारांचे चारित्र्य' पाहण्यापेक्षा त्याच्यातील 'इलेक्टिव्ह मेरीट'लाच मोठ्या प्रमाणात महत्त्व देण्यात येऊ लागले. परिणामी राजकारणाचे गुन्हेगारीकरण मोठ्या प्रमाणात वाढले. प्रस्तुत शोध निबंधात राजकारणाच्या गुन्हेगारीकरणामागील कारणे, त्याचे स्वरूप आणि त्यावरील उपाय योजनांचा अभ्यास करण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे.

**२) अध्ययनाची उद्दिष्टये:—**

i) भारतीय राजकारणातील वाढत्या गुन्हेगारीकरणाच्या कारणांचा अभ्यास करणे.

ii) भारताच्या राजकारणातील गुन्हेगारीकरणाच्या स्वरूपाचा अभ्यास करणे.

**३) अध्ययनाची गृहीतकृत्ये :—**

i) भारतीय राजकारणातील वाढत्या गुन्हेगारीकरणाला समाजाचे होत असलेले नैतिक अध:पतन, आणि निवडणुकांचे बदलते स्वरूप राजकारणाचे झालेले व्यावसायीकरण आदी कारणे जबाबदार आहेत.

ii) भारताच्या राजकारणात गुन्हेगारीकरणाच्या प्रवृत्तीचा अधिक शिरकाव होत आहे.

**४) तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन:—**

**i) राजकारणाचे गुन्हेगारीकरण म्हणजे काय?:—**

गुन्हेगारी प्रवृत्ती ही संपूर्ण मानव जातीला कलंक तथा मारक मानली जाते. या दुष्ट प्रवृत्तीचा कोणत्याही क्षेत्रात शिरकाव झाला की, त्या क्षेत्राचा विकास खुंटतो आणि त्या क्षेत्राची अध:पतनाकडे वाटचाल होते. "सामान्यत: गुन्हा म्हणजे

कायद्याद्वारे निषिद्ध, सामाजिक दृष्टीने हानिकारक, नैतिक दृष्टीने दोषपूर्ण आणि राज्याद्वारे दंडित करण्यायोग्य मानवी वर्तन होय."[३] जर ही गुन्हेगारी संघटित स्वरूपात असेल तर त्याची हानिकारकतेची क्षमता कित्येक पटीने वाढते. या संघटित गुन्हेगारीमुळे जनसामान्यांचे सार्वजनिक जीवन दूषित होत आहे. या गुन्हेगारी स्वरूपाच्या टोळ्या या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय समाजासमोर आव्हान बनू पाहत आहेत. सन १९८८ ला इंन्टरपोलच्या पहिल्या आंतरराष्ट्रीय मेळाव्यात संघटित गुन्हेगारीची पुढील प्रमाणे व्याख्या संमत करण्यात आली. ती अशी, "असा कोणताही उद्योग किंवा समूह जो सतत बेकायदेशीर कृत्यात मग्न असतो, त्याचा प्राथमिक उद्देश निव्वळ नफा गोळा करणे हाच असतो, ज्याला राष्ट्रीय मर्यादांची कसलीही चाड नसते अशांची गणना संघटीत गुन्हेगारात करावी."[४] भारतीय राजकारणात गुन्हेगारी प्रवृत्ती ही मोठ्या प्रमाणात वाढत आहे. सामान्यपणे जेव्हा राजकीय महत्त्वकांक्षाची पूर्तता करण्यासाठी गुन्हेगारीचा आधार घेणे राजकारणाचे महत्त्वपूर्ण अंग बनते, तेव्हा त्या स्थितीला राजकारणाचे गुन्हेगारीकरण ही संज्ञा दिली जाते.

'भारताच्या शासक वर्गाची राजकीय संस्कृती' या विषयावर आयोजित १२व्या राजस्थान राज्यशास्त्र संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात डॉ.एल.एस.राठोड यांनी राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाचा अर्थ सांगितला आहे. त्यांच्या मते, "गुन्हेगाराचे राजकीय पक्ष तथा संसदेसोबतच सर्व विधायी संस्थांमध्ये झालेला सरळ प्रवेश म्हणजेच राजकारणाचे गुन्हेगारीकरण होय."[५] याबरोबरच डॉ.राठोड यांनी राजकीय गुन्हेगारीकरण या संज्ञेत राजकीय प्रक्रिया आणि कामकाजाला प्रभावित करण्यासाठी गुन्हेगारी प्रवृत्ती आणि त्या संबंधित विविध मार्गाचा प्रयोग करणे याचाही समावेश केला आहे.

**ii) राजकारणाचे गुन्हेगारीकरण:उदय व विकासाची कारणे:—**

स्वातंत्र्यौत्तर काळात १९६७ला चौथ्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीपासून खऱ्या अर्थाने राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाने डोके वर काढायला सुरूवात केली. प्रारंभी राजकीय नेते आपला प्रभाव वाढविण्यासाठी, निवडणुका जिंकण्यासाठी गुन्हेगारांची मदत घेत असत. आता मात्र प्रत्यक्ष—अप्रत्यक्षरित्या विविध गुन्ह्यात आरोपी असणारे लोक राजकारणातील मोठ्या पदावर विराजमान झाले आहेत. या संदर्भात १४ व्या लोकसभेपासून ते विद्यमान १७ व्या लोकसभेत सहभागी झालेल्या गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या राजकीय प्रतिनिधींच्या संख्येत सातत्याने असलेल्या वाढीचा संदर्भ देणे योग्य ठरेल. "गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीचे १४ व्या लोकसभेतील प्रमाण २४ टक्के होते, १५ व्या लोकसभेमध्ये ३० टक्के झाले. १६ व्या लोकसभेत मध्ये ते ३४ टक्के होते सध्याच्या लोकसभेमध्ये ते ४३ टक्के इतके आहे."[६]

| अ. क्र. | लोकसभेचा कार्यकाल | गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीचे प्रमाण |
|---|---|---|
| १ | १४ वी लोकसभा | २४ टक्के |
| २ | १५ वी लोकसभा | ३० टक्के |
| ३ | १६ वी लोकसभा | ३४ टक्के |
| ४ | १७ वी लोकसभा | ४३ टक्के |

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की, १४वी लोकसभा ते १५वी लोकसभा दरम्यान लोकसभेतील गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीचे प्रमाण ६ टक्क्यानी वाढल्याचे दिसून येते. १५वी लोकसभा ते १६वी लोकसभा दरम्यान लोकसभेतील गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीचे प्रमाण ४ टक्क्यानी वाढल्याचे दिसून येते. तर . १६वी लोकसभा ते १७वी लोकसभा दरम्यान लोकसभेतील गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीचे प्रमाण ९ टक्क्यानी वाढल्याचे दिसून येते. एकंदरीत भारतीय लोकशाही समोर राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाचे आव्हान दिवसेंदिवस अधिक गडद होताना दिसत आहे. यासंबंधी इलेक्शन वॉचडॉग असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म ने २०१४ साली दाखल केलेल्या ५४३ खासदारांपैकी ५२१खासदारांच्या शपथपत्राचे विश्लेषण केले आहे. "ADRने दिलेल्या अहवालात जवळपास ३३टक्के (५२१खासदारांपैकी)खासदारांवर खून, खुनाचा प्रयत्न, जातीय विघटन, अपहरण आणि महिला संबंधी गंभीर स्वरूपाचे फौजदारी स्वरूपाच्या गुन्ह्याची नोंद असल्याचे नमूद केले आहे."[७]

राजकारणातील गुन्हेगारीकरणाच्या उदय व विकासाची विविध कारणे आहेत. पहिले कारण म्हणजे भारतीय समाजव्यवस्थेतील होत चाललेले नैतिक अध:पतन होय. भारताला स्वातंत्र्यप्राप्ती झाली त्यावेळेची समाजात असलेली

नैतिकता आणि सद्यस्थितीतील समाजात असलेली नैतिकता यात खूप मोठी तफावत आढळते. दुसरे कारण म्हणजे भारतीय समाजव्यवस्थेत असलेली गरिबी, निरक्षरता आणि बेरोजगारीचे प्रमाण होय. भारतीय समाजव्यवस्थेत गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी मोठ्याप्रमाणात रुंदावत आहे. त्यामुळे गरीब मतदार हे आपले मत कवडीमोल किंमतीत विकण्यास मागेपुढे पाहत नाही. यासंबंधी राजगोपालाचारी १९६२ साली लिहिलेल्या 'लोकशाहीतील दोषावर' या आपल्या लेखात म्हणतात, "भारतीय जनता गरीब आहे आणि त्यामुळे लाचखोरीला सहज बळी पडू शकतेय अगदी एका दिवस पुरतील इतके खाण्याचे पैसे दिले, तरी गरीब लोकांची मते मोठ्या प्रमाणावर विकत घेता येतात."[८] ज्या राज्यात निरक्षरता, बेरोजगारी अधिक आहे त्याठिकाणी राजकारणाच्या गुन्हेगारीचे प्रमाण अधिक आहे, यामागे हेसुद्धा तथ्य आहे.

तिसरे कारण म्हणजे राजकीय पक्षांनी सत्ताप्राप्ती हे एकमेव लक्ष ठेवल्याने उमेदवारांचे चारित्र्य, अभ्यास, संघटन कौशल्य, पक्षनिष्ठा आणि शिक्षण यासारख्या गुणाचे महत्त्व कमी होत आहे. याउलट त्या उमेदवाराची निवडणुकीत विजयी होण्याची क्षमता किती आहे ? त्याचा पक्षाला किती फायदा होतो ? याचा अधिक विचार केला जातो. या मागची पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी वैष्णव मिलन यांनी मांडलेल्या विचारांचा संदर्भ देणे योग्य ठरेल. त्यांनी 'भारतीय राजकारणाचे वाढते गुन्हेगारीकरण' या विषयावर सखोल अभ्यास करून 'व्हेन क्राईम पेज' या नावाचे पुस्तक लिहिले. यात ते म्हणतात,"खर्चिक निवडणुका, राजकीय पक्षांचा संस्थात्मक पातळीवरील दुबळेपणा आणि निवडणूक खर्चावर मर्यादा घालण्यासाठी केलेले पण निरुपयोगी ठरलेले नियम यांच्यामुळे स्वत:चा खर्च स्वत: भागू शकतील अशा उमेदवारांना प्राधान्य द्यायला पक्षाने सुरुवात केली "[९]यामुळे निवडणुकीत श्रीमंत, अतिश्रीमंत लोकांचा वावर अधिकाधिक वाढायला सुरुवात झाली.

चौथे कारण म्हणजे निवडणुका व राजकारणाचे बदललेले स्वरूप होय, कारण पूर्वी शांततेच्या मार्गाने सत्तांतर घडवून आणण्याचा मार्ग म्हणून निवडणुकीकडे पाहिले जात होते. म्हणून निवडणूका या नि:पक्ष, निर्भीड अशा वातावरणात पार पाडल्या जात. सद्यस्थितीत मात्र निवडणुका या खर्चिक–अतिखर्चिक होण्याबरोबरच निवडणुकीला हिंसाचाराचे गालबोट लागत आहे. याबाबत भा. ल. भोळे म्हणतात, "शांततामय पध्द्तीने सत्तांतर घडवून आणण्याचा मार्ग असे लोकशाहीतील मुक्त व निर्भय वातावरणात पार पडणाऱ्या निवडणुकांचे वर्णन केले जाते. प्रत्यक्षात मात्र उमेदवार पळविणे, ठार मारणे, मतदारांना धाक दाखविणे. अशाप्रकारचे प्रमाण निवडणुकीमध्ये वाढत चाललेले आढळते."[१०] याबरोबरच पूर्वी राजकारणाचा समाजकारणाशी सांगड घातली जात होती. आता मात्र राजकारण व्यवसाय बनला आहे. त्यातील नेत्यांपासून ते कार्यकर्त्यांपर्यंत प्रत्येक घटक हा व्यवसायिक बनत चालला आहे. व्यवसायिकता आली की त्यात स्पर्धा येणे हे स्वाभाविक आहे. निवडणुकीतील स्पर्धा या जीवघेण्या बनत आहेत. यामुळे राजकारणाचे गुन्हेगारीकरण होण्यास हातभार लागत आहे.

वरीप्रमाणे राजकारणातील गुन्हेगारीकरणाच्या उदय व विकासाची विविध कारणे सांगता येतात.

**iii) भारतीय राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाचे स्वरूप:–**

गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना हाताशी धरून निवडणुका जिंकण्याचे कसब सर्वात अगोदर उत्तरप्रदेश आणि बिहारच्या नेतृत्वाने आत्मसात केले. कालांतराने याचा प्रसार भारतातील विविध घटकराज्यात झाला. राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाचा उदय आणि विकासाचे अध्ययन केल्यास त्याचे स्थूल स्वरूप लक्षात येते. त्यात राजकीय प्रतिनिधीकडून होत असलेला पैसा व मनगटशाहीचा वापर निवडणूक काळात वाढतो. याच आधारे निवडणूक जिंकण्याचा प्रयत्न केला जातो. सत्ताप्राप्तीनंतर राजकीय नेत्यांकडून गुन्हेगारी कृत्यांना मदत केली जाते. या नेत्यांकडून आवश्यकता भासली तर कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांच्या दैनंदिन कामकाजात हस्तक्षेप केला जातो आणि गुन्हेगारांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला जातो. सत्ताधारी नेत्यांचा प्रशासन यंत्रणांवर वचक निर्माण होतो परिणामी सत्तेवर असलेल्या राजकारण्यांची खुशामत करण्यात या संस्था व यंत्रणा धन्यता मानतात, यात विशेषत: पोलिस यंत्रणेचा उल्लेख करता येईल. "ज्यावेळी राजकीय नेते, गुन्हेगारी प्रवृत्ती आणि पोलीस यंत्रणा या तिन्ही घटकांचा समन्वय होतो.त्यावेळी राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाची प्रक्रिया पूर्ण होते."[११] सद्यस्थितीत आपण पाहतो की, ज्यांच्या नावावर सरकारी दप्तरात खून, खंडणी, अपहरण यासारख्या गुन्ह्यांची नोंद झालेली आहे. असे व्यक्तीही राज्यविधिमंडळ व संसदेवर रीतसरपणे निवडून गेले आहेत. यापुढचा टप्पा म्हणजे, "आपल्या कर्तबगारीच्या जोरावर त्यांनी प्रशासनातील सन्माननीय व प्रतिष्ठाप्राप्त पदावरही कब्जा केल्याचे पाहायला मिळते.

"[१२] यावरून असे म्हणता येते की, सद्यस्थितीत राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाची जागाही गुन्हेगाराच्या राजनीतिकरणाने घेतली आहे.

एकंदरीत भारतीय राज्यव्यवस्थेत गुन्हेगारी प्रवृत्तीचा झालेला शिरकाव हा लोकशाहीसमोर आव्हान बनू पाहत आहे. ज्यांच्याकडे मनी पावर, मसल पावर आहे, अश्यांचे राज्यव्यवस्थेवर वर्चस्व प्रस्थापित होत आहे. यामुळे निश्चितच लोकशाही तत्त्वांना तिलांजली देण्याचा प्रयत्न होईल. कारण ज्यांना कायद्याने शिक्षा देण्याची आवश्यकता आहे, अश्याच गुन्हेगारीगारी प्रवृत्तीच्या प्रतिनिधींच्या हाती कायदा बनविण्याची सत्ता जाईल. तसेच निवडणुकीत पैसा गुंतवायचा आणि जिंकल्यानंतर तो पैसा मोठ्या प्रमाणात वसूल करायचा म्हणजेच 'सत्तेतून पैसा आणि पैश्यातून सत्ता' हे चक्र सुरू होईल आणि हे चक्र लोकशाही व्यवस्थेसाठी घातक ठरू शकते.

राजकारणाचे गुन्हेगारीकरण रोखण्याच्यादृष्टीने उपाययोजना करण्यासाठी विविध समित्या स्थापन करण्यात आल्या. त्यापैकी महत्त्वपूर्ण समिती म्हणजे तत्कालीन भारत सरकारचे गृहसचिव एन. एन. व्होरा यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेली समिती (जुलै १९९३) होय. या समितीने अनेक शिफारशी केल्या. थोडक्यात, राजकारणाच्या गुन्हेगारीकरणामुळे भारतातील परिस्थिती गंभीर बनत चालली आहे. यावर उपाय शोधला जाऊ शकतो. मात्र त्यासाठी राजकीय नेते, राजकीय पक्ष, प्रशासकीय यंत्रणा आणि लोकशाहीचा आधार असलेला मतदार राजा यांच्या ठिकाणी प्रबळ इच्छाशक्ती असणे आवश्यक आहे. या सर्वांनी मिळून भारतीय लोकशाहीच्या वाटचालीत आलेल्या विकृती आणि अडथळे दूर करण्यासाठी जीवापाड प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**iv) निष्कर्ष:–**

i) सुरुवातीला राजकीय नेत्याकडून निवडणूक जिंकण्यासाठी गुन्हेगाराची मदत घेतली जायची, आता मात्र प्रत्यक्ष राजकीय गुन्हेगारच सत्तास्थानी विराजमान होत आहेत.

ii) राजकारणाच्या गुन्हेगारीकरणामुळे भारतीय लोकशाहीच्या विकास, स्थैर्यासमोर अडथळे निर्माण होत आहेत.

iii) लोकशाहीत निवडणुका, मतदान, जनतेचे प्रतिनिधी, जनतेचे कल्याण याला खूप महत्त्व असते.परंतु राजकारणाच्या गुन्हेगारीकरणामुळे वरील सर्व घटकाचे महत्त्व कवडीमोल होते.

iv) लोकशाहीला आणि मतदाराला गरिमा प्राप्त करून देण्यासाठी राजकारणातील गुन्हेगारीकरणाचा नायनाट झाला पाहिजे. त्यासाठी सर्व भारतीय जनतेने आप–आपली जबाबदारी स्विकारणे आवश्यक आहे.

**संदर्भ सुची:–**

1)http://jagtapahatra.blogspot.com/2017/02/blog-spot
2)https://maharashtratimes.com/editorial/samwad/india/democracy-is-in-danger/zone/articleshow/73612261-cms
3)सुभाष काश्यप एवं विश्वप्रकाश गुप्त, 'राजनीति कोश', हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय,दिल्ली विश्वविद्यालय,दिल्ली २०११ पृष्ठ क्र.१००.
4)एन.के.सिंग, माधव मोर्डेकर (अनु.), 'भारतीय राजकारणातील गुन्हेगारी व भ्रष्टाचार', मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे २०००, पृष्ठ क्र. ४९.
5)पुखराज जैन/बी.एल.फडिया, 'भारतीय शासन एवं राजनीति (राज्यो की राजनीति सहित)',साहित्य भवन पब्लिकेशन , आगरा २००८, पृष्ठ क्र. ८६६
6) http://prahaar.in/a-comprehensive-solution-to-criminal-politics/
7) https://indianexpress.com/elections/83-per-cent-lok-sabha-mps-are-crorepatis- 33-per-cent-have-criminal-cases-adr-report-5647211/
8)https://www.weeklysadhana.in/archive/view/article/ramchandra-guha-black-side:20of-Indian-democracy
9) कित्ता क्र. ७.
10) भास्कर लक्ष्मण भोळे,'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण', पिंपळापुरे अँण्ड कं.पब्लिशर्स, नागपूर, २००३ पृष्ठ क्र. ५८७.
11)कित्ता क्र.पृष्ठ क्र. ८६७.
12)कित्ता क्र.पृष्ठ क्र.४८.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) –7.675, Issue NO, 272(CCLXXII)
ISSN : 2278-9308
Fabruary, 2021

# आधुनिक इतिहासलेखनाचे नवीन प्रवाह

प्रा.डॉ. दीपक पां. लोणकर
लोकमान्य महाविद्यालय, वरोरा जि. चंद्रपूर (महा.), पिन. ४४२९०७

**प्रस्तावना–**

इतिहासाचे ज्ञान व क्षेत्र हे अमर्याद असून कालाप्रमाणे अनादि आहे. ऐतिहासिक घटनांच्या मागे अनेक विचार, कारणे, परंपरा, गोष्टी असतात. त्या घटना राजकीय, आर्थिक, धार्मिक, सामाजिक इत्यादी प्रकारच्या असू शकतात. त्यामुळे एखाद्या ठिकाणी घटलेली घटना किंवा परीस्थिती ही दुसऱ्या ठिकाणी तशीच घडतील असे नाही. त्यामुळे इतिहासाचा अभ्यास करणाऱ्यामध्ये अडचण निर्माण होते. एकूणच इतिहासाची सुसंगती लावून विशिष्ट तत्वानुसार इतिहास लिहिणे हेच महत्वाचे आहे. इतिहासामध्ये विशिष्ट वैशिष्ट्यपूर्ण घटनांची नोंद ठेवलेली असते व त्या मानवी जीवनाशी संबंधीत असल्या पाहिजे. फक्त झालेल्या घटनांचीच नोंद न ठेवता वर्तमानकालीन घटनांचीही नोंद ठेवायची असते या संदर्भात नेपोलियन वोनापार्ट म्हणतो, "जीवनाचे खरे मानसशास्त्र व तत्वज्ञान जर कुठे पाहायला मिळत असेल तर ते इतिहासामध्ये"[१]. या दृष्टीने मानवाची प्रगती जाणून घेणे हे इतिहासाचे खरे ध्येय आहे.

इंग्रजी भाषेतील History या शब्दांचे मूळ Istoria या ग्रीक शब्दात आढळते. ह्याचा अर्थ नव्या माहितीचा शोध घेणे. चौकशी करणे किंवा माहिती मिळविणे असा होतो[२]. तर इतिहास या संस्कृत शब्दाची फोड केल्यास इति+अ+हास म्हणजे 'असे असे घडले किंवा अशा प्रकारे घडले' असा होतो. याचा अर्थ जे भूतकाळात घडले त्या सर्व घटना इतिहासाच्या कक्षेत येतात म्हणजेच भूतकालीन घटना म्हणजे इतिहास असा शब्दाचा अर्थ काढता येतो[३]. तर जर्मन भाषेतील इतिहासवाचकGaschichte या शब्दाचा अर्थ गतकालीन घटनांचे तर्कशुध्द व अर्थपूर्ण विवेचन असा होतो. एकूणच वरील तीनही शब्दाच्या सर्वमान्य अर्थ काढून इतिहास म्हणजे भूतकालीन माहितीचा किंवा घटनांचा शोध होऊन जे काही घडले त्याचे जसेच्या तसे वर्णन अर्थपूर्ण व तर्कशुध्दपणे करणे म्हणजे इतिहास होय अशी सार्वत्रिक व्याख्या करता येईल.

**उद्दिष्ट्ये –**

(१) आधुनिक इतिहास लेखनाचे नवीन प्रवाहाची माहिती मिळविणे.
(२) आधुनिक इतिहास लेखनाचे महत्व जाणून घेणे.

**गृहितके –**

(१) आधुनिक काळात इतिहास लेखनात नविन विचारधारा निर्माण होऊन व्याप्ती वाढली.
(२) आधुनिक इतिहास लेखनामुळे मानवी जीवनाच्या समग्र इतिहासावर लिखाण होऊ लागले.

**इतिहासाच्या व्याख्या व इतिहासकार –**

इतिहासाच्या अनेक संशोधकानी व इतिहासकारानी आपापल्या पध्दतीने व विचाराने व्याख्या केल्या आहेत. जागतिक स्तरावर खऱ्या अर्थाने इ. स. पूर्व ६ व्या शतकात इतिहास लेखनाला ग्रीक मध्ये सुरवात झाली तेव्हा पासून तर आजपर्यत अनेकांनी इतिहासाबद्दल व्याख्या करून आपली मते दिली आहे.

(१) इंग्रज विद्वान फ्रान्सिस बेकन म्हणतो की, 'मानवाला शहाणा बनविणारी विद्याशाखा म्हणजे इतिहास होय'.[४]

(२) थ्युसिडाईडस म्हणतो, 'इतिहास म्हणजे संस्मरणीय घटनांचे निवेदन होय' **(History is a story of things worthy to be remembered.)**[5]

(३) प्रो. इ. एच कार – 'इतिहास म्हणजे वर्तमानकाळ व भूतकाळ यामधील कधीही न संपणारा संवाद होय'. **(History is an unending dialougue between the Past and the Present.)**[6]

(४) अमेरिकन इतिहासकार प्रो नेव्हिस – 'इतिहास म्हणजे भूतकाळाला वर्तमानकाळाशी जोडणारा पूल आहे व तो भविष्यकाळाचा मार्गदर्शक आहे'.[७]

(५) रियासतकार गो. स. सरदेसाई – 'मानवी प्रगतीचा आढावा म्हणजे इतिहास'.[८]

अशा प्रकारच्या व्याख्या इतिहासकारांनी आपापल्या पध्दतीने केलेल्या दिसतात.

**(A)प्राचीन इतिहासकार –**

**(१) ग्रीक** – लिखित इतिहास लिहिण्याचा प्रारंभ हा ग्रीक मध्ये इ. स. ५ व्या शतकात झाला.[९] त्यापूर्वीचा इतिहास हा मौखिक परंपरेतील असून कथा, लोककथा, मिथके, लोकगीते या स्वरूपात मौखिक पध्दतीने पद्यरूपात पुढच्या पिढीला हस्तांतरीत केला जाई. परंतु खऱ्या अर्थाने ग्रीक इतिहासकारांनी इतिहास लेखनाला सुरवात केली त्यात हिरोडोटस (इ. स. पूर्व ४८४–४३०), थ्युसिडाईस (इ.स. पूर्व ४६०–३९६), पॉलिबियस (इ.स. पूर्व २०८–१२६) याशिवाय झेनोफोन, डायोडियस, स्ट्रवो, प्लुटर्क इ. च्या इतिहासकाराच्या नावाचाही उल्लेख करता येईल.[१०]

**(२) रोमन** – प्राचीन युरोपच्या इतिहास लेखनात ग्रीक इतिहासकारानंतर रोमन इतिहासकार महत्वाचे ठरतात त्यात कॅटो (Cato) इ. स. पूर्व २३४–१४८), लीव्ही (Livy) इ. स. पूर्व ५९ ते १७), कार्नोलियस टसिअस (Cornelius Tacitus) इ. स. ५५–१२०), ज्यूलिअस सीझार (Julius Caeser) इ.स. पूर्व १००–४४), तसेच ॲपीयन, (Appian), फ्लेव्हिओ ओरियन इ. रोमन इतिहासकार महत्वाचे मानले जाते.[११]

**(३) चीन** –तसेच चीनमध्ये चाऊ राजघराण्याच्या काळात म्हणजे इ.स. पूर्व ८ व्या शतकात इतिहास लेखनाचे पुरावे मिळतात[१२] कन्फूशिअस, झुमा शिएन (Szuma Chien) त्सो शुआन (Tso - Chuan), झुमा कुआंग (Szuma Kuang), पान कू, लिऊ शोह हे इतिहासकार याशिवाय फाहियान,[१३] हयू एत्संग, इत्सीग या इतिहासकारांनी ही चीनच्या इतिहासाबद्दल बरीच विस्तृत्व माहिती लिहून ठेवली आहे.

**(४) भारत** – प्राचीन भारतीय इतिहास लेखनात इतिहासकारांनी किंवा लेखकांनी ज्याला खरा इतिहास म्हणता येईल असा एकही ग्रंथ निर्माण केलानाही त्यादृष्टीने इतर ग्रंथ लिहिले गेले तरी इतिहास ग्रंथाचा अभाव जाणवतो परंतु इतिहासाचे वेगळे रूप आपल्याला प्राचीन ग्रंथात पाहायला मिळते. अर्थवेवादात 'इतिहास' या शब्दाचा उल्लेख मिळतो,[१४] याशिवाय छादोग्योपनिषदात तर इतिहास व पुराणांना पाचवा वेद संबोधले आहे. या दृष्टीने प्राचीन काळी लिहिल्या गेलेल्या पुराणाचे महत्व हे इतिवृत्तासारखेच आहे.[१५]परंतु खऱ्या अर्थान इतिहास म्हणता येईल असा ग्रंथ नाही तरी कौटील्याचे अर्थशास्त्र, बुध्द घोषाचे बुध्दचरित्र, बाणभट्टाचे हर्षचरित्र, विशाखादत्ताचे मुद्राराक्षस, क्षुद्राचे मृच्छकटिक, कल्हाणचा राजतरगिणी इत्यादी ग्रंथात इतिहासाचा दृष्टिकोन सापडतो.[१६] ऐतिहासिक ग्रंथ लिहिण्यासाठी पुरावे म्हणून ते उपयोगी असतात.

**B) मध्ययुगीन इतिहासकार –**

**(१) ख्रिस्ती इतिहासकार –**

ख्रिस्ती धर्माच्या उद्यानंतर युरोपात क्रांतिकारी बदल घडून आला. ग्रीकांनी बुध्दीप्रामान्याला महत्व दिले तर रोमनांनी राजकीय हालचालींना महत्व देऊन त्यावर आधारीत इतिहास लिहिले.

ख्रिस्ती इतिहास कारामध्ये युसिबीअस (इ.स. २६० ते २४०), सेंट आगस्टिन (इ.स. ३५४ ते ४३०), कॅसिडीअर, प्रोकोपिअस, ओटो, ईसुबस पर्म्फालस इ. इतिहासकाराचा उल्लेख करता येईल[१७] या इतिहासकाराना काहिनी इतिहासाशी धर्माला जीडून धार्मिक दृष्टिकोनातून लिखान केलेले दिसुन येते.

**(२) अरब इतिहासकार –**

अरब परंपरेमध्ये लोकशाहीच्या परंपरा असल्यामुळे त्यांनी राष्ट्राचा इतिहास लिहिण्याकडे कल दाखविला त्यामध्ये अबू इब्न याह्या, अल वकीदी, अल मदाहनी, अल बहादुरी, दिनावारी, अलमसुदे, अल तहारी, अल बरूनी, इव बरात्र, इब्न खलइन इत्यादी इतिहासकार उल्लेख करता येईल.[१८]

**(३) इंग्लीश फ्रेंच इतिहासकार–**

इग्लंडमध्ये मध्ययुगात गिल्डस एडमर, मॅलन बेरी, हेन्री, गॅरवेल, ऑडिरिअस, व्हिटॅलीस हे[१९] इतिहासकार होऊन गेले तर फ्रान्समध्ये रिचर, सिजबर्ट, टॉरग्नी हे इतिहासकार झाली.[२०]

**(४) भारतीय इतिहासकार –**

१२ व्या शतकापासून भारतीय इतिहास लेखनात स्वरूप व तंत्राच्या दृष्टीनी महत्वाचे मूलभूत बदल घडून आले. १२ ते १८ वे शतक हा भारतीय इतिहास लेखनातील महत्वाच काळ मानला जाते. या काळात सुलतान शाही व मोगलशाहीतील इतिहासलेखन इतिहासकारांनी केलेले दिसते त्यात मिनाज–उस–सिराज, याह्या–इब्न–अहमद–सरहिदी, शमसुद्दीन सिराज अफीक, झियाउद्दीन बरनी, आमीर खुस्त्रो, हसन निजानी व इसामी, फेरिस्ता यांचा उल्लेख सुल्तानशाहीचे इतिहासकार म्हणून करता येईल[२१] तर, मोगलशाहीत बाबर, निजा मुद्दीन, अहमद, बदायुनी, अबुल फजल, मुतामद खान, अब्दुल हमीद लाहोरी, इनायन खान, महम्मद साकी, मुस्तहे खान, खाकी खान, मुहम्मेद कासमी, भीमसेन, ईश्वरदास नागर, मनुची इत्यादी इतिहासकाराचा उल्लेख करता येईल.[२२]

**C) आधुनिक इतिहासकार:–**

आधुनिक काळात इतिहासाचे स्वरूप व व्याप्ती वाढल्यामुळे इतिहासलेखनात अनेक बदल घडून आले. आधुनिक काळात अनेक इतिहासकारांनी वेगवेगळ्या दृष्टीने इतिहास लेखन केलेले दिसून येते. विशेषता रोमांटिक, नॅशनालिस्ट पॉझिटिवीस्ट व मार्क्सिस्ट हे चार प्रवाह प्रामुख्याने दिसतात. याशिवाय ॲनल्स, सबाल्टर्न इत्यादी नविन प्रवाह ही इतिहासलेखनाचे उदयास आलेले आहे. त्यादृष्टीने बऱ्याच इतिहास कारानी आधुनिक काळात लेखन केले आहे.

त्यात ऑगस्त कॉम्प्त तसेच लिओपोल्ड रॅन्के यांना आधुनिक इतिहास लेखन शास्त्राचा जनक म्हणतात[२३], तसेच निबूर, कोलिंगवूड, एडवर्डकार, कार्ल मार्क्स, मार्क ब्लाच, लुसियन फाब्रे, फर्नाद ब्रोदेल, पीटर बर्क, विलीयम जोन्स, हेन्री कोलब्रुक, जेम्स प्रिन्सेस, अलेक्झांडर कॅनिगहम, मॅक्समुल्लर, जेम्स मील, गॅट डफ, जेन्सटॉड हे परदेशी लेखक तर काशीप्रसाद जयस्वाल, वीर सावरकर, राधा कुमुद मुखर्जी, डॉ. रामकृष्ण भांडारकर, डॉ. अळनेकर, डॉ. हबीब, सर जदुनाथ सरकार, के. एम. अशरफ, आशिर्वादलाल श्रीवास्तव, रमेशचंद्र मुजुमदार, डॉ. धर्मानंद कोसंबी, रोमीला थापर, डॉ. बीपीनचंद्र, गो. स. सरदेसाई, डॉ. ॲन्तानिओ ग्रामची, रणजित गुहा, सुमित सरकार इत्यादी लेखकाचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल.

**इतिहासाची व्याप्ती –**

इतिहासाची व्याख्या स्वरूप या प्रमाणे इतिहासाची व्याप्ती ही नेहमी बदलणारी व विकसीत होणारी आहे. त्यादृष्टीने इतिहास ही नेहमी व्यापक व विकसीत होत जाणारी ज्ञानशाखा आहे कारण ग्रीक इतिहास लेखनापासून म्हणजेच इ. स. पूर्व ५ व्या शतकापासुन तर इ. स. २१ व्या शतकापर्यत म्हणजे इतिहासाची व्याप्ती वाढत गेलेली आपल्याला दिसून येते. त्या क्षेत्रात विस्तार झालेला दिसतो.

काळाच्या ओघात इतिहास लिहितांना इतिहासकारांनी ऐतिहासिक दृष्टीत बदल केला त्यामुळे इतिहासाची व्याप्ती वाढली या संदर्भात इतिहासकार वाल्श म्हणतो, "History as we know it today as developed branch to learning … is a comparatively new thing …"[24]

प्राचीनकाळी इतिहास लेखनाची व्याप्ती राजे व त्यांच्या पराक्रमाच्या गोष्टी इतकाच मर्यादित होत्या. पुढील काळात राजा त्यांचे युध्दे, तह, त्यांचा साम्राज्यविस्तार, राजे रजवाडे अशी व्याप्ती वाढली विशेषता ग्रीकांनी या बाबतीत लिखाण करतांना राजकीय घटनांचाच अंर्तभाव इतिहासात केला.

मात्र इ. स. तिसऱ्या शतकापासून तर १५ व्या शतकापर्यतच्या काळाला हा जगातील धर्मनिष्ठ इतिहास लेखनाचा काळ असल्यामुळे आधीच राजकीय विषयावरील लिखान मर्यादित होऊन धार्मिक इतिहास लेखनाला प्राधान्य दिल्या गेले त्यात ईश्वराचे कार्य, महात्मा, चमत्कार, जीवन कार्य या गोष्टीला इतिहासामध्ये स्थान दिल्या गेले परंतु मानवी जीवनाकडे ऐतिहासिक दृष्टीने विचार झाला नाही.[२५]

परंतु १६ व्या शतकात युरोपात झालेल्या पुनरूज्जीवनाच्या क्रांतीनंतर मात्र बदल होऊन मानवी जीवनाकडे पाहण्याची मानवतावादीदृष्टी विकसीत होऊन देव व धार्मिक विषय बाजूला सारून राजाच्या संपर्कातील सरदार अमीर उमराव, त्यांचे जीवन व कार्य कर्तृत्व व मानवी कार्याशी निगडीत विषय यावर इतिहास लेखन होऊ लागले. नवीन जलमार्गाचा शोध घेणाऱ्या साहसी खलाशांच्या जलप्रवासाची वर्णने प्रसिध्द होऊ लागली.[२६] इतिहासाचा विषय हा भूतकाळाशी संबंधीत असल्यामुळे भूतकाळे संदर्भसाधनातून शोधण्याचे प्रयत्न होऊ लागले यासाठी लिखित व अलिखित

संदर्भ साधने शोधून इतिहास लेखन होऊ लागले याबाबत फ्रेंच पध्दतिशास्त्रज्ञ सिईन बॉस व लॉजिलास म्हणतो. 'No Documents No History'.[27]

पुढे १८ व्या शतकात दळणवळणाच्या व वाहतूक साधनात क्रांती होऊन अनेक इतिहासाच्यासंदर्भ साधनाचा, साहित्याचा कागदपत्राचा मागोवा घेऊन अभ्यास सुरू केल्यामुळे केवळ घटनांचा अभ्यास न राहता आता परीस्थितीचा व घडामोडीचा अभ्यास सुरू होऊन इतिहासाचे तत्वज्ञान इतिहास लेखनात मांडल्या जाऊ लागले त्यात इटालीचा व्हिको, फ्रान्सचा व्हाल्टेअर, जोहान हर्डर इत्यादी विचारवंतानी इतिहासाकडे पाहण्याचा दृष्टीकोनात भर घातली.[२८]

१९ व्या शतकात इतिहास लेखनात मोठ्या प्रमाणात परीवर्तन घडून मानवी जीवनाचा व्यापक विचार होऊन मानवाबरोबरच समाजाचाही अभ्यास होऊ लागला तसेच सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, भौगोलीक गोष्टीचेही अध्ययनाकडे लक्ष दिल्या जाऊ लागले तसेच २० व्या शतकातही इतिहासची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढून मानवी जीवनाच्या अनेक ज्ञानशाखांचा अभ्यास इतिहासात सुरू झाल्या. पुरातत्वशास्त्र, नाणेशास्त्र, शिल्पशास्त्र या सहाय्यकारी शास्त्राचा मदतीमुळे इतिहासलेखनाच्या कक्षा व्यापक बनल्या व यातुनच पुढे इतिहास लेखनात वेगवेगळे विषय मांडल्या जाऊ लागले. उदा. सामाजिक हालचाली, खेळ, चालीरीती, परंपरा, दैनंदिन जीवन हे इतिहासाचे विषय बनले. त्याचबरोबर मानवी जीवनाच्या प्रगतीचा विचार होऊन नद्या, पर्वत, सागर, निसर्ग, व्यापार उद्योगधंदे, शेती, तंत्रज्ञान, भौगोलिक शोध इत्यादी विषयावर इतिहासात लेखन होऊ लागल्यामुळे इतिहासाची व्याप्ती २० व्या शतकात मोठ्या प्रमाणात वाढली व समाजशास्त्र, राज्यशास्त्र, मानव्यशास्त्र, अर्थशास्त्र, पुरातत्व, भौतिकशास्त्रे यांच्याशी संबधीत विषय म्हणून इतिहासाकडे पाहिल्या जाऊ लागले.

प्रो. जी. एम. ट्रिव्हलीन यांनी इतिहासाचा व्याप्ती संदर्भात (१) शास्त्रीय (२) काल्पनिक (३) साहित्यीक या तीन शाखा सांगितल्या[२९] यामुळे इतिहास व्याप्तीकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलून अनेक विषयाचा अर्तभाव इतिहासामध्ये केला जाऊ लागला व इतिहासाची व्याप्ती ही मानवाच्या उत्क्रातीशी संबधीत म्हणून मानवाने वेगवेगळ्या क्षेत्रात केलेली प्रगती व विकासाचा आढावा आवश्यक मानला जाऊन अनेक विषय इतिहासात समाविष्ठ केल्या गेले. त्यात आईन्स्टाईनचासापेक्षतावाद, साहित्य क्षेत्रातील संरचनावाद यासारखे नवीन प्रयोग इतिहास लेखनात होऊ लागले व यातूनच दुर्लक्षित लहान विषयावरील लेखन करण्यास मायल फुको याने सांगितल्यामुळे वंचिताचा इतिहास, प्रादेशिक इतिहास, स्थानिक इतिहास लेखनाला प्राध्यान्य दिल्या गेले.[३०]

अशा प्रकारे आज इतिहासाच्या व्याप्तीत अनेक विषयाचा समावेश होऊन मानवाशी (१) संबधीत अनेक नवीन विषयावर इतिहासलेखन केल्या गेल्यामुळे इतिहासाची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढली तसेच (२) इतिहास लेखनाचे अनेक नवीन प्रवाह तयार होऊन त्यावरही मोठ्या प्रमाणात इतिहास लेखनाला सुरूवात झाली आहे. त्यादृष्टीने इतिहासाची व्याप्ती ही अमर्याद आहे असे म्हणता येईल.

**इतिहास लेखनाचे नविन प्रवाह –**

२० व २१ व्या शतकात इतिहासाची व्याप्ती मोठ्या प्रमाणावर वाढली व वेगवेगळ्या दृष्टीकोनातून लिखान होऊ लागले. त्यात प्रामुख्याने पौर्वान्यवादी, मार्क्सवादी, साम्राज्यवादी, धर्मशास्त्रीय, राष्ट्रवादी, उदारमतवादी, पुराणमतवादी, मानवतावादी, उत्तर आधुनिकतावादी, सबाल्टर्न, नवमार्क्सवादी इत्यादी दृष्टीकोन तयार होऊन त्याद्वारे लिखान होऊ लागले. व विशिष्ट दृष्टीकोनातून इतिहासाकडे पाहण्याची दृष्टी निर्माण झाली.

परंतु यामध्ये पुढील काळात बदल होऊन इतिहासाची व्याप्ती आणखी वाढून नविन दृष्टीकोन व परंपरा स्विकारल्या गेल्या. उदा. ॲनाल्सया परंपरेने ऐतिहासिक नवीन दृष्टीकोन देऊन खऱ्याअर्थाने इतिहासाला Interdisciplinary करण्याचे श्रेय देता येईल. कारण या परंपरेने हे सांगितले की मानवी जीवनाला व्यापून टाकणाऱ्या संपूर्ण गोष्टीचा समावेश करणाऱ्या इतिहासाची मागणी केली पाहिजे.[३१] यामुळे आणखी व्यापकता वाढून इतिहासात अनेक नविन प्रवाह निर्माण झाले व त्यादृष्टीने लेखन होऊ लागले व यातूनच स्थानिक इतिहास, प्रादेशिक इतिहास, वंचितांचा इतिहास, पर्यावरणाचा इतिहास, खाद्यसंस्कृतीचा इतिहास, स्त्रीवादी इतिहास, कायद्याचा इतिहास, संरचनावादी इतिहास, उत्तर आधुनिकतावाद, मौखिक इतिहास, नागरी, इतिहास, लिंगभाव आणि पुरूषत्वाचा अभ्यास, जमातवाद आणि इतिहास,

साहित्याचा इतिहास, संस्कृतीचा इतिहास इत्यादी सारखे नवेप्रवाह तयार होऊन त्यावर लिखानास सुरूवात झाली आहे. व नवीन संशोधने समोर येऊन इतिहासाची व्यापकता आणखी वाढत आहे.

**(अ) पौर्वात्यवादी इतिहास लेखन किंवा प्राच्यप्रणाली (Orientalist History) –**

युरोपच्या पूर्वेकडील असलेल्या प्रदेशाला प्रामुख्याने युरोपियनानी पौर्वात्य असा उल्लेख केलेला आहे. त्यात प्रामुख्यात भारत, चीन, जपान व इतर राष्ट्राचा समावेश असून Orient म्हणजे पौर्वात्यजन उगवणाऱ्या सूर्याकडील जग असा शब्दाशा अर्थलॅटीनभाषेत आढळतो.[३२] या संदर्भात डॉ. एडवर्ड सैद यांनी आपल्या Orientalism या ग्रंथात याबद्दल पौर्वात्यवादाची विवेचना केलेले आहे.[३३]

भारतीय प्राचीन ग्रंथात मोठ्या प्रमाणात माहिती आहे. परंतु त्याचा प्रसार व परिचय हा पाहिजे तसा झाला नाही म्हणून ब्रिटीशाच्या प्रशासकीय गरजेतून व जिज्ञासेतून १८ व्या व १९ व्या शतकात ब्रिटीश मिशनऱ्यांनी प्राचीन भारतीय इतिहासाचे व साहित्याचे महत्व व परिचय जगापुढे आणण्यासाठी या ग्रंथाचे अध्ययन व भाषांतर सुरू केले.[३४] व यातून प्राच्यविद्येची स्वतंत्र ज्ञानशाखा विकसीत होऊन विल्यम जोन्स, चार्लस विल्किन्स, हेन्री थॉमस कोलब्रुक, मॅक्स मुल्लर इत्यादीनी भारतीय विद्याभ्यासकांनी सुरू केला व भारतीय संस्कृती कशी श्रेष्ट आहे हे जगाला सांगितले.[३५]

या पौर्वात्यवादी इतिहासलेखात दुसरा संप्रदाय हा आग्लवाद्यांचा असून जेम्स मिल, लार्ड विल्यम बेटींग, लार्ड थॉमस बीबीग्टन, मॅकाले इत्यादीनी भारतीय संस्कृतीला हिन लेखून हिंदु संस्कृती ही मुळात श्रेष्ठ आहे पण ती आता मलिन झाली आहे. असा उल्लेख केला.[३६] यामुळे भारतीय संस्कृतीतील दोष दाखविण्याचा प्रयत्न केला गेला.

अशा वेळी डॉ. एडवर्ड सैद यांनी या संदर्भात पोर्वात्य इतिहासलेखनाबाबत ब्रिटीशांचा दृष्टीकोन कसा स्वार्थी होता, पाश्चिमात्य व पौर्वात्य यांच्यात विषमता निर्माण करणारा दृष्टीकोन होता हे सांगून यात सुधारणेची आवश्यकता प्रतिवादन केली व पौर्वात्य दृष्टीकोनासंबंधी त्यांना नविन पध्दतीने इतिहास लेखनाला सुरवात केली,[३७] यातूनच इतिहास लेखनाबाबत नवीन प्रवाह उदयास आला.

**(ब) स्त्रीवादी इतिहास लेखन (Feminist History) –**

स्त्रीवाद ही एक तत्वप्रणाली असून त्यामध्ये अनेक प्रवाह आहे. स्त्रियांना इतिहासामध्ये स्थान व महत्व नाकारून स्त्री ही नाजूक, हळवी अविवेकी असून पुरूष हे मजबूत विवेकी असतात. म्हणून स्त्रीयांना शिक्षणांचा, स्वातंत्र्याचा मतदानाचा या सारखे अधिकार नाकारल्या गेले ही परीस्थिती जगाबरोबरच भारतात ही मोठ्या प्रमाणात दिसते या दृष्टीने जागतिक इतिहासाचा अभ्यास केल्यास त्यातही स्त्रीयांचा दर्जा पुरूषापेक्षा गौण होता असेच म्हणता येईल. त्यांना अनेक अधिकार नाकारून स्त्री म्हणजे उपभोग्य वस्तू असाच तिच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन होता. जगाच्या व देशाच्या इतिहासात पुरूष प्रधानतेलाच महत्व देऊन स्त्रीयांचे महत्व नाकारल्या गेले म्हणून यासंदर्भात जगात स्त्रीवादी चळवळी उदयास आल्या त्यात पहिली चळवळ किंवा लाट ही १९ व्या शतकाच्या प्रारंभीच्या दशकात विकसीत झाली तर दुसरी चळवळ ही १९६० ते ८० या काळात तर तिसरी लाट १९९० नंतर उदयास आली ती आजपर्यंत कायम आहे.[३८]

त्यात काही स्त्री लेखिकेने लिखाण करून स्त्रीवादाचा पुरस्कार केला त्यात मेरी वोल्टन स्क्राप्ट (१७५९ ते १७९९) यांनी 'A Vindication of the right of woman' हा उदारनवादी विचारधारेचा ग्रंथ लिहून स्त्री पुरूष समानतेचा पुरस्कार केला.[३९] याशिवाय या काळात जॉन स्ट्युअर्ट मिल व हॅरीएट टेलर यांनीही स्त्री समानहक्क व नागरी हक्क बद्दलचा आग्रह धरला[४०] तर समाजवादी विचारवंत फुरीअर, सॉ सीना इत्यादी विचारवंतानी वर्गव्यवस्था ही स्त्रियांना दुय्यम स्थान प्रदान करते अशी भूमिका घेतली व मार्क्सवादी स्त्री वाद्यांनी विशेषता मेरीअरोसा डाला कोस्टा व सेलमा जेम्स यांनी स्त्रियांच्या गृहकामाच्या वेतनाचा मुद्दा उचलून धरला.[४१]

सिमा दि वोबुआ यांच्या १९८९ साली प्रकाशित झालेल्या 'The Second Sex' या ग्रंथात त्यांनी स्त्रियांची भूमिका स्पष्ट करतांना ती पुरूषाप्रमाणेच सचेतन व स्वयंभू आहे हे आत पुरूषांनी ओळखले पाहिजे असे सांगितले.[४२]

पुढील १९६० ते ८० च्या दुसऱ्या लाटेत जहाल स्त्रीवादाचा पुरस्कार करून, शुलामिथ फायरस्टोन या विदुषीने'The Dialectic of Sex' (१९७०) या ग्रंथात स्त्रीयांच्या शोषणाचे कारण जैविक असून त्यासाठी जैविक क्रांतीची आवश्यकता प्रतिपादीत केली तर[४३] केट मिलेट यांनी 'Sexual Politics' (१९७०) या ग्रंथात स्त्रियांची

शोषणाची बीजे ही पितृसत्ताक लिगभावव्यवस्थेत आहे असे सांगितले.[४४] अशाप्रकारे बेल हुक्स, ॲलिस वॉकर या काळावर्णीय स्त्रियांनी स्त्रीवाद बद्दल लेखन करून स्त्रीयांची भूमिका मांडली.

पुढे १९८० मध्ये कोपरहेगेन व १९८५ मध्ये नॅरोबी येथे झालेली स्त्रीवादी परिषदामध्ये ही स्त्रीयांच्या प्रश्नाची मांडणी व अधिकाराची भाषा बोलल्या गेली.[४५]

याचेच पडसाद भारतातही उमटून भारतामध्ये स्त्रीवादी लेखनाला सुरवात झाली. महात्मा फुले, गोपळ आगरकर, मं. गांधी, डॉ. आंबेडकर यांनी स्त्री मुक्तिचा पुरस्कार केला व त्यात विनोबा भावे, दादा धर्माधिकारी, राम मनोहर लोहिया यांनी भर घातली व यातून विशेषता भारतात १९८० स्त्रीवादी चळवळ विस्तारली.

यातूनच राष्ट्रवादी इतिहासकारांनी स्त्रियांच्या परिस्थितीबाबत घेतलेल्या ऐतिहासिक दृष्टिकोनावरही टीका केल्या गेली तसेच वसाहतिक काळातील स्त्रीयांचा दर्जा, स्वातंत्र्योत्तर स्त्रीयांची चरीत्रे, स्त्रीयांच्या योगदानाचा इतिहास याकडे तत्कालीन भारतीय राष्ट्रवादी इतिहासकारांनी कसे दुर्लक्ष केले हे पटवून देऊन त्यात सुधारणा करण्याची आवश्यकता प्रतिवादन केल्या गेली[४६] व नवीन स्त्रीवादी इतीहासलेखनाला सुरवात झाली. त्यात गर्दा लर्नर या स्त्रीवादी अभ्यासकाचे योगदान महत्वाचे मानले जाते. त्याचबरोबर राबर्ट ब्रिफा, गार्डन चार्हल्ड, एव्हलिन रीड यांनी या क्षेत्रात मोठी कामगिरी केली आहे.[४७] तर भारतात डॉ. इरावती कर्वे, डॉ. दा ध कोसंबी, डॉ. शरद पाटील, पुरातत्वज्ञ ह. धी. सांकलिया, डॉ. रा. चि. ढेरे, कुमकुम रॉय, डॉ. लीला दुबे, उमा चक्रवर्ती, डॉ. सुहासिनी हर्लेकर, डॉ. इंदुमती शेवडे इत्यादी अनेक स्त्रीवादी इतिहासकारांनी स्त्रियांच्या प्रश्नावर प्रकाश टाकून स्त्रीवादी दृष्टीने इतिहास लेखन केले. त्यामुळे आधुनिक काळात स्त्रीवादी इतिहास लेखन (Feminist History) हा नवीन प्रवाह उद्यास आला.[४८]

**(क) खाद्यसंस्कृतीचा इतिहास (Culinary History) –**

२० व्या शतकाच्या उत्तराधीन म्हणजे १९७० च्या दशकापासून खाद्यसंस्कृतीचा इतिहास लिहण्यास सुरवात झाली असुन या शाखेला History of diet, History of food किवा Culinary History असेही म्हणतात.[४९]काळ, समाज व संस्कृतीची खाद्यक्षेत्रातील भूमिका कशी होती व त्याचा कसा विकास होत गेला हे सांगण्याच्या व समजवण्याचे काम या इतिहास लेखनाच्या माध्यमातून केले जात असून समाजाचे व व्यक्तीचे खाण्यापिण्याविषयीचे आचार–विचार या बद्दलची माहिती ही या इतिहासलेखनाचा विषय आहे.[५०]

मानवी जीवनाचा समग्र इतिहास लिहिला जावा ही भूमिका फ्रेच इतिहासकारांनी घेऊन 'The Annales School' च्या माध्यमातून मार्क ब्लॉक, लुसिन फेब्रव, एव्हरनॅक यांनी घेतल्यामुळे मानवाच्या सांस्कृतिक व भौतीक क्षेत्रातील इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला गेला यातूनच खाद्यसंस्कृतीचा इतिहास लिहिण्यास चालना मिळावी या दृष्टीने ॲनाल्स वाद्यांनी या संशोधनाला नविन दिशा दिली व यातूनच यासंबधी लिखान होऊन १९६१ मध्ये आहाराच्या इतिहासाबाबत 'Material life and biological Behavior' हे पुस्तक प्रसिध्द झाले[५१] व त्यामाध्यमातून केवळ पोषणमूल्ये व आहारशास्त्र इतकी मार्यादित दृष्टीकोन न ठेवता इतिहासकारांनी आहारावरील संशोधनाला गांभिरतापूर्वक घेऊन त्याच्या माध्यमातून सामाजिक व सांस्कृतिक आकृतीबंध शोधण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन ॲनाल्सवाद्यांनी केला.[५२] विशेषता यातील फर्नाद ब्रॉदेल यांनी खाद्यसंस्कृतीवर ग्रंथ लिहून या विषयाला चालना दिली. व त्यांनी कार्न, तांदूळ व मका यांना Plants of Civilization मानले व 'हि तिनही धान्ये मानवाच्या भौतिक व काही प्रमाणात आध्यात्मिक जीवनाला संघटीत करणारी ठरली' असे ब्रादेल मानतो[५३] व यासंदर्भात 'Superfluify, Food and Drink', 'Daily Brade' या सारखे लेख पुस्तकात लिहीले.[५४]

यातूनच पुढील काळात ब्रॉदेल च्या विचारांचा आधार घेऊन अनेकांनी खाद्यसंस्कृतीच्या इतिहासलेखनाला सुरूवात केल्यामुळे खाद्यसंस्कृतीच्या इतिहासाला स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून मान्यता मिळू लागली. वैद्यकीयशास्त्र, जैवविवीधतेचा अभ्यास, वसाहतवादाचा अभ्यास करतांना खाद्यसंस्कृती हा प्रमुख घटक आवश्यक मानल्या जाऊ लागला[५५] व विविध देशाचा सामाजिक व सांस्कृतिक इतिहासांचा मागोवा खाद्यसंस्कृतीच्या माध्यमातून घेणारे अनेक ग्रंथ तयार झाले. त्यात के. एन. चौधरी 'Asia Befor Europe : Economy and Civilisation of the Indian Ocean from the Rise of Islam to 1750', जॉर्ज बर्नेट चा 'Plenty and want a social History of Daiat in England from 1818 to the present day', रिचर्ड बॅकेट चे 'Conviced test in Australia', फिलिप फर्नांडिस–अर्मस्तो यांचा

'Food History', के सी चॅग यांचा 'Food in China', इत्यादी सारखे ग्रंथ नंतरच्या काळात निर्माण होऊ खाद्यसंस्कृती च्या इतिहास लेखनाचा प्रवाह सुरू झाला.[५६] १९८० पासून अमेरिकेतील बोस्टन हे शहर खाद्यसंस्कृतीच्या अभ्यासाचे केंद्र बनले[५७] व नवीन दृष्टीने वसाहतीचा प्रशासनाच्या धोरणामुळे शेती पध्दतीत झालेला बदल, पारंपारीक अन्नाच्या जागी नविन अन्नपदार्थाची सवय, औद्योगीकरण, शहरीकरण, जागतिकीकरण यामुळे खाद्यसंस्कृतीत व आहारात झालेला बदल, कुपोषण, नवीन पदार्थाची आवड इत्यादी अनेक विषयाचा सखोल अभ्यास या शास्त्रात सुरू होऊन जगातील अनेक संदर्भ साधने अभ्यासले जाऊ लागले. भारताच्या संदर्भात डॉ. गोडे यांचे फार मोठे योगदान आहे त्यांनी आपल्या संशोधनात खाद्यपदार्थाचे वस्तूचे व अन्नघटकांचे प्राचीनात उल्लेख शोधून काढून त्याद्वारे उगम शोधण्याचा प्रयत्न केला व अनेक संदर्भ साधने त्यांनी प्रकाशात आणली त्यामुळे त्यांना भारतीय खाद्यसंस्कृतीच्या इतिहासाचे जनक असे म्हणतात.[५८]

**४) पर्यावरणाचा इतिहास (Envirnmental History)–**

आजच्या काळात पर्यावरणाची समस्या बिकट झाल्यामुळे पर्यावरण इतिहासाच्या अभ्यासास विशेष महत्व प्राप्त झाले आहे. या दृष्टीने जागतिक स्तरावरही मोठ्या प्रमाणात या प्रश्नाची चर्चा सुरू असुन त्यासाठी अनेक जागतीक परिषदांचे आयोजनसुध्दा केल्या जात आहे. आजच्या जगातील ज्या काही महत्वाच्या समस्या आहे त्यातील एक म्हणजे पर्यावरणाची समस्या या दृष्टीने इतर शास्त्राप्रमाणेच इतिहासकारांनीही याकडे लक्ष देऊन ऐतीहासिक दृष्टीने पर्यावरणाचा इतिहास लेखनास १९७२ पासुन खऱ्या अर्थाने सुरूवात केली.[५९]

पॅरीस मध्ये 'ॲनाल्स' ही फ्रेच इतिहासकारांची नवीन विचारप्रणाली उदयास आली व त्यांनी 'समग्र इतिहासलेखन' या विचारातून इतिहासलेखन हे उद्दीष्ट समोर ठेवल्यामुळे या विचारप्रणालीचे व विद्वानांनी व इतिहासकारांनी नव्या क्षितीजांना व विषयांना इतिहासात सामावण्याचा प्रयत्न चालविला त्यातील ल्युसिन फेब्रव (१८७८–१९७६) मार्क ब्लॉक (१८८६–१९४४), फर्नाद ब्रोदेल (१९०२–१९८५) या ॲनाल्स प्रणालीच्या उद्गात्यांनी नवीन विषयाची भर इतिहासात टाकून व्याप्ती वाढविली. इतिहासातील नवीन विषयावर अध्ययन करणे, सामाजिक व आर्थिक इतिहासाचे श्रेष्ठत्व व सिध्द करणे आणि मानववंशशास्त्र हवामानशास्त्र, मानसशास्त्र, भूगोल आणि इतर संबधित शास्त्राकडून मदत घेणे या उद्दिष्टातून व हेतून इतिहासलेखनाचा सुरवात केली त्यामुळे मानवाच्या सर्व ज्ञानशाखांना समाविष्ट करून घेणाची आवश्यकता 'अनाल्स' या विचारप्रणालीने सांगितले. त्यामुळे या विचारप्रणालीचे इतिहासकार फर्नाद ब्रादेल यांनी पर्यावरणाचा इतिहासावर भर देऊन या संदर्भात इतिहासलेखन करण्याची प्रेरणा जागतिक व भारतीय इतिहासकारांना तसेच पर्यावरणवाद्यांना दिली यातून पर्यावरणाचा इतिहासाचे लेखन वाढले.[६०]

फर्नाद ब्रादेल यांनी यांनी मानवाच्या दैनंदिन जीवनाच्या अंर्तभाव इतिहासात व्हावा अशी भूमिका घेतल्यामुळे वने आणि पर्यावरणाचा विषयात्मक व संख्यात्मकदृष्ट्या अभ्यास त्यांनी आपल्या लेखनामध्ये केला व यातूनच त्यांचीHistory of Civilization out of Italy वThe medeterian and the Medeterian world in the age of Philip the II हे ग्रंथ लिहिली.[६१] त्यात त्यांनी भूमीत व पर्यावरणा संदर्भातील विचार मांडला व त्यामुळे पर्यावरण इतिहास लेखनाला सुरवात झाली. तसेच इमॅन्युअल रॉय लौदुरी यांनीही १९५० नंतर पर्यावरणाच्या इतिहासावर लेखन करून पर्यावरण इतिहासाच्या संशोधनात वनांच्या सांस्कृतीक इतिहासाला व त्या संबधीत प्रश्नांना महत्वाचे स्थान आहे असे सांगितले. [६२]

यामुळेच द्वितीय महायुध्दानंतर अमेरिकेत मोठ्या प्रमाणात वनांच्या इतिहासावर लेखन केल्या गेले व पर्यावरण इतिहासात, निसर्ग व काळाच्या ओघात त्यामध्ये झालेले बदल, मानवाने निसर्गाच्या उपयोग केल्याने झालेले बदल याशिवाय भटक्या, शिकार व अन्न करणाऱ्या जमाती, शेती करणारी गट, वसाहतिक विस्तार, औद्योगी क्रांतीमुळे झालेले बदल, मिथके, धर्म, विज्ञान याबाबतचे जनतेचे दृष्टीने इत्यादी विषयाची चर्चा पर्यावरणाच्या इतिहासात होऊ लागली व यातून १९६७ मध्ये रॉडरीक नॅश या अमेरीकन इतिहासकाराने 'wilderness and the American mind हे पुस्तक लिहिले.[६३]

भारतामध्ये पर्यावरणवादी शास्त्रज्ञ माधव गाडगीळ व इतिहासकार रामचंद्र गुहा यांनी 'This Fissured Land and Ecological History of India' हे पुस्तक लिहून भारतीय पर्यावरणादी इतिहासाचा दृष्टीकोन मांडला[६४] याशिवाय रिचर्ड ग्रीव यांनी १९९८ मध्ये इत्यादी 'Ecology, Climate and Empire, The Indian Ligecy in Global in

Envirnmental History – 1500 to 1940' यांनी या पुस्तकात पर्यावरणाचा इतिहास मांडला व वसाहतवाद्यांच्या वनसंवर्धनाबाबत रामचंद्र गुहानी केलेल्या चर्चेला व ग्रोव्ह यांनी आव्हान दिले.[६५] याशिवाय रोमीला थापर, सुमित गुहा (एनव्हायरनमेंट ॲन्ड एथनिसिटी इन इंडिया १२००–१९९१) इत्यादी सारख्या इतिहासकारांनी यावर लिखान करून पर्यावरणाचा इतिहासलिहीण्यास हातभार लावला[६६] तरी या क्षेत्रात अजून संशोधनाची फार आवश्यकता आहे या दृष्टीने या प्रवाहाला महत्व प्राप्त झाले आहे.

**५) लिंगभाव आणि पुरूषत्वाचा अभ्यास –**

जगात स्त्रियांच्या प्रश्नावरून स्त्रीमुक्ती चळवळ उदयास आली व यातून स्त्री अभ्यास (Women's Studies) ही नविन शाखा तयार झाली. परंतु या स्त्रीवादी चळवळीमुळे पुरूषांचीही कोडी, व घुसमट, कुचंबना होत असून त्यांना समाजात मानाचे स्थान राहिले नाही, त्यांची या विचारातून पुरूषाना सशक्त करण्यांच्या जाणीवेतून पुरूषाच्या मुक्तीचा विचार पुढे येऊन १९७० च्या दशकापासून पुरूष व पुरूषत्व यांचा अभ्यास सुरू झाला.[६७]

स्त्रीवादीचळवळीने स्त्री शोषणासाठी लिंगधिष्ठीत समाजव्यवस्था आणि पुरूषप्रधान संस्कृती व व्यवस्था ही जबाबदार मानली व लिंग (Sex) साठी लिंगभाव (Gender) यातील फरक सांगून स्त्रीशोषणाचे भौतीक आधाराची मांडणी केली व यातून लिंगभाव अभ्यासात (Gender Studies) सुरवात होऊन लिंगभावी करणाऱ्या प्रक्रियेत पुरूष व पुरूषत्व या विषयाच्या नविन अभ्यासाला सुरवात झाली.

'पुरूषत्व म्हणजे सामाजिक व्यवहार, सामाजिक संस्था, भाषा, संस्कृती यामधील स्त्रीत्व दुय्यममातून पुरूषी गुण श्रेष्ठ माननारे एक सामाजिक रचित होय'.[६८] या दृष्टीने पुरूष हा आक्रमकता, शक्ती, भावविवशता व भितीचा अभाव, शारीरीक इजेलान घाबरणे इत्यादी लक्षण व गुणांच्या दृष्टीने स्त्री पेक्षा श्रेष्ठ व वेगळा आहे तरी पण पुरूषाला समाज नेभळट, बायकी, नामर्द, स्त्रैण पुरूष ठरवतो, व स्त्रियांकडून त्यांची कुचंबना होते त्यामुळे तो श्रेष्ठ असूनही स्त्रीवादी चळवळीमुळे त्याला स्थान नाही म्हणून पुढील काढात पुरूषत्व सिध्द करण्याची कल्पना रूढ होऊन पुरूषांचे पुरूषत्व व पुरूष यांचा अभ्यास सुरू झाला. या दृष्टीने पुरूषत्व हे सामाजिक व सांस्कृतिक रचित आहे. या पुरूषत्वाचे तीन प्रवाह आहे (१) स्त्रीवाद समर्थक (२) पुरूषाच्या हक्काची मागणी करणारा (३) समलैगीक केंद्री[६९]

१९७० पासुन अमेरीकेत पुरूषाच्या मुक्तिची भाषा बोलणारी पुरूष मुक्तिची चळवळ सुरू झाली यातूनच वॉरेन फॅरेल यांनी स्त्रीवादी चळवळीमुळे पुरूषांची कोंडी होत असल्यामुळे त्यांना सशक्त करण्याची भूमिका घेतली.[७०] पुढील काळात १९८० नंतर पुरूष व पुरूषत्व या संदर्भात मोठ्या प्रमाणात नियतकालीकात लिखाणही झाले. ज्यात माइकेल फ्लड यांनी आस्ट्रेलियात 'X-Y : Men Sex Politics' नावाचे मासिक सुरू केले[७१] तर १९९२ साली 'Journal of Mens Studies' व १९९८ मध्ये 'Men and Masculinitin' हे मासिके सुरू झाली व याविषयावर राबर्ट कॉनेल, माईकेल फ्लड, माईकेल मेसनर, माईकेल किमेल, बॉब पिज इत्यादी अभ्यासकांनी महत्वपूर्ण लिखाण आणि संशोधन केले व पुरूषत्व हे सामाजिक रचित असून त्या दृष्टीने पुरूषत्वाचे अभ्यासाच्या आवश्यकता सांगितली,[७२] तसेच राबर्ट कॉनेल यांनी 'Masculinities' या आपल्या ग्रंथात (१) प्रभावशाली पुरूषत्व (२) दुय्यमपुरूषत्व (३) वर्चस्वाकांक्षी पुरूषत्व (४) सीमांतेकरण हे पुरूषत्वाचे चार प्रकार सांगून विचार स्पष्ट केले.[७३]

पुरूषत्वाचे तीन प्रवाहातील पहिला स्त्रीवादसमर्थक गटाने ही लिंगभेदभावाची व्यवस्था नष्ट करून स्त्रीमुक्तीचा पुरस्कार केला व यासाठी अनेक पुरूषांचे संघटन तयार झाले. विशेषता पाश्चात्य राष्ट्रात अनेक संघटना स्त्री हिसेविरोधात उभ्या राहिल्या त्यात अमेरिकेत (NOMAS), कॅनडात व्हाईट रिब्बन कॅम्पेन (WRC), ऑस्ट्रेलियात मासा (MASA) तर[७४] भारतात १९८० च्या दशकात पुरूष उवाच (पुणे १९८७), मावा (मेन्स अगेन्स्ट व्हायोलन्स ॲन्ड अब्यूज) (MAVA), मॅसवा (मेन्स ॲक्शान फॉर स्टापिग व्हायोलन्स अगेन्स्ट वूमन) (MASAVA) ही येथे (लखनौ २००२), सम्यक इत्यादी संघटना तयार होऊन लिगभेद, हिसा, लैगिकता इत्यादी विषयावर काम सुरू केले[७५] व 'चुप्पीतोडो' हिंसा रोको, 'नये मर्द की नयी सोच', गालीबंद आंदोलन इत्यादी सारखे अभियानही राबविली.[७६]

तर पुरूषत्वाच्या दुसऱ्या गटात पुरूषांच्या हक्काची मागणी करणाऱ्या मध्येही अनेकांनी गट संघटना व संस्था स्थापन केल्या. यात प्रामुख्याने पुरूष हक्क संरक्षण समिती, (१९९६), सेव्ह द इंडीयन फॅमिली फाऊंडेशन, अहमदाबाद येथे अखिल भारतीय पत्नी अत्याचार विरोधीमंच (ऑल इंडिया फेडरेशन टू अपोज क्राइम बाय व्हाईवज) या संघटना

स्थापन झाल्या. राज्यसंस्थेने स्त्री केंद्र कायदे केल्यामुळे त्याचा गैरवापर स्त्रिया पुरूषांविरूध्द करीत असून पुरूषत्व धोक्यात आले आहे. त्यासाठी पुरुष हक्कांनी संरक्षणाची, मुक्तीची मागणी या गटांनी केली.[७७]

तर पुरूषत्वाच्या तिसऱ्या समलैंगिकता (Homo sexuality) या प्रवाहातही अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर संघटना स्थापन झाल्या. ज्यात भारतात हमसफर ट्रस्ट, पुकार, समपंथी ट्रस्ट, नाझ फाऊंडेशन इत्यादी संघटना होऊन या संघटना समलिंगी पुरूष व तृतीयपंथी यांच्याबरोबर कामकरीत आहे व यातूनच ट्रान्सजेन्डर, ट्रान्ससेक्युअल, पुरूष पेढ्या, तृतीय पंथी यांचा अभ्यास केला जात आहे व अनेक लिखाण व संशोधन पुढे येत आहे.[७८]

यादृष्टीने इतिहासलेखन शास्त्रात मृणालिनी सिन्हा, रोजलिण्ड ओहनलन यांनी 'मुगलकाळातील पुरूषत्व आणि वसाहतीक पुरूषत्व यांचा अभ्यास', केला आहे.[७९] तसेच आशिष नदी यांनी भारतीय पुरूषत्वाच्या पुनबांधणीवर ब्रिटीश साम्राज्याचा कसा प्रभाव पडला यांचे अध्ययन केले तर म. गांधी यांनी ब्रिटीशाच्या धोरणाविरोधात पुरूषत्वापेक्षा स्त्रीत्व कसे श्रेष्ठ आहे यांची मांडणी आपल्या विचारातून केली तर जोसेफ अल्टर यांनी देहाधिष्ठि राष्ट्रवाद आणि पुरूषत्व याची मांडणी केली,[८०] याशिवाय सुधीर कक्कर, पार्थ चटर्जी, संजय श्रीवास्तव, राधिका चोप्रा, मंगेश कुळकणी यांनी यासंदर्भात महत्वाचे लेखन व संशोधन घडवून आणले व इतिहास लेखनात पुरूषत्वाचा व लिग भावाच्या अभ्यासाला वाव निर्माण करून दिल्या.

या शिवाय इतिहास लेखनात अनेक नवीन इतिहास प्रवाह येत आहे. या ठिकाणी सगळ्यांची माहिती देणे शक्य नसल्यामुळे काही महत्वाचे लेखनप्रवाह याठिकाणी घेतले आहे. आधुनिक काळात, नवीन इतिहास प्रवाहामध्ये Annals(ॲनाल्स)ह्या लेखन प्रवाहाचे योगदान महत्वाचे मानले जाते तसेच Sabaltarn History, Law History, Structura History, New Marxist History, Postmodernanism History, जमातवाद आणि इतिहास, अब्राम्हणी (जात वर्ग स्त्री दास्यान्त) इतिहास, Oral History, Local History, Regional History इत्यादी. यावर संशोधन व लिखान होत आहे. व नवीन ज्ञानशाखांची भर इतिहास लेखनात प्रवाहात पडत आहे.

**६) प्रादेशिक इतिहास (Regional History) :–**

प्रादेशिक इतिहास ही इतिहासाची एक नवीन शाखा असून बऱ्याचवेळ आपल्या जगाचा, खंडाचा देशाचा इतिहास माहित असतो परंतु आपल्या सभोवताली असलेल्या परिसराच्या, प्रदेशाचा इतिहास माहित नसतो त्या दृष्टीने प्रादेशिक इतिहासाची लेखन आवश्यक मानले जाते.

प्रामुख्याने १९५० नंतर या प्रादेशिक इतिहास लेखनाला सुरूवात झाली. त्यामुळे आधुनिक काळात प्रादेशिक इतिहास लेखनाचे महत्व वाढले. परंतु खेदाची गोष्ट अशी की राष्ट्रीय इतिहास लिहिला जातो परंतु प्रादेशिक इतिहासाबद्दल अजूनही उदासिनता दिसून येते. १९७६ साली इतिहासकार रोमीला थापर यांनी पंजाबमध्ये झालेल्या इतिहास परिषदेतील व्याख्यानात प्रादेशिक इतिहासाची व्याप्ती व महत्व याबद्दल चर्चा केली होती.[८१] त्यामुळे काही प्रमाणात भारतात प्रादेशिक इतिहासाच्या संशोधनाबद्दल पुढील काळात जागरकता निर्माण झाली होती. परंतु पाहिजे तसे लिखाण या संदर्भात झाले नाही. काही प्रमाणात या संदर्भात लेखन झाले त्यात जेम्स टॉड चा 'राजस्थानचा इतिहास', विल्यम हंटरचा 'ग्रामीण बंगालचा इतिहास', डब्लू एच मोरलंडचा (संयुक्त प्रांताचा इतिहास, गॅड डफ चा 'मराठ्यांचा इतिहास', डॉ. रा. गो. भांडारकर यांचा 'दख्खन इतिहास', या. मा. काळे यांचा 'नागपूर प्रांताचा इतिहास', वि गो खोबरेकर यांचा 'कोकणचा इतिहास', अ. ज. राजूरकर यांचा 'चंद्रपूरचा इतिहास' ही काही उदाहरणे देता येईल.

प्रादेशिक इतिहास ही संज्ञा लवचिक व सापेक्ष असून प्रादेशिक इतिहास कशाला म्हणावे याबद्दलचे गैरसमज बरेच आहेत. बरेचदा स्थानिक इतिहासालाच प्रादेशिक इतिहास म्हटले जाते. परंतु या दोन्ही भिन्न संकल्पना आहे. स्थानिक इतिहास हा प्रादेशिक इतिहासाचा सूक्ष्मप्रकार म्हणता येईल. या दृष्टीने विचार केल्यास भारत हे एकत्व मानल्यास दक्षिण भारत, उत्तर भारत, महाराष्ट्र, तामिळनाडू हे 'प्रादेशिक' प्रकारातमोंडेल, व महाराष्ट्र हे एकाच मानले तर विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण इत्यादी प्रदेश हा 'प्रादेशिक' ठरेल. जर विदर्भाचा प्रदेश प्रादेशिक मानला तर नागपूरचा इतिहास, चंद्रपूरचा इतिहास हे स्थानिक ठरेल.[८२] त्यामुळे जगाचा व राष्ट्राचा इतिहास हा समग्रलक्षी इतिहास (Macro History) आहे तर प्रादेशिक व स्थानिक इतिहास हा अंशलक्षी इतिहास (Micro History) आहे.[८३]

इतिहासाचे व्यक्ति, समाज, स्थल आणि काळ हे चार अनुबंध असून स्थल किंवा प्रदेश काळालाही विशेष महत्व आहे कारण माणूस जेव्हा स्थलवासी झाला. तिथूनच मानवाच्या खऱ्या इतिहासाला सुरवात झाली त्यामुळे प्रादेशिक इतिहासाच्या संदर्भातही स्थळाचे महत्व अनन्य साधारण आहे.

ऐतिहासिक संदर्भात प्रादेशिकतेची सुरवात ही आपल्या गावापासुन होत असते म्हणूनच स्थानिक इतिहासाला (Local History) प्रादेशिक इतिहासाचा पोटविभाग म्हणता येईल. म्हणूनच प्रादेशिक इतिहास स्पष्ट करतांना सांस्कृतिक दृष्टीकोनही महत्वाचा मानला जातो. त्याच बरोबर भौगोलिकताही महत्वाची मानली जाते तसेच प्रादेशिक इतिहास लेखन करतांना वर्तमान संदर्भही विचारात घेतले जातात. परंतु प्रादेशिक इतिहासाद्वारे संकुचित प्रादेशिकतवाद जोपासल्या जाऊ नये यासाठी काही पथ्येही पाळली पाहिजे याशिवाय राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक वैचारिक ऐतिहासिक लेखन करतांना केवळ वर्णनावर भर न देता अन्वयायी सैधांतिक चर्चेलासुध्दा महत्व देऊन प्रादेशिक इतिहासलेखन करायला हवे[८४]

आधुनिक काळात प्रादेशिक लेखनाच्या संशोधनाबद्दल अनेक संशोधकांनी महत्वाचे लेखन केले आहे. विशेषता महाराष्ट्राच्या संदर्भात य. दि. फडके, मराठवाड्याच्या इतिहासाबाबत गो. ब. देगलूरकर, पंढरीनाथ रानडे, रा. श्री मोरवंचीकर, सोमनाथ रोडे, प्रभाकर देव इत्यादी तर खानदेशाच्या इतिहासाबाबत अरविंद देशपांडे, मु. व. शहा, श्याम कायदे, पी. डी. जगताप इत्यादी तर विदर्भाच्या इतिहासाबाबत या. मा. काळे, भा. रा. अंधारे, शरद कोलारकर, नि. आ. वक्काणी इत्यादी चे ग्रंथलेखन महत्वाचे मानले जाते.[८५] तरी पण आधुनिक काळात प्रादेशिक इतिहास लेखनाला जागतिकीकरणामुळे फरक पडून वेगळे संदर्भ तयार होत आहे.

तसेच प्रादेशिक इतिहासामुळे राष्ट्रीय इतिहास लेखनाला महत्व प्राप्त होऊन प्रादेशिक स्वातंत्र्य आंदोलने, चळवळी, नेतृत्व, प्रादेशिक प्रशासन, कायदे, प्रथा, परंपरा, युध्द, कला, स्थापत्य, शिल्प व मंदिरे याची माहिती उपलब्ध होऊन इतिहास लेखनाला वेगळी दिशा मिळते.

**मूल्यमापन :–**

आधुनिक काळात इतिहास म्हणजे केवळ राजा त्याच्या लढाया, तह, स्वातंत्र्य आंदोलने इतक्या पुरताच मर्यादित न राहता मानवी समाजाच्या संपूर्ण ज्ञानशाखाचा अभ्यास त्यात होऊन स्थानिक पातळीपासुन तर वैश्विक पातळी पर्यत (Local to Global) मानवाच्या सर्वस्पर्शी अंगाची चर्चा इतिहासात होत आहे. त्यामुळे इतिहास लेखनाच्या नवीन प्रवाहानी इतिहासाची व्याप्ती समृध्द केली आहे. त्यामुळे इतिहास विषयाचा चेहराच बदलून गेला आहे. इतिहासामुळे व्यक्तीचे नाव, गाव, कुटुंब, प्रदेश, राष्ट्र याची ओळख निर्माण होते. त्यामुळे इतिहासलेखन ही मानवी समाजाची मानसिक व बौध्दिक गरज आहे. या संदर्भात आर्थरमार्विक हा तत्वज्ञ म्हणतो की, 'इतिहासाविना मानवी समाजाची अवस्था ही स्मृतीभ्रंश झालेल्या माणसासारखी आहे'.[८६]

या दृष्टीने समग्रइतिहासाचे लेखन आज काळाची गरज आहे. हे ओळखून इतिहासकारांनी अनेक नवीन प्रवाहांचा अभ्यास व संशोधन करून त्यावर लिखाण सुरू आहे. त्यातून फ्रेच मध्येAnnalas School च्या माध्यमातून मार्क ब्लॉक, फर्नांद ब्रॉदेल यांनी वेगवेगळ्याविषयावर इतिहास लेखन केलेले दिसते. तसेच अनेक नवीन इतिहासविषयक लेखनाचे सबाल्टर्न, राष्ट्रवादी इत्यादी नविन दृष्टीकोन तयार झाले आहे.

भारतामध्ये १८ व्या शतकात खऱ्या अर्थाने शास्त्रशुध्द इतिहासलेखनाला वसाहतिक काळात सुरवात होऊन युरोपीय लेखकांनी इतिहास, धर्म, भाषा, तत्वज्ञान, साहित्य, कला इत्यादी विषयावर लेखन केले आहे त्यात पौर्वात्यवादी इतिहास लेखनाने महत्वाची कामगिरी केली आहे. (Orientalism या संज्ञेसाठी पौर्वात्यवादाप्रमाणेच प्राच्यप्रणाली हाही शब्द प्रयोग केला जातो).[८७]या इतिहासलेखनात पाश्चात्यवादी व आग्लवादी असे दोन गटानी भारतीय म्हणजे पौर्वात्य इतिहासलेखनाला बदनाम करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. परंतु पुढील काळात एडवर्ड सैद यांनी या संदर्भात नवीन विवेचन प्रस्तुत करून केले तसेच भारतीय संशोधकानीही भारतीय इतिहास लेखनाला वसाहतीक मानसिक व बौध्दिक गुलामगिरीतून स्वतंत्र करण्याच्या दृष्टीने महत्वाचे कार्य केले.

स्त्रीवाद हा स्त्री स्वातंत्र्याचा उद्घोष करणारा राजकीय दृष्टीकोन असून त्यामध्ये अनेकप्रवाह हे काळाच्या प्रवाहात उदय झाले व त्यांनी स्त्री प्रश्नाच्या सौध्दातिकरणाऱ्या समृध्द करणाचे प्रयत्न केले तसेच या स्त्रीवादी चळवळीने सामाजिक

शास्त्रामधील मुख्यप्रवाही सिध्दातांना व मांडणीलाही आव्हान दिले व इतिहास राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, साहित्य अशा सर्वच ज्ञानशाखातर्गत स्त्रीवादी नव्या मांडणीला सुरवात झाली आहे तरी अजून बराच पल्ला गाठायचा आहे.

भारतीय खाद्यसंस्कृतीचा विस्तृत्व काळ व विविधता पाहता त्याची व्याप्ती आपल्या लक्षात येते. परंतु अजूनही भारतात अजूनही खाद्यसंस्कृतीचा इतिहास हा गांभीर्याने घेतला जात नाही. मुख्यप्रवाही इतिहासावर खाद्यसंस्कृतीचा कसा प्रभाव टाकला जाऊ शकतो व इतिहासाच्या खाद्यसंस्कृतीचे कार्यस्थान आहे. याची मिमांसा करण्याची आवश्यकता आहे व यासंदर्भात ठोस संशोधनाची आवश्यकता आहे. तरी खाद्यसंस्कृतीच्या इतिहासमाध्यमातून इतिहासातील कालखंडातील सांस्कृतिक व सामाजिक तसेच आर्थिक जीवनावरही प्रभाव पडतो.पर्यावरणवादी इतिहासामुळे इतिहासामध्ये नविन दालन उघडल्या जाऊन मानवाच्या बरोबरच निसर्गाचाही अभ्यास इतिहासदृष्टीकोनातून सुरू झाला त्यामुळे श्रध्दा व मूल्ये कसे व्यक्त होतात व निसर्गाशी असलेले नाते कसे प्रभावीत करतात याचाही विचार पर्यावरणाच्या इतिहासामध्ये होऊ लागला. दूरव्यापी पर्यावरणवादी चळवळीने, वसाहतवादी कालखंडात वनांचा मानवी समाजाशी असलेल्या संबंधातील परिवर्तनाविषयी जाणून घेण्यास इतिहासकाराबरोबरच समाजशास्त्रज्ञानांही प्रवृत्त केले. जगाच्या तुलनेत भारतीय पर्यावरणाचा इतिहास हा बाल्यावस्थेत असून त्यात भर देण्याची आवश्यकता आहे.

पुरूष व पुरूषत्व या विषयावर चौकटीबाहेरही संशोधन व लिखाण होत असून अनेक स्वयंसेवी संघटना यांचे काम सुरू आहे. पुरूषत्व ही स्त्रीवादी चळवळीच्या विरोधात निर्माण झालेली चळवळ आहे. त्यामुळे याबाबतीत विरोधाभासही दिसतो. 'स्त्री' ही एक अभ्यासाची स्वतंत्र ज्ञानशाखा निर्माण आली आहे. त्यामुळे लिंगभावाचे चर्चाविश्व व्यापक बनत आहे. तेवह आज गरज आहे ती स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून पुरूष व पुरूषत्वाचा अभ्यास व चिकित्साकरण्याची व त्यादृष्टीने लिखान होणे आवश्यक आहे.

प्रादेशिक इतिहासाच्या माध्यमातूनही अनेक नवीन प्रादेशिक इतिहासाची मांडणी व लेखन होत आहे. राष्ट्रीय व वैश्विक इतिहासाला बळकटी येण्यासाठी प्रादेशिक इतिहास हा आवश्यक आहे. प्रादेशिक इतिहासातूनच स्थानिक इतिहासासाठी चालना मिळून अनेक नवीन संशोधन होत आहे. माहिती मिळत आहे. त्यामुळे स्थानिक नेतृत्व, चळवळी, कला स्थापत्य, समस्या इत्यादींचा अभ्यास पुढे येऊन व अनेक प्रादेशिक संदर्भ साधने पुढे येऊन इतिहासात नविन भर पडत आहे.एकूणच इतिहासलेखनात नविन परिप्रेक्षातून व विषयातून लेखनाला सुरवात होऊन अनेक नविन विषयावर लिखान होत आहे. उदा. वैद्यकशास्त्र विज्ञान व तंत्रज्ञानाचा इतिहास (History ofmedicin, Science & Tecnology), साहित्याचा इतिहास (History of literature) यासारखे अनेक विषय इतिहास लेखनात अंर्तभूत होत आहे. तरीही २१ व्या शतकात भारतीय इतिहासाला एका बाजूला उत्तर आधुनिकतावादाचे व नवसाम्राज्यवादाचे तर दुसऱ्या बाजूला संकुचित प्रादेशिकतावादाचे व जमातवादाचे आव्हान पेलावे लागत आहे. पाठ्यपुस्तकाच्या निर्मितीत राजकीय हस्तक्षेप वाटतो आहे. इतिहासाबाबत समाज अतिशय संवेदनशील व असहिष्णू बनला आहे. यातून इतिहासाचा अभ्यासक कसा मार्ग काढून ही आव्हाने पेलतो व नवीन प्रवाहाने इतिहास लिहितो हे काळच ठरवेल.

**संदर्भ ग्रंथ :–**

(१) डॉ. कोठेकर शांता, 'इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००७
(२) गायकवाड, डॉ सरदेसाई, हनमाने, 'इतिहास लेखनशास्त्र', फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००१
(३) बाबूरकर जास्वंदी(संपा), 'इतिहासातील नवीन प्रवाह', डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१४.
(४) डॉ. सरदेसाई बी. एन, 'इतिहास लेखन पध्दती', फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०११
(५) इ श्रीधरन, 'इतिहास लेख', ओरीएंट ब्लैकस्वान प्रकाशन, हैदराबाद, २०११
(६) पांडे प्रकाशचंद्र 'सार्थक इतिहासबोध', ग्रंथविकास प्रकाशन, जयपूर, २०११.
7)Ellwood P. Cubberley, 'Historical Perspectires of Education', Dominant Publishers, Delhi 2010.
8) Bajaj K Satish, 'Recent Trends in Histriography', Anmol Publishars, 1998.
9) Thapar Romila, 'The Scop and Significance of Regional History, Orient longman publishes, New Delhi, 1987.
१०) त्रैमासिक, इतिहास शिक्षक, इतिहास शिक्षक महामंडळ प्रकाशन, अंक. ३ रा. २०१२.
11) Lonkar Deepak(ed), 'Proceedingthe important of Regional History in Modern Age', Lokmanya Mahavidyalya, Waroa, 2015, 4 April.

# भारतीय योग पध्दती व मानवाची रोगप्रतिकार शक्ति:आत्मनिर्भर भारताच्यासंदर्भात

प्रा. उत्तम रामचंद्र देउळकर
संचालक, शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग
लोकमान्य महाविद्यालय, वरोरा. जि. चंद्रपुर.

**गोषवारा:—**

रोग हा एक प्रकार होय. काही महिण्यापुर्वी चीनच्या वुहान शहरातुन न्युमोनियाचा एक प्रकार समोर आला. डिसेंबर २०१९ ला जागतिक आरोग्य संघटनेने याला नोव्हल कोरोना व्हायरस कोविड—१९ असे नाव दिले. हळूहळू या साथीच्या रोगाचे लक्षणे संपुर्ण जगात दिसायला लागले. लाखोच्या संख्येने मानवावर मृत्युचे सावट पसरले, आणि विशेष म्हणजे ज्यांची रोगप्रतिकार शक्ति ही कमजोर असेल , आधिपासुनच इतर आजाराने त्रस्त असेल अश्या व्यक्तीना हा रोग जास्त प्रभावित करत होता. अजूनपर्यंत या रोगावर उपचाराकरीता लस सापडलेली नाही. अनेक देशात संशोधन चालू आहे. जानेवारी किंवा फेब्रुवारी २०२० पर्यन्त लस येण्याची संभावना व्यक्त केली जात आहे.

आयुर्वेदामध्ये मानवी शरीरातील रोगप्रतिकारकांना उत्तेजित करणारया औषधी उपलब्ध आहे. आयुर्वेद औषधीसंशोधनाच्या योगदानासाठी भारतीय वैद्यकीय शास्त्रीय प्रणाली सहसा ओळखली जाते. गेल्या २००० वर्षापासून आयुर्वेदाचा कोणताही दुष्परिणाम झालेला दिसुन येत नाही. योगाची वास्तविक सुरूवात चित्रित करणे खूपच अनिश्चित आहे. ही प्राचीन चिकित्सा पध्दतीपैकी एक आहे. नियमित योगाभ्यासाद्वारे आम्ही रोगप्रतिकार शक्ति वाढवून साथीच्या रोगापासून दूर राहू शकतो. ''योग म्हणजे जोडणे''हा विचार तो आपल्या जीवनात घेऊन निघाला की त्याला निसर्गाशी व नैसर्गिक सहजयोगाशी तो आपले सूत्र जुळविण्याचा प्रयत्न करतो. कारण ''योग: हा दु:ख नाशन'' निसर्गाच्या नियमाप्रमाणे जोडत राहिल्याने उफराटे विचार, आचार आणि उच्चार होण्याचे कारण नाही. जीवनात सर्वांच्या हिताची 'समदृष्टी' यायला लागते. ''सर्वांना सुख लाभावे तशी आरोग्यसंपदा, व्हावे कल्याण सर्वांचे, कोणी दु:खी असू नये'' ही सर्वात्मक निरामय—आरोग्याची भावना घेऊन तो धारणेवर चढतो. कुठलीही हानिकारक, हिंसक, असत्य बाब तो वर्ज्य करतो. तशी योगाची वृत्ती प्राणायाम नि आसनातून स्थिरावते.

आता योगाचा अर्थ पृथ्वीवर जीवन व्यतीत करणारया मानव समाजाला आरोग्य विषयक अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. ज्यामध्ये साथीचे सकाळी कुठेतरी जाऊन आसने नि प्राणायाम करण्यापुरता मर्यादित राहणार नाही. तो संपूर्ण 'जीवनरहीटीशी' निगडित झालेला असेल.

**प्रस्तावना:—**

आजच्या आधुनिक जीवनपध्दती मध्ये टॉक्सिन, प्रदुषण, खाण—पान जे बदलेले स्वरूप, नकारात्मक विचार या सर्वबाबी मनुष्याची रोगप्रतिकार क्षमता कमी करत असतात. आपण असे म्हणु शकतो की आधुनिक युगात मनुष्याची बदलेली जिवनशैली व रोगप्रतिकारशक्ती यांचा जवळचा संबंध आहे. आधुनिक जिवनशैली मध्ये आमचा आहार, विहार, आचरण या सर्व बाबी प्रभावित झालेल्या आहे. या सर्वांचा नकारात्मक प्रभाव आमच्या शारीरिक क्षमतेवर पडत आहे. जेव्हा मनुष्याची रोगप्रतिकार शक्ती कमजोर होते तेव्हा सर्दी—ताप, खोकला, डोकेदु:खी, कोरोना इत्यादी बीमारीचे आक्रमण मानवी शरीरावर लवकर होते, व मनुष्य बीमार पडतो. आहारामध्ये फरक पडल्यास त्याचा प्रभाव पाचनतंत्रावर पडतो. व पाचनतंत्रात बिघाड झाल्यास त्याचा प्रभाव रोगप्रतिकारशक्ती वर पडतो.

अत्याधिक चिंता, तणाव, असफलता, झोपपूर्ण न होणे, भिती, अविश्वास इ. मुळे आरोग्य हे बिघडते व रोगप्रतिकारशक्ती कमी होते. आसनाद्वारे वरील सर्व बाबीवर आम्ही प्रभाव टाकु शकतो. सर्व आसनामुळे शरीर लवचिक व सुदृड व रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यास मदत होत असते. नियमित योगाभ्यासाद्वारे आम्ही आपली रोगप्रतिकार शक्ती वाढवू शकतो.

योग हा शब्द 'युज' या संस्कृत धातुपासुन बनलेला आहे. ज्याचा अर्थ आहे आत्म्याचे परमात्म्यात विलीन होणे. योग ही भारतातील पाच हजार वर्ष प्राचीन ज्ञानशैली आहे. पुष्कळ लोकांचा असा समज आहे की योगाभ्यास म्हणजे शारीरिक

व्यायाम आहे. ज्यात शरीर ताणले, वाकवले, पिळले जाते आणि अवघड श्वसन प्रक्रियांचा अवलंब केला जातो. खरेतर मानवी मन आणि आत्मा यांची अनंत क्षमता जाणून घेणा—या या विज्ञानाची म्हणजे योगसाधनेची केवळ वरवरची ओळख झाली. योगाभ्यासामध्ये जीवनशैलीचा परिपूर्ण सारांश प्राप्त होतो. 'प्रथम सुख निरोगी शरीर' धनप्राप्ती, संसारिक सुखांचा उपभाग व ईश्वराचे चिंतन हे निरोगी व्यक्तीच साध्य करू शकतो. रोगीव्यक्ती स्वत:साठी व समाजाकरिता देखील नकोसा होतो. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीचे प्रथम कर्तव्य हे आहे की, त्याने योग्य आहार, आवश्यक झोप, इंद्रिय संयम आणि नियमित व्यायाम याद्वारे आपले शरीर निरोगी ठेवण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करावा. युवावस्थेच्या प्रारंभीच निरोगी शरीराबाबत लक्ष देण्याची आवश्यकता आहे. या योग्य वेळीच निरोगी शरीराचे महत्त्व लक्षात घेवून यौवनरूपी ऐश्वर्यास सुरक्षित ठेवण्याचे उपाय प्रत्येक युवकाने केले पाहिजेत. जर ही योग्य वेळ निघून गेली तर पश्चाताप करण्याशिवाय गत्यंत्तर नाही. असे म्हटले जाते की,

**''जे गेल्यानंतर परत येत नाही ते यौवन**
**जे आल्यानंतर परत जात नाही ते वृध्दत्व''**

'शक्ती' व 'बुध्दी' ही जीवनाच्या गाडीची दोन चाके आहेत, ज्याकडे बालपणापासूनच लक्ष दिल्यास ही गाडी शंभर वर्षे विनाअपघात चालू शकते.

निरोगी शरीर, कुशाग्रबुध्दी आणि एकाग्र मन यांना विकसित ठेवण्याकरीता तुलनात्मक दृष्टया अशी कोणतीही व्यायामपध्दती सर्वांगीन लाभदायक नाही, जी आपल्या प्राचीन ऋृषिमुनीपासुन प्रचलित आसन, प्राणायाम, क्रिया, ध्यान इत्यादीची समानता करू शकते. या कारणास्तव योगासनाचा प्रचार आज संपूर्ण विश्वात होत आहे. योगसाधनेने लहान मुले, युवक, स्त्री, पुरूष सर्वजन पैसे खर्च न करता पूर्ण आरोग्य प्राप्त करू शकतात. !आचार्य:२०१८! !१!

**महत्व:—**

रोगप्रतिकारशक्ती वाढविण्याची गुरूकिल्ली म्हणजे 'योग' भारताने जगाला दिलेली आरोग्यविषयक सुवर्णभेट म्हणजे 'योग', यामुळे आरोग्य निरोगी आणि आनंदी बनते प्राणायमाद्वारे श्वास घेण्याची भिन्न तंत्रे उपयोगात आणून फुप्फुसाची क्षमता सुधारली जाते. भिन्न आसने आणि कार्यपध्दती आसन आणि यौगिक क्रिया म्हणुन ओळखल्या जातात. यौगिक क्रियेमुळे फुप्फुसातील श्वास घेण्याची क्षमता वाढून शरीर सहनशील बनते.

सध्यपरिस्थितीत कोविड—१९ मध्ये कोरोना या साथीच्या रोगामुळे मानवामध्ये चिंता नैराश्य आणि मानसिक ताण वाढलेला आपण बघतो आहे. यामूळे शरीराची रोगप्रतिकार क्षमता प्रभावित होते. मनूष्याला स्वस्थ्य व सुंदर जीवन व्यतीत करायचे असेल तर योगसाधनेची आवड लावली पाहिजे. जीवनशैलीत सुधारणा घडवुन आणण्याकरीता योगाची आठ अंगे म्हणजे अष्टांगयोग पाहणे अभ्यासणे जरूरी आहे.,! **यम, नियम, आसन,प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधि** !
या आठ अंगाना योगसाधनेमध्ये विशेष महत्व आहे. मानसिक स्वास्थ्य व जीवनात उठण्याबसण्याचे व खाण्यापिण्याचे नियम घालुन घ्यावे लागतात अन्यथा एकांगी स्वरूपाचे कार्य वा विचार होईल. गीतेत म्हटले आहे **''योगावरी चढु जाता शम साधनबोलिले''** शमचा अर्थ संयम **'' न फार खावुनि किंवा खाणेचि सोडुनि, निजणे, जागणे, खाणे फिरणे आणि कार्यही मोजुनीकरितो त्यास योग हा दु:ख नाशन''** श्रीकृष्णाने अर्जूनाला दिलेला उपदेश सर्वांसाठी योगप्रेरक आहे.

**उद्वेश:—**

१. आरोग्यासाठी योगसाधना महत्वाची आहे का ? हे जाणुन घेणे.
२. योगसाधनेमुळे आरोग्य सुधारते काय ?
३. अष्टांगयोग म्हणजे काय ?
४. योगसाधने मुळे रोगप्रतिकार शक्ति प्रभावित होते काय ?

**अध्ययन पध्दति:—**

कोणत्याही संशोधकाला संशोधन जर करायचे असेल तर संशोधन हे वैज्ञानिक पध्दतीवर आधारित असते. त्यात संशोधनाला प्रमाण मानले जात नाही तर संशोधन हे केवळ माहितीचा संग्रहच असतो. म्हणुन प्रस्तुत शोध निबंधासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा उपयोग करण्यात आला आहे. एखादया व्यक्ती, समूह, समाज, घटना किंवा कोणत्याही विषय किंवा समस्यांचा या वास्तविक तथ्यांचे, वैशिष्टयांचे, वर्णनात्मक विवेचन प्रस्तुत करणे हा वर्णनात्मक संशोधन

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) –7.675, Issue NO, 272(CCLXXII)
ISSN : 2278-9308
Fabruary, 2021

आराखडयाचा मुख्य उद्देश आहे. वैज्ञानिक पध्दतीने संकलित केलेल्या तथ्यांच्या आधारे वर्णनात्मक विश्लेषण करणे म्हणजे वर्णनात्मक संशोधन आराखडा होय. तसेच प्रस्तुत अध्ययनात तथ्य संकलनासाठी दुय्यम तथ्य सामुग्रीचा उपयोग करण्यात आला आहे. यात योग साहित्य, पुस्तके, वर्तमानपत्र, मासिकपत्रे, भाषणे, संकेतस्थळ, धार्मिक ग्रंथे, ऐतिहासिक कागदपत्रे व इंटरनेट, गुगल वरील माहीती.

**तथ्य विश्लेषण:–**

'युज' या धातुपासुन बनलेला शब्द म्हणजे 'योग' ज्याचा अर्थ आहे आत्म्याचे परमात्म्यात विलीन होणे. ही दहा हजार वर्ष प्राचीन भारतीय योग ज्ञानशैली आहे. योग परंपरेचा उल्लेख नारदीय सुक्त आणि सर्वात प्राचीन अश्या ऋग्वेदामध्ये आढळतो, हा आपणास पुन्हा सिंधु–सरस्वती सभ्यतेचे दर्शन घडवतो. आतिप्राचिन उपनिषद बृहदारण्यकमध्ये योगामधील काही शारीरिक आसनाचा उल्लेख आढळतो. छान्दोग्य उपनिषदामध्ये प्रत्याहारचा तर बृहदारण्यकमधील एका स्तवनामध्ये प्राणायामचा सविस्तर उल्लेख आहे. प्रचलित योगाच्या स्वरूपाचा प्रथम उल्लेख कठोपनिषदामध्ये आहे जी आयुर्वेदाच्या कथा शाखामधील अंतिम आठ वर्गामध्ये पहिल्यांदा येते जे मुख्य आणि अत्यंत महत्वाचे उपनिषद आहे. येथे योगाला अंतर्मनाच्या यात्रेसाठी तसेच चेतनेच्या विकासासाठी गरजेच्या प्रक्रियेच्या रूपात जाणले जाते.

सुदर आरोग्यासाठी आपण योगाची आठ अंगे पाहू– यम, नियम, आसन, प्राण्यायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधि.

१.**यम**– यम म्हणजे योगसाधकासाठी असलेली नैतिक आणि सामाजिक मार्गदर्शक तत्वे, यम पाच आहेत. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रम्हचर्य, आणि अपरिग्रह.

**अहिंसा**– अहिंसा म्हणजे कोणत्याही प्रकारची हिंसा न करणे दुस–या कोणाप्रती किंवा स्वत:प्रती केलेले कोणतीहीहाणी पोहोचवणारे, टीकात्मक ठरणारे, चीड आणणारे, राग आणणारे किंवा शिक्का मारणारे शारीरिक, भावनिक किंवा मानसिक कृत्य म्हणजे हिंसा या खोल रूजलेल्या संकल्पनेची जाणीव योग साधकाला असली पाहीजे.

**सत्य**– सत्य म्हणजे खरेपणा योगसाधकाने कायम स्वत:प्रती तसेच इतराप्रती खरे राहीले पाहीजे. सत्याच्या पथावर चालत राहिल्यास मानाचे, आदराचे, संवेदनशील वर्तनाचे आयुष्य उभे राहते.असे आयुष्य योगसाधकासाठी अत्यावश्यक आहे.

**अस्तेय**– अस्तेय म्हणजे चोरी न करणे. याचा अर्थ आपल्या मालकीचे नाही ते आपण घेउ नये, यात केवळ भौतिक स्वरूपाच्या चोरीचा समावेश होत नाही, तर मानसिक स्तरावरील चोरीही येते.

**ब्रम्हचर्य** – ब्रम्हचर्य म्हणजे आत्मसंयम. याची मदत होते ती आपली व्यसने व टोकाच्या सवयीचे बंध तोडण्यामध्ये. यासाठी धैर्य आणि इच्छाशक्तिची गरज भासते.

**अपरिग्रह**– अपरिग्रह म्हणजे लोभ सोडणे. याचा अर्थ आपल्या मालकीच्या पण गरजेपेक्षा अधिक असलेल्या कोणत्याही गोष्टींचा शारीरिकरित्या, मानसिकरित्या व भावनिकरित्या त्याग करणे. यामुळे व्यक्तीला साधे आयुष्य जगण्यात मदत होते.

२.**नियम**– नियम हा रूपांतरणाच्या साधनांचा एक शक्तिशाली संच आहे, स्वत:चे निरीक्षण करून स्वत:बद्दल अधिकाधिक जागरूक होण्यासाठी आपल्यातच असलेला एक आरसा आहे. नियमाच्या पाच शाखा आहेत–सौच,संतोष,तापस,स्वाध्याय आणि इश्वरप्रानिधान.

**सौच**–सौच हे वातावरणाचे अंतर्गत व बाहयशुध्दीकरण आहे. आपल्यामध्ये व आपल्या आजुबाजुला कशामुळे अशुध्दी निर्माण होते ते शोधून त्याचा नाश करण्याचा हा मार्ग आहे.

**संतोष**– यामध्ये समाधान, आत्मविश्वास आणि आयुष्यातील स्थैर्याची भावना दाखवली जाते. समाधानी राहता आले तर आपली हाव कमी होते. आपल्या लालसा आणि गरजा कमी होतात. याऐवजी हा नियम आपल्यात कृतज्ञेची भावना निर्माण करतो.

**तापस**– तापस हा स्वयंशिस्तीचा आणि हिमतीचा सराव आहे यामुळे आपल्याला आपल्या हानिकारक ठरू शकेल अशा भावनावश वर्तनावर नियंत्रण ठेवता येते आणि विजय मिळवता येतो तसे जागृतावस्था साध्य करण्यात मदत होते.

**स्वाध्याय**– स्वाध्याय म्हणजे स्वत:चा अभ्यास करणे, यामध्ये आपण या क्षणात आणि त्यापलीकडे कोण आहोत हे बघण्याची गरज भासते. हा स्वत:चा स्वत:च्या कृतीचा आणि विचाराचा अभ्यास आपल्याला स्वत:मध्ये सुधारणा घडवुन आणण्यात मदत करतो.

**३.आसन**— आसने म्हणजे आपले शरीर लवचिक, तंदुरस्त आणि कणखर राखण्यात मदत करणा—या शारीरिक स्थिती, शरीर आणि मनातील समायोजन व समतोल समजून घेण्याचा तसेच त्याचा सराव करण्याच्या या पध्दती आहेत. या स्थितीमूळे साधकाला आयुष्यातील कसोटीच्या काळात सकारात्मक दृष्टिकोण ठेवण्यात तसेच आयुष्याकडे सकारात्मक पध्दतीने बघण्यात मदत होते.

४. **प्राणायाम**— प्राणायाम हा शब्द दोन शब्दांची संधी आहे. प्राण आणि आयाम हा श्वासांना स्थिर हालचालींशी जोडण्याचा सराव आहे किंवा थोडक्यात श्वासावर नियंत्रण ठेवणे आहे. योगाच्या आठ अंगापैकी हे चौथे अंग आहे. प्राणायामाच्या अभ्यासाला शास्त्रीय संशोधनाचा आधार आहे.

ताण, चिंता आणि अन्य वेदनांचा प्रतिकार करणा—या प्रतिक्रियांना उद्दीपित करणा—या पॅरासिम्पथेटीक मज्जासंस्थेला कार्यान्वित करण्यासाठी तसेच शरीराला आराम देण्यासाठी प्राणायाम प्रभावी ठरते. श्वासावर नियंत्रण ठेवण्यास शिकल्यामुळे मनावर नियंत्रण ठेवण्यातही मदत मिळते आणि यातुन तुम्हाला स्व:ला आणि या अभ्यासाला अधिक चांगले समजून घेता येते.

५.**प्रत्याहार**— प्रत्याहार म्हणजे अनावश्यक किंवा सकारात्मक वाढ आणि विकासात अडथळा आणणा—या सर्व गोष्टीतून आपल्या संवेदना काढून घेण्याची पध्दत आहे, मनाची प्रतिकारशक्ती बळकट करण्यात याचा उपयोग होतो. हे अंग ध्यानाच्या प्रक्रियेत महत्वाचे आहे.

६. **धारणा**— धारणा म्हणजे अविचलित एकाग्रता, धारणा म्हणजे व्यक्तीने तिचे लक्ष एका बिंदूवर, अविचलितपणे एकाग्र करणे. यामुळे वर्तमानातील क्षणावर नियंत्रण मिळवणे आणि त्याप्रती अधिक सक्रिय होणयात व्यक्तीला मदत मिळते. यासाठी खुप सरावाची गरज आहे. पण एकदा का यात प्राविण्य संपादन झाले की मनाला निश्चित उद्दिष्टाकडे वळवण्यात खूप मदत होत

७. **ध्यान**— ध्यान म्हणजे मेडिटेशन, ध्यान आणि धारणा यांची अनेकदा गल्लत केली जाते, पण तसे नाही. यातील प्रमुख फरक समजुन घेऊ, धारणा म्हणजे एखादया विशिष्ट गोष्टीवर एका वेळी अधूनमधून केंद्रित केलेले लक्ष, यामध्ये काहीतरी क्रिया घडत असते. ध्यान म्हणजे कोणत्याही प्रक्रियेचा विचार न करता संपूर्ण लक्ष मनावर केंद्रीत करणे होय.

८. **समाधि**— समाधि ही अवस्था आहे. धन्यता आणि आनंदाची ही अखेरची अवस्था आणि योगाभ्यासातील अखेरचा टप्पा आहे. याचा अर्थ कायमस्वरूपी अत्यानंदाची अवस्था असा नाही. खरे तर ही परिपूर्तीची अवस्था आहे. यामध्ये व्यक्ती कोणत्याही भौतिक गोष्टीच्या आणि विश्वासांच्या बंधापासून मुक्त असने. मनापासून मुक्त असणे तिचे विचारावर व कृतीवर नियंत्रण असणे खरोखर धन्यतेची अवस्था आहे.

योगाच्या या आठ अंगामध्ये प्राविण्य मिळवणे कठिण आहे. पण कोणत्याही व्यक्तीसाठी हे अशक्य नाही. ही अंगे आपल्याला अधिक सचेतन आणि जागरूक होण्यास मदत करतात यामुळे आपल्याला आयुष्याचे सर्वाधिक चीज करण्याची क्षमता प्राप्त होते. ''शरीरमाद्य खलु धर्म साधनम'' ही संस्कृत उक्ति अतिशय महत्वाची आहे. कोणतेही सत्कार्य !खलु धर्म! सादायचझाल तर ठणठणीत शरीर असल्याशिवाय त्या कार्याची फलश्रुती समाधानकारक मिळणे दुरापास्त आहे. मनाचे स्वास्थ्य शरीरावर अवलंबुन आहे तर उलटपक्षी मनासह शरीराचे तंत्र सुरळीत राहते.

वरील प्रमाणे अष्टांग मार्ग यम,नियम,आसन,प्राणायाम,प्रत्याहार,ध्यान,धारणा आणि समाधि याला प्राधान्य दिले गेले. याने वर पाहिल्याप्रमाणे मानसिक स्वास्थ्य व सोबत जीवनात उठण्याबसण्याचे व खाण्यापिण्याचे नियम घालुन घ्यावे लागतात. अन्यथा एकांगी स्वरूपाचे कार्य वा विचार होईल.

गीतेत म्हटले आहे **''योगावरी चढु जाता शम साधन बोलिले''** शमचा अर्थ संयम **''न फार खावुनि किंवा खाणेचि सोडुनि निजणे, जागणे, खाणे, फिरणे आणि कार्य ही मोजुनि करितो त्यास योग हा दु:ख नाशन''** हा अर्जुनाला दिलेला उपदेश सर्वांसाठी योगप्रेरक आहे.

**रोगप्रतिकार शक्ती**

बहुतेक लोक सतत आजारी पडत असतात विशेषत: ऋतुबदलानंतर आणि इन्फेक्शनच्या विळख्यात येणे हे याचे प्रमुख कारण असते. या आजारपणास कारण बॉडी इम्युनिटी चांगली नसणे हे असते. जर इम्युन सिस्टीम मजबुत नसेल तर शरीराची रोगांच्या सोबत लढण्याची शक्ती कमी होते. ज्यामुळे आपण लवकर आजारी पडतो. डॉक्टरांनी कितीही

औषध दिली तरी पेशंटमधील उपजत रोगप्रतिकार शक्ति असण आवश्यक आहे. नेमकी रोगप्रतिकारशक्ती म्हणजे काय आणि त्यावर होणारा परिणाम तसेच ती कशी निर्माण करता येईल, याचा विचार करू.

शरीरात कोणताही जंतुसंसर्ग, तसेच ॲलर्जीयापासून सरंक्षण करण्याचे काम म्हणजे प्रतिकार शक्ति. रोगप्रतिकार किंवा विविध गोष्टीमुळे शरीरात होणारी रिॲक्शन यांना अडवण्याचा कार्य प्रतिकारशक्ती करीत असते. प्रतिकारशक्तीचे दोन प्रकार असतात. पहिला प्रकार म्हणजे निसर्गत: जन्मत: मिळणारी शक्ती: म्हणजेच शरीरात असणारा बोन मॅरो. हा रक्तातील जंतु किंवा नको असलेल्या पेशी शोधून त्यावर रिॲक्शन देत असतो.

**पहिला प्रकार** – विविध प्रकारचेजंतु किंवा जेनेरिक भाग किंवा काही वेळापुर्वी होउन गेलेला आजार यामुळे ठराविक प्रतिकार शक्ती तयार होते. यात पुन्हा प्रकार असतात, एक म्हणजे सगळया प्रकारचे जंतु विरूद्व प्रतिकार शक्ती आणि दुसरा ठराविक जंतु विरूद्वची शक्ती.

**दुसरा प्रकार**– ठराविक वातावरण, जंतु, ॲलर्जी या सान्निध्यात वारंवार असल्यामुळे शरीरात ठराविक बदल घडून येतात. ज्यात प्रतिकारशक्ती तयार होते. यामुळे शरीरात त्रास दिसून येत नाही. त्याचेसुध्दा दोन प्रकार आढळून येतात. एक म्हणजे शरीरात आपोआप तयार होणारी शक्ति आणि दुसरी म्हणजे लस, इंजेक्शनमुळे तयार होणारी शक्ती याच दुस–या प्रकारात मोडणारा प्रकार म्हणजे ॲक्टिव आणि पॉझिटिव्ह.

ॲक्टिव म्हणजे जिवंत जंतुपासुन तयार केलेली लस शरीरात इंजेक्शनद्वारे दिली जाते व शरीरात त्यावर बदल होउण त्या आजाराची प्रतिकारशक्ती तयार होते. पॉझिटिव्ह म्हणजे प्रतिकारशक्ती तयार अन्टीबॉडीज वापरण. जंतुसंसर्ग झाल्यानंतर बोन मॅरोचे निदान करून त्यावर प्रतिकार करण्याच्या पेशीच प्रमाण वाढवितो. उदा. पांढ–या पेशी किंवा शरीरात होणारी रिॲक्शन म्हणजे ताप, अंगदुखी, थंडी वाजुन येण म्हणजे जंतुमधील विषारी घटक रक्तात मिसळतात. रक्तातील पेशी त्यावर रिॲक्शन दाखवून जंतुचा नायनाट करतात. दैनदिन जीवनात प्रतिकारशक्ती ही दिवसेंदिवस कमी झालेली दिसते. बदलते वातावरण, अपूर्ण आहार कमी झोप आणि व्यायामाचा अभाव यामुळे जंतुसंसर्ग जास्त जाणवतो. अपूर्ण ज्ञान, अस्वच्छ राहणीमान, गर्दीच्या ठिकाणाच वास्तव्य यामुळे आजारात वाढ होत आहे. !**महाराष्ट्र टाईम्स ५ स्टेंबर** २०१७!.

रोगप्रतिकारशक्ती कशी वाढवावी – नैसर्गिकपणे जीवन जगणे, नुसतेच काम न करता संपूर्ण पौष्टिक आहार घेणे, यात फळ आणि पालेभाज्यांचा समावेश असावा. रोज एक फळ खाणे आवश्यक आहे. झोप – २४ तासात कमीतकमी आठ तास झोप आवश्यक आहे. यात शरीराची झालेली झीज भरून निघते. तसेच मेटाबॉलिजम चयापचय क्रिया साधारण राहते. अपु–या झोपेमुळे हृदयासह मेंदूवर जास्त दुष्परिणाम दिसून येतात. वनज – जन्मत: उंचीनुसार वजनाच प्रयोजन असते. परंतु स्थुलपणामुळे सगळे अवयव क्षमतेपेक्षा जास्त कार्य करत असतात. त्याकरिता नियमित आहार आणि मर्यादित अन्न खाणे गरजेंचे असत. व्यायाम – खाऊन झालेली ऊर्जा खर्च करणे हे गरजेचे असते. म्हणुनच २४ तसात एक तास व्यायाम करणे अत्यंत गरजेच असत. शरीराचा समतोल साधण्यासाठी प्रतिकारशक्ति गरजेची आहे. आधुनिक काळात नव नवीन येणा–या जंतूचा प्रतिकार करण्यासाठी औषध उपचारापेक्षा नैसर्गिकरित्या आजार टाळता आले पाहिजे. हाच खरा मोठा उपाय आहे. अस म्हटल तर चुकीच ठरणार नाही. म्हणजे यासाठी योगसाधना ही सर्वोत्तम आहे.

योगसाधना ही स्वच्छ, सुदर, हवेशीर थोडी जागा उपलब्ध असली तरी आपण योगासन, प्राणायाम करून आपली रोग प्रतिकारशक्ती वाढवू शकतो. योगसाधने मध्ये काही आसने आपण रोज करावी किंवा एका आठवडयात कमीत कमी ३ दिवस ही आसने करावीत, यामध्ये प्रमुखत: सुर्यनमस्कार, उभ्या स्थितीतील आसने, बैठया स्थितीतील आसने, पोटावर झोपलेल्या स्थिती तील आसने, पाठीवर झोपलेल्या स्थितीतील आसने करावीत.

क्रमानुसार नावे सुर्यनमस्कार १० किंवा १२ भागामध्ये. ताडासन, वृक्षासन, त्रिकाणासन, बैठे पश्चिमोतानासन, वक्रासन, मंडुकासन, वज्रासन, उष्ट्रासन, पोटावरील भुजंगासन, शलभासन, धनुरासन, पाठीवरील विपरीत करणी, नौकासन, पवनमुक्तासन, हलासन, चक्रासन, श्वासन ही आसणे प्रमुखत: रोज करावीत.

यानंतर क्रिया मध्ये जलनेती, कपालभाती व प्राणायामामध्ये बाहय प्राणायाम, भस्त्रिका, अनुलोम विलोम, उद्गित प्राणायाम व प्रार्थना करावी.

निष्कर्ष:—

''शरीरमाद्य खलु धर्म साधनम'' ही संस्कृत उक्ति अतिशय महत्वाची आहे. कोणतेही सत्कार्य खलु धर्मसादायचझाल तर ठणठणीत शरीर असल्याशिवाय त्या कायाची फलश्रुती समाधान कारक मिळणे दुरापास्त आहे. मनाची स्वास्थ्य शरीरावर अवलंबून आहे तर उलटपक्षी मनासह शरीराचे तंत्र सुरळीत राहते.

शरीराचे तंत्र जर सुरळीत नसेल तर शरीराची रोगप्रतिकार शक्ति ही कमजोर होत जाते, व जंतु संसर्ग हा होण्याची संभावना अधिक निर्माण होते. आजच्या परिस्थितीचा विचार जर केला तर संपुर्ण जगामध्ये कोरोना विषाणुचा प्रकोप चाललेला आहे. अश्या या कोरोणा सदृष्य काळात मनुष्याची रोगप्रतिकार शक्ती जर मजबूत असेल तर संसर्ग होण्याची शक्यता कमी होते.

रोगप्रतिकार शक्ति वाढविण्यासाठी योगसाधना ही मनुष्याला खूप सहाय्य करू शकते यासाठी नियमित योग्य मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनाखाली योगप्रक्रियेचा अवलंब करून आपण या कोरोनाचा किंवा जंतु संसर्गाचा सामना अधिक क्षमतेने करू शकतो.

संदर्भ:—

१.डॉ. देवव्रत आचार्य, योगासन, विद्याभारती प्रकाशन लातुर.
२.डॉ. आनंद नाडकर्णी, आरोग्याचा अर्थ, ग्रंथाली मुंबई.
३.डॉ. रणजित चिकोडे, योगजीवन अर्थात योगाभ्यासाने, रिया पब्लिकेशन कोल्हापुर.
४.बी. के. अययंगार, रोहण प्रकाशन २०११.
५.आचार्य : २०१८ — १

# आत्मनिर्भर भारत : एक दृष्टीक्षेप

प्रा.डॉ. रवींद्र बापुराव शेंडे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
लोकमान्य महाविद्यालय, वरोरा जि. चंद्रपूर (महा.), पिन. ४४२९०७

**गोषवारा :**

भारत एकविसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकातही विकसनशील राष्ट्र आहे त्यामुळे भारताकडे आत्मनिर्भरतेसाठी जी प्रचंड क्षमता आहे त्याची प्रथमता ओळख होणे आवश्यक आहे. आत्मनिर्भरता म्हणजे स्वावलंबन होय तसेच प्रसंगी दुसऱ्यांना सार्थक मदत करणे होय. भारतीय अर्थव्यवस्था इंग्रजी साम्राज्याअगोदर स्वयंपुर्ण होती. या भारतीय अर्थव्यवस्थेला इंग्रजांनी जाणूनबूजून तोडले. हा आत्मनिर्भरतेचा तोडलेला धागा जोडण्यासाठी आजची अधिक लाभांश देणारी देशाची लोकसंख्या, पुढे निर्माण होणारी पर्याप्त लोकसंख्या, विकासाचे आर्थिक व आर्थिकेत्तर घटकांच्या मदतीने आत्मनिर्भरतेचा धागा जोडणे शक्य आहे. तसेच आत्मनिर्भरतेसाठी प्रत्येकाला वेळोवेळी सुचणाऱ्या सार्थक युक्त्यांचा वापर करणेही आवश्यक आहे.थोडक्यात आत्मनिर्भरतेसाठी अजागतिकीकरणाचा प्रभावी वापर होणे आवश्यक आहे.

**प्रस्तावना:**

भारतीय अर्थव्यवस्थेच्या क्षमता आणि मर्यादांची ओळख लक्षात घेवून मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी १२ मे, २०२० रोजी देशाला जवळपास ३० मिनिटे संबोधित केले. या संबोधनामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताला आत्मनिर्भर होण्याचा नवीन कार्यक्रम दिला. आत्मनिर्भरतेचा उद्देश कोरोना या रोगापूरताच मर्यादित नाही, तर भविष्यामध्ये भारत आत्मनिर्भरतेतून समर्थ होईल, असे त्यांना सुचवायचे आहे. आत्मनिर्भरता मिळविणे कठीण असले तरी शक्य आहे कारण भारताकडून'वसुधैव कुटूंबकम्' पाळल्या जात आहे. तसेच भारताने अनेक प्राचीन संस्था अस्तित्वात असलेल्या व नविन स्त्रोतांच्या वापरासाठी शिल्लक ठेवल्या आहे.

'आत्मनिर्भरता' ही संकल्पना नवीन वाटत असली तरी ती जुनीच आहे. ती वेगवेगळ्या स्वरूपात चालत आलेली आहे. महात्मा गांधींची स्वदेशीची संकल्पना, लोकमान्य टिळकांची चतु:सूत्री, तिसऱ्या योजनेचे (१९६१–१९६६) मुख्य उद्दिष्ट्य – स्वयंपूर्णता, दादाभाई नोरोजींचा आर्थिक नि:सारणाचा सिध्दांत, राष्ट्रपुरूषांचा राष्ट्रवाद, 'मेक इन इंडिया', 'स्टार्ट अप', राष्ट्रपुरूषांचे बाणेदार उत्तरे –'जय जवान जय किसान', 'शिका,संघटित व्हा व संघर्ष करा', वर्तमान पंतप्रधानाची विविध घोषवाक्य –'सबका साथ – सबका विकास', 'लोकल के लिए व्होकल' या सर्व संकल्पनांच्या मुळाशी आत्मनिर्भरता समाविष्ट आहे किंवा आत्मनिर्भरतेला पूरक ठरणाऱ्या सर्व संकल्पना किंवा योजना आहे.

आत्मनिर्भरता या साधनातून 'समर्थ भारत' हे साध्य प्राप्त करावयाचे असेल तर साधारणत:पुढील वातावरण देशात व जगात अपेक्षित आहे. (१) प्रत्येकाकडून शस्त्रज्ञानाऐवजी शास्त्रज्ञानाचा वापर (२) प्रत्येकाला वेळोवेळी सुचणाऱ्या सार्थक युक्त्यांचा वापर (३) जगाच्या पाठीवर सदासर्वकाळ शांतता. (४) प्रत्येक देशाकडे अतिरिक्त ठरणाऱ्या स्त्रोतांचा काटकसरीने वापर. (५) निसर्ग मानवी गरजा पूर्ण करू शकतो मानवी हाव पूर्ण करणार नाही याची आठवण. (६) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थाची भुमिका निपक्षपाती अशा सार्थक वातावरणामुळे आत्मनिर्भरता एका देशात निर्माण होऊन एका देशाची आत्मनिर्भरता दुसऱ्या देशांना त्याच वेळी प्रेरकतेतून उपलब्ध होऊन देशाच्या समर्थतेतूनच विश्वामध्ये समर्थपणा निर्माण होण्यास कुठल्याही अडचणी नाही. एकूणच "तन–मन–धन से सदा सुखी हो भारत देश हमारा–विश्व हमारा" हे घोषवाक्य आत्मनिर्भरतेतूनच मिळविणे शक्य आहे.

**बीज शब्द**

नवे जागतिकीकरण, उदारिकरण व खाजगीकरण, सर्वसमावेशक व्यूहरचना,

**निवडक संशोधन साहित्याचा आढावा**

धरचक्रवर्ती पी. जी. (२०१७) यांनी योजना मासिकातील आपल्या लेखात विकास आणि आपत्तीमधील त्रीमितीय संबंध सांगितला आहे. (फडणवीस मृणालीनी (२०२०) यांनी अर्थमिमांसा संशोधन पत्रिकेमध्ये विकासाचा पर्याय : भांडवलवाद ? या लेखात जगात बऱ्याच नकारात्मक बाबी असल्याने विकासाकरीता समाजाभिमुख नवप्रर्वतन आवश्यक असल्याचे सांगितले.गाडगीळ गंगाधर (१९६१) यांनी 'नियोजन आणि समृध्दी' या पुस्तकात आधुनिक भारतीय रणसंग्रमाचे विवेचन सांगितले आहे.

थोडक्यात आत्मनिर्भरतेसाठी अनेक प्रयोग भारतात झाले असले तरी प्रस्तुत शोधनिबंधात काही नवीन युक्त्या सुचविण्याचा प्रयत्न केला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये**

प्रस्तुत शोधनिबंधाची पुढील उद्दिष्ट्ये ठरवलेली आहेत. ज्यात आत्मनिर्भरतेतून समर्थ भारत निर्माण होईल हा प्रमुख उद्देश आहे.

१) भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्वपूर्ण तथ्यांचा किंवा वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.
२) तीनही क्षेत्राचा अपारंपारिक उर्जास्त्रोतासारखा वापर आवश्यक आहे याचा अभ्यास करणे.
३) मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आत्मनिर्भर भारतासाठी सुचविलेल्या पाच आधारस्तंभाचा अभ्यास करणे.
४) आत्मनिर्भर भारताच्या निवडक अंतिम स्त्रोतांचा आणि मर्यादांचा अभ्यास करणे.

**शोधनिबंधाची गृहीते**

१) आत्मनिर्भरता स्थळ, काळ, देश व व्यक्ती सापेक्ष तसेच मानसिक संकल्पना आहे.

**संशोधनपद्धती**

या शोधनिबंधासाठी प्रामुख्याने वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा वापर करतांना घटक विश्लेषण (Data Analysis) या पध्दतीचा वापर केला त्यासाठी तथ्य संकलन व माहिती संकलनासाठी प्रामुख्याने दुय्यम सामुग्रीचा आधार घेतला आहे.

**शोधनिबंधाचे विश्लेषण**

आत्मनिर्भरतेतून समर्थ भारत निर्माण करण्यासाठी भारत आणि जगाच्या पाठीवर जे वातावरण अपेक्षित आहे त्यामध्ये प्रत्येक देशात सदासर्वकाळ शांतता टिकणे ही परिस्थिती कठिण आहे. कारण सदासर्वकाळ शांतता टिकणे म्हणजे समुद्राला नदीच्या दिशेने वळते करण्यासारखे आहे किंवा पूर आलेल्या जमिनीवर शास्त्रीय पध्दतीने घर बांधण्यासारखे आहे किंवा चमत्कारच होईल. पण हे मात्र खरे आहे की शांततेशिवाय कोणत्याही देशाला सामर्थ्यपणा प्राप्त करणे कठिण आहे. आत्मनिर्भरतेची कक्षा संकुचित नसून ती व्यापक आहे. कारण "जगा आणि जगू द्या" या मुख्य तत्वाला आत्मनिर्भरता अधिक विस्तारित करते. आत्मनिर्भरतेचे अनेक स्त्रोत जगाच्या पाठिवर उपलब्ध असल्यामुळे प्रत्येक देशाला आत्मनिर्भरता किंवा स्वावलंबी होणे शक्य आहे. या सर्व स्त्रोतांचा किंवा बलस्थानांचा शोध भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीकोणातून पुढील प्रमाणे,

**भारतीय अर्थव्यवस्थेची मूलभूत लक्षणे किंवा महत्त्वपूर्ण तथ्ये–**

| अ.क्र. | घटक | विवरण |
|---|---|---|
| १ | एकूण लोकसंख्या (२०११) | १२१.०२ कोटी |
| २ | जागतिक लोकसंख्येत लोकसंख्येचे प्रमाण | १७.७ % |
| ३ | ग्रामीण लोकसंख्या (२०११) | ६८.८४ % |
| ४ | शहरी लोकसंख्या (२०११) | ३१.१६ % |
| ५ | लोकसंख्येची घनता (२०११) | ३८२ प्रति वर्ग किमी |
| ६ | देशाचे एकूण क्षेत्रफळ | ३२८७२६३ वर्ग किमी |
| ७ | जगात क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारताचे स्थान | ७ वे (२.४२%) |

| | | |
|---|---|---|
| ८ | वनाने व्याप्त प्रदेश | ६७८३३३ वर्ग किमी (२०.६४%) |
| ९ | एकूण राष्ट्रीय उत्पन्न (२०१९–२०२०) | १४३ लाख करोड (चालू किंमती नुसार) |
| १० | दरडोई उत्पन्न (२०१९–२०२०) | १,१०,००० रूपये (चालू किंमतीनुसार) |
| ११ | मानवी विकास निर्देशांक (२०१९) | १२९ क्रमांक (१८९ देशामध्ये) |
| १२ | जी. डी. पी. दर (२०१६–२० १७.२०१९–२०२०) | अनुक्रमे ८.२%, ७.१%, ६.२%, ४.२%, |
| १३ | पंचवार्षिक योजना (१९५१–२०१७) | १२ पंचवार्षिक व ०७ वार्षिक योजना पूर्ण |
| १४ | त्रीवर्षीय कृती योजना | (२०१७–१८,२०१८–१९,२०१९–२०) |
| १५ | राष्ट्रीय उत्पनात कृषी, उद्योग व सेवा क्षेत्राचा वाटा (२०१९–२०२०) | अनुक्रमे १५%, ३०%, ५५% |
| १६ | खाद्यान्न उत्पादन (२०१९–२०२०) | २९५.६७ मिलियन टन |
| १७ | रेल्वे झोनची संख्या | १७ झोन |
| १८ | नगद आरक्षण अनुपात (०६.०१.२०२१) | ३% |
| १९ | बैंक दर ( ०६.०१.२०२१) | ४.२५% |
| २० | रेपो रेट ( ०६.०१.२०२१) | ४% |
| २१ | रिवर्स रेपो रेट ( ०६.०१.२०२१) | ३.२५ % |
| २२ | राष्ट्रीयीकृत बॅकांची संख्या (नोव्हेंबर २०२०) | १२ |
| २३ | गठित वित्त आयोगाची संख्या | १५ |
| २४ | १५ व्या वित्त आयोगाचा कालावधी | २०२०–२०२५ |
| २५ | एकूण विदेशी कर्ज (जुन २०२०) | ५५४ बिलीयन डॉलर |
| २६ | कार्यकारी लोकसंख्या (२०११) | ७२.९७ कोटी |

**स्त्रोत – आर्थिक समीक्षा २०१९–२०२०**

**तीनही क्षेत्रांचा अपारंपारिक उर्जास्त्रोतासारखा परस्परपूरक वापर**

शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्रे अर्थव्यवस्थेचे मुख्य खांब आहेत. हे तीनही खांब परस्परपूरक आहे, स्वतंत्र नाही हे प्रथमता लक्षात घेणे आवश्यक आहे. आज तिनही क्षेत्राचा जी. डी. पी. मधील वाटा फार विसंगत होत चाललेला आहे. (कृषी क्षेत्र १५%, उद्योग क्षेत्र ३०% आणि सेवा क्षेत्र ५५%) यात योग्य समन्वय साधने आत्मनिर्भरतेसाठी आवश्यक आहे.

अधिक लोकांना समावून घेण्याची क्षमता कृषी क्षेत्राकडे सुरवातीपासूनच आहे. सामान्य व आरोग्य आणिबाणीच्या वेळीसुध्दा या क्षेत्राचा अनुकूल प्रभाव कायम असतो. “सर्व समान असले तरी काही लोक अधिक समान असतात” (जार्जे आर्वेल) या युक्तीप्रमाणे आपल्या देशात शेतीला महत्वाचे स्थान गांधी–विनोबा तंत्राच्या सहाय्याने प्रसंगी आधुनिक तंत्राच्या सहाय्याने देणे आवश्यक आहे.

नैसर्गिक व मानवी भांडवलाच्या पर्याप्त वापरासाठी उद्योग व व्यवसायांचे नियोजनरित्या विकेंद्रीकरण करणे आवश्यक आहे. आज उद्योग व व्यवसायांचे मर्यादित अशा शहरे व महानगरांमध्ये केंद्रीकरण झाल्यामुळे उत्पन्नाचे केंद्रीकरणही वाढले आहे. त्यामुळे उत्पन्नाच्या विकेंद्रीकरणासाठी, नैसर्गिक व मानवी साधणाच्या वापरासाठी तसेच बऱ्याच नकारात्मक गोष्टी देशात पसरल्या असल्यामुळे उद्योग व व्यवसायांचे विकेंद्रीकरण आवश्यक आहे.

सेवा क्षेत्रात जेवढ्या संस्था मोडतात त्यांच्यामध्ये आत्मनिर्भरतेसाठी वित्तीय सर्वसमावेशन वृत्ती वाढीला लागणे अपेक्षित आहे. सर्व नागरिक सेवा क्षेत्रासोबत जुडणे आणि त्याचे फायदे सर्वांना मिळणार असे वातावरण अपेक्षित आहे. उदा. विम्याच्या कक्षेत सर्वच नागरिकांचा समावेश, बॅकासोबत सर्वच भारतीय परिसर व वयोगट जुळणे आणि त्याचे फायदे सर्वांना, किंमत स्थिरतेला प्रोत्साहन देऊन विकास मोठा करण्याची क्षमता या क्षेत्राकडून वाढणे अपेक्षित आहे.

थोडक्यात,शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्र एकमेकांसाठी पर्याय नाही तर प्रत्येक क्षेत्राच्या क्षमता आणि मर्यादा वेगवेगळ्या आहे. त्यामुळे या तीनही क्षेत्रांचा परस्परपुरक वापर अपारंपारिक उर्जास्त्रोतांसारखा होणे आवश्यक आहे. त्यामुळे आपल्या देशाच्या आत्मनिर्भरतेला खरी बळकटी येईल.

**सार्वजनिक आरोग्य आणि शिक्षण व्यवस्था बळकट करणे**

आत्मनिर्भरतेकरिता सार्वजनिक आरोग्य बळकट करणे आवश्यक आहे. (कांबळे पी. एस., २०२०) कारण आरोग्यविषयक आणिबाणीच्या काळात खाजगी क्षेत्रावरील अवलंबित्व जोखमीचे ठरते. कारण खाजगी क्षेत्र आरोग्याच्या बाबतीत तात्पुरती मलमपट्टी आहे. त्यामुळे शासनाने जन्मापासून—मृत्यूपर्यंत आरोग्याची जबाबदारी सांभाळल्यास (सामुहिक गट विम्या आधारे) प्रत्येकजन स्व:ताच्या कौशल्याचा वापर प्रत्येकवेळी राष्ट्रहितासाठी अधिक करेल. तसेच शिक्षणाबाबतीतही खाजगी क्षेत्रावर अवलंबने जोखमीचे ठरते. (कांबळे पी. एस., २०२०) कारण आज खाजगी शिक्षणव्यवस्था सर्व प्रकारच्या विषमता कमी करण्याऐवजी वाढवित आहे. त्यामुळे समान पातळीचे दर्जेदार शिक्षण देण्यासाठी सार्वजनिक शिक्षणव्यवस्था विकसित करणे आवश्यक आहे. अधिक मानवी भांडवल असणाऱ्या आपल्या देशात खाजगी शिक्षण व्यवस्था मोठ्या झाल्यास पुढे मोठे संकट नक्की येईल त्यामुळे सर्व विषमता कमी करण्यासाठी, मानवी भांडवलाचा कणा मजबूत करण्यासाठी तसेच अज्ञान दूर करण्यासाठी सार्वजनिक शिक्षणव्यवस्था बळकट करणे आवश्यक आहे. जी. डी. पी. मधील सर्वात जास्त वाटा शिक्षणावर खर्च करणे आवश्यक आहे. वर्तमान व भविष्यामधील सर्व विषमता कमी करण्याची ताकद सार्वजनिक शिक्षणव्यवस्थेमध्ये असल्यामुळे सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेत आवश्यक सुधारणाही करणे तत्काळ गरजेचे आहे.

**सार्वजनिक व खाजगी क्षेत्राच्या सह अस्तिवातून स्वायत्त व प्रेरित गुंतवणूकित वाढ**

भारतानेमिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार केल्यामुळे खाजगी व सार्वजनिक क्षेत्राच्या सहअस्तित्वाला आणि स्वायत्त व प्ररित गुंतवणूकीला मोठा आधार मिळाला आहे. परंतु १९९० च्या दशकामध्ये सार्वजनिक क्षेत्रातील दोषामुळे खाजगीकरणाचा वेग प्रचंड वाढला आहे. त्यामुळे कोणतेही सरकार खाजगीकरणाला प्रोत्साहन देत आहे हे खरे असले तरी आत्मनिर्भरतेसाठी दोनही क्षेत्राच्या समान सहअस्तित्वाला डिफेन्स सारखे लक्ष देणे गरजेचे आहे. आवश्यक त्या ठिकाणी, आवश्यक त्या क्षेत्रात, आवश्यक कालावधीकरिता सरकारने खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील मालकीहक्कात बदल करणे आवश्यक आहे. खाजगी क्षेत्रात एकाधिकारशाही नष्ट झाली असली तरी तिची जागा आज अल्पाधिकाराने घेतली आहे. एकाधिकारात एका व्यक्तीची मालकी असते तर अल्पाधिकारात मोजक्या व्यक्तींची मालकी तयार होते. हे मोजके व्यक्ती बाकीच्या स्पर्धकांना स्पर्धेत येवू देत नसल्यामुळे एकाधिकारासारखे फायदे अल्पाधिकारात त्यांना मिळते आणि त्याचवेळी ग्राहकांचे किंवा जनतेचे प्रचंड नुकसान होऊन विकासावर मर्यादा येत असलेल्या पहायला मिळत आहे. आज नावापुरती मिश्र अर्थव्यवस्था शिल्लक आहे आणि आपल्या देशात भांडवलशाही अर्थव्यवस्था छुप्या स्वरूपात वर्चस्व प्रस्थापित करीत आहे. दोनही क्षेत्रांचे सह अस्तित्व व दोनही गुंतवणूकीला प्रेरणा (खाजगी क्षेत्राकडून होणारी गुंतवणूक प्रेरित गुंतवणूक तर शासनाकडून होणाऱ्या गुंतवणूकीला स्वायत्त गुंतवणूक म्हणतात) आणि यातून समाजाभिमुख नवप्रर्वतनावर मुख्य भर दिल्यास आत्मनिर्भरता शक्य तितक्या लवकर निर्माण होईल. ज्याप्रमाणे चालण्यासाठी दोनही पायांची, पाहण्यासाठी दोनही डोळ्यांची, कामांसाठी दोनही हातांची गरज आहे अगदी त्याचप्रमाणे दोनही क्षेत्रे व दोनही गुंतवणूकीचे महत्त्व आत्मनिर्भरतेसाठी सारखेच महत्वाचे आहे.

**आत्मनिर्भरतेचे पाच आधारस्तंभ**

मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आत्मनिर्भर भारत ही संकल्पना स्पष्ट करतांना पाच आधारस्तंभ सांगितले आहे यामध्ये (i) भारतीय अर्थव्यवस्था (ii) पायाभूत सुविधा (iii) किंमत व बाजार यंत्रणा (iv) लोकशाही (v) मागणी.

वरील पाचही घटकांचा क्रम मागेपुढे लागत असला तरी परस्परपुरकतेतून निर्माण होणारे महत्त्व सारखेच आहे.

**(i) भारतीय अर्थव्यवस्था**

भारतीय अर्थव्यवस्था विकसनशील आहे आणि विकासाचे सार्थक प्रयत्न स्वातंत्र्यापासून सुरू आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत निर्माण झालेली विविध संकटे दूर करून बऱ्याच अनुकूल घटना अर्थव्यवस्थेत घडल्या आहेत. त्यामध्ये राज्यघटनेची निर्मिती, निती आयोगाची स्थापना (जूने नाव नियोजन आयोग) पंचवार्षिक योजनांची मुख्यउद्दिष्टासह आखणी

आणि अंमलबजावणी, हरितक्रांतीचा प्रयोग, केंद्रीय बॅकांचे राष्ट्रीयीकरण, व्यापारी बॅकांचे राष्ट्रीयीकरण, नोटाबंदीचे निवडक प्रयोग, वस्तू आणि सेवा करप्रणाली, नवे खाजगीकरण, जागतिकीकरण आणि उदारीकरणाचा वापर, आंतरराष्ट्रीय संस्थासोबत नवे संबंध, अशा अनुकूल घटना आहेत. तरूणाईने युक्त असणारी आपली लोकसंख्या व नैसर्गिक साधनसंपत्तीमार्फत आपल्या अर्थव्यवस्थेचे रूपांतरण आत्मनिर्भरतेतून विकसित राष्ट्रात होणारे आहे, हे खरे आहे.

**(ii) पायाभूत सुविधा**

विविध उर्जास्त्रोत, वाहतूक व्यवस्था, दळणवळणाची साधने, विज्ञान आणि तंत्रज्ञान, बॅका आणि वित्त कंपन्या, सामाजिक वरखड बाबी इत्यांदींचा समावेश पायाभूत सुविधांमध्ये होतो. पायाभूत सुविधा उत्पादनाला प्रत्यक्ष मदत करीत नसल्या तरी अप्रत्यक्ष मदतीतून प्रत्येक क्षेत्राच्या क्षमता वाढविण्यास या सोयी महत्त्वाच्या आहे. पायाभूत सोयीमधील गुंतवणूकीपासून परतावा तत्काळ मिळत नाही आणि गुंतवणूक मोठी असल्यामुळे सरकारचा हस्तक्षेप पायाभूत सोयीमध्ये कायम आवश्यक आहे. "बांधा–चालवा–हस्तांतरीत करा" या सूत्राचा वापर पायाभूत सोयीमध्ये योग्य असला तरी अतिरेक होता कामा नये याची खबरदारी शासनाने घेणे आवश्यक आहे.

**(iii) किंमत व बाजार यंत्रणा**

प्रचंड ग्राहकवर्ग, मोठी बाजारपेठ अशी भारतीय अर्थव्यवस्थेची ओळख जगाच्या पाठीवर आहे.त्यामुळे बाजारपेठेतील चुकीच्या प्रथा शक्य तितक्या लवकर होणे आवश्यक आहे. आज आपल्या अर्थव्यवस्थेत एकाधिकाराची जागा अल्पाधिकार स्पर्धेने घेतली आहे. (एकाधिकारात एकच विक्रेता असतो पर्यायी विक्रेता नसल्यामुळे तो ग्राहकांचे प्रचंड नुकसान करतो.) तरीही अल्पाधिकार स्पर्धेतही शोषण सुरू असलेले दिसते. अल्पाधिकारात मोजके विक्रेते असतात. ते आपसात संगनमत करून बाहय स्पर्धकांना आत येऊ देत नाही. यातूनच ग्राहकांची प्रचंड लूट होते यात बदल होणे आवश्यक आहे. बरेचसे विक्रेते निर्माण होऊन म्हणजे एकाधिकारयुक्त स्पर्धा प्रत्येक वस्तूबाबत तयार होऊन ग्राहकांच्या मागणींचा, वस्तूंच्या दर्जाचा, किफायतशीर किंमतीचा समतोल निर्माण होणे आवश्यक आहे. एकूणच बाजारातील चुकीच्या प्रथा, परंपरा बंद होऊन किंमती व वस्तूचा दर्जा यात चांगले संबंध आत्मनिर्भरतेसाठी एकाधिकारयुक्त स्पर्धेतूननिर्माण होणे आवश्यक आहे.

**(iv) लोकशाही**

कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ हे लोकशाहीचे आधारस्तंभ आहे. लोकशाही प्रदीर्घ काळ टिकेल असा अंदाज असला तरी या लोकशाहीमार्फत अर्थव्यवस्था समृद्ध व आत्मनिर्भर होणे आवश्यक आहे. बहूमत तयार होऊन योजनांची आखणी आणि अंमलबजावणी करण्यासाठी लोकशाहीचे महत्त्वाचे स्थान आहे. निर्णय प्रक्रियेत सर्वांना समावून घेण्याची क्षमता लोकशाहीत असल्यामुळे मतदार व मतदार प्रक्रिया साधी, सोपी, समग्र असावयास हवी, लोकशाहीमुळे भारतीय अर्थव्यवस्था आत्मनिर्भर होण्यासाठी ती जगण्याबरोबरच सर्वसमावेशक बनणे आवश्यक आहे.

**(v) मागणी**

अर्थव्यवस्थेत अचुक मागणी किंवा प्रभावी मागणी वाढणे आवश्यक आहे. यासाठी आपल्या लोकसंख्येच्या मर्यादित गरजा कोणत्या आहे. तसेच आज आणि भविष्यकालीन गरजांचा अचुक अंदाज घेवून पुरवठा निश्चित केल्यास साधनधनाच्या पर्याप्त वापराबरोरच पुरवठा= मागणी हे समीकरण तयार होईल व याचा फायदा सर्वांना मिळेल. देशात मागणी किंवा प्रभावी मागणीचा अभाव असल्यामुळे साधनधन वाया जात आहे. तसेच मागणीचा अचुक अंदाज घेता येत नसल्यामुळे असलेल्या पुरवठ्यावर ताण पडून साधने वाया जात आहे. मागणी =पुरवठा हे समीकरण आत्मनिर्भरतेसाठी योग्य बनविण्याकरीता बाजारपेठांमध्ये चांगले संबंध निर्माण होणे आवश्यक आहे तसेच किंमत हा घटक मागणी पुरवठ्यामध्ये मध्यस्थ असल्यामुळे किंमत स्थिरताही मागणीसाठी टिकणे आवश्यक आहे.

**आत्मनिर्भर भारत =भारतीय अर्थव्यवस्था+ पायाभूत सोयी+ किंमत व बाजार यंत्रणा+ लोकशाही+ मागणी** या सर्व घटकामध्ये परस्परपूरकता सबळ झाल्यास आत्मनिर्भरता पुढील काही दशकात देशात निर्माण होईल यात कुठलीही शंका नाही.

**अनुत्पादन खर्च आणि तीव्र समस्यांकडे विशेष लक्ष**

भारतीय अर्थव्यवस्थेत किंमत अस्थिरतेचा प्रश्न दुसऱ्या महायुध्दापासून सुरू झाला असून तो अजूनही कायम आहे. आज कोवीड–१९ मुळे किंवा वर्तमान दशकातील आर्थिक बदलामुळे भारतीय अर्थव्यवस्था सुस्तीच्या स्थितीत आहे. (बाजारात येणारी पुन्हा–पुन्हा घट) यावर उपाययोजना झाली नाही तर मंदी किंवा महामंदीवरही उपाय करणे कठीण होईल. मंदी किंवा महामंदी अनेक कारणामुळे निर्माण होत असली तरी अनुत्पादन खर्च हे मंदी निर्माण होण्याचे प्रमुख कारण आहे. अनुत्पादन खर्चावर शासनाने, उद्योजकांनी, वैयक्तिक जीवनातही मनुष्याने चांगले व्यवस्थापन करण्याची आवश्यकता आहे. अनुत्पादक खर्चाबाबतचा भ्रम काढून टाकणे आवश्यक आहे. बरेचदा अनुत्पादक खर्च प्रदर्शन प्रभावामुळे मोठा बनतो (दुसऱ्यांकडे जी वस्तू आहे ती माझ्याकडे असायला हवी याला प्रदर्शन प्रभाव म्हणतात) या प्रदर्शन प्रभावामुळे विकसनशील राष्ट्रांचा किंवा जनतेचा अनुत्पादक खर्च वाढतो. अनुत्पादक खर्चामुळे खोटी मागणी निर्माण होते. याचा अंदाजही संयोजकाला घेता येत नाही. पुढे हा खर्च मंदीच्या रूपाने अंगलट येतो. यामुळे अनुत्पादक खर्चावर विविध साधनांच्या व संयमाच्या सहाय्याने नियंत्रण प्रस्थापित होणे आत्मनिर्भरतेसाठी आवश्यक आहे.

आपल्या देशात दारिद्रय, बेकारी, महागाई, आर्थिक विषमता अंतर्गत व बाहय संरक्षण या तीव्र समस्याम्हणून ओळखण्यात येते. यावर विशेष उपाययोजना करणे आवश्यक आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात साथीच्या रोगावर नियंत्रण प्रस्थापित करण्यात यश आले असले तरी मानवी चुकांमुळे या तीव्र समस्या वाढत आहे. या सर्व समस्या परस्परपुरक आहे. एका समस्येकडे विशेष लक्ष दिल्यास इतर समस्या त्यातुन हळूहळू नष्ट होणाऱ्या आहे. आर्थिक विषमता नष्ट होण्याकरीता गरिबांचा दृष्टिकोण बदलणे आवश्यक आहे तसेच मलाही कौशल्याच्या आधारे पुढे जाता येते हा दृष्टिकोण बनणे आवश्यक आहे. दारिद्रयासाठी – दारिद्रयाचे दुष्टचक्र नष्ट करणे आवश्यक आहे. बेकारीसाठी तीनही क्षेत्रांच्या क्षमता आणि उपयोगी उत्पादन तंत्राचा आवश्यक वापर, अंतर्गत व बाहय संरक्षणासाठी देशाअंतर्गत यासमवेत काम करणाऱ्या संस्था आणि बाहय संस्था यांच्या भुमिका निपक्षपाती होणे आवश्यक आहे. या तीव्र समस्या साध्या पध्दतीने सोडविता येते, गरज आहे ती दृष्टिकोण सकारात्मक करण्याची.

**तरूणाईला विश्वासात घेऊन गुंतवणूक आणि आत्मनिर्भरतेचा प्रवास**

आधुनिक काळात तरूणाई हा करमणुकिचा विषय नाही तर चांगल्या गुंतवणूकीचा स्त्रोत आहे. याकडे शासनाने आणि घराघरातून लक्ष देणे गरजेचे आहे. तरूणाईला विश्वासात घेऊन गुंतवणूकीला प्रोत्साहन दिल्यास प्रचंडफायदे तयार होणारे आहे. चांगले शिक्षण, प्रशिक्षण, संशोधनाच्या सोयी तरूणाईला मिळाल्यास कोणत्याही जोखमी हा वयोगट घेण्यसाठी तयार होईल. यातून आत्मविश्वास व आत्मनिर्भरता तयार होऊन त्याचा फायदा कुटूंब, गाव, शहर, राज्य, राष्ट्राला एकाच वेळी मिळेल. जे सुचते ते मांडण्याची धमक या वयोगटाकडे असल्यामुळे त्याचा सार्थक वापर होणे देशहितासाठी आवश्यक आहे. "डेमोग्राफिक डेव्हिडंड" आज आपल्या लोकसंख्येत आहे आणि तो पुढच्या काही दशकापर्यंत टिकणारा आहे. याचा पूर्ण अंदाज घेऊन संधीचे सोने केल्यास आत्मनिर्भरतेचा प्रवास सुखकर होईल आणि यामार्फत देशाला समर्थपणासुध्दा मिळेल. प्रत्येक घटकराज्यांच्या क्षमता व केंद्रशासित प्रदेशांच्या क्षमता हा तरूण गट प्रथमता ओळखत असल्यामुळे त्यांच्या सार्थक क्षमतांचा उपयोग देशात करून घेणे महत्त्वाचे आहे. तसेच अतिरिक्त लोकसंख्येचे पर्याप्त लोकसंख्येत रूपांतरण करणेही याचवेळी आवश्यक आहे. यासाठी तरूण वयोगटाला पर्याप्त लोकसंख्येचे महत्त्व पटवून देणे आवश्यक आहे, म्हणजे आज अतिरिक्त लोकसंख्येतील डेमोग्राफीक डिव्हीडंड (तरूण लोकसंख्येचा गट अधिक) आणि भविष्यातील पर्याप्त लोकसंख्या यातून मानवी भांडवल सुदृढहोऊन नैसर्गिक साधनधनाचा वापर व इतरही स्त्रोतांच्या वापरासाठी हा घटक महत्वपूर्ण ठरेल. एकूणच सद्यास्थितीतील तरूणाईचा गट व पुढील पर्याप्त लोकसंख्येच्या सहाय्याने आत्मनिर्भर भारत निर्माण होणार आहे, यात कुठलेही वावगे नाही.

**मर्यादित गरजांच्या पूर्ततेतूनच आत्मनिर्भरता निर्माण**

निसर्ग मानवी गरजा पूर्ण करू शकतो मानवी हाव पूर्ण करणार नाही म्हणजे आपल्या मर्यादित गरजा पूर्ण करणे कोणत्याही व्यक्तीला किंवा राष्ट्राला शक्य आहे, याची ओळख होती. अमर्याद गरजांसाठी साधनांची विपूलता कोणत्याही राष्ट्राकडे नाही. कसलीही प्रगती म्हणजे विकास नव्हे. युरोपियनांची प्रगती होत आहे असे मानण्यालायक पुरावा उपलब्ध नाही. आध्यात्मिक व नैतिकतेचे लक्षण तिथे दिसत नाही. दुर्योधनाजवळ अफाट संपत्ती होती पण विदुर आणि सुदामाच्या

तुलनेत तो दारिद्री होता. तलवारीच्या सहाय्याने जगणारे अनेकदा तलवारीने मरतात. पोहणारा बहुतेकदा बुडूनच मरतो. एकूणच अमर्याद गरजांची पूर्तता करण्याचा प्रयत्न झाल्यास शांततेऐवजी अशांतता तयार होतांना दिसते आणि मर्यादित गरजांच्या पुर्ततेतून शांतता तयार होते.

मर्यादित गरजांच्या पूर्ततेवेळी “जे करायचा तुमचा संकल्प असेल ते तुम्ही बेलाशक बोलून दाखवा आणि जे बोलून दाखवावयाची तुमची तयारी नाही ते करावयास जाऊ नका” (लोकमान्य टिळक) याचा वापर होणे आवश्यक आहे. अमर्याद गरजांमध्ये जे चांगले वैशिष्ट्ये आहे किंवा अतिआवश्यक गरजांची निवड करून साधनांचा वापर झाल्यास आवश्यक गरजा प्रत्येकांच्या पूर्ण होऊन आत्मनिर्भरतेचा पाया मजबूत बनण्यास कोणत्याही अडचणी नाही यातूनच शाश्वत व सर्वसमावेशक विकासाचा राजमार्ग तयार होईल आणि तो आत्मनिर्भरतेला मजबूत करेल.

**विषयासंदर्भात निष्कर्ष**

(१) भारतीय अर्थव्यवस्था इंग्रजी साम्राज्याअगोदर स्वयंपूर्ण किंवा आत्मनिर्भर होती तिला जाणिवपुर्वक इंग्रजांनी तोडली आहे.

(२) भारतीय अर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्राकडे विकास करण्याची प्रचंड क्षमता असुनसुध्दा १९९० च्या दशकापासून या क्षेत्राकडे दुर्लक्ष सुरू आहे.

(३) भारत लोकसंख्येबाबत तरूण देश आहे परंतु या लाभांश लोकसंख्येचा पर्याप्त वापर होत असलेला दिसून येत नाही.

(४) शासनाचे सार्वजनिक आरोग्य आणि शिक्षण व्यवस्थेकडे उत्तरोत्तर दुर्लक्ष होत जात असल्याचे दिसून येते.

(५) भारतीय अर्थव्यवस्थेत विकास आणि आपत्तीमध्ये जवळचा संबंध असतांना आपत्तीकडे अतिशय दुर्लक्ष होत असलेले दिसून येते.

(६)आत्मनिर्भरतेला आर्थिक कारणे कारणीभूत आहेत तसेच आर्थिकेत्तर कारणेही महत्वाची आहे.

(७) भारतीय अर्थव्यवस्थेतील दारिद्रिय, बेकारी, महागाई, आर्थिक विषमता, अंतर्गत व बाह्य संरक्षण या प्रमुख समस्यातील तीव्रता अजुनही कायम असलेली दिसून येते.

(८) शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्र एकमेकांना पुरक असतांना जी.डी.पी. मधील वाट्यामध्ये जे अंतर निर्माण होत आहे ते आत्मनिर्भरतेसाठी योग्य नाही.

(९) भारताकडे लोकसंख्या, नैसर्गिक साधनसंपत्ती आणि इतरही विकासाचे अनेक स्त्रोत उपलब्ध असल्यामुळे आत्मनिर्भरतेचा प्रश्न कठीन असला तरी सामूहिक प्रयत्नाद्वारे तो सुटणारा दिसुन येतो.

**गृहितकृत्याची पडताळणी**

भारतीय विचारवंतानी आणि सुधारकांनी आर्थिक शोषणावर आधारित आर्थिक नि:सारणाचा सिध्दांत मांडला आणि ब्रिटिशाकडून होणारी भारताची आर्थिक लूट लोकांसमोर मांडली, त्यातूनच पुढे स्वदेशीची चळवळ उभी राहिली. याचाच भाग म्हणून ब्रिटिश मालाची होळी केली गेली, त्यांच्या मालावर बहिष्कार टाकला गेला. ही स्वंयपूर्णतेला चालना देण्याची चळवळ होती. पुढे सर्व देश जागतिकरणात (१९९५) सहभागी होऊन प्रादेशिकतेला किंवा स्थानिकतेकडे दुर्लक्ष करून देशा–देशाच्या परस्परपुरकतेतून आत्मनिर्भरता तयार केलेली दिसून येते आणि वर्तमान दशकात (२०१०–२०२०)‘मेक इन इंडीया’, ‘स्टार्ट–अप’, ‘अमेरीका–चीन व्यापार युध्द’, ‘अमेरिका फर्स्ट योजना’ अशा उपक्रमातून स्वदेशाहित महत्त्वाचे मानणारी प्रादेशिक अस्मितादेशादेशात प्रभावी ठरू लागली आहे. त्यामुळे आत्मनिर्भरता ही देश, स्थळ, काळ, व्यक्ती आणि मानसिक संकल्पना आहे असेया शोधनिबंधाचे गृहितक निवडक घटनांच्या आधारे सिध्द होते.

**समस्यांच्या निरसनासाठी किंवा आत्मनिर्भरतेकरीता अल्प, मध्यम आणि दिर्घकालीन उपाययोजना**

कोणत्याही व्यक्ती किंवा अर्थव्यवस्थेपुढे साधनांच्या दुर्मिळतेमुळे आर्थिक प्रश्न निर्माण होतो आणि विकास व आपत्तीचा जवळचा संबंध असल्यामुळे नवीन नवीन नैसर्गिक व मानवी संकटे निर्माण होत असतात यासाठी अल्प, मध्यम आणि दीर्घकालीन उपाययोजना तयार असणे गरजेच्या आहे. गरजांची किंवा समस्यांची सोडवणूक करतांना शस्त्रज्ञानाऐवजी शास्त्रज्ञानाचा वापर होणे आवश्यक आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या आत्मनिर्भरतेसाठी अल्प, मध्यम आणि दीर्घकालीन योजना पुढीलप्रमाणे,

(अ) अल्पकालिन उपाययोजना

(i) एकाचवेळी मागणी व पुरवठा दोनही बाजूकडे लक्ष (ii) सार्वजनिक आरोग्य व शिक्षण व्यवस्था बळकट करणे (iii) स्वायत्त गुंतवणूकीला प्रोत्साहन आणि वाढ (iv) कृषी व संबंधित क्षेत्रांवर जाणिवपुर्वक लक्ष (v) शासन लोकांच्या व लोक शासनाच्या बाजूने आहे यावर भर (vi) साधनधनाच्या वापरासाठी प्रत्येकाकडून छोट्या युक्त्यांचा वापर वाढविणे आवश्यक (vii) विकास आणि आपत्तीसाठी शास्त्रज्ञानाचा वापर (viii) अनुत्पादक खर्च शासन व व्यक्ती मार्फत तात्काळ बंद. (ix) कार्यकारी लोकसंख्येचा प्रबळ वापर.

(ब) मध्यमकालीन उपाययोजना

(i) संघटित व असंघटित रोजगारात वाढ (ii) सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा विस्तार (iii) प्रेरित गुंतवणूकीला प्रोत्साहन (iv) पायाभूत सुविधेत वाढ (v) उद्योग व व्यवसायांचे विकेंद्रीकरण (vi) आयात प्रतिस्थापन व निर्यात विविधकरण (vii) विदेशी व्यापाराची दिशा व रचना विकसित (viii) देशाकडील अतिरिक्त साधनांचा कौशल्याने वापर (ix) केंद्रीयबॅंकेचे मौद्रिक धोरण व शासनाचे राजकोषीय धोरण विकास केंद्रित.

(क) दिर्घकालीन उपाययोजना

(i) पर्याप्त लोकसंख्या बाबत नियोजन (ii) विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांशी संबंध (iii) आयाती–निर्यातीच्या सुलभ स्त्रोतांचा वापर (iv) देशाअंतर्गत तीव्र समस्यांच्या निवारणावर भर(v) प्रत्येक राज्य व केंद्रशासित प्रदेशांच्या क्षमतांची व समस्यांची ओळख व उपाय (vi) लोकशाही व सार्वभौमत्ववार भर (vii) प्राचीन संस्थांची जपणूक (viii) खेडे–शहरे, स्त्री–पुरूष विकासाची केंद्रे यावर भर (ix) वसुधैव् कुटूंबकम् (x) सर्वसमावेशक व शाश्वत करप्रणाली.

**समारोप**

भारतीय नागरिकांना देशाच्या क्षमता आणि मर्यादांची ओळख असल्यामुळे आत्मनिर्भरता मिळविणे कठीण असले तरी शक्य आहे कारण भारताकडे स्वावलंबनाचे किंवा आत्मनिर्भरतेचे प्रचंड स्त्रोत उपलब्ध आहे. काही दशकापर्यंत टिकणारी लाभांश लोकसंख्या, पुढे त्यातून निर्माण होणारी पर्याप्त लोकसंख्या, बरेच विकासाचे आर्थिक व आर्थिकेत्तर घटक भारताकडे आहे तसेच देशात अतिरिक्त ठरणाऱ्या साधनांचा वापर दुसऱ्या देशांना उपलब्ध करून देणे व इतर देशांकडे अतिरिक्त ठरत असलेल्या साधनांचा चांगला वापर करणे याची कला भारताकडे आहे आणि दुसऱ्याकडून आपल्या साधनांचा गैरवापर होत असल्यास प्रसंगी तोंड देण्याचीही क्षमता देशाकडे असल्यामुळे आत्मनिर्भरता मिळविणे कठीन नाही आणि पुढेयामुळे “तन–मन–धन से सदा सुखी हो भारत देश हमारा – विश्व हमारा” हा राजमार्ग आत्मनिर्भरतेतून तयार होईल, हे खरे आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :–**

(१) दैनिक लोकसत्ता (२०१७) रौप्य महोत्सव विशेषांक, नागपूर
(२) पाटील जे. एफ (२०१२), महाराष्ट्राची आर्थिक पाहणी पर्यायी दृष्टिकोन, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर
(३) देशपांडे विनायक, (२०१०) भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण आणि विकास) हिमालया पब्लीशींग, नागपूर
(४) रानडे अजित, (२०२०) लोकसत्ता वेबसंवाद मधिल सादरीकरण
(५) रॉय अजित (२०१९) द नॅशनल इंटरेस्ट, दै. हितवाद
(६) अर्थसंवाद (२०१६) मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक, खंड ४० अंक १
(७) देसाई व भालेराव (२०१२) कृषी अर्थशास्त्र, निराली प्रकाशन, पुणे
(८) भामरे संजय (२०१३), महिलांचे सामाजिक योगदान, अर्थव पब्लिकेशन, जळगाव
(९) धरचक्रवर्ती पी. जी. (२०१७) विकास आणि आपत्ती, योजना मासिक, मुंबई.
(१०) फडणवीस मृणालिनी (२०२०) विकासाचा पर्याय भांडवलवाद ? अर्थमिमांसा अर्धवार्षिक मासिक.
(११) गाडगीळ गंगाधर (१९६१) नियोजन आणि समृध्दी, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर.
(१२) कांबळे पी. एस. (२०२०) मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक, खंड ४४, अंक २.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) –7.675, Issue NO, 272(CCLXXII)
ISSN : 2278-9308
Fabruary, 2021

# कौमार्यावस्थेतील विदयार्थीनींच्या स्व:संकल्पनेचा त्याच्या भावनिक बुद्धिमत्तेशी संबंध

प्रा. योगिता गोरे
गृहअर्थशास्त्र विभाग
लोकमान्य महाविद्यालय वरोरा

**प्रस्तावना :–**

मानव हा विकसनशिल प्राणी आहे. मानवी शरीर ही निसर्गाने दिलेली एक देणगी आहे. मानवी शरीरचनेचे सतत कायमच अविरत संशोधन चाललेले आहे तरी मानवी शरीर रचना ही एक आच्यर्यकारक देणगी आहे. प्रत्येकाला आपल्या शरीराबद्दल कुतूहल असते.गर्भधारणेपासून ते जन्मापर्यंत मानवी विकास सुरु असतो. विकासाच्या वेगवेगळया अवस्थांमधून व्यक्तीचा विकास होत असतो. त्यामध्ये नवजात अवस्था, शैशवावस्था, बाल्यावस्था, कौमार्यावस्था इत्यादी अवस्थ येतात. मानवी जीवनातील सर्वात महत्वाचा टप्पा कौमार्यावस्था हा होय.

शैशवावस्था व बाल्यावस्थे पेक्षा कौमार्यावस्थेत बालकाचा शारीरिक, मानसिक, भावनिक तसेच सामाजिक विकास जामाने होतो. कुमार वयात शारीरिक बदल होतात. त्याची उत्सुकता निर्माण होते लैगिंग विषयावर उघडपणे बोलले जात नाही चर्चा केली जात नाही. मित्र मैत्रिणींनी दिलेल्या अर्धवट ज्ञानातून माहिती मिळविण्याचे प्रयत्न केले जातात शारीरिक आणि भावनिक वाढ व विकास व्हावा यासाठी लैंगिकते बद्दल शास्त्रीय माहिती मिळणे आवश्यक आहे. लैगिक शिक्षण ही काळाची गरज आहे.

शहरातील आणि ग्रामिण भागातिल कौमार्यावस्थेतील विद्यार्थ्यांच्या समस्यामध्ये बरीच तफावत दिसून येते. शहरी भागातील विद्यार्थ्यांचा सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक दर्जा उंचावलेला असतो, तसेच शैक्षणिक क्षेत्राततही बऱ्याच सवलती असतात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा सामाजिक , कौटुबिक, आर्थिक दर्जा शहराच्या मानाने मागासलेला असतो तसेच शैक्षणिक सोई सवलती कमी प्रमाणात उपलब्ध असतात. परंतू, सद्यास्थितीत त्यांच्यासाठीही बऱ्याच सोई सवलती उपलब्ध झालेल्या आहेत तरीही ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी कौटुंबिक व आर्थिक समस्या बऱ्याच येतात त्यामुळे सुविधा असतांनाही ते शिकु शकत नाही व त्यांच्या शैक्षणिक संपादनात अडथळे येतात.

कौमार्यावस्थेत १३ वर्ष ते १९ वर्ष या वयोगटातील मुलांचा समावेश होतो. तसेच कौमार्यावस्थेचे प्रमुख लक्षण लैगिक परिपवक्वता होय. या काळात वर्तन अभिवृत्ती, मुल्ये यांच्यामध्ये सतत बदल होत जातात हे बदल किशोरावस्थेच्या उत्तरार्धापेक्षा पुर्वार्धामध्ये जास्त घडत असल्याने किशोरावस्थेचे पुर्व आणि उत्तर किशोरावस्था असे दोन भाग केले जातात.

कुमारावस्था, कौमार्यावस्था, पौगंडावस्था अशा भिन्न भिन्न नावांनी ही अवस्था ओळखली जाते. किशोरावस्था आणि पौगंडावस्था यांच्या दरम्यानाची अवस्था म्हणजे कुमारावस्था होय. 'स्टॅन्ले होल' यांच्या म्हणण्यानुसार, कुमारावस्था म्हणजे मुला मुलींचा नवा जन्मच होय. उत्तर कुमारावस्थेतील मुले किंवा मुली हे कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश करतात तेव्हा आता आपले पाल्य मोठे झाले आहे याची जाणीव प्रथम पालकांना होते. कुमारावस्थेच्या कालखंडाला इंग्रजी मध्ये ''टिन एज'' म्हटले जाते. या वयात मुलांमध्ये शारीरिक, मानसिक, भावनिक आणि सामाजिक स्थित्यंतरे घडत असतात. विचार व भावना उचंबळून येतात. मुले व मुली शारिरिक परिवर्तनामुळे गोंधळून जातात. या संक्रमनाच्या कालखंडात मुला मुलींची स्थिती संदिग्ध असते. मनात गोंधळ निर्माण झालेला असतो.मुला मुलींनकडून जर बालीश वर्तन झाले तर ''आता तु मोठा किंवा मोठी झालीस'' असे म्हणणे योग्य नाही आणि याच मुलां मुलींकडून प्रौढांना असे वर्तन झाले तर '' लहान तोंडी मोठा घास'' असे म्हणून मोठयांकडून टिका केली जाते काही मुले मुली निराश होतात. अस्थिरता निर्माण होते या वयात लैंगिक भुकेची सुरुवात होते तिचे समाधान व उपशम यात सामाजिक बंधनाचा अडसर येतो. तो अडथळा आल्यामुळे दमन आणि व्दंद निर्माण होते. यातूनच मुला मुलींकडून अनैतिक व विकृत मार्ग स्वीकारले जाण्याची शक्यता निर्माण हाते.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये**

१) कौमार्यावस्थेतील विद्यार्थ्यांच्या स्व–संकल्पना शोध घेणे.
२) कौमार्यावस्थेतील विद्यार्थीनीच्या स्व–संकल्पना शोध घेणे.
३) कौमार्यावस्थेतील विद्यार्थ्यांच्या भावनिक बुध्दिमत्तेचा शोध घेणे.
४) कौमार्यावस्थेतील विद्यार्थीनींच्या भावनिक बुध्दिमत्तेचा शोध घेणे.
५) कौमार्यावस्थेतील विद्यार्थ्यांच्या स्व–संकल्पना व भावनिक बुध्दिमत्तेतील संबंध शोधणे.
६) कौमार्यावस्थेतील विद्यार्थीनीच्या स्व–संकल्पना व भावनिक बुध्दिमत्तेतील संबंध शोधणे.
७) कौमार्यावस्थेतील विद्यार्थी व विद्यार्थ्यींनी पैकी यांच्या स्व–संकल्पना व भावनिक बुध्दिमत्तेचे तुलनात्मक अध्ययन करणे.

**शोधनिबंधाचे विश्लेषण**

**कौमार्यावस्था :–**

**''दिवस तुझे फुलायचे, झोपाळया वाचूनी झुलायचे''**

शंकर वैद्य यांच्या काव्यरचने प्रमाणे प्राप्त होणारी अवस्था म्हणजे कौमार्यावस्था होय. व्यक्तीच्या जीवनातील वयाच्या १३ ते १९ वर्षातील कालखंड कौमार्यावस्था म्हणून ओळखला जातो. या कालखंडास कुमारावस्था, कौमार्यावस्था, पौगंडावस्था या नावांनीही ओळाखल्या जाते.

किशोरावस्था व प्रौढावस्था चा अवस्थांच्या दरम्यान हा कालावधी होय. शालेय जीवनातील महत्वाचा भाग या कालखंडात येतो.या वयाच्या विद्यार्थ्यांचा मानसिक, भावनिक व शारिरीक विकास झपाट्याने होत असतो. त्यांच्या संकल्पना तयार होत असतात.त्यांच्या भावनिक बुद्धीमत्तेचा विकास होत असतो. किशोर वय किंवा किशोरावस्था Adolescence लॅटीमधील Adolescere म्हणजे मोठे होणे to grow up म्हणजे मोठे होण्याचा काळ होय. किशोर वय हा अरिपक्व मुलांचे (कुमाराचे) पुर्ण वाढ झालेल्या प्रगल्भ तरुणात रुपांतर होण्याच्या प्रक्रियेचा कालखंड होय. मानसाची वाढ व विकास हे जन्मापासून (त्याची आधी गर्भधारणे पासून) सुरु असते तरी त्यांच्या भ्रृण, बाळ/नवजात अर्भक, शिशु, बालक, कुमार, किशोर, तरुण, प्रौढ, वृद्ध इत्यादी अनेक टप्यांपैकी एका विशिष्ट संक्रमणाच्या कालावधीला किशोरवय म्हणतात व त्यातील लैंगिक विकासाच्या टप्याला पौगंडावस्था म्हणतात.

या काळात मुलींमध्ये आणि मुलांमध्ये शारीरिक, बौदिधक, मानसिक आणि सामाजिक बदल होत असतात. या काळाच्या सुरुवातीला शरीरातील अंत:स्त्रावांमध्ये बदल होण्यास सुरुवात होते. त्यामुळे माणसाच्या लैंगिक विकासाला सुरुवात होते आणि त्याच बरोबर दुय्यम लैंगिक चिन्हे ही दिसू लागतात. कौमार्यावस्थेचे प्रमुख लक्षण लैंगिक परिपक्वता होय. पुर्वीच्या काळी पौगंडावस्था आणि किशोरावस्था असे दोन स्वतंत्र कालखंड मानले न जाता त्यावेळी सर्वसाधारण पुनरुत्पादनाची क्षमता निर्माण होईल त्यावेळी किशोरा प्रौढ मानले जात असे. **स्टॅन्ले हॉल यांच्या मते :–**

''कौमार्यावस्थेत जणु काही मुलांमुलींचा जन्म होतो. नवीन प्रवृत्ती, नवीन वर्तन प्रकार, नवीन दृष्टीकोण निर्माण होतात. हे व्यक्तीच्या आधी बालपणात नसतात त्याचे मुलभूत कारण प्रजनन क्षमता होय.

**श्री. ए.टी. जेटसिल यांच्या मते :–**

''कुमारवस्था हा जिवनातील असा कालखंड आहे की, ज्या काळात मुले आणि मुली बालपणातून मानसिक दृष्टया, भावनिक आणि शारीरिक दुष्टया प्रौढावस्थेत पर्दापण करित असतात.

**R.A. Peel यांच्या मते :–**

''कुमारवस्थेचा काळ हा तनावमुक्त आणि संक्रमनाच्या अतिभाराने व्यापलेला असते.''

**श्री. जीन पी गेट यांच्या मते :–**

थोर ध्यैय सिध्दांताची सुरुवात तसेच सत्याचा स्विकार करणारे वय म्हणजे कुमारावस्था होय. कौमार्याअवस्थेत महत्वाचे जैविक, शारिरीक बदल घडून येतात. या अवस्थेचे महत्वाचे वैशिष्ठय म्हणजे कौमार्यावस्था होय. विकासाची गती शैशव आणि बाल्यावस्थेच्या गतिप्रमाणेच खुप जास्त असते. मुलांमुलींचे वर्तन अस्थिर बनते . आचार विचार व भावना यात खळबळ सुरु असते कुमांराना या गतीची जाणीव होत असल्यामुळे विकासाच्या या गतीशी समायोजन करतांत कुमार

भांबावून जातो. हा काळ मानसिक वादळाचा आणि भावनिक ताणाचा काळ मानतात, तर आपल्याला ''वादळी अशांततेची अवस्था'' असे म्हणता येईल. मानसशास्त्रज्ञ या कालखंडास 'परिपक्वनाचा काल'' असेही म्हणतात. कारण याच कालखंडात मुलांना अनेक शारिरीक, मानसिक, भावनिक, सामाजिक, नैतिक क्षमतांचा विकास होत असतो. या अवस्थेतील व्यक्ती प्रौढ होण्याच्या मार्गावर असतात. या काळात मुलांमुलींच्या शरीराचा आकार मानात व बांध्यात मोठे बदल होतात. बऱ्याचशा शारीरिक क्षमतांचे परिपक्वन याच काळात होते.

**कौमार्यांचा विकास :–**

१) कौमार्यांचा शारिरीक विकास :–

१) मुलांमुलींची हातापायाची लांबी, उंची एकदम वाढते.

२) वजनात वाढ होते.

३) मुलांची शरीरे शारीरिक दृष्ट्या कणखर होतात व मुली अधिक नाजुक होतात.

४) मुलांचे खांदे रुंदावतात, आवाज घोगरा होतो, मिसरुड फुटते.

५) मुलींचे खांदे अरुंद होतात, कटी रुंदावते, शारिरीक पक्वता प्राप्त होते.

६) मुलाची हाडे बळकट होतात. त्या मानाने मुलींची हाडे ठिसुळ होतात.

७) शरीरातील प्रमाणबंद्धता कमी होते.

८) शरीरातील सर्व अंत:स्त्राव ग्रंथी स्त्रावू लागतात.

९) दुय्यम लैगिंक लक्षणे दिसू लागतात.

१०) मुलींची मासिक पाळी सुरु होते.

११) मुलांपेक्षा मुलींच्या वाढीचा वेग सुरुवातीची दोन वर्ष जास्त असतात.

**२) कौमार्यांचा मानसिक ;बोध्दीद्ध विकास :–**

१) मेंदूचा पुर्ण विकास होते.

२) मुलांमुलींची अमुर्त विचार प्रक्रिया विकसीत होते.

३) कुमार कुमांरीचे अभिरुची क्षेत्र विस्तारते.

४) मुलांमुलींची अवधान कक्षा वाढते.

५) तर्कशक्ती विकसित झाल्यामुळे मुले मुली स्व:तचे मत मांडतात.

६) अमूर्त प्रश्न, कोडी सोडविण्याकडे जास्त कल असतो.

७) विविध विषयावर वाद चर्चा करतात स्व:तची मते आग्रहपुर्वक मांडतात.८) मुलींना विविध हस्तकला मध्ये अभिरुची निर्माण होते.

**३) कौमार्यांचा भावनिक विकास :–**

१) या वयातील मुलांमुलींना भिन्न लिंगी व्यक्तीबद्दल आकर्षण वाढते. पण एकमेंकांशी कसे बोलावे या बाबत गोंधळन जातात.

२) भावनांचा उद्रेक झाल्यात कडवट भाषा वापरुन राग व्यक्त करतात.

३) या वयात मुलांमुलींना आई किंवा वडीलांचा उपदेश ऐकायचा नसतो. शिक्षकांनी विशेषत: मुलींसमोर केलेला अपमान मुलांना
सहन होत नाही अशा परिस्थीतीत राग न आवरल्यास उलट उत्तर देणे, वेडेवाकडे वागणे, हात उगारणे या सारखे अशाेभनिय वर्तन घडू शकते.

४) या काळातील मुले राग आल्यास कधीकधी घरातील व्यक्तीशी बोलणे टाळतात.

५) या वयात भावनिक भडका कधीही घडू शकते. भावनिक अदला बदल सतत चालु असतात म्हणूनच या अवस्थेला ''वादळी अशांततेचा काळ'' असे म्हणतात.

६) ही मुले, मुली भावी जिवनाविषयी रमणिय सुख स्वप्ने रंगवतात कल्पनाविश्वात रममान होतात.या वयात त्याचे वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष होते.

७) हळुहळू भांवनांवर ताबा मिळविल्या जाते.

८) ''स्व'' ही भावना विकसित होते.

**४) कौमार्यांचा सामाजिक विकास :–**

१) या वयात गट निर्माण करण्याची वृत्ती निर्माण होते मुलांचे व मुलींचे मिश्रगट तयार होतात.

२) मुले, मुली आपल्या गटाशी एकनिष्ठ असतात या निष्ठेसाठी आई वडिल शिक्षक यांच्याशी संघर्ष होतात.

३) सांकेतिक भाषा चिन्हांचा वापर करतात.

४) या वयातील मुले मुली आदर्शाच्या शोधात असतात. व्यक्ती पुजक बनतात उदा. सचिन तेंडूलकर, अभिताभ बच्चन, ऐश्वर्या रॉय यासारख्या व्यक्तीची छायाचित्रे जमवतात आणि त्यांचे पोस्टर खोलीत लावतात. आपल्या आवडत्या क्षेत्रातील नामांकित व्यक्तीचे पुजक बनतात.

५) कर्मकांड, जातपात, धार्मिकता या गोष्टींना या वयातील मुली मुलीं विरोध करतात.

**५) कौमार्यांचा नैतिक विकास :–**

१) प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे नैतिक मुल्यांचा विकास होते.

२) नैतिक मुल्यांकडे साशंकतेने पाहणे.

३) वैयक्तीक नितीनियम तयार करण्याचा प्रयत्न करणे.

४) इतरांच्या नैतिक वर्तनाबाबत अत्यंत दक्ष असणे.

५) स्वत:च्या चुका बाबत अपराधीत्वाची भावना नाही.

**कौमार्यावस्थेतील विद्यार्थ्यांच्या सुसमायोजनात शिक्षण आणि पालकांचे योगदान**

१) या वयातील विद्यार्थ्यांना पोषक आणि पुरेसा आहार पुरविणे.

२) क्रिडा, खेळ, कवायती, व्यायाम याविषयी मार्गदर्शन करावे.

३) या काळात शारीरिक बदल नैसगिक आहे या विषयी समजावून देणे.

४) कुमारांना सहशिक्षण दयावे. अभ्यास पुरक कार्यक्रमात कुमार कुमारींना एकत्र येवून सहकार्याने काम करण्याची संधी दयावी.

५) शाळेत शिक्षकांनी आणि घरी पालकांनी त्यांना झेपतील अशा जबाबदाऱ्या त्यांच्यावर टाकून त्यांचा आत्मविश्वास वाढवावा.

६) कुमारांना संरक्षण आणि प्रोत्साहन दयावे.

७) राजकिय सामाजिक, धार्मिक, वैयक्तीक मते तयार करण्यास सहकार्य करावे.

८) सामाजिक कार्यात सहभागी होण्यास प्रोत्साहन दयावे.

९) एखादा तरी छंद जोपासण्याकरिता प्रोत्साहन दयावे.

१०) लैगिक विकास प्रक्रियेची शास्त्रशुदध माहिती देणे प्रसंगी डॉक्टरांकडून योग्य ते मार्गदर्शन दयावे. लैगिक जीवनाविषयी त्यांचे गैर समज दूर करावेत.

११) कुमारावस्थेतील मुला मुलींच्या समस्यावर मात करण्यासाठी शाळेतील वातावरण पोषक असणे गरजेचे आहे.

१२) या वयात शिक्षकांनी कुमारांशी व्यवहार करतांना बरोबरीच्या नात्यानं,मित्रत्वाच्या नात्याने करणे आवश्यक आहे. या काळात चांगल्या व्यक्तींचा आर्दश मुला मुलींसमोर ठेवणे गरजेचे आहे.

१३) घरात पाल्यांच्या मतालाही प्राध्यान्य दयावे. घरातील वडीलधाऱ्या व्यक्तींनी कुमारांचा सल्ला घ्यावा. व तसेच त्यांना योग्य ठिकाणी मार्गदर्शनही करावे.

१४) पालकांनी आपल्या मुला मुलींशी जवळीक साधावी म्हणजे आपल्या पाल्याला विश्वासात घ्यावे.

**कौमार्यावस्थेत समुपदेशकाची भुमिका :—**

कौमार्यवस्थेत समुपदेशकाची भुमिका अत्यंत महत्वाची असते. समुपदेशक हा कुमारांना एखादया समस्येचा सर्व बाजूंनी विचार करण्यास प्रवृत्त करतो. एखादया समस्येची उत्तर शोधण्यास मदत करते. समस्या ज्याची त्यानेच सोडवायची असते. मुलांना संभ्रमावस्थेत सोडणे योग्य नाही. तर त्यांच्या बरोबर आपण आहोत हा आधार महत्वाचा असतो. कुमारावस्थेत जीवनाकडे आशावादी दृष्टीकोनातून पाहणे आवश्यक असते व सकारात्मक दृष्टी निर्माण होणे अत्यंत महत्वाचे असते.

कुमार निराश होता कामा नये. विफलतेतून तो सदैव दूर राहीला पाहिजे. कार्यानुभवासारख्या विषयांच्या अभ्यासातून तों जिवनात स्वावलंबी झाला पाहिजे. या दृष्टीने कुमारांना मार्गदर्शन, समुपदेशन करणे आवश्यक आहे. या काळात त्यांचे शिक्षण चालु ठेवणे जीवनविषयक मार्गदर्शन करणे, समुपदेशन करुन आशेचा किरण दाखविण्यात व नवी पिढी खऱ्या अर्थाने मुल्याधिष्टीत करण्यात शिक्षक, पालक व समुपदेशक यांचे योगदान मोलाचे आहे.

**कौमार्यावस्थेतील मुला मुलींमध्ये दिसून येणारे साम्य :—**

कौमार्यावस्थेच्या या काळात मुला मुलींना कल्पनाविश्वात रमण्यास आवडते. समवयस्क मित्र मैत्रिणीमध्ये राहण्यास आवडते.शारीरिक, मानसिक, भावनिक , बौद्धिक, नैतिक इत्यादी प्रकारचे बदल हे पुर्णपणे नैसर्गिक असतात. या होणाऱ्या सर्व बदलांना वयात येणे असे म्हटले जाते. शरीराच्या वाढीबरोबर लैगिकतेची व्याप्ती ही बरीच असते. मुलगी वयात येणे म्हणजे पाळी येणे ही गोष्ट नैसर्गिक आहे हे तिला समजवून दयावयास हवे.

कौमार्यावस्था या काळात पालकांनी वयात येणाऱ्या पाल्यांना हसत खेळत लैगिक शिक्षण दयावे शाळामध्येसुध्दा लैगिक शिक्षण दिल्यास मुलांमुलींच्या मनातील गैरसमज व भिती दूर होण्यास मदतच होईल असे वाटते. मुलांमुलींच्या भावी जिवनाला आयुष्याला चांगले वळण लागेल. लैगिक समस्यांमध्ये स्वप्नावस्था, हस्तमैथून, इंद्रीय, ताठ होणे, इत्यादी गोष्टींबद्दल मुलांना काळजी वाटते. या सर्व गोष्टी नैसर्गिक होत असतात त्यामध्ये अयोग्य किंवा गैर काहीच नाही हे त्यांना समजून सांगावे त्याबद्दल मुलांना रागावू नये व कौतुकही करु नये मुलींच्या बाबतीत मासीक पाळीच्या वेळी दुखणे रक्तस्त्राव होणे, हस्तस्पर्शाने व हस्तमैथूनाने सुख:द संवेदना होणे व पुन्हा पुन्हा तो अनुभव घ्यावासा वाटणे, स्वप्नाळू वृत्ती जाग्या होवून दिवसा स्वप्ने पाहणे या गोष्टी संभवतात, निरोगी वातावरणात मुलां मुलींची एकत्र वाढ झाल्यास बऱ्याचशा समस्या सुटतिल. या वयात मुले मुलींमध्ये बंडखोरी करण्याची दाट शक्यता असते. आई वडिलांनी सांगितलेल्या गोष्टी न करणे, न आठवणे, वेळेवर घरी न येणे, खोटे बोलणे, जेवण, अभ्यास वेळेवर न करणे, यावेळी आई वडिलांनी घाबरुन जाण्याचे कारण नाही आपली मुले मोठे झाली आहेत हे समजून त्यांना शक्य तेवढे स्वातंत्र व मोकळीक घ्यावी. शिस्त असावी पण बेशिस्त व अतीशिस्त नसावी. शिस्तीचा बळघाई दाखवू नये.पालकांनी पाल्यांना हळुवारपणे हाताळल्यास, त्यांना विश्वासात घेवून बोलल्यास अनेक समस्या सहजासहजी सुटतील.

या किशोर वयातील मुले मुलीं व्यसनाच्या आहारी जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. पाल्यांवर लहाणपनापासुन चांगले संस्कार केल्यास मुले—मुली व्यसनाकडे वळणार नाहीत. आई वडीलांचे न पटणे, सतत संघर्ष, कलह भांडणे होणे, पालक व्यसनी असणे, घरातील वातावरणाचा मुला—मुलींवर होऊन त्यांना व्यसनाची लागण होण्याचा संभव असतो. मुलामुलींना शिस्त जरुर लावावी. त्यांच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण करावी. मुला—मुलींना पालकांनी वेळ दयावा. त्यांच्या समवेत वेळ घालवावा.त्यांच्याशी गप्पा गोष्टी कराव्यात. त्यांच्याशी सुखदु:खाच्या गोष्टी कराव्यात. प्रत्येकाने आपापले अनुभव सांगावेत. असे केल्याने मुले व्यसनाकडे वळणार नाहीत.

पाल्यांना पॉकेटमनी जरुरीपेक्षा जास्त देऊ नये. तसेच त्यांनी जरुरीपेक्षा जास्त काळ घराबाहेर राहू नये. आपल्या पाल्याचे मित्र—मैत्रिणी कोण आहेत त्यांची ओळख करुन घ्यावी. संगतीचा परिणाम मुलांवर होण्याची शक्यता असते तेव्हा पालकांनी आवश्यक तेवढे लक्ष ठेवले पाहिजे. या काळात पालक सतर्क, जागरुक राहील्यास मुलांचे भावी आयुष्य निरोगी व आरोग्यदायी होईल.

**कौमार्यावस्थेतील विद्यार्थ्यांच्या स्व:संकल्पना**

**(स्व.:बोध)** (Self Concept)

काही वर्षापासून मानशास्त्राच्या अभ्यासात सर्व प्रथम मानवी स्व:संकल्पनाच्या अभ्यासास विशेष महत्व दिल्या जाते कारण मानवाच्या रोजच्या जिवनात त्यास प्राप्त होणारी सामाजिक, आर्थिक परिस्थिती, बाजुचे वातावरण या सर्व घटकांचा मानवावर परिणाम होत असतो. त्या अनुषंगाने मानवी स्व:संकल्पना सुध्दा बदलत असतात. कारण एकच गोष्ट जर मानवा समोर वारंवार येत असली तर ती खोटी असूनही त्यास ती सत्य वाटू लागते. हा मानस शास्त्राचा नियम आहे. म्हणून मानस शास्त्राच्या अभ्यासात स्व:संकल्पनेला विशेष महत्वाचे स्थान आहे.

विसाव्या शतकाच्या मध्य पुर्व काळापासून शिक्षण क्षेत्रात सुध्दा बालकाच्या स्व:संकल्पनेस प्राधान्य देण्यात येत आहे, कारण याचा उपयोग बालकाच्या व्यक्तीमत्व विकासात तसेच त्यास योग्य मार्गदर्शन करण्यासाठी होत असतो. मानवी वर्तन आणि मानवी स्व:संकल्पना या एकाच नाण्याच्या दोन बाजु आहे असे म्हणणे चुकीचे होणार नाही. कारण मानवी स्व:संकल्पनेचे प्रतिबिंब मानवी वर्तनातून दिसून येत असते. म्हणजेच मानवाच्या स्व:संकल्पनेचाच परिणाम त्याच्या वर्तनावर होत असतो. उदा. एखादया्ला सातत्याने यश मिळत असेल आणि एखादया्ला अपयश येत असेल तर हया दोन्ही व्यक्तीच्या स्व:संकल्पनेत फरक असतो असे सिध्द झाले आहे.तसेच ज्याच्या जीवनात चढ व उतार असे दोन्ही गोष्टी आहे त्यांच्या स्व:संकल्पना वरील दोन्ही पेक्षा भिन्न असतात हे सुध्दा प्रयोगाअंती सिध्द झाले आहे.

**स्व:संकल्पना म्हणजे काय ?**

The Individuals Perception or view of himself is now as his self concept

^व्यक्तीची वैयक्तीकरित्या स्वत:ला आकलन करण्याची शक्ती क्षमता म्हणजेच स्व:संकल्पना होय*. विद्यार्थ्यांच्या स्वत: बद्दलची स्वत:च्या विचार व भावना कल्पना याबाबतची अभिवृत्ती म्हणजेच स्व:संकल्पना होय.

मानव हा आपल्या रोजच्या व्यवहारीक जीवनात जो अनुभव घेत असतो त्यापैकी तो चांगल्याचा स्वीकार तर वाईट गोष्टीचा त्याग करित असतो आणि समाजाशी परिस्थीतीशी समायोजन साधण्याचा प्रयत्न करित असतो.

स्व:संकल्पनेत आकलन करणे, शिकणे, प्रेरणा, संवेदना, आवेग, आकांक्षा, अभिरुची तसेच इतर समायोजन साधणाऱ्या घटकाचा समावेश होत असतो.

**स्व:संकल्पनेचा विकास** :–

कोणताही मानव हा जन्मताच स्व:संकल्पना घेवून जन्मास येत नसतो. तर शैशवावस्थेपासून तर प्रौढावस्थेपर्यंत त्यास जशी परिस्थिती प्राप्त होते, तो ज्या समाजात, ज्या वातावरणात राहतो, त्याचा त्यावर प्रभाव पडत जाऊन त्याच्या स्व:संकल्पनेचा विकास होत जातो.सुरुवातीस नवजात मुलं हे सर्वस्वी दुसऱ्यावर अवलंबून असते. त्यास फक्त आईवडील किंवा स्वकीय हवे असतात परंतू ते जसेजसे मोठे होवू लागते तेव्हा तो समोरील जग पाहून गोंधळत असतो. नंतर त्याच्यातला मीपणा जागृत होवून मी म्हणजे मी, माझे घर, माझी शाळा, माझे पुस्तक अशा प्रकारची त्याची स्व:संकल्पना बनत असते. पुढे हेच मुलं स्वत:स गांधी नेहरु, किंवा पुन्हा मोठा नेता संबोधत असतो. परंतू किशोरावस्थेत त्यांच्यावर जो प्रभाव पडतो त्यानुसार त्याची स्व:संकल्पना तयार होते परंतु प्रौढावस्थेमध्ये त्याच्या स्व:संकल्पना एक वैचारीक दिशा प्राप्त झालेली असते

**स्व:रचना**:–

''जन्मापासुन बाल्यावस्थेपर्यंत तसेच पुढे प्रौढावस्थेपर्यंत व्यक्तीचा जो विकास होत जातो त्यास स्व:रचना असे म्हणतात.''

**कौमार्यावस्थेत स्व:संकल्पनेवर परिणाम करणारे घटक** :–

१) **परिपक्वतेचे वय** :–

लवकर परिपक्व होणाऱ्या किशोराला जवळजवळ प्रौढाप्रमाणेच वागणूक दिली जात असल्याने उशिरा परिपक्व होणाऱ्या किशोरापेक्षा त्यांच्या स्व:संकल्पना अनुकूल तयार होवून त्याचे चांगले समायोजन घडते

२) **बाहयपत्र :—**

इतरांपेक्षा कमी प्रतिचे बाहयरुप शारिरीक दोष या मधून न्युनत्व भावना निर्माण होते आणि त्याचा स्व:संकल्पनेवर प्रतिकुल परिणाम होतो.

३) **लैगिंक योग्यता :—**

स्वत:च्या लिंगानुरुप बाहयरुप, अभिरुची आणि वर्तन प्रकार असल्यास स्वत: बद्दल अनुकुल संकल्पना तयार हाते.

४) **नावे व टोपन नावे :—**

किशोरांच्या नावांचा व टोपन नावाचा मित्रांकडून उपहास होत असल्यास त्यांना संकोचल्या सारखे वाटते.

५) **डोळ्यासमोर असणारी आर्दश व्यक्ती :—**

ज्या व्यक्ती बरोबर किशोरांचे जवळचे संबध असतील व जी व्यक्ती किशोराला आदर्श वाटते त्या त्या व्यक्तीचे गुणधर्म अंगी बाळगण्याचा प्रयत्न करतात. ही व्यक्ती समलींगी असेल तरच लिंगानुरुप गुणधर्म विकसीत होतात.

६) **मित्र :—**

मित्र आपल्याकडे कोणत्या प्रकारे बघतात या बद्दल असणारे किशोराचे संवेदन आणि समुहमान्य व्यक्तीत्व गुणांच्या विकासासाठी किशोरांवर असणारे समुहाचे दडपण, यानुसार किशोराच्या व्यक्तीमत्वावर मित्र समुहाचा परिणाम होतो.

७) **सर्जनशीलता :—**

क्रिडा शैक्षणिक क्षेत्र इत्यादी बाबतीत किशोराला त्याच्या बालपणापासून प्रोत्साहन मिळत असेल तर त्याचा किशोराच्या स्व:संकल्पनेवर अनुकूल परिणाम होतो.

८) **महत्वाकांक्षेची पातळी :—**

स्वत:च्या क्षमतांबाबत ज्या किशोरांमध्ये वास्तव्य जाणीव आहे त्याच्यामध्ये यश प्राप्तीची शक्यता जास्त असते त्यामुळे आत्मविश्वास आणि समाधान वाढते. परिणामत: अनुकुल स्व:संकल्पना तयार होते.

**भावनिक बुध्दिमत्ता :—**

भावनिक बुध्दीमत्तेच्या संदर्भात सर्वप्रथम भावनेच्या संदर्भात जाणून घेणे आवश्यक आहे. भावना म्हणजे व्यक्तीची मानसिक प्रक्षुब्ध स्थिती, अस्वस्थता मनोविकारात्मक उद्दीपक अवस्था म्हणजे भावना होय. ^भावना* या शब्दाला इंग्रजीमध्ये पर्यायी शब्द म्हणजे Emotion आहे. Emotion हा शब्द Emovere या शब्दा पासुन उत्पन्न झालेला आहे. Emovere म्हणजेच ज्व`जपत किंवा To Move होतो. मराठीमध्ये याचा अर्थ ढवळणे किंवा हलवणे असे सांगता येईल. मनाला हलवणे किंवा ढवळणे या बाबी भावना मध्ये येतात. भिती, राग, व्देष, आनंद, प्रेम, किळस, दु:ख, आश्चर्य, लाज आदर कृतज्ञता अशा कितीतरी भावना असतात यातीलकाही भावना धन तर काही भावना ऋण असतात. या भावना भाषा, ध्वनी, हावभाव, कृती इत्यादी पध्दतीचा त्यांच्या व्यक्तीमत्वावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष परिणाम होत असतो. व्यक्तीला स्वत:च्या भावनांचे व्यवस्थापन करणे फार मोलाचे असते. भावनांचे दीर्घकालीन अविष्कारण त्यांचा स्वभाव ठरवतो. भावनांची परिपक्वता, प्रगल्भता, तसेच अभिव्यक्ती मानवी जीवनात अत्यंत महत्वाची आहे.

जॉन मायर आणि पिटर सॉलोव्ही या मानस शास्त्रज्ञांनी, व्यक्तीच्या स्वत:च्या आणि इतरांच्या भावनांची देखरेख करणे, भावनांचे नियंत्रण व संतुलन करणे, विचार आणि कृतीसाठी भावनांचा योग्य उपयोग करणे असा उपयोग करावयास शिकवणे यांचा संबंध भावनिक बुद्धीमत्तेशी आहे असे म्हटले आहे.

**भावनिक बुध्दिमत्ता संकल्पना :—**

बुद्धीमत्तेच्या संदर्भात ''भावनिक बुध्दिमत्ता'' ही एक नविन संकल्पना बुद्धीमत्तेच्या क्षेत्रात सध्या विकसित झालेली आहे. भावनिक बुद्धीमत्ता ही संज्ञा प्रथमता अमेरिकन मानसशास्त्रज्ञ पीटर सॅलोरी व जॉन मेयर (१९८०) यांनी वापरली.

**विद्यार्थी दशेत भावनांचे महत्व :–**

कौमार्यावस्थेतील विद्यार्थ्यांच्या आयुष्यात भावनाला अतिशय महत्व आहे. प्रेम, सहानुभुती, दया, आनंद, उत्सुकता या सुखदायक भावना आहेत. तर राग, काळजी, व्देष, भिती, आणि दुख:दायक भावना होय. मुलांच्या भावनांना जर योग्य वळण मिळाले तर त्यापासुन त्यांना आनंद होता. मुलांच्या मनांवरील भावनांचे दडपण नाहीसे होते त्यामुळे त्यांचे शारीरिक कार्य सुरळीत चालते.भावनांचे दडपण नसल्यास शरीर ग्रंथी सुरळीतपणे कार्य करतात. भावनांचे दडपण असल्यास विचारांचा गोंधळ उडतो त्यामुळे भाषा दोष आढळून येतो. मुलांना आपल्या भावना निट व्यक्त करता येत नाही.

**हरलॉक यांच्या मते :–**

''जी मुले काळजी, निराशा, व्देष, दु:ख, या भावनांच्या दडपणाखाली असतात अशा मूलांमध्ये शैक्षणिक पात्रता असूनही त्यांना ज्या प्रमाणात यश मिळायला पाहिजे तसे मिळत नाही.''

काही मुलांच्या मनात भावनांचा इतका गोंधळ असतो की, तो त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येतो. मुलांच्या भावनात्मक वाढीचा परिणाम त्यांच्या सामाजिक, बौध्दिक, क्रियात्मक, शारीरिक विकासावर होत असतो. ज्या मुलांना आई–वडीलांचे प्रेम मिळू शकत नाही अशी मुले प्रेमाला आसुसलेली असतात. त्याचा अनिष्ट परिणाम मुलांच्या व्यक्तीमत्वावर होतो.

**विद्यार्थ्यांचा भावनिक विकास आणि बुद्धीमत्तेत वाढ :**

'' मनुष्य जन्माला आल्यापासून त्याचा भावनिक विकास सुरु हातो.''

मुलांचा भावनात्मक विकास त्यांच्या बौध्दिक विकासावर अवलंबून असतो. लहानपणी मुलांना जे अनुभव येतात त्यानुसार त्या व्यक्ती विषयी भावना तयार होतात. त्यासाठी अनुभव स्मरणात राहीले पाहिजे, म्हणजेच भावनात्मक विकास होण्यासाठी स्मरण शक्ती आणि विचार करण्याची पात्रता या दोन्ही गोष्टीची आवश्यकता असते.

विद्यार्थ्यांच्या बुद्धीमत्तेत वाढ होण्याकरिता अनुवांशिकता, परिस्थीती, संशोधन पध्दती, सामाजिक, आर्थिक परिस्थीती तसेच भौगोलिक, शालेय, सांस्कृतीक, परिस्थिती ही जबाबदार असते. बौद्धीकतेमध्ये अनुवंश हा महत्वाचा घटक आहे. मुलांना आईवडीलांकडून बुद्धीची देणगी मिळते. अनेक संशोधनाव्दारे आई, वडील आणि मूल यांच्या बुद्धीगुणांकात बरेच साम्य असते असे आढळले आहे.

परंतू केवळ अनुवंशीकतेवर बुध्दिमत्ता अवलंबून नसते तर त्याला परिस्थीतीची जोड आवश्यक असते. मुलांना योग्य भावनिक वातावरण मिळाल्यास त्यांची बुध्दिमत्ता योग्य प्रकारे विकसित होण्यास मदत मिळते.

**भावनिक बुद्धीमततेचा अर्थ :–**

१) **गोलमन यांच्या मते :–**

''भावनिक बुद्धीमत्ता ही एक आपल्या स्वत:च्या व इतरांच्या भावना ओळखण्याची, स्वत:ला प्रवृत्त करण्याची आणि स्वत:च्या आणि आपल्या परस्पर संबंधातील भावनांचे व्यवस्थापन करण्याची क्षमता आहे.''

२) **कुपर आणि स्वाफ यांच्या मते :–**

'' भावनिक बुद्धीमत्ता ही एक संवेदना, समाज, मानवी उर्जा म्हणून असलेल्या भावनिक शक्तीचे परिणमकारक उपयोग करण्याची तसेच माहिती जोडण्याची आणि प्रभावी करण्याची योग्यता आहे.''

३) **Salovery यांच्या मते :–**

सालोवेरी ने भावनिक बुद्धीमत्तेचे पाच टप्पे सांगीतले आहे.

१) स्वत:च्या भावनांची जाणीव
२) भावनांचे व्यवस्थापन
३) स्वत:ला प्रवृत्त करण्याची प्रेरणा
४) दुसऱ्यांच्या भावना समजणे
५) परस्पर संबंध सांभाळणे

**जॉन मेयर म्हणतात :–**

''स्वत:च्या भाव भावनांवर व इतरांच्या भाव–भावनांवर अधिकार दाखवण्याची क्षमता या भावनांमधील भेट ओळखून सर्व माहितीचा उपयोग विचार व कृती यांच्या मार्गदर्शनासाठी करणे म्हणजे भावनिक बुद्धीमत्ता होय.''

**संशोधनाचे महत्व :–**

Adolescence या लॅटीन शब्दापासून Adolescence झालेला आहे. यालाच कौमार्यावस्था असे म्हणतात. कौमार्यावस्था म्हणजे मानसिक, शारीरिक, भावनिक, सामाजिक, परिपक्वता येई पर्यंतची अवस्था होय. कौमार्यावस्थेतील (१६ ते १९) मुलांमुलींना युवक युवती किंवा तरुण–तरुणी असेही म्हणतात. कौमार्यावस्था ही अत्यंत महत्वाची अवस्था होय. विद्यार्थी या दशेत काहीसा गोंधळलेला असतो. कौटुंबीक किंवा वैयक्तीक स्तरावरील कोणतेही निर्णय किंवा समस्या तो हाताळू शकत नाही. या मागे कुटुंब किंवा इतर सामाजिक परिस्थिती कारणीभूत असू शकते. या अवस्थेत विद्यार्थ्यांच्या शारीरिक रचनेत बराच बदल दिसून येतो ते स्वत:ला मोठे समजून ते मनामल्या मनात गोंधळून जातात आणि कोणतेच निर्णय घेवू शकत नाही. या समस्या जाणून घेवून पालकांनी व शिक्षकांनी कौमार्य कालीन विद्यार्थ्याच्या बाबतीत योग्य निर्णय घेतले पाहिजेत व त्यांच्या समस्या जाणून घेवून मार्गदर्शन करणे जरुरी आहे.

कौमार्यावस्थेतील मुला–मुलींची स्व:त्वाची भावना अत्यंत तिव्र असते ही भावना जन्माजात नसते विविध बऱ्या वाईट अनुभवातून ती निर्माण हाते. प्रसिध्द मानसशास्त्रज्ञ स्टॅन्ले हॉल (१८४४–१९२४) यांनी म्हटले आहे की, कौमार्यावस्थेत जणू काही मुलांमुलींचा नवा जन्म होतो. नवीन प्रवृत्ती, नवीन वर्तन, प्रकार, नवीन दृष्टीकोण निर्माण होतात. हे व्यक्तीच्या आधीच्या शैशावात किंवा बालपणात नसतात. त्यांचे मुलभूत कारण प्रजनन क्षमता, कौमार्यावस्था सुरु होण्यापुर्वी व्यक्ती ही एक बालक असते पण कौमार्यावस्थेत पदार्पण केल्यानंतर व्यक्ती हा बालक निर्माण करु शकतो. कौमार्यावस्थेत मुलेमुली तारुण्याच्या उंबरठयावर असतात. हयावेळी त्यांचे पाऊल वाकडे पडू नये म्हणून त्यांच्यावर कौटूंबिक जाचक बंधणे असतात. कौमार्यावस्थेत पालकांचे मार्गदर्शन अत्यंत आवश्यक असते. हया सर्व समस्या शोधून त्यांना योग्य मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. म्हणून कौमार्यावस्थेतील विद्यार्थ्यांच्या स्व:संकल्पनेच्या आणि त्याच्या भावनिक बुद्धीमत्तेचा विचार करणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष :–**

१) कौमार्यावस्थेतील बहुसंख्य विद्यार्थी व विद्यार्थीनीचे स्व–संकल्पना प्राप्तांक चांगल्या स्वरुपाचे असल्याचे दिसून येते. तसेच मुलींचे स्व–संकल्पना प्राप्तांक मध्यमान मुलांच्या स्व–संकल्पना प्राप्तांक मध्यमानापेक्षा अधिक असल्याचे दिसून येते यावरुन असे म्हणता येते की, मुलांपेक्षा मुलींच्या स्व–संकल्पना चांगल्या आहे.

२) कौमार्यावस्थेतील मुलांचा भावनिक बुध्दिमत्ता स्तर हा उच्च स्वरुपाचा असतो.

३) कौमार्यावस्थेतील मुलींचा भावनिक बुध्दिमत्ता स्तर हा उच्च स्वरुपाचा असतो.

४) कौमार्यावस्थेतील मुलांमधील स्व–संकल्पना व भावनिक बुध्दिमत्ता यांच्यामध्ये लक्षणीय फरक नाही.

५) कौमार्यावस्थेतेतील मुलींमधील स्व–संकल्पना व भावनिक बुध्दिमत्ता यांच्यामध्ये लक्षणिय फरक नाही.

६) कौमार्यावस्थेतील विद्यार्थ्यांच्या स्व–संकल्पना व भावनिक बुध्दिमत्ता यांच्यामध्ये लक्षणिय फरक असतो.

**शिफारशी :–**

१) कौमार्यावयीन विद्यार्थांच्या शैक्षणिक आकांक्षा, भावनिक व बौध्दिक स्तर आणि त्यांची सृजनशिलता यांचा तुलनात्मक अभ्यास यावर देखिल संशोधन करता येईल.

२) कौमार्यावस्थेतील मुलांमुलींच्या स्व:संकल्पनेतील फरक तपासता येईल.

३) उच्चवर्गीय आणि मागासवर्गीय मुलांमुलींच्या स्व–संकल्पनेतील फरक तपासता येईल.

४) मंदबुद्धी आणि प्राज्ञावान मुलांच्या स्व–संकल्पनेतील फरक पाहता येईल.

५) शारिरीक व्यंग असणारी मुले आणि सर्वसाधारण मुले यांच्या स्व–संकल्पनेतील फरक पाहता येईल.

**सारांश :–**

संशोधन अहवालातील सर्व गोष्टी सारांश रुपाने नोंद करणे हे या सारांश भागाचे उद्दीष्टय आहे. यात एकंदरीत सर्व भागाचा आढावा देण्यात येत आहे. यात संशोधन पध्दतीची माहिती देण्यात आली आहे. त्यासाठी सर्व प्रथम प्रस्तावना

करुन त्यात सदर प्रकरणात कोणकोणत्या बाबी स्पष्ट करण्यात आल्या त्याविषयी माहिती देण्यात आली आहे. त्यानंतर कौमार्यावस्था त्यातील विकास, तसेच शिक्षक आणि पालकांचे योगदान, समुपदेशकाची भूमिका, मुलांमुलींमधील साम्य, विद्यार्थ्यांच्या स्व:संकल्पना त्यांचा विकास रचना तसेच स्व:संकल्पनेवर बुध्दिमत्ता, संकल्पना, भावनिक विकास, बुध्दिमत्तेत वाढ, अर्थ, संशोधनाची आवश्यकता, महत्व, उद्दिष्ठ, निष्कर्ष आणि शिफारशी या विषयी माहिती देण्यात आली आहे.

संदर्भग्रंथ

1. Maharashtra times.com.article show
2. Loksatta News Paper
3. Lokmat News Paper

# IT-Base Best Practices in College Libraries

**Leena N. Puppalwar**
Librarian
Lokmanya Mahavidyalaya, Warora

**Abstract:-**

In this era of globalization, there are many ways to change world. There is enough requirement to face the competition for librarian. The Academic libraries are required to be empowered through providing the qualitative knowledge to society through the "Best Practices".

Then what should be the role of librarians in the lockdown period. This research paper discusses how readers and literature can be reconciled. The study reveals that best practices playing an important role in college libraries.

The present paper highlights the IT based best practices in college libraries adopted by the libraries to attract library users.

In this paper, the author has introduced various practices to be implemented in academic librarieswith kind support, valuable suggestion from manage and ambitious skill of libraries.

**Introduction:-**

The library is the most effective medium for spread of knowledge education. Education is a process spreading knowledge. During which processof human life being gain knowledge from their surrounding by formal and informal ways needless to say that the library plays vital role.

Education implies cultivation of the intellect. With kind support enough knowledge and valuable, suggestion form management and ambitious kill of libraries.The formal education is achieved through educational institutions like schools, college, universities and other institutions, There will be a Continuous interaction between the teacher and Students. But education is a life-long process. Formal education ends after a certain stage in life. But through informal education, man keeps himself abreast with the new knowledge, new skills and new means and methods of development. Here library plays an important role to invent knowledge.

As a social agency the library stimulate reading habit. Attract the readers to the library and make them beneficiaries of the knowledge available in various documents. Since many years library has been playing an important role in disseminating information to literates as well as illiterates.

The covid-19 is pandemic. The world has been stunned by the virus. Lockdown continued in most countries. In India there was also from March to May.**Role of Librarians in Lockdown Period:**

1) Increase the awareness about covid-19
2) Disseminate Information to Researcher for their Research.
3) To provide information to teacher for teaching process.
4) To provide information to students for learning process.

**Definitions:-**

**College library:-**

Every educational institution requires library containing, various information sources as rightly said: "Library is the heart of the institution". Colleges are also not exception to this. Every college has a library. P. N. Gaur defines the term "College Library" as a Library Organized and administered by a college for the use of its students and member's of staff.

**Best Practice:-**

(1) "Best Practices as a quality of high standard, excellence, highly improved outstanding par excellence service. It means way of doing something that is usual or expected way in particular Organization or situation, guidelines for good practices. In this process of developing best practices we taken action rather than good ideas & we improve our skills".

Oxford Advanced Learners Dictionary

(2) "Best practice are guidelines which are used to obtain the most efficient & effective way of completing a task using repeatable & proven procedures".

Webopedia

(3) "Best practice may be innovative and be a philosophy, policy, strategy, program, process or practice that solve a problem or create new opportunities and positively impact on organizations. Institutional excellence is the aggregate of the best practices followed in different areas of institutional activities.

National Board of Accreditation and Assessment (NAAC)

From above definition, best practice means, a method or technique used to improve the current workflow of an organization to obtain its objectives effectively & with predetermined standards.

**Relevance of the study:-**

Today's modern libraries are considered as service centers, Library helps the users to get an information. So that they want developed library with tools and techniques.

Looking at the outbreak of corona virus, today need of the developing libraries.The traditional Indian education system now embraces e-learning. Many educational institutions are spreading knowledge by online. Each and every sector of education has made online learning this period. IT Base Best practices play an important role to attract the college students towards the college library.

**Reason of Selecting the Topic:-**

While moving fast in the digital age. The nature of Library Services has also changed so that college libraries need IT basedBest practices.

The researcher has selected the topic for research because the best practices play an important role in the college libraries to implement the five lawsof library science in college libraries and motivate the maximum utilization of library for getting the demand of users with identify the needs of the users.

**Objectives:-**

1) To find out role and importance of best practices in college Libraries.
2) To execute the five lows of Library Science.
3) To magnetize & meet the user demand.
4) To maximize the utilization of Library.

5) To identify the needs of the user's.
6) To market library services and products.
7) To find out the how IT base best practices create image of the college Library among the society.
8) To show the best practices of college Library can be done properly by electronic media.

**Scope & Limitations of Study :-**

The present study is related to IT based best practices in the college libraries. The present Research study covers arts, commerce and science college libraries. The college has selected on the basic of NAAC Accreditation.

The main focus of the study has on IT best practices of College libraries.

**Hypotheses :-**

1) Internet Access Facility is most popular best practice conducted in college libraries.
2) Science and commerce college libraries are rendering relatively more number of IT base best practices as compare to Art's college libraries.
3) There is no sufficient infrastructure facilities available in college Libraries for IT base best practices.
4) There is no separate financial provision for best practices in the college libraries.

**Research methodology :-**

The study follows the survey method used for data collection.

The following techniques has been using for data collection in survey type of research

1) Questionnaire
2) Interview
3) Observation
4) Secondary Data

Questionnaire method of data collection is quite popular, particularly in case of big enquiries. The questionnaire hadcirculate to all the college librarians of Arts, Commerce and Science faculty libraries.

Apart from the questionnaire methods the interview and observation method also follow to acquire necessary information about the IT based best practices in the college libraries.

**IT Based Best Practices :-**

1) Free browsing unit (Internet access facility)
2) Broad band Internet Center (Internet access facility)
3) Library homepage for information dissemination
4) Dynamic Library website
5) User feedback through Library homepage
6) Group concessional Night services offer for outside students and scholars in accessing e-resources.
7) Access to Digital repository through library website.
8) Digital access to all internal document's
9) Digital repositories.
10) Database creation using international standard formats.

11) Electronic surveillance system.

**Conclusion :-**

It is conclude that the IT based best Practices in the college libraries found very useful for better implementation of five laws in libraryto bring quality in the services. Users able to utilize library services effectively. It is conculed that there is not sufficient infrastructure facilities available in the college libraries for IT based best Practices There is no separate financial provision for all best practices in college libraries.

**Bibliography :-**

1) Kumar, P.S.G. Foundations of Library and information Science, Delhi : B. R. Publishing corporation, 2003.
2) Kothari, D. R. Research Methodology Methods & Techniques, New Delhi : Wishwa Prakashan, 2nd ed, 2001.
3) Tripathi, S. M. Lal, C. K. Kumar Descriptive Questions in Library And information Science, New Delhi : ESS Ess Publication, 2002.
4) Dr. Sathe Vivek Sampatrao : BEST PRACTICES IN THE COLLEGE LIBRARIES, knowledge Librarian, Jan – Feb 2015, eISSN No. 2394-2479.
5) www.naac.gov.in/dacs/best : Best Practices in Library and Information services (LIS) – NAAC
6) पाटील एस. के. आणि चिकटे आर. व्ही. : डिजिटल ग्रंथालये आधुनीक काळाची गरज, ज्ञान गंगोत्री, डिसे. जाने. फेब्रु. २००७, प्र.क्र. ५३–५३.
7)सुरेश वांदिले, डिजिटल अध्यायन, दै. लोकसत्ता दि. ०६–०५–२०२०.

# Expressionismin Mahesh Elkunchwar'sOld Stone Mansion

**Shrikant Niranjan Puri**

Head, English Department

Lokmanya MahavidyalayaWarora, Dist. Chandrapur

**Abstract**

The end of the twentieth century has seen drastic changes in the socio-economic condition of the villagers in India. This is the time when modernism was slowly entering into the lives of the villagers. Many people were crazy to accept the new lifestyle. However, there were some feudal families who were lingering between the modern and the old lifestyles. They wanted to follow the old traditions and rituals; at the same time, they saw their neighbours improving their lifestyle by following modern ways. They believed in the eighteenth century aristocratic values. They wished that the people should work for them without any expectation. Without doing any work and selling their property for the luxurious life made them poor. It was also the age of urbanization, materialism and capitalism. Under this circumstances and dilemma, the living becomes uneasy. This explores the psychological condition of the characters in the play written at this time.

त्या बाईच्या आपल्या कुटुंबा बद्‌दलत्या आपुलकीच्या भावना पदार्थात उतरतात आज नोकरी करणा—या स्त्रिया बाईलाच भाताचा कुकर तरी लावू शकतो.सुधा मुर्ती, आशा भोसले, सुकन्या कुलकर्णी, सविता मालेपकर, लालन सारंग अशा अनेक स्त्रियाज्या वेळेच्या बाबतीत बेभरवसा असणा—या क्षेत्रात काम करतात त्या तर आपल्या स्वयंपाक घरासाठी वेळ काढत असतील तर इतरांनी का शक्य होणार नाही? जी बाई स्वयंपाक घरावर आपल वर्चस्व सिध्द करते ती आपल्या कुटूंबावर अधिराज्य करते. कुणी कितीही अमान्य करीत पण मानसाच्या मनावर राज्य करायचा मार्ग जेवनातूनच जातो हेसत्य आहे खुप ठिकाणी अस दिसते की नोकरी न करणा—या घरी बसणा—या बायकाही स्टेटस सिंबोल हया स्वत:च्याच तयार केलेल्या व्याख्येत स्वयंपाक घरात स्वत:काम करणे म्हणजे खालच्या दर्जाचे काम समजायला लागलेत. आज लग्नानंतर मुली स्वयंपाकघरात प्रवेश करू पाहत नाही घरात येणा—या सुनेला स्वयंपाक करता येत नाही, कणिक मळता येत नाही तसेच आजकाल स्त्रिया हया बाहेरचे जेवन बोलावून घरी जेवतात उदा. जेवणाचे पॅकिंगडब्बे पिझ्झा,बर्गर इ. असे प्रकार घडतात घर आणि हॉटेल मध्ये फरक काय राहिला ?

आपल्या परंपरेत तर काही ठिकाणी दुस—या दिवशी नवीन नवीन सुनेकडून चुलीची पुजा करतात ती प्रथा उरलेली दिसत नाही, कारणीभूत कोण ? परावलंबी जगनं कधीच जीण नसाव हा मंत्र बायकांनी कमवती होण्याकरिता अंमलात आणला चांगली गोष्ट आहे पण स्वत: व हक्काच असलेल्या क्षेत्राची तिलांजली देवून ते मिळवणं कितपत फायद्यात पडेल याचाही विचार असावा.

**निष्कर्ष**

१.सद्यस्थितीत बायका हया स्वयंपाकघरात वावरत नसल्यामुळे आज त्या सर्वांच दृष्टीकोनातूनत्या खरोखरच परावलंबी होत असताना दिसत आहे.

२.मुलांना घरातील व्यक्तीला ज्या पोषकघटकांची गरज आहे ते पोषक घटक अन्नातून मिळतांना दिसत नाही कारण घरात जे अन्न बनते ते फक्त अन्न म्हणून व जीभेच्या स्वादासाठी बनत असते.

३.हॉटेलमधील अन्नात तसेच पॅकिंग केलेल्या अन्नात फुड प्रीझर्व्हटींगचाचय वापर होतो त्या वस्तूचा शरीरावर नकळतपणे परिणाम होतो. अजिनोमोटो सारखे कमी प्रमाणातफक्तअन्नाची लालसा वाढविणारे पदार्थ हानिकारक असते.

४.बाहेरून विकत आणणा—या अन्नाला पाहिजे ती चव नसते तसेच खर्च वाढतो व पोटभर जेवायला सुध्दा मिळत नाही तिथल्या अन्नात अवास्तविकपणे मसाल्याचा वापर शिळे अन्न एकत्र करून खाऊ घातले जाते डोळयाआड होणा—या गोष्टीला आपल्याला सामोरे जावे लागते.

५.बाहेरच्या अन्नातून विषबाधा, अपचन, गॅसेस होण्याची शक्यता असते

६.बाहेरच्या अन्नातून तृप्तता व मनशांती मिळत नाही त्यामुळे अन्नाचा तुटवडा जातो बेचव अन्न हे वाया जाते.

७.घरच्या अन्नाची सर बाहेरच्या अन्नातून प्राप्त करता येत नाही प्रेमवात्सल्य त्यामधून व्यक्तीला मिळत नाही

८.व्यक्ती बाहेरच्या अन्नाच्या सेवनातून अनेक रोंगाना आमंत्रण देतो पाहिजे त्या गरजा अन्नातून भागविल्या जात नाही म्हणून कधीही घरचे अन्न हे सुयोग्य असते.

९.भारतीय अन्न संस्कृतीतील परंपरा हया पुढच्या पिढीसाठी गोष्टीच्या स्वरूपात प्राप्त होऊन राहिल्या आहे.

१०.संस्कृतीचे जतन करणे हे बाहेरचे अन्न खाल्यामुळे जमणार नाही

**संदर्भग्रंथ**

१. आहारशास्त्र – पुनरूत्थान प्रकाशन सेवा ट्रस्ट
२. करूणा किचन वेबसाई
३. Mahaarastra times.com> article show

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) –7.675, Issue NO, 272(CCLXXII)
ISSN : 2278-9308
Fabruary, 2021

# मराठी संत पंचकातील एकांतवास आणि जागतिक महामारीतील विलगीकरण

डॉ. पल्लवी ताजने
मराठी विभाग, लोकमान्य महाविद्यालय, वरोरा

**प्रस्तावना :–**

भारतीय साहित्यातून मानवी जीवनाच्या सर्वच अंगाचे पडसाद उमटलेले दिसतात. तशीच साहित्यातील महत्त्वाची जीवनमूल्ये घेऊन पुढील अनेक पिढया आदर्शवत जीवन व्यतित करतांनाही आपल्याला दिसते हाच परस्पर संबंध साहित्य आणि मानवी जीवनामध्ये दिसतो या दृष्टीने मानव आणि साहित्याचा विचार केल्यास आजपर्यंत मानवी आयुष्यात जे–जे परिवर्तन किंवा स्थित्यंतर झाले त्या सर्व परिस्थितीचा तत्कालीन साहित्यावर आणि आधी निर्माण झालेल्या साहित्याचा मानवी जीवनशैलीवर यथायोग्य परिणाम होताना दिसतो. यातूनच परस्पर सहजसंबंध जपत भारतीय साहित्य आणि मानवी जीवन उत्तरोत्तर प्रगल्भतेकडे जाताना दिसते, परिपक्व होताना दिसते.

मराठी साहित्यातही आपणास अशीच साक्षांकित मूल्ये दिसतील जी मानवी जीवनासाठी आदर्शवत ठरली. साहित्यात अशी आदर्शवत साक्षांकित मूल्ये जेथे निपजली, फळली फुलली आणि अखिल मानव विश्वासाठी प्रसादरूपी दान ठरली ती म्हणजे मराठी संत साहित्यातून महाराष्ट्राला फार मोठी संत परंपरा लाभली आहे आणि या संतांनी सांगितलेले ज्ञान आणि त्याला अनुरूप असलेले ' बोले तैसा चाले' असे त्याचे आयुष्य अखिल समाजासाठी जगण्याचा मार्ग बनले. हा मार्ग अखिल समाजासाठी एक अध्यात्मिक पथ ठरला. इतकेच नव्हे तर मानवी जीवनातील प्रत्येक समस्येचा प्रत्येक प्रश्नाचा उत्तरमार्ग ठरला, किंबहुना जीवनमार्ग ठरला अशाप्रकारे आदर्शवत सांसारिक आणि अध्यात्मिक जीवनाचे सार, ,संत साहित्यात आपल्याला दिसते आणि ही संत वाड्.मयाची वैभवशाली परंपरा मानवी आयुष्यालाही वैभव प्राप्त करून देते.

मराठी भाषेतील संत साहित्याचा विचार केला तर ज्ञानेश्वरांनी ज्या भाषेला 'मराठीचिये नगरी' म्हटले तेथेसुध्दा जीवनतत्त्वज्ञान उमलले आणि फुललेले दिसते. मराठी संत साहित्यात अशा जीवनतत्त्वज्ञानाची बाग विकसीत झाली. या बागेला उत्तरोत्तर फुलविण्याचे कार्य मराठी संत परंपरेने आणि त्यानी निर्माण केलेल्या वाड्•मयाने केले म्हणून कुसुमाग्रज म्हणतात.

'रत्नजडित अभंग ओवी अमृताची सखी
चारी वर्णातुनी फिरे, सरस्वतीची पालखी'

मराठी साहित्याचा पायाच मुळात संत साहित्यावर उभा आहे आणि मराठी भाषा निर्मितीच्या सुरवातीच्याच काळात मराठीने ग्रंथरूपात पदार्पण केले ते संत साहित्याच्या माध्यमातूनच. म्हणूनच मराठीने संतसाहित्य आणि संतसाहित्याने मराठी भाषा फुलविली असे म्हणता येईल. मराठी संत साहित्यातून ज्ञानेश्वरांपासून तुकारामांपर्यंतच्या संतानी भागवत् धर्माचा प्रचार प्रसार केलाच पण मराठी संतामध्ये भागवत्धर्माचा पाया रचणाऱ्या ज्ञानेश्वरांनी प्राकृत भाषेचा, तत्त्वज्ञानाचा, भाषाविज्ञानाचा आणि मराठी काव्याचाही पाया रचला. मराठी संतांच्या मांदियाळीत भागवत्धर्माची पताका खांद्यावर घेणारे ज्ञानेश्वर – नामदेव –एकनाथ – तुकाराम हे चार संत आणि क्षात्रधर्माची पूजा करणारे संत रामदास हे पाच संत महत्त्वाचे आहेत. या पाचही संतानी आणि इतर सर्व मराठी साहित्यातून तत्त्वज्ञान मांडणाऱ्या संतानी अध्यात्मापासून तर सांसारिक जीवनातील सर्व बाजूचा सखोल अभ्यास आपल्या साहित्यातून मांडला आणि मराठी साहित्याचा उन्मेषपर्व म्हणता येईल असा सुवर्णकाळ निर्माण करून अखिल विश्वाला चिरंतन टिकणारे साहित्य उपलब्ध करून दिले.

मराठी संतांनी आपल्या साहित्यातून आणि एकंदर जगण्यातून ज्या – ज्या विषयाला हात घातला ते सर्व विषय मानवी आयुष्य समृध्द करणारे आहेत.जातीव्यवस्थेपासून पर्यावरण संवर्धनापर्यंत सर्व विषयावर संतांनी आपल्या साहित्यातून भाष्य केले. या व्यतिरिक्त मानवी जीवनाची सर्व मूल्यांचे आदर्शवत तत्त्वज्ञान सहज आणि सोप्या भाषेत सांगितले आणि हे जीवनमूल्य सांगत असताना आध्यात्मिक दृष्टीने विकासाचा नवा मार्ग आपोआप, सहज निर्माण केला. या सर्व विषयांत मानवी जीवनाची घट्ट बैठक /पाया तयार करणारा एकांतवास संत साहित्यातील मोती ठरावा असाच आहे. सर्व संतांपैकी

ज्ञानेश्वर – नामदेव– एकनाथ– तुकाराम – रामदास या कवीपंचकांनी आपल्या आयुष्यात एकांतवासात राहून ज्या वैचारिक प्रक्रिया, अनुभूती समृद्ध केल्या त्याचे पडसाद त्याच्या साहित्यावरही दिसून येतात. एकांत किंवा एकांतवास हा संतांसाठी चिंतनासाठी गरजेचा होता किंबहुना याच एकांतवासातील चिंतनामधून ते संतत्वापर्यंत पोहचले आहे असे निश्चितपणे म्हणता येईल. एकांतवासाची अनेक उदाहरणे, संदर्भ संताच्या आयुष्यातून आणि त्याच्या साहित्यातून आले आहेत हे संदर्भ अभ्यासण्याचा प्रयत्न या संशोधन लेखातून केला गेला आहे.

संतांची शिकवण ज्याप्रमाणे कालातीत आहे. त्याचप्रमाणे संतानी सांगितलेला एकांतवास हासुद्धा कालातीत आहे. मराठी मातीला संतांची वैभवशाली परंपरा लागली आहे. त्यांची शिकवण ही महाराष्ट्रातील लोकांच्या रक्तात भिनली आहे. आजपर्यंत ज्या पिढ्या झाल्या त्या सर्व पिढ्या मौखिक पदधतीने या सर्व संतांच्या ओव्या, अभंग, भारूड, गौळण आपल्या पुढच्या पिढीपर्यंत पोहचवत आल्या या, सर्व साहित्यातून महाराष्ट्रातील अनेक पिढ्या घडल्या उदाहरणदाखल घ्यायचे झाल्यास शिक्षणाचा कोणताही संबंध न आलेल्या आपल्या आजी पणजीच्या तोंडून हरिपाठ ऐकला म्हणजे जवळपास ७०० वर्षांपुर्वीचे वाङ्•मय मौखिक शिक्षणातून संस्काराच्या स्वरूपात पिढीदरपिढी झिरपत गेलेले आपणास लक्षात येईल परंतु आजची परिस्थिती, पिढी, त्याचे जिवनमान झपाट्याने बदलत आहे. या पिढीसमोरील समस्या आणि आव्हानेसुध्दा मोठी आहेत. तसेच गरजाही वेगळ्या आणि मोठ्या झाल्यात. या सर्व परिस्थितीला धरून ज्या पद्धतीने जिवनमान आपण जगत आहोत त्यात कुठेतरी आपल्या पाठीशी असणारे हे मौखिक वाङ्•मय आपल्या आचरणातून प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे बाहेर पडताना दिसते. ज्या प्रकारची व्यवस्था गुंतागुंत आजची पिढी अनुभवत आहे. त्यातुन संतानी सांगितलेल्या एकांतवासाची गरज निर्माण झाली आहे.

आजपर्यंत आलेल्या सर्वच महामारींचा विचार केला तर वैज्ञानिकदृष्टीने अधिक विकसित झालेल्या आजच्या काळात जीवनाविषयीच्या अपेक्षाही तेवढ्याच वाढल्या आहेत, म्हणून साधणे आणि सुविधांचा यथायोग्य उपयोग आपल्याला समृद्ध जीवनासाठी आवश्यक वाटतात. या दृष्टीने विचार केल्यास २०२० मध्ये आलेल्या जागतिक महामारीच्या काळातसुध्दा अशाच मोठ्या संकटाला सामोरे जात असताना जीवन– मरणाचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे कुठे सक्तीचा एकांतवास आणि पुढे स्वयं:निर्मित एकांतवास उपभोगतांना संपूर्ण जग आपल्याला दिसते. अशा वैश्विक संकटात हा एकांतवास किती लाभदायक असू शकतो याची कल्पना येते संतानी अनुभवलेल्या आणि सांगितलेल्या एकांतवासाची आणि आताच्या एकांतवासाची कारणे आणि संदर्भ वेगळे असले तरी या एकांतवासाच्या काळात संताची ही एकांतवासाची शिकवण अतिशय उपयोगाची ठरते.

**एकांतवासः–**

एकांतवास ज्याला इंग्रजी भाषेत 'Solitude'किंवा'Isolation' असे म्हणतात. ज्याला इंग्रजीत 'the state of being alone/isolated'म्हणता येईल परंतु इंग्रजी साहित्यातील विलियम शेक्सपियर ने वर्णन केलेला एकटेपणा म्हणजे 'Alone' हा भारतीय संत साहित्यातील 'एकांतवास' म्हणजेच 'Isolation','quarantine'यापेक्षा वेगळा आहे. एकटेपणा वाट्याला आला असतो आणि एकांतवास स्वेच्छेने स्विकारला असतो.

**संत साहित्यातील एकांतवास :–**

महाराष्ट्रातील संतामध्ये संत ज्ञानेश्वरांपासून तर संत रामदासांपर्यंतच्या सर्व संतांनी त्यांचे वैयक्तिक आयुष्य आणि त्याच्या हातून निर्माण झालेले साहित्य यातून मानवी आयुष्यासाठी,अखिल मानवतेसाठी आदर्शवत जीवनाचा पाया घालून दिला. जनसामान्यात प्रामुख्याने ज्या संतांची शिकवण महत्त्वाची मानली जाते, त्यात प्रामुख्याने ज्ञानेश्वर–नामदेव–एकनाथ–तुकाराम आणि संत रामदास या पाच संतापैकी संत ज्ञानेश्वर, नामदेव,आणि तुकाराम हे भागवत संप्रदायातील संत. जे वारकरी होते. संत एकनाथ महाराज दत्त संप्रदायी असून पुढे वारकरी संप्रदायाचा प्रचार करण्याचे, संप्रदायाला बळकटी देण्याचे काम करतांना सामाजिक स्तरावरील विषमता दूर करून समाजात समन्वय निर्माण करणारे संत होते, तर संत रामदास हे क्षात्रधर्माचे उपासक आणि प्रचारक होते, या पाचही संतानी सांगितलेले तत्त्वज्ञान आणि केलेले मार्गदर्शन अखिल विश्वासाठी दीपस्तंभासारखे ठरत आले. हेच त्याच्या अस्सलपणाचे लक्षण होय.

**संत ज्ञानेश्वर :–**

भागवत धर्माचा पाया रचणारे संत ज्ञानेश्वरांनी आपल्या आयुष्य आणि सााहित्यातून जे मांडले त्या आधारावर आपण अनेक विचारांची मांडणी करीत आहोत किंबहुना आजतागायत मानवी जीवनात मांडल्या गेलेल्या प्रत्येक विचारांची पायेमुळे ज्ञानेश्वरांच्या साहित्यात दिसून येतात. मानवी आयुष्यातील प्रत्येक प्रश्नाचे उत्तर ज्ञानेश्वरीत मिळेल इतके मुलभूत प्रश्नापासून वैश्विकतेच्या प्रश्नांपर्यंत सर्वाचे उत्तर आपणास ज्ञानेश्वर देतात. आज जे आधुनिक सिद्धांत आपण मांडत् आहोत त्या सर्व सिद्धांतांची पाळेमुळे आपणास ज्ञानेश्वरीत दिसतील.

संत ज्ञानेश्वरांचे अवघ्या २१ वर्षाचे आयुष्य आणि त्याच्या साहित्यकृती यातूनच त्याच्या आयुष्यातील लोकांतातील एकांत दिसतो ज्ञानेश्वरच्या नावावर लहान मोठे मिळून साठ ग्रंथ सांगितलेजातात त्यांच्यातील काही आज उपलब्ध नाहीत आणि काही विवाद्य आहेत. परंतु ज्ञानेश्वरांच्या नावावरील जे ग्रंथ निर्विवादपणे मान्य केले जातात. ते म्हणजे १. ज्ञानेश्वरी २. अमृतानुभव ३. चांगदेव पासष्टी ४. अभंग ५. हरिपाठ [२]

या पाचही ग्रंथाचा आणि संत ज्ञानेश्वरांच्या जीवनाचा विचार केला तरी इतकी मोठी ग्रंथसंपदा निर्माण होण्यासाठी चिंतनाची आवश्यकता असते आणि हे चिंतन अभ्यासातून एकांतवासातून येते ज्ञानेश्वरांनी लोकांतात राहूनही एकांतवास अनुभवला असे त्याच्या एकंदर आयुष्यावरून दिसते.

ज्ञानेश्वरांनी भगवद्गीतेवर 'ज्ञानेश्वरी ' नावाची टीका लिहिली. जी अखिल मानवजातीसाठी तत्वज्ञानाचा मार्गदर्शक स्त्रोत करू शकेल. किंबहुना यापेक्षाही वरचा विचार म्हणजे '' ज्ञानेश्वरी सारखे ग्रंथ आपल्या दैनदिन समस्या किंवा राष्टाच्या योजना कशा पार पाडाव्यात याचा कार्यक्रम पुरविणारे ग्रंथ असतात. हे कार्यक्रम किंवा आखलेल्या योजना पुऱ्या करण्यामागे कोणते विशाल,उदार,सकलहितैषी मन, बुद्धी आणि अंत:करण असायला हवे ते सतत दाखवून देणारे ग्रंथ असतात''[३] हे सध्या परिस्थितीला तंतोतंत लागू होणारे आहे.

ज्ञानेश्वरी हा ग्रंथ भगवद्गीतेवरील टीका असली तरी ज्ञानेश्वरांनी ती आपल्यासामर्थ्याने फुलविली आहे. भगवद्गीतेच्या सहाव्या अध्यायात

'' योगी युज्जीत सततमान्मानं रहसि स्थित:।
एकाकी यतचित्तात्मा निराशीरपरिग्रह : ।। '' [४]

म्हणजेच मन आणि इंद्रियांसहित शरीराला वर करणारा, आशारहित आणि संग्रहरहित असणारा योगी एकांतात स्थित होऊन आत्म्याला परमात्म्यापर्यंत घेऊन जातो याच श्लोकापासून सोळाव्या श्लोकापर्यंत एकांताचे आणि संयमित वृत्तीचेच वर्णन आले आहे. यावर ज्ञानेश्वरीत ज्ञानेश्वरांनी,

''ऐसिया दृष्टी जो विवेकी । पार्था तो एकाकी ।
सहजें अपरिग्रही जे तिहीं लोकीं । तोचि म्हणऊनि । । [५]

या संदर्भातील ओव्यांमध्ये संत ज्ञानेश्वरांनी एकांतवासात करावयाच्या ध्यानाचा उल्लेख ओव्यांच्या स्वरूपात मांडला आहे. उदा.

'' म्हणोनि तैसे न करावे । समभावें धरावें ।
हे बहू असो होआवे । आसन ऐसें । ।
मग ऐथ आपण । एकाग्र अंत:करण ।
करूनि सद्गुरूस्मरण । अनुभविजे । ।
तैसे स्मरतेनि आदरें । सबाहृय सात्विकें भरे ।
जंव कठीणपण विरे । अहंभावाचे । ।

याशिवाय भगवद्गीतेच्या अठराव्या अध्यायात ५२ व्या श्लोकात

''विविस्तसेवी लघु आशी यतवाक्कायमानस : ।
ध्यानयोगवर : नित्यम् वैराग्यम् समुपश्रित : । । [६]

एकांतवासाचे महत्त्व सांगितले आहे हेच महत्त्व ज्ञानेश्वरांनी ओवीत ते शब्दबध्द केले आहे. ज्ञानेश्वर म्हणतात की,

''गजबजा सांडिलिया । वसवी वनस्थळिया ।
अवयवांच्या इंद्रियसमुदाया — । सह एकटाचि । । '' [७]

असे करून पुढे वैराग्यापर्यंतचा आणि मोक्षापर्यंतचा प्रवास
'' असे संसार– रणाचे आंत । अंधारात सूर्य जातो तसा असे जात ।
मोक्षविजयश्रीचा वर । होण्यासाठी । ।[८]

इथपर्यंतचा प्रवास ज्ञानेश्वर सांगतात हे एकांतवासाचे महत्त्व सांगणारे ठरते. याशिवाय ज्ञानेश्वरीच्या १३ व्या अध्यायात संत ज्ञानेश्वरांनी एकांताचा उल्लेख करून त्याचे महत्त्वच विषद केले आहे. तेथे ते असे म्हणतात.

''आणि एकांते चोखटें । तपोवने तीर्थे तटे ।
देखोनि जो गा विटे । तोहि तो चि । ।'' [९]

ज्ञानप्राप्तीसाठी भक्ताच्या ठिकाणी ज्या ज्या गोष्टी असायला हव्या त्या बद्दलचे ओवींच्या माध्यमातून विवेचन ज्ञानेश्वर करतात. एकांत तपोवन आणि तीर्थाटनाचे महत्त्व ज्याला कळले नाही तो अज्ञानाचे मूर्त रूप असतो. असे ज्ञानेश्वर सांगतात याही पुढे ते म्हणतात.

''ऐसिं जयाचिं नवासिये । एकांता जात जाए । नावेंचि जो जियो । रानाचेनि । ।''[१०]

लीनता, दंभशून्यत्व, अहिंसा, ऋजुता, क्षमा, उपासना ,स्थैर्य आणि इंद्रिय निग्रहाचे महत्त्व सांगतांना सर्व गोष्टींचा त्याग करून नित्य नियमाने एकांत अनुभवतो. त्यात रमतो. या मनुष्याला निसर्गाशी खरा संवाद साधता येतो आणि अशी लक्षणे असलेली व्यक्ती आपल्याला दिसत असेल तर '' जाण त्याला ज्ञानासी । शेज जाहली । । म्हणजे तो ज्ञानापर्यंत पोहचला. त्याच्याशी जवळीक साधू शकला असे समजावे.

**संत नामदेव :–**

भागवत धर्माच्या विस्ताराचे काम करणाऱ्या संत नामदेव संसार आणि भक्तीच्या माध्यमातून परमार्थप्राप्तीचा प्रवास केला बालपणापासूनच उपास्य देवतांचा अनुग्रह संपादन करणारे नामदेव विठ्ठलाचे भक्तोत्तम होते. पंढरीची वारी करणाऱ्या विठ्ठलभक्ताच्या कुळात नामदेवांचा जन्म झाला असल्याने जन्मापासूनच भक्तीचा संस्कार त्याच्यावर झाला होता. नामदेवाची बालपणीची भाबडी भक्ती त्यांच्या अभंगातूनही सहज दिसते.

'' विषयी आसक्त झाले माझे मन ।
ऐसा मी अपराधी दुराचारी देवा ।
भेटसी केशवा कवणेपरी । । ''[१२]

येथे संत नामदेवांनी ध्यानाचे महत्त्व विषद केले आहे . ध्यानाशिवाय परमेश्वर प्राप्ती नाही आणि विषयामध्ये आसक्त असलेला मी किती अपराधी आणि दुराचारी आहे याचा प्रत्यय नामदेवांना बालवयातच आला होता. याच ध्यानासाठी एकांतवासाची निवांत गरज असते.

संत नामदेव ज्ञानेश्वरांविषयी व्यक्त होताना
''धन्य इंद्रायणी पिंपळाचा पार । धन्य ज्ञानदेव पुण्यभूमी । ।
धन्य भागीरथी मनकर्णिका बोधा । आणिक गंगा त्रिवेणी त्या । ।
धन्य ऋषीश्वर धन्य पांडुरंग । मिळाले सांग अलंकापुरी । ।
नामा म्हणे धन्य भाग्याचे ते संत । झाला पाहा एकांता ज्ञानोबाचा । ।'' [१३]

ज्ञानेश्वरांचा एकांत म्हणजे ज्ञानेश्वरांची संगती लागलेले सर्व संत धन्य झाले, त्याचे भाग्य उजळले मग या संत संगतीमध्ये नामदेवसुध्दा येत होते. नामदेवांना संत ज्ञानेश्वरांचा एकांत लाभला होता या दोन्ही संतांनी तिर्थयात्रा एकत्र केली. एकांतात व्यक्तीचा अध्यात्मिक विकास होतो तसाच विकास '' ज्ञानेश्वरांनी ज्याचा पाया रचून देऊळ उभारले त्या भागवत धर्माचा विस्तार करण्याचे महत्कार्य नामदेवाकडून घडावयाचे होते त्यासाठी त्यांचा उच्चतम आध्यात्मिक विकास होणे. अवश्य होते म्हणून त्यांच्या निरूपम भक्तीला परमश्रेष्ठ ज्ञानाची जोड देणे ही ज्ञानेश्वरांना योजिलेल्या या तीर्थयात्रेचा एक हेतू असावा''

संत नामदेव यांनी उत्तरेकडे भ्रमण केले गुरूग्रंथसाहेब या शिखांच्या धर्मग्रंथात नामदेवांच्या हिंदी पदांचा समावेश आहे. शं.पु. जोशी यांनीसुध्दा पंजाबातील नामदेव या ग्रंथात नामदेवाच्या पंजाबातील कार्याला बारकाव्यानिशी मांडले आहे. हा सर्व भ्रमंती काळ नामदेवांच्या एकांतवासाचा काळ होता असे म्हणता येईल.

**संत एकनाथ :–**

संत पंचकातील समन्वयवादी संत म्हणजे संत एकनाथ होय. ज्ञानेश्वरांचे भागवत धर्माचे खंडित झालेले कार्य एकनाथांनी व्यापक स्वरूपात पुढे नेले. पैठणसारख्या सनातनी विचाराच्या ठिकाणी भागवत धर्माची पताका एकनाथांनी फडकावली. बालपणापासूनच अध्यात्माकडे कल असणाऱ्या एकनाथांनी विविध ग्रंथाचे अध्ययन केले होते आणि यातूनच त्यांची अध्यात्मिक ज्ञानाची इच्छा वाढून ते देवगडला जाऊन जनार्दनस्वामीचे शिष्य बनले. सहा वर्ष जनार्दन स्वामीकडून शिक्षा प्राप्त केल्यानंतर त्यांनी शूलभंज पर्वतावर एकांतवासात तश्चर्या केली[१६] आणि यातीलच चिंतनातून पुढे एकनाथांकडून भागवत धर्मासाठी भरीव कार्य केले, आपल्या ग्रंथनिर्मितीतून मराठी वाङ्मयाला व्यापक स्वरूप दिले. वेदान्त आणि व्यवहार तसेच तत्त्वज्ञान आणि आचारधर्म यांचा मेळ घातला.

एकांतवासाचे महत्त्व संत एकनाथांच्या आयुष्यात जसे दिसते तसेच एकनाथनिर्मित साहित्यातही एकांतवासाचे महत्त्व दिसते.

'न लगे अष्टांग धुम्रपान। वायु आहार पंचाग्निसाधन।
नग्न मौन एकांत स्थान। आटाआटी न करणे ॥'[१७]

एकांतवासासमोर कोणतीही गोष्ट अप्रिय असल्याचे ते म्हणतात.

परमेश्वराचा लाभलेला एकांतही त्यांच्या साहित्यातून येतो 'एकांत घातली मिठी। न सुटे गांठी पाहिली दृष्टी।'[१८] असा ही श्रीकृष्णाशी मिळालेला एकांत ते वर्णितात.

संत एकनाथांचे आयुष्य आणि त्याच्या साहित्यातून एकांतवासाची बरीच उदाहरणे मिळतात जे संत एकनाथांच्या चितंनासाठी महत्त्वपूर्ण ठरते.

**संत तुकाराम :–**

संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगातून एकांतवास सांगितला तो त्याच्या 'बोले तैसा चाले' प्रमाणे दिसतो. संत तुकाराम महाराजांनी संसार आणि परमार्थ यात समन्वय साधून आध्यात्माकडे वाटचाल केली. 'संसाराच्या तापे तापलो मी देवा'[१९] असे म्हणून देहूजवळील भंडारा डोंगरावर तसेच भालचंद्र आणि घोरवडेश्वर डोंगरावर साधनेसाठी एकांतवासात जात आणि म्हणूनच याच साधनेतून तुकोबांची अभंगवाणी जन्माला आली जिने तुकोबांना जगत्गुरू केले.

संतांचे कार्य यथायोग्य जाणणाऱ्या तुकारामाच्या तोडून संतांचा धर्म 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती। देह कष्टविती परोपरकारे।।'[२०] असे म्हणून संतांनी जगासाठी घेतलेले कष्ट हे एकांतवासात केलेल्या चिंतनाचे फलित असल्याचे दिसते. म्हणूनच संताचा हा जीवनसिद्धांत अभंगाात उतरण्यास एकांतवास कारणीभूत ठरतो. संतामध्ये जो कालातीत दृष्टीकोन असतो. तो आपत्कालीन परिस्थितीत आपल्या सामान्य जनांना तात्पुरत्या स्वरूपात कळतो.

एकांतवासासमोर इतर गोष्टी नगण्य आणि शुल्लक कशा ठरतात, ते सांगतांना संत तुकाराम म्हणतात,

'विष तथा जाले धन मान जन। वसविती वन एकांती त्या।।
नावडती जीवा आणिक प्रकार । आवडी ते फार एकांताची ॥'[२१]

एकांतवासापुढे सर्व काही नगण्य वाटणाऱ्या संत तुकारामांना हा एकांतवास कशासाठी महत्वाचा वाटतो, तर

'येणे सुखे रूचे। एकांताचा वास ॥
नाही गुणदोष ।अगा येत ॥'[२२]

एकांतवास सुखकरक का वाटतो? कारण या एकांतवासात मनुष्य चिंतन करतो आणि चिंतनातून मानवी वागणुकीत कोणतेही गुणदोष येत नाही. त्यामुळेच तुकारामांच्या मते, हा एकांतवास 'ब्रल' जाणण्याचा मार्ग आहे. संत तुकाराम महाराजांना याच एकांतवासात निसर्गाच्या जवळ जाता आले. वृक्षवल्ली आणि वनचरे हे सोयरे झालेत तर, याच एकांतवासाने तुकारामांना चिंतन आणि भक्तीच्या जवळ नेले म्हणून,.

''काळ सारावा चिंतने । एकांतवासी गंगास्नाने ।
देवाचे पूजने । प्रदक्षिणा तुळशीच्या ॥''[२३]

तर कुठे हा एकांतवास

''तुका म्हणे होय मनाशी संवाद। आपुलाचि वाद आपणास।।''[२४]

असे स्वत:ला पडलेल्या अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी, आपलाच आपल्या मनाशी संवाद होण्यासाठी एकांतवास महत्त्वाचा ठरतो.

संत तुकाराम जेव्हा मनाला योग्य वळण लावण्यासंबंधी बोलतात तेव्हा,

''गती अधोगती मनाची हे युक्ती । मन लावी एकांती साधुसंगे ।
जतन करा जतन करा ।धावते सैरा ओढाळ ते ।।
मान अपमान मनाचे लक्षण ।। लावलिया ध्यान तेची करी ।।
तुका म्हणे मन उतरी भवसिंधू । मन करी बंधु चौऱ्यांशीचा ।।''[२५]

असा चौऱ्यांशी लक्ष योनींचा जन्म मरणाचा प्रवास टाळण्यासाठी संत–साधूंसोबत एकांत म्हणजे सहवास किती महत्त्वाचा ठरतो, हेही ते सांगतात.

**संत रामदास :–**

परमार्थ, स्वधर्मनिष्ठा, राष्ट्रप्रेम यांची शिकवण सामान्यजनांना देणारे सामर्थ्याचे उपासक आणि उपासनेचे सामर्थ्य अंगी बाणवून लोकांना त्या मार्गावर चालण्यास शिकविणारे समर्थ रामदास होय. समर्थ रामदासांचे आयुष्य आणि त्यानी निर्माण केलेले साहित्य यातून प्रापंचिक ज्ञान आणि पारमार्थिक मार्गाची दिशा अखिल महाराष्ट्राला मिळाली. अखिल विश्वाची चिंता बालवयापासूनच करणाऱ्या संत रामदासांनी मानवी आयुष्याच्या समृद्धतेसाठी ज्या गोष्टी महत्त्वाच्या ठरतात, त्यात एकांतवासाचे महत्व सांगून अखिल विश्वाला जगण्याचा मार्ग सांगितला आहे. समर्थ रामदासांनी आपल्या आयुष्यात एकांतवास घालवला तो म्हणजे चाफळच्या खोऱ्यात असतांना त्यांचे वास्तव्य बहुतांश काळ जंगलात, झाडाझुडपात, असे. डेरवणच्या डोंगरघळीत, वाघापूरच्या सङ्यावर, भैरवगडच्या घळीत, चंद्रपुरच्या डोंगरावर, कळंब्याच्या घळीत ते एकांतवासात चिंतन करीत.[२६]

दासबोध हा समर्थ रामदासांचा विविध विषयावरील तत्त्वचिंतनाचा गाभा असलेला ग्रंथ अरण्यातील शिवथरघळ या निसर्गसानिध्यात असलेल्या एकांतस्थळी असलेल्या मठात लिहिल्या गेला. याशिवाय सज्जनगडावरील समर्थांचा एकांतवासही महत्त्वाचा ठरतो. छत्रपतीच्या विनंतीनुसार परळीच्या किल्ल्यावर समर्थांनी वास्तव्य केले तोच हा सज्जनगड. समर्थ रामदास जवळपास दोन वर्ष सज्जनगडावर होते हा त्याचा एकांतवासाचा काळ होता.

''अखंड एकांत सेवावा । अभ्यासची करीत जावा ।
काळ सार्थकची करावा । जनासहित ।।
दास डोंगरी राहतो । यात्रा देवाची पाहतो ।
देव भक्तासवे जातो । ध्यान रूपे ।।''[२७]

हे वर्णन सज्जनगडावरील एकांतवासाच्या काळातले असावे.

मनाच्या श्लोकांमध्ये समर्थ म्हणतात.

'' सदा सेवि आरण्य तारूण्यकाळी ।
मिळेना कदा कल्पनेचेनि मेळी ।
चळेना मनी निश्चयो दृढ ज्याचा ।
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।''[२८]

अरण्यात आपल्या आयुष्याचा तारूण्यकाळ व्यथित करावा जेणेकरून आपले मन कुठल्याही काल्पिक विचाराने येता न चळावता आपल्या निश्च्याची दृढ राहील. अरण्यात एकांतवास अनुभवणे येथे अपेक्षितच आहे. श्री रामाचे नामस्मरण केल्याने एकाग्रता वाढून संकल्पाची पूर्तता होते आणि विकल्पाकडे मन चुकत नाही म्हणून ''रमाकांत एकांतकाळी भजावा'' असे समर्थ म्हणतात. समर्थ रामदास दासबोधात एकांताचे महत्त्व विषद करतात.

''येकांती विवेक थाई पडे । येकांती येत्न सापडे । येकांनी तर्क वावडे । ब्रम्हांडगोडी ।।''[२९]

एकांतवासात विवेक तर्काने मनुष्य विचार करतो आणि असे करणे म्हणजे ब्रम्हांडाची गोडी लागण्यासारखे आहे. समर्थांनी एकांतात साधकांकडून करावयाची कामे सांगितली. कुणी ध्यान, कुणी जप तर कोणी पाठांतर अशा नानाप्रकारे आपली साधना करतात.

समर्थांनी एकांतात साधकांना भूतकाळाचे स्मरण केल्याने.

''येकांनी स्मरण करावे । चुकले निधान पडे ठावें । अंतरात्म्यासारिसे फिरावे । काही तरी ॥''[३०]

जे निधान चुकले. जो निर्णय चुकला असेल त्याचे ज्ञान होते. तसेच असा एकांतवास अनुभवणारा साधक 'जयास येकांत मानला । अवघ्या आधी कळे त्याला । त्यावेगळे वडिलपणाला । ठवचि नाही ॥'[३१]

सर्वात पहिले ज्ञानप्राप्ती होते आणि ज्ञानप्राप्तीच्या क्षेत्रात वडिलपणाचा. मोठेपणाचा मान त्याला मिळतो. एकांतवासात मौन धारण केल्यास 'सोहं सोहं' चा भास होतो . म्हणजे आत्म्याचा परमात्म्याशी समन्वय साधला जातो आत्मज्ञानी अव्दैत पाहण्यासाठी एकांतवासी निवांतपणे. एकचित्त होतात ज्यातून समाधानप्रापती होत असते. म्हणून ''कल्पनेचा प्रांत तो माझा एकांत । तेथे मी निवांत बैसेईन ॥''[३२] असे समर्थ रामदास एकांत अनुभवतात. संत पंचकातील या पाचही संतांना आपल्या आयुष्यातून आणि साहित्यांतून एकांतवासाचे महत्त्व, एकांतवासाचे फायदे, साधकाकडून एकांतवासात करावयाची कार्य सांगितले आहे.

संताकडून सांगितलेला हा एकांतवासाचा मार्ग सद्यपरिस्थितीत अतिशय महत्वाचा वाटतो आहे. आज कोविड १९ सारख्या जागतिक माहामारीच्या काळात किंवा आजपर्यंत आलेल्या सर्व वैश्विक महामारीच्या काळात मग ब्लैक डेथ, प्लेग किंवा आताच्या कोविड १९ च्या काळात वातावरणातील दूषित संसर्ग/दोष होण्याची भिती जास्त असते अशा परिस्थितीत रोंगांचा प्रसार टाळण्यासाठी मानवी संपर्क किंवा व्यावहारिक जगाशी संपर्क टाळणे गरजेचे ठरते हा संसर्गजन्य रोग जगातील विविध भागांमध्ये व्यक्ती -व्यक्ती स्तरावर सहजरित्या पसरू लागल्याने त्याला ' सार्वजनिक आरोग्य आणिबाणी'[३३] घोषित करण्यात आली.

जागतिक महामारीत भारताचा विचार केल्यास इतर देशातील जनतेच्या तुलनेत भारतीय जनतेने रोगाच्या उपाय योजनेवर मोठ्या प्रमाणात भारत सरकारचे सहाय्य केले. आजच्या जागतिक महामारीच्या संकटात जो मार्ग जागतिक आरोग्य संघटना किंवा वैद्यकीय क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था सांगत आहेत तोच मार्ग भारतीय संस्कृतीत प्राचीन काळापासून सांगण्यात आला. मराठी साहित्यातील संतांनीही हाच मार्ग ७०० वर्षांपूर्वी पासून सांगितला आहे.

'' विष तया जाले धन मान जन ।
वसविती वन एकांती त्या ॥''[३४]

या संतांच्या म्हणण्याप्रमाणे जेव्हा - जेव्हा धन, मान आणि जनामध्ये विष येते म्हणजेच दूषितता येते तेव्हा - तेव्हा एकांतवास अनुभवावा, हा एकांतवास आणि लोकांत कसा असतो तर,

''रान अथवा घर एकांत लोकांत ।
समाधान चित्त ते ते घडी ॥''[३५]

त्या - त्या वेळी समाधान प्राप्त करून देणारा ठरतो. सद्यास्थितीला हे तंतोतंत लागू होणारे आहे. कोविड १९ च्या परिस्थितीने जीवनात असे प्रसंग आले की आपल्याला एकांतवासात राहावे लागले. आजच्या काळातील वैद्यकीय संकल्पना वेगळ्या असल्या तरी त्याचा उगम कोढेतरी आपणास संतानी सांगितलेल्या संकल्पनेतच दिसतो आणि हे सत्य नाकारण्यासारखे नाही. म्हणूनच ज्ञानेश्वरासारखे संत ७ शतकापुर्वी सांगून गेले,

''युध्दकारने पृथ्वीवरती । विष वायू पसरेल ।
असंख्य जीव या विषवायूने । प्राणांसी मुख्कतील ॥''[३६]

ही जाण संताना होती. वैद्यकीय क्षेत्राने रोगाला प्रतिबंध घालण्यासाठी विलगीकरण (separation) एकांतवास (seolusion)ज्याला आगणीकरण (isolatoon) quarantine असे शब्द वापरले गेले. शारीरिक व्याधी असो वा मानसिक व्याधी दोन्हीसाठी एकांतवास हा सर्वोत्तम उपाय आहे.

'' आताबरे घरिच्या घरीं । आपली उरी आपणापे ।
वाइटबरे न पडे दृष्टी । मग कष्टी होइजेना ।।''[३७]

असे म्हणत एकांतवासात राहणे , घरच्या घरी राहणे सर्वांच्या हिताचे आहे, असे केले तरच 'तुका म्हणे घडे एकांताचा वास । तरिच या नास संबंधाचा ।।'' घडू शकेल.

भारतीयांना कोठेतरी अशी वैभवशाली पार्श्वभूमी लाभली असल्यामुळे लॉकडाउन, त्यात संशयितांना केलेले विलगीकरण किंवा एकांतवास या सर्व गोष्टी भारतातील लोकांनी बऱ्या प्रमाणात पाळल्या परंतु पाश्चात्य संस्कृतीतील लोकांना त्या पेक्षा व्यक्तिस्वातंत्र्य जास्त महत्वाचे वाटले. याची कित्येक उदाहरणे आपण पाश्चात्य देशात बघितली. बऱ्याच जणांना या एकांतवासाचा उपयोग मानसिक स्वास्थ्यासाठी, सर्जनशिलतेसाठी, चिंतनासाठी, नवनव्या गोष्टींचा शोध घेण्यासाठी केला हेच या एकांतवासाचे फलीत होते.

कोरोनासारख्या महामारीने माणसाला पुन्हा एकदा आत्मपरीक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. सोहंपर्यतचा प्रवास करण्यासाठी तयार केले. ही परिस्थिती आपल्यावर अनावधानाने आली असली तरी त्या परिस्थितीला सामोरे जाण्याचे मार्ग मात्र नैसर्गिक जगण्याचे मार्ग आहे हेही आपल्या लक्षात आले. खूप मोठया गोंगाटात असतांना मनुष्य ते सहन करतो परंतु त्यानंतर त्याला शांतता हवी असते, आणि हाच नेमका शांततेचा काळ आहे या काळात किंवा मानवी जीवनांच्या कोणत्याही काळात आणि परिस्थितीत संतानी सांगितलेला मार्ग सार्वकालीक ठरतो, कालातीत ठरतो हे मात्र नक्की !

**संदर्भ:—**

१. dictionary.com /isolation
२. भिंगारकर, डॉ. कृ. ज्ञा. नाथसंप्रदाय आणि ज्ञानेश्वर, पदमगंधा प्रकाशन, प्रथमावृत्ती २००७, पृ ७०, क्रमांक ३७
३. संपादक , डॉ स्नेहल तावरे, ज्ञानेश्वरी व विसावे शतक,' ज्ञानेश्वरीची भूमिका व विसावे शतक ',डॉ व. दि. कुलकर्णी ,स्नेहवर्धन प्रकाशन ,पृ. १३
४. श्री श्रीमद् ए.सी.भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद , भगवत्गीता, जशी आहे तशी, भक्तिवेदांत बुक टस्ट , हरे कृष्ण धाम, जुहू, मुंबई ४०००४९ ISBN 978-93-89176-39-8 , अध्याय ६— श्लोक १० वा पृ २२९
५. टनुवादक त्र्यंबक चव्हाण, सं.डॉ. विजय भटकर, मूळ सांप्रदायिक ज्ञानेश्वरीसहित आजची ज्ञानेश्वरी, मल्टिव्हार्सिटी प्रकाशन, अध्याय ६ वा ओवी क्र —१०६ पृ —१३९
६. श्री श्रीमद. ए.सी.भक्ती वेदांत स्वामी प्रभुपाद, भगवद्गीता, अध्याय—१८, श्लोक —५२ पृ ५८९
७. अनुवादक चव्हाण त्र्यं.सं;डॉ विजय भटकर, मूळ सांप्रदायिक ज्ञानेश्वरीसहित आजची ज्ञानेश्वरी अध्याय १८, ओवी १०२१ पृ.६७२
८. कित्ता, ओवी १०४९ पृ.६७४
९. कित्ता, अध्याय १३ ओवी ८२३ पृ ४२४
१०. कित्ता, अध्याय १३, ओवी १९९ पृ ३८१
११. कित्ता, ओवी—२०१ पृ.३८१
१२. कानडे, डॉ.मु.श्री, संतांची हे भेटी, स्नेहवर्धन प्रकाशन ISBN ८१—८५६०१—५१—८,पृ.५७
१३. नामेदवाचे अभंग internet source- you tube
१४. कानडे, डॉ.मु.श्री, संतांची हे भेटी, पृ..६६३—६३

१५. कित्ता, पृ–६३–६४
१६. literature awgp.org/ akhandjyoti/1961/ November/ V2-I9
१७. web.bookstruck.in/book/chapter/44942 पंढरी माहात्म्य अभंग
१८. https://mr.m.wikibooks.org/w/index.php
१९. कुलवंतवाणी.in जगतगुरू संत तुकाराम महाराज अभंग
२०. https://mr.m.wikisource.org/wiki/ तुकारामगाथा
२१. कुलवंतवाणी.in जगतगुरू संत तुकाराम महाराज अभंग ४४८६
२२. कित्ता अभंग .२४७१
२३. कित्ता अभंग .९८०
२४. कित्ता अभंग .२४७१
२५. कित्ता अभंग .१११८
२६. सामना ,निसर्गपूजक समर्थ रामदास, वैजयंती कुलकर्णी, २६ फेब्रु २०१९, १२.४० वा. , https://www.saamana.com/article-onsamarth-ramdas-swami.2/
२७. कित्ता
२८. मनाचे श्लोक, श्लोक .५४
२९. दैनंदिन दासबोध, निवड आणि निरूपण, माधव कानिटकर,डायमंड पब्लिकेशन, पुणे पृ.३१४
३०. कित्ता पृ.३१५
३१. कित्ता पृ ३१६
३२. https://mr.m.wikibooks.org/wiki/रामदासाचे अभंग
३३. BBC.com ३१जानेवारी २०२० जागतिक आरोग्य संघटनेकडून सार्वजनिक आरोग्य आणिबाणी जाहीर
३४. कुलवंतवाणी.in जगत्गुरू संत तुकाराम महाराज अभंग ४४८७
३५. कित्ता, अभंग ३०४३
३६. अनुवादक–त्र्यंबक चव्हाण, सं. विजय भटकर, आजची ज्ञानेश्वरी, अध्याय –१८
३७. कुलवंतवाणी.in जगतगुरू संत तुकाराम महाराज अभंग –३५२९

# कापूस उत्पादन व विपणन व्यवस्थापन

प्रा.नितेश गुलाब जोगी
वाणिज्य विभाग
लोकमान्य महाविद्यालय, वरोरा जि. चंद्रपूर (महा.), पिन. ४४२९०७

सारांश :–

कृषी आणि औद्योगीक क्रांतीचा कणा समजले जाणारे कापूस हे भारतातील महत्वाचे पिक आहे. भारतातील अंदाजे ६० हजार कोटी मनुष्य बळ कापसाच्या उत्पादन प्रक्रियेत व कापड उद्योगामध्ये सहभागी आहेत. कापड उद्योगातील मुख्य कच्चा माल कापूस आहे. कापूस हे जिल्हयातील एकमेव नगदी पीक असून शेतकरी मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. दिवसेन दिवस कापूस उत्पादनाचा खर्च वाढत आहे आणि उत्पन्न घटत आहे. कापूस उत्पादनाकरिता आधुनिक लागवड तंत्राचा कमी वापर अप्रमाणित बियानांचा वापर, शेतकऱ्यांची बेताची आर्थिक परिस्थिती अल्पभुधारकी नवीन तंत्रज्ञानाचा पुरेसा प्रसार व स्वीकार न होणे इत्यादी कमी उत्पादकतेची कारणे आहे.

**प्रस्तावना:–**

शेती व्यवसाय हा जगातील अत्यंत महत्वाचा पुरातन व्यवसाय आहे. भारतीय अर्थव्यसस्थेत कृषीला महत्त्वपूर्ण स्थान आहे कृषीच्या विकासाशिवाय मानवी जीवन कधीही सुखी व समृद्ध होऊ शकणार नाही. मानवाची अन्नधान्याची गरज कृषीमार्फतच पूर्ण होऊ शकते. उद्योगांना आवश्यक असणाऱ्या कच्चामालाचा पुरवठासुध्दा शेतातूनच होत असतो.

भारतातील बहुसंख्य लोकसंख्या खेड्यात राहत असून शेती हा त्याचा प्रमुख व्यवसाय आहे. भारताच्या लोकसंख्येपैकी जवळजवळ ७० टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. खेड्यातील बहुतांश लोकांचे शेती हे उपजीविकेचे प्रमुख साधन आहे. शेती व शेतीशी संलग्न असलेले व्यवसाय जसे पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन इत्यादीचा एकत्रित विचार केल्यास जवळ जवळ ८० टक्के लोकसंख्या कृषी आणि संलग्न व्यवसायावर अवलंबून असल्याचे दिसून येते.

राष्ट्रीय उत्पन्नात कृषी उत्पन्नाचा हिस्सा २३.६ टक्के आहे. म्हणूनच भारतीय शेतीला भारतीय अर्थव्यस्थेचा कणा असे म्हटले जाते. महात्मा गांधीच्या शब्दात सांगायचे झाल्यास "भारतीय शेती भारतीय लोकांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन असल्यामुळे शेती हा भारताचा आत्मा आहे"[१]. भारताची अर्थव्यवस्था मुख्यत: ग्रामीण अर्थव्यवस्था असल्यामुळे व हया अर्थव्यवस्थेत कृषी हा महत्त्वाचा व्यवसाय असल्यामुळे भारताच्या आर्थिक विकासात कृषी विकासाचे महत्त्वपुर्ण स्थान आहे. जनतेकरीता अन्नधान्य प्रमुख उद्योग तसेच लघु व कुटीर उद्योगांना लागणारा कच्चामाल आणि पशुधनाकरीता आवश्यक असणारे खाद्य शेतीतून प्राप्त होत असते.

भारत हा कृषीप्रधान देश असून भारतीय अर्थव्यवस्थेचा सर्वात महत्वाचा व्यवसाय शेती आहे. भारतातील भूमीउपयोजनात असे दर्शविले आहे की एकूण क्षेत्रफळाच्या ४७% क्षेत्र हे शेतीखाली आहे. देशातील एकूण लोकसंख्येचा ७०% लोक हे शेतीवर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष अवलंबून आहेत. भारतातील शेती ही मोसमी हवामानार अवंलबून आहे. भारतात पावसाळ्यात पाऊस पडतो मात्र हा पाऊस सर्व भारतभर समाज प्रमाणात पडत नाही काही भागात अतिपर्जन्य होते तर काही भागात अत्यल्प पर्जन्य होते. म्हणजेच मोसमी पर्जन्य हे अतिरिक्त व विषम असल्याने भारताच्या शेतीवर याचा फार मोठा परिणाम होतो. भारतामध्ये शेती हा प्राथमिक व महत्त्वाचा व्यवसाय आहे. भारत हा दाट लोकसंख्येचा देश आहे. मागील तीन ते चार दशकामध्ये भारतामध्ये शेती व्यवसायात अमुलाग्र बदल झालेला दिसून येतो. आधुनिक पद्धतीची जलसिंचन पद्धती, कृषीतंत्रज्ञानात झालेले बदलाचा अवलंब व पिकपध्दतीतील बदल यामुळे शेतीला चांगले दिवस येत आहे. १९६७–६८ यावर्षी भारत सरकारने हरितक्रांती योजना सुरू केली व यांचा परिणाम म्हणून अनेक पिकांच्या दरहेक्टरी उत्पादनात वाढझाली. शिवाय भारतात काही पीक विमा योजना सुरू करण्यात आल्याने नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे होणारे नुकसान भरून मिळण्याची हमी शेतकऱ्यास मिळू लागली.

**कापूस :–**

कापूस हे भारतातील एक महत्त्वपूर्ण नगदी पीक आहे. उत्पादनात जरी आज भारत जगात चौथ्या स्थानावर असला तरी कापसाचे रोप प्रथम भारतातच आढळून आलेले आहे व नंतर ते इतर देशामध्ये प्रसारीत झाले. प्राचीन काळापासून भारतात कापसाचे उत्पादन होत आहे यांचे पुरावे ऋग्वेद व सिंधूसंस्कृतीच्या उत्खननामध्ये आढळते. भारतातील हातमागावर विणले जाणारे, कापड १८ व्या शतकाच्या पूर्वी इतर देशामध्ये निर्यात केले जात होते. हिरोडोट्स व मार्कोपोली यांच्या आलेखावरून भारतातील कापसाचा प्राचीन इतिहासावर प्रकाश टाकला आहे. भारत कापूस उत्पादक क्षेत्राबाबत जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. परंतु दर हेक्टरी उत्पादन कमी असल्याने जगात चीन, संयुक्त संस्थाने व रशियानंतर कापूस उत्पादनात भारत चौथ्या स्थानी आहे. भारत व पाकिस्तान यांच्या विभाजनानंतर भारतातील उत्तम कापूस उत्पादक क्षेत्र पाकिस्तानमध्ये गेले. कापूस हे भारतातीलच नव्हे तर महाराष्ट्रातीलही एक प्रमुख नगदी पीक आहे. महाराष्ट्रातील लागवडीखालील एकूण क्षेत्राच्या १५.९ टक्के क्षेत्रावर कापसाचे उत्पादन घेतले जाते.

**अभ्यासाचे महत्त्व :–**

भारतातील महाराष्ट्र हे राज्यही कृषीप्रधान राज्य आहे. एखाद्या राज्यातील शेतीचा अभ्यास करतांना तेथील शेतीचे महत्त्व, कृषी भुमीउपाययोजना, शेतीची पद्धत, पिके, शेतीचा विकास आणि त्या भागातील शेतीच्या समस्या या गोष्टीचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते. महाराष्ट्रामध्ये शेतील अद्यापही अनन्यसाधारण महत्व आहे. महाराष्ट्रातील ५७.६%लोकसंख्या ग्रामीण भागात राहते यापैकी जवळ–जवळ ९०% लोक हे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष शेतीवर अवलंबून आहेत. जमीन ही मानवास निसर्गाकडून मिळालेली महत्त्वाची साधनसंपत्ती आहे. या साधनसंपत्तीच्या आधारेच मानव आपल्या गरजा पूर्ण करीत असतो. या जमिनीच्या योग्य वापरावरच मानवाचा विकास अवलंबून असतो. कोणत्याही प्रदेशातील जमिनीचा वेगवेगळ्या हेतूने केला जाणारा वापर म्हणजेच भूमीउपयोजन होय. महाराष्ट्रामध्ये मात्र दिवसेंदिवस शेती व्यवसायातील लोकांचे प्रमाण कमी होत आहे.

राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत शेतीचे स्थान अतिशय महत्त्वपूर्ण असते वाढत्या आर्थिक विकासाबरोबर शेतीवरील लोकसंख्येचे अवलंबित्व कमी होत जाते हे जरी खरे असले तरी ही अवस्था साध्य करण्यासाठी शेतीच्या क्षेत्राची मदत मोलाची ठरते. जपानसारख्या वेगाने विकसीत झालेल्या देशातसुध्दा शेतीने विकास–प्रक्रियेला हातभार लावला आहे. देश विकसीत झाला तरी वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची आणि विविध उद्योगांची कच्च्या मालाची गरज हेच क्षेत्र पूर्ण करते. विकसनशील अर्थव्यवस्थेत तर राष्ट्रीय उत्पन्न, निर्यात, अन्नधान्य आणि कच्चा मालाचा पुरवठा, रोजगार इत्यादी अनेक क्षेत्रांमध्ये शेती–क्षेत्राची भूमीका महत्त्वाची असते.

**संशोधनाची उद्दिष्टे :–**

वरील विषयानुसार अध्ययनाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहे.

१) कापूस उत्पादकांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन करणे.

२) कापूस उत्पादनांच्या कार्यपद्धतीचा व समस्यांचा सखोल अभ्यास करणे.

३) कापूस पिकांचे वितरण व विपणन व्यवस्थेसंबंधी असणाऱ्या अडचणी व समस्यांचा सर्वांगीण अभ्यास करणे.

४) शेतकऱ्यांना शासनाद्वारे देण्यात येणाऱ्या सोयी सवलतीचा अभ्यास करणे.

५) शेतकऱ्यांच्या दृष्टीने कापूसाचे पीक इतर पिकांच्या तुलनेत लाभदायक आहे किंवा नाही याचे अध्ययन करणे.

**संशोधनाची गृहितकृत्ये :–**

१) कापूस उत्पादनामूळे शेतकऱ्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावलेला आहे.

२) उत्पादन खर्चाच्या तुलनेत मिळणारा बाजारभाव कमी आहे.

३) कापूस उत्पादक शेतकऱ्यांना आवश्यक तो कर्जपूरवठा होत नाही.

४) चंद्रपूर जिल्ह्यामध्ये कापूस विपननाची फारसी सोय उपलब्ध नाही.

५) कापूस साठवणुकीच्या सोयीचा अभाव आहे.

६) शासनातर्फे कापूस उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादन विषयक प्रशिक्षण दिले जात नाही.

**संशोधन पध्दती –**

**प्राथमिक स्त्रोत –**

कापूस उत्पादक करणाऱ्या शेतकऱ्यांची उत्पादन, विपणन व्यवस्थापन, सामाजिक, आर्थिक बाबी आणि त्यांच्या समस्यासंबंधी माहिती मुलाखत अनुसूचीच्या माध्यमाने संकलित करण्यात आली. मुलाखत अनुसूचीची निर्मिती मार्गदर्शक व विषयातील तंज्ञाच्या मदतीने तसेच उपलब्ध साहित्यांच्या आधारावर करण्यात आली. मुलाखत अनुसूचीची विश्वसनियता तपासण्यात आली व त्यानंतरच या अनुसूचीचा उपयोग तथ्य संकलनाकरिता करण्यात आला.

**दुय्यम स्त्रोत –**

प्रस्तुत अध्ययनात दुय्यम स्त्रोतांतर्गत वर्तमानपत्र, मासिके, ग्रंथ, पुस्तके, शोध प्रबंध व नियतकालिकांद्वारे प्राप्त माहितीचा वापर करण्यात आला, त्याच प्रमाणे इंटरनेटवर उपलब्ध माहितीचा देखील वापर करण्यात आला. शोध प्रबंधात योग्य ठिकाणी या माहितीचा वापर करण्यात आला.

**पुर्व साहित्याचा आढावा :–**

कोणतेही संशोधन कार्य करीत असतांना त्याविषयाशी संबंधित पुर्वी झालेल्या संशोधनाचा आढावा घेणे अतिशय आवश्यक आहे. यामुळे संशोधनाशी संबंधीत विषयांवर किती प्रमाणात संशोधन झाले आहे याची माहिती प्राप्त होते तसेच पूर्वी झालेल्या संशोधनात कुठल्या पद्धतींचा वापर करण्यात आला तसेच संशोधन करतांना संशोधकाला कोणकोणत्या समस्या जाणवल्या याचा देखील आढावा घेता येतो. सर्वात महत्वाचे म्हणजे या विषयावर आतापर्यत झालेल्या संशोधनात विषयाशी संबंधित कोणत्या घटकावर अद्याप संशोधन झाले नाही याची माहिती प्राप्त होते. म्हणजेच संशोधन उणीवा माहित होतात.

**अल्टेनबुचनेर व सहकारी** (२०१६) यांच्या संशोधनाचे मुख्य उद्देश कापूस उत्पादनाचा अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या राहणीमानाच्या दर्जावर होणाऱ्या प्रभावाचे अध्ययन करणे हा होता. संशोधनाकरिता तंजानिया येथील कापूस उत्पादकांची निवड करण्यात आली. संशोधनात प्राप्त परिणामानूसार कापूस हे अल्पभूधारक शेतकऱ्यांचे उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत आहे पण कीटनाशकाच्या अत्यधिक उपयोगामुळे जमीनीवर नकारात्मक प्रभाव होते. म्हणूनच शासनाद्वारे शेतकऱ्यांना जैविक शेती करण्याचा सल्ला देण्यात येतो.

**चंद्रशेखर व सहकारी** (२०१७) यांच्या संशोधनाचे मुख्य उद्देश दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांच्या सामाजिक–आर्थिक स्थिती व त्यांच्या मानसिक घटकाचे अध्ययन करणे हा होता. संशोधनाकरिता बेंगलुरू जिल्ह्यातील १२० दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांकडून मुलाखत पध्दतीद्वारे माहिती एकत्रित करण्यात आली. संशोधनात प्राप्त परिणाम दर्शवितात की बहुतांश कृषक अशिक्षीत असून पुरूष असल्याचे आढळले. तसेच या शेतकऱ्यांकडे शेतीचा अनुभव असून काही प्रशिक्षणाचा अनुभव नसल्याचे आढळते.

**बोहरा व सहकारी** (२०१८) यांच्या संशोधनात अल्प भूधारक व मोठे शेतकऱ्यांच्या सामाजिक–आर्थिक स्थितीत बायोगॅसच्या होणाऱ्या प्रभावाने अध्ययन करण्यात आले. संशोधनाकरिता कर्नाटक राज्यातील अल्पभुधारक व सधन शेतकऱ्यांकडून मुलाखतपध्दतीद्वारे माहिती एकत्रित करण्यात आली. संशोधनात प्राप्त परिणाम दर्शवितात की बायोगॅस पद्धतीद्वारे अल्पभुधारक व सधन शेतकऱ्यांच्या सामाजिक–आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा घडू शकते.

**बागल व सहकारी** (२०१८) यांच्या संशोधनाचे मुख्य उद्देश गहू उत्पादकाच्या सामाजिक–आर्थिक घटकांचा त्यांच्या उत्पादकतेवर होणाऱ्या प्रभावाचे अध्ययन करणे हा होता. संशोधनाकरिता जम्मु व काश्मिर येथील सांबा जिल्ह्यातील १२ गावातील १२० गहू उत्पादक शेतकऱ्यांची यादृच्छिक पद्धतीद्वारे निवड करण्यात आली. संशोधनात प्राप्त परिणाम दर्शवितात की गहू उत्पादक शेतकऱ्यांच्या सामाजिक–आर्थिक घटकांचा गहूच्या उत्पादनावर प्रभाव होत नसल्याचे आढळले. तसेच गहूचा उत्पादन व उत्पन्न वाढविण्याकरिता सिंचन व्यवस्थेकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

**बिस्वास व सहकारी** (२०१८) यांच्या संशोधनाचे मुख्य उद्देश समाजिक–आर्थिक घटकांचा मासे उत्पादक शेतकऱ्यांवर होणाऱ्या प्रभावाचे अध्ययन करणे हा होता. संशोधनाकरिता पश्चिम बंगाल येथील परगाना जिल्ह्यातील ६० शेतकऱ्यांकडून माहिती एकत्रित करण्यात आली. संशोधनात प्राप्त परिणाम दर्शवितात की मध्यम शेतकऱ्यांचे वार्षिक उत्पन्न ५ टन प्रति हेक्टर असून त्यांचे शिक्षणाचे स्तर सामान्य असल्याचे आढळते.

तथ्य, संकलन, विश्लेषन व निर्वचन :–

**कापसाची लागवड (Cotton Plantation)** :– कापूस हे पिक महाराष्ट्रामध्ये खरीप हंगामात घेतले जाते. कापसाची लागवड जूनच्या दुसऱ्या आठवड्यात केली जाते. जेथे जलसिंचनाची सोय आहे ते उन्हाळ्यामध्येच मार्च ते मे या काळात लागवड केली जाते. महाराष्ट्रामध्ये पूर्वीपासून कापसाची लागवड केली जात आहे. पूर्वी राज्यात शेतकरी पारंपारिक पद्धतीने कापसाची पेरणी करत असे व निसर्गावर अवलंबून राहून मिळेल ते उत्पन्न घेत असहे. आज मात्र त्यामध्ये मोठी प्रगती झाली असून वेगवेगळ्या प्रकरणाच्या कापसाच्या जातीच्या बियांच्या शोध लागला आहे. त्यामुळे साहजिकच लागवडीच्या पद्धतीत बदल घडून आला. आज कापसाची लागवडी वेगवेगळ्या शेती औजाराच्या सहाय्याने फुली काढून दोऱ्यांच्या सहाय्याने खूणा करून मजूराद्वारे कापसाची लागवड टोचणीद्वारे किंवा रोप तयार करून केली जाते. कापसाचे पीक तयार होण्यासाठी साधारणत: १७० ते २२० दिवसांचा कालावधी लागतो. कापसाचे पीक काढणीला आल्यानंतर एकाच वेळी काढता येत नाही तर ऑक्टोंबरमध्ये कापसाचे काही बोंडे फुटण्यास सुरूवात होते. म्हणजेच ऑक्टोंबर पासून कापसाची बेचणी सुरू करावी लागते. ही वेचणी जानेवारी फेब्रुवारी पर्यत चालते.

चंद्रपूर जिल्हातील कापूस लागवडीखालील क्षेत्र मागील ५ वर्षातील

तक्ता क्र. १

| अ. क्र. | वर्ष | क्षेत्र |
|---|---|---|
| १ | २०१५ – १६ | ३९६४ |
| २ | २०१६ – १७ | ४३९२ |
| ३ | २०१७ – १८ | १८४३ |
| ४ | २०१८ – १९ | ३५६७ |
| ५ | २०१९ – २० | ४४९३ |

वरील तक्त्यामध्ये सन २०१५–१६ ते २०१९–२० या कालावधीत चंद्रपूर जिल्ह्यातील कापुस पिकाखालील क्षेत्र दर्शविली आहे. २०१६–२०१७ पर्यत शेतामध्ये लागवड वाढत असतांनी दिसत आहे. तर २०१९ ते २०१८ या वर्षात कमी झालेली आहे आणि पुन्हा ती २०१८ ते २०२० मध्ये वाढलेली आहे. म्हणजेच कापूस उत्पादक शेतकरी कापूस पिकाकडे वळतानी दिसत आहे.

**कापसासाठी आवश्यक भौगोलिक परिस्थिती (Geographical Condition for Cotton in Maharashtra)** :

**१) तापमान (Tempreture)** : कापूस हे एक उष्ण कटिबंधीय पीक आहे. कापसाच्या लावडीपासून तर कापूस वेचणीपर्यंत भरपूर तापमान आवश्यक असते. या पिकांची चांगली वाढ होण्यासाठी तापमान हे २१° ते २७°C च्या दरम्यान असावे लागते. जर या काळात तापमान १८°C च्या खाली गेले तर ते या पिकास हानीकारक असते. या पिकाला दीर्घकाळ उष्ण व कोरडी हवा आवश्यक असते.

**२) पर्जन्य (Rain)** : कापसाच्या पिकाला अधिक पावसाची आवश्यकता नसते. ७५ ते १०० cm पाऊस असणाऱ्या प्रदेशामध्ये हे पीक घेतल्या जाते मात्र ५० cm एवढे कमी पर्जन्य असणाऱ्या भागात जलसिंचनाचा उपयोग करून कापसाचे उत्पादन घेतल्या जाते. कापूस परिपक्व झाल्यानंतर म्हणजेच बोंडे फाटण्याच्या वेळी जर आकाशात ढग आले किंवा पाऊस झाला तर ते कापसासाठी हाणीकारक असते. तर १०० cm पेक्षा अधिक पाऊस पडल्यास बोंडे खराब होतात. पावसाचे प्रमाण कमी असल्यास सिंचनाची आवश्यकता असते.

**३) मृदा (Soil)** : कापसासाठी कसदार काळी मृदा आवश्यक आहे. कारण कापूस हे पिक मातीचा कस मोठ्या प्रमाणात कमी करते. त्यामुळेच तर कापसासाठी खतांचा अधिक वापर करावा लागतो. लाव्हारसांपासून निर्माण झालेली काळी कसदार मृदा, नद्यांनी निर्माण केलेली गाळाची मृदा व जमिनीमधील पाण्याच्या निचरा होणारी मृदा या पिकास अधीक उपयुक्त आहे. मध्यम स्वरूपाच्या मृदेमध्ये रासायनिक खतांचा उपयोग करून हे पीक घेतले जाते. ज्या भागामध्ये काळी कसदार मृदा आहे त्या भागात जर लागवडीच्या अगोदर भरपूर पाऊस झालेला असेल तर तेथे पुन्हा पावसाची तेवढी आवश्यकता पडत

नाही. लेटेराइट मृदासुध्दा कापसाच्या पिकास अनुकूल आहे. मृदेतून पाण्याचा निचरा होऊन मध्यम ओलावा टिकवणारी मृदा कपाशीच्या पिकाला आदर्श ठरते.

**निष्कर्ष :—**

१) कापूस उत्पादन घेत असतांना लागणारे साहित्य उपलब्ध होत नाही. बहुतांश भागात कोरडवाहू शेती असल्यामुळे पाण्याची कमतरता जाणवते.

२) शासकीय शेतमाल खरेदी केंद्र जिल्ह्यातील कोणत्याही बाजार समीती आवारात कायमस्वरूपी उपलब्ध नाही.

३) कापूस उत्पादनात काही वर्षामध्ये घट जाणवत आहे आणि ही घट जाणवण्याची कारणे म्हणजे उत्पनाबद्दल माहिती नसणे आणि बाजार समितीमध्ये होणारी पिळवणूक यामुळे उत्पादणावर होणारा परिणाम याकडे दुर्लक्ष.

४) उत्पादन घेतल्यानंतर सोयी सुविधा उपलब्ध करणे आणि बाजवी किंमत उपलब्ध करणे.

५) निवडलेल्या शेतकरी प्रतिसादांपैकी १८.३७ टक्के शेतकऱ्याकडेच फक्त स्वत:च्या मालकीची वाहतुक साधने आहेत, तर ८१.६३ टक्के शेतकऱ्यांना स्वत:च्या मालकीच्या वाहतुक साधनाने शेतमालाची वाहतुक करावी लागते. तसेच ३४.८९ टक्के शेतकऱ्यांना ५ टक्के वाहतुक खर्च करावा लागतो.

६) निवडलेल्या शेतकरी प्रतिसादापैकी १०० % प्रतिवाद शेतकरी इतर राज्यात शेतमालाची विक्री करत नाही व त्यासाठी त्यांना पायाभुत सुविधा उपलब्ध नाही. ८१.१७ टक्के प्रतिवादक शेतकऱ्यांच्या मते शेतमाल विपणन पद्धतीत समस्या आहेत तर ८१.६२ टक्के प्रतिसादक शेतकऱ्यांना शेतमाल विपणन पद्धतीत अपेक्षित आहेत आणि ७६.५३ प्रतिसादक शेतकऱ्यांना पायाभुत सुविधाबाबत बाजार समितीकडून अपेक्षा आहेत.

**शिफारशी / उपाययोजना :—**

१) कापुस उत्पादनाबद्दल जनजागृती करणे आणि लागणाऱ्या सुविधा पुरविणे यामुळे उत्पादनात वाढ होईल.

२) सर्व शेतकऱ्याच्या शेतमालाची किंमत समान पध्दतीने ठरविण्यासाठी इलेक्ट्रानिक लिलाव पध्दतीचा वापर करावा.

३) शेतकऱ्यांना मिळणाऱ्या आर्थिक उत्पनात वाढ घडवुन आणण्यासाठी उत्पादन खर्च व विक्री खर्च कमी करणे गरजेचे आहे त्यासाठी शासनाने प्रयत्न करणे.

४) शेतमाल विक्रीसाठी बाजार समितीत घेवून आल्यानंतर शेतमालाची चोरी होते. ती होवू नये म्हणून लिलाव गृहाच्या ठिकाणी सी. सी. टी. व्ही कॅमेरे बसवण्यात यावेत. जेणेकरून शेतमालाची चोरी होणार नाही.

५) शेतमाल विपनन प्रक्रियेत शेतकऱ्यांना सामाविष्ट करून घेण्याचे बंधन कायद्याद्वारे करावे. तसेच शेतमाल विकेल त्याच दिवशी शेतऱ्यांना पैसे मिळतील याची बाजार समीतीने शेतकऱ्यांना हमी द्यावी.

६) बाजार समित्यातील राजकीय हस्तक्षेप कमी करून सचिवांना जास्तीत जास्त अधिकार प्रधान करावेत.

**संदर्भग्रंथसूची :—**

१) डॉ. आगलावे प्रदीप, संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे विद्या प्रकाशन, नागपूर १ जाने. २०००.

२) डॉ. भांडारकर पु. ल. सामाजिक संशोधन पद्धती महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मीत मंडळ, नागपूर. तृतीय आवृत्ती १९८७.

३) डॉ. संत दु. का, संशोधन पध्दती, प्रक्रिया व अंतरंग पुर्ण विद्यार्थीगृह प्रकाशन पुणे द्वितीय आवृत्ती जुलै — १९८८.

४) डॉ. नाडगोंडे गुरूनाथ, सामाजिक संशोधन पध्दती फडके प्रकाशन कोल्हापूर द्वितीय आवृत्ती ऑक्टो. १९९९

५) डॉ. जरारे विजय एल, समाजिक शास्त्रीय संशोधन प्रणाली अद्वैत प्रकाशन, अकोला २२ ऑक्टो. २००४

६) WWW.Google.Com.

७) epaper.agzowon.com

7) Dr. Rakesh Kothari Marketing Management RBD Publishing House Jaipur – New Delhi – 2016.

# वस्तू व सेवा कराचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम

प्रा.कु. प्रिती दिलीपराव पोहाणे
वाणिज्य विभाग
लोकमान्य महाविद्यालय, वरोरा जि. चंद्रपूर (महा.), पिन. ४४२९०७

**सारांश –**

वस्तू व सेवा कर देशातील अनेक करांना बाद करून ही भारतात निर्माता, व्यावसायिक आणि उपभोक्त्यांना समोर ठेवून एकच कर असणारी प्रणाली आहे. करदाता आणि सरकार या दोघांनाही अत्यंत क्लिष्ट आणि गुंतागुंतीच्या कर पध्दतीला सामोरे जावे लागत असे. म्हणूनच भारत सरकारने १०१ व्या संशोधनाद्वारे 'एक देश एक कर' असणारी वस्तू व सेवा कर प्रणाली १ जुलै २०१७ पासून भारतात लागू केली. या कर प्रणालीमुळे भविष्यात भारतीय अर्थव्यवस्था उत्तम स्थितीत येईल व करचुकवेगिरी, काळा पैसा याला आळा बसेल यात शंका नाही. विशेष महत्वाचे म्हणजे भारतीय अर्थव्यवस्था मजबूत झाली तर देशातील जनतेला जास्तीत जास्त कल्याणविषयक सुख सुविधा उपलब्ध करून देण्यास सरकारला सुलभ जाईल आणि हे या करप्रणालीमूळे शक्य आहे.

**प्रस्तावना :–**

भारतीय अर्थशास्त्राच्या इतिहासातील एक अविस्मरणीय दिवस १ जुलै २०१७ या दिवसी भारतातील विविध राज्ये यातील दहा कायदे, केंद्र सरकारचे आठ कायदे, स्थानिक स्वराज्य संस्थेचा ऑक्ट्रॉस कायदा असे अप्रत्यक्ष करविषयक १९ कायदे रद्द होऊन त्याची जागा एकाच पण संमिश्र प्रकारच्या जीएसटीने घेतली. या सर्वांचे एकत्रीकरण करून निर्माण झालेली जी प्रणाली होती तिला 'जीएसटी प्रणाली' असे म्हणतात.

**जीएसटीची अंमलबजावणी :–**

१९१९ च्या 'गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट' द्वारा जी दुहेरी राज्यव्यवस्था सुरू झाली ती १९३५ साली बदल करून भारत एक फेडरल देश झाला. तरीपण प्रांतांना स्वायत्तता होती. त्यांना वस्तू विक्रीवर कर लावण्याचा अधिकार होता. तो अधिकार सन १९५१ च्या भारतीय घटनेमध्ये देखील मान्य करण्यात आला होता. भारतीय घटनेमध्ये वर्ष २०१६ मध्ये १०१ वी दुरूस्ती करून घटनेच्या १४६ए, २६९ए, २७९ए आणि ३६८ मध्ये बदल केला व जीएसटी अस्तित्वात आले.

वस्तू व सेवा कर भारतातील कराच्या क्षेत्रातील सुधारणांचे लक्षणीय पाऊल आहे. केंद्र व राज्य सरकारच्या अनेक करांचे एकत्रीकरण केल्यामुळे दुहेरी कर आकारणीचा होणारा दुष्परिणाम कमी होऊ लागला. संपूर्ण देशात ग्राहकांचा विशेष फायदा असलेले २५ ते ३० टक्के पर्यंत कराचे ओझे कमी झाले. वस्तू व सेवा कराची अंमलबजावणी १ जुलै २०१६ पासून केल्या गेली. त्यामुळे केंद्राच्या सात जागी तर राज्यसरकाराच्या ११ प्रकारच्या विविध कराच्या ठिकाणी जीएसटी ने जागा घेतली. हे कर राज्यसरकार व केंद्रसरकार तर्फे वसूल केले जातात. केंद्र सरकारचा सेंट्रल जीएसटी याला सीजीएसटी (CGST) असे म्हणतात. तर राज्य सरकारच्या स्टेट जीएसटी याला एसजीएसटी (SGST) असे म्हणतात.

**वस्तू व सेवा कर (GST) :–**

हा एक अप्रत्यक्ष कर कायदा आहे. भारताच्या कर संरचनेत सुधारणेची ही एक मोठी क्रांती आहे. वस्तू व सेवा यांच्या उपभोगावर हा कर लागतो. यामध्ये निर्माण प्रक्रिया ते उत्पादनापर्यंत तसेच उपभोगापर्यंत प्रत्येक टप्प्यांवर कर आकारणी केली जाते. जिथे जीएसटी लागू नाही तिथे वस्तू व सेवांवर वेगवेगळे कर लावले जातात. भारताच्या घटनेनुसार संपूर्ण देश हा २९ राज्यांमध्ये विभागलेला आहे. या प्रत्येक राज्यांमध्ये दोन सरकारांचे अधिपत्य चालते. जीएसटी हा एक कर जरी असेल तरी त्यामध्ये ४ करांचा अंतर्भाव आहे.

१. केंद्रीय वस्तू व सेवा कर (CGST)
२. राज्य वस्तू व सेवा कर (SGST)

३. एकात्मिक वस्तू व सेवा कर (IGST)

४. संघराज्य वस्तू व सेवा कर (UTGST)

हे सर्व कर लावल्याने कर आकारणीसाठी सुटसुटीत व सुरक्षिततेचा अनुभव प्राप्त होतो.

**एकात्मिक वस्तू व सेवा कराचा अर्थ :–**

हा कर केंद्रीय विक्रीकर लागणारा कोणताही नवीन कर नाही तर हा असा तंत्र आहे ज्याद्वारे दोन राज्याच्या मध्ये होणाऱ्या व्यापारावर नजर ठेवणे किंवा नियंत्रण ठेवणे शक्य होईल. कराचा एक हिस्सा राज्याला मिळायला पाहिजे जिथे अंतिम उपभोक्ता निवासकरती आणि दुसरा हिस्सा केंद्र सरकारला मिळायला पाहिजे.

**संघराज्य वस्तू व सेवा कर :–**

हा कर अशा राज्यात लावल्या जातो जे राज्य केन्द्रशासित राज्याच्या श्रेणीत येतात. या राज्यामध्ये हा कर वसूल केला जातो. हा कर केन्द्रशासित प्रदेशांच्या सीमेच्या आत चुकता करावा लागतो. हा कर केन्द्रीय वस्तू व सेवांच्या बरोबरीने याचे शोधन करावे लागते.

**कर आकारणी व कर सवलत :–**

जीएसटी मध्ये केंद्रशासन व राज्यशासन यांच्या संयुक्त विद्यमाने ही कर आकारणी केली आते. जीएसटी करात पाच प्रकारचे दर जीएसटी परिषदेने घोषित केले आहे. ३%, ५%, १२%, १८%, २८%, या व्यतिरिक्त काही वस्तू व सेवांना सुट प्राप्त पदाच्या सुचीत ठेवल्या गेले आहे.

**जीएसटी कर प्रणालीत वस्तू आणि सेवा कर यांचे वर्गीकरण :–**

| कराचे दर | समावेश असलेल्या वस्तू |
|---|---|
| ० % | दुध, लोणी, दही, नैसर्गिक मध, ताजेफळ, भाज्या, मासे, चिकन, गव्हाचे पीठ, बेसन, पोळी, समाचार पत्र, बांगड्या, पूजेचे सामान इत्यादींवर ० %कर दर लावले जातात. |
| ५ % | क्रिम, मिल्क पावडर, पनीर, कॉफी, चहा मसाले, साबुदाणा, केरोसीन, कोळसा, ज्वारी, मोहरी, १००० रू. किंमती पर्यंतचे कापड, ५०० रू. पर्यतच्या किंमतीचे फुटवेअर, औषधी इत्यादींवर ५% कर दर लागेल. |
| १२% | मासाच्या निर्मित वस्तू, पनीर, तुप, पॅकींगमध्ये असणारे वाळलेले फळे, नमकीन, फळांचे रस, आयुर्वेदिक औषधी, दंत पावडर, अगरबत्ती, रंगीत पुस्तक, छत्री, १००० रू. पेक्षा जास्त किंमतीचे कापड, शिलाई मशीन आणि सेल फोन इत्यादीवर १२%दराने कर लागेल. |
| १८%, | यात स्वादयुक्त साखर, पास्ता, पेस्ट्री, आईसक्रीम, केक, जाम, सॉस, सूप, स्टील, स्पीकर आणि मॉनीटर, कॅमेरा, बिस्कीट इत्यादी वस्तूवर १८ टक्के कर लागेल. |
| २८%, | कोको, चॉकलेट, वेफर्स, पेन, मसाला, पेंट, कॅशशॅम्पू, सनस्क्रीम, वॉलपेपर, डिशवॉशर, मोटारसाइकल, व्यक्तिगत उपयोगांसाठी विमान आणि बोट इत्यादी वस्तूवर २८% कर लागेल. |

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :–**

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

(१) वस्तू सेवा कराचा भारतीय अर्थव्यवस्थेवर पडणाऱ्या प्रभावाचे अध्ययन करणे.

(२) वस्तू व सेवा कराचा शेती क्षेत्रावर काय परिणाम झाला याचा शोध घेणे.

(३) वस्तू व सेवा कराचा बॅकींग क्षेत्रावर पडणाऱ्या प्रभावाचे अध्ययन करणे.

(४) वस्तू व सेवा कराचा उपभोक्त्याच्या समाधानावर होणाऱ्या परिणामाचे अध्ययन करणे.

(५) संशोधनाच्या निघणाऱ्या निष्कर्षावरून योग्य उपाययोजना सुचविणे.

**गृहितके :–**

वस्तू व सेवा कराचे भरतीय अर्थव्यवस्थेत खूप मोठ्या प्रमाणात महत्वाचे स्थान आहे.

**संशोधनाचे महत्व :—**

१ जुलै २०१७ रोजी केंद्र सरकारने वस्तू व सेवा कर लावून भारतीय अर्थव्यवस्था मजबूत करण्याचा प्रयत्न केला आहे. भारतामध्ये प्राथमिक क्षेत्र, दुय्यम क्षेत्र व तृतीय क्षेत्र या तिनही क्षेत्रांवर वस्तू व सेवा कराचा परिणाम झाला आहे आणि संशोधनाचे महत्त्व म्हणजे ज्या उद्दिष्टांनी वस्तू व सेवा कराची अंमलबजावणी करण्यात आली तो उद्देश मात्र सफल होतांना दिसत नाही कारण वस्तू व सेवा कराचा उत्पादनावर, रोजगारावर, उपभोक्त्याच्या समाधानावर, बॅकिंग क्षेत्रावर याचा विपरित परिणाम झाल्याचा दिसतो. म्हणून माझ्या दृष्टीने वस्तू व सेवा कराचा भारतीय अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या प्रभावाचे अध्ययन करणे हे संशोधनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

**GST चा शेतकरी वर्गावर होणारा परिणाम :—**

सध्या जागतिक आर्थिक अर्थव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर सरकार आणि बाजारपेठ यांचे परस्पर संबंध कसे असावेत जेणेकरून बाजार अपयशी होणार नाही. बाजार यंत्रणा सरकार हे एकमेकांना पर्यायी आहे की पूरक कल्याणकारी अर्थव्यवस्था कशी आणता येईल, भाववाढ रोखण्यासाठी उपाय, रोजगार वाढीसाठी सुरू असलेली जगभरातील चर्चा इत्यादीवर उपाय आवश्यक आहे. त्यासाठी महत्वाचे उद्योग हे सरकारी नियंत्रणात असावे आणि ते सरकारनेच चालवावे अशी भूमिका महत्त्वाची आहे. तरीपण सरकारनी जीएसटी सारखे कर शेतकऱ्यांवर लावून शेतकरी वर्गाचे नुकसान केले. त्याचा परिणाम खालीलप्रमाणे दर्शविला आहे.

१) जीएसटीमुळे शेतकऱ्यांना शेती करणे परवडत नाही. कारण शेती करणे शेतकऱ्यांना महाग झालेली आहे.
२) शेतकऱ्यांना सुरूवातीपेक्षा जीएसटी लागू झाल्यापासून जास्त खर्च करावा लागत आहे.
३) जीएसटीमुळे शेतकऱ्यांना मिळणारा नफा कमी झाला आहे.
४) शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारी अवजारे ट्रॅक्टर, मशीन, टायर, यंत्रे महाग झाली आहेत.
५) कीटकनाशकांवर १८ टक्के टॅक्स शेतकऱ्यांना द्यावा लागत आहे.

**कोणत्या वस्तूवर किती टक्के टॅक्स :—**

| वस्तु | दर | झालेला परिणाम |
|---|---|---|
| उत्पादन | १२ टक्के | शेतीवर मालाला नुकसान |
| कीटकनाशक | १८ टक्के | कीटकनाशक महाग |
| ट्रॅक्टर | १२ टक्के | ट्रॅक्टर आणि उपकरणे महाग |
| रबर | २८ टक्के | टॉयर महाग |
| प्लॅस्टिक पाईप | २८ टक्के | प्लॅस्टिक पाईप महाग, ट्यूब वॅल महाग |

**भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे जीएसटीचे अनुकुल परिणाम :—**

**(१) कराच्या दरातील एकरूपता :—**

जीएसटी करप्रणाली अंतर्गत 'एक राष्ट्र एक कर' ही संकल्पना प्रत्यक्ष अमलात येत असल्याकारणाने संपूर्ण भारतात अप्रत्यक्ष कराचे दर (Rate of Indirect Tax) हे समसमान असतील. यामुळे व्यापारी वर्गाला व्यापार करणे सोयीचे ठरेल. थोडक्यात म्हणजे जीएसटीमुळे व्यापारी वर्गाच्या व्यवसायात तठस्थता येऊन तो आपल्या मर्जीप्रमाणे एक कर प्रणाली अंतर्गत कुठल्याही भौगोलिक क्षेत्रावर सहजतेने व्यापार करू शकेल.

**(२) निर्यातीला प्रोत्साहन :—**

जीएसटी कर प्रणालीमध्ये केंद्र सरकार व राज्यसरकारचे कराचे दर समाहित असल्याकारणाने त्याचबरोबर केंद्रिय विक्री कर वगळल्याकारणाने स्थानिक पातळीवर निर्मित वस्तुंच्या व सेवांच्या उत्पादनाचा व्यय हा कमी येईल. यामूळे राष्ट्रीय वस्तूंच्या आंतरराष्ट्रीय किंमती कमी होऊन प्रतिस्पर्धी वस्तूला स्पर्धक म्हणून भारतीय वस्तु टीकाव धरू शकेल व त्याच अनुशंगाने भारतीय निर्यातीला प्रोत्साहन मिळुन विदेश चलनाचा प्रवाह भारताकडे येऊ लागेल.

(३) पारदर्शकता व सरलता :–

जीएसटीया नवीन कर प्रणालीअंतर्गत एक मजबूत व व्यापक असे सुचना प्राद्योगिकी प्रणालीची व्यवस्था भारतात केली जाणार आहे. त्यामुळे पंजीकरण, रिटर्न, भुगतान यासारख्या ज्या किचकट व क्लिस्ट स्वरूपाची कामे ही करदात्यासाठी ऑनलाईन पध्दतीने केली जाणार आहेत. या सर्वांचा एकंदरीत परिणाम म्हणजे करप्रणाली पारदर्शक व सरल होण्यास मदत होईल.

(४) व्यापार व उद्योगात प्रतिस्पर्धा वाढेल :–

व्यापार करीत असतांना जो विनिमय खर्च येत होता तो आता येणार नाही. त्यामुळे उत्पादन व्यय सुध्दा घटेल, त्यानंतर वस्तूच्या किमतीसुद्धा घटू लागतील व व्यापारामध्ये तसेच उद्योजकामध्ये स्पर्धेला उत्तेजन मिळून वस्तू उत्पादनाच्या प्रक्रियेत गती येऊन उत्पादनाचे प्रमाण वाढेल.

(५) केंद्र सरकार व राज्य सरकार यांना उपयुक्त :–

(अ) GSTलागू होण्याआधी भारतात राज्य सरकार व केंद्रशासन सरकार यांच्या अप्रत्यक्ष करांचे दर हे भिन्न भिन्न होते. 'एक देश एक कर' या प्रणालीचा अवलंब करून शासनाच्या दृष्टीने ही प्रणाली अत्यंत सरल व सोपी ठरणार आहे.

(ब) GST अमलात आल्याबरोबर कर वसुली करण्यासाठी जो खर्च येतो त्यात अधिकाधिक न्युनता येण्याची शक्यता आहे.

**भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे जी.एस.टी. चे प्रतीकुल परिणाम :–**

१) ग्राहक उपयोगी वस्तू :–

जीएसटी लागू झाल्यानंतर लिक्विड सोप, डिटरजेंट, रेझर, केंची, नेल कटर ८.७५ टक्क्यांनी वाढलेले आहे. तसेच मिसरी, बताशा यावर ५ टक्के जीएसटी लागला आहे.

२) दुध व दुध उत्पादित वस्तू :–

दुध पावडर, ताक, तूप यावर ६ टक्के जीएसटी लागू झाल्यामुळे या वस्तू अधिक महाग झाल्यामुळे सामान्य व्यक्तीच्या दैनंदिन खर्चात वाढझाली आहे.

३) माहिती व तंत्रज्ञान :–

मल्टीकेक्शन प्रिंटर, फोटो कॉफी, फॅक्स मशीन, माऊस, कीबोर्ड, सीडी–डीवीडी यावर १० टक्के जीएसटी लागू होणार असल्यामुळे या वस्तू अधिक महाग होत असल्यामूळे सर्वसामान्य व्यक्ती या वस्तू खरेदी करू शकणार नाही.

४) कृषी उत्पादित वस्तू :–

कृषी उत्पादन करण्यासाठी लागणारी उत्पादन तंत्रे जसे की कीटकनाशक औषधे यावर १२ टक्के जीएसटी असल्यामुळे तसेच कृषी उत्पादित आदान वस्तूंच्या किंमतीत वाढझाल्याने अधिक प्रमाणात खरेदी होऊ शकणार नाही.

५) बॅकींग क्षेत्र :–

ऑनलाईन सर्व बॅकीग प्रणाली लागू करण्यात आल्यामुळे मनी ट्रान्सफर, मोबाईल संदेश सेवा यावरील कमीशन इत्यादी विविध सेवावर जीएसटी लागल्यामुळे सामान्य जनतेच्या हातातील क्रयशक्ती कमी होवून सरकारकडे गळती होण्याचा हा एक मार्ग आहे.

६) नोंदणी शुल्कात वाढ :–

नवीन घरे व नवीन प्लाट खरेदी केल्यानंतर त्याची कायदेशीर नोंदणी आपल्या नावावर करण्यासाठी शासनाकडून यावर जीएसटी अधिक प्रमाणात आकारली जाते.

७) महागाईत वाढ :–

विविध व्यापाऱ्यांना व उद्योजकांना जीएसटी भरावा लागत असल्यामुळे विविध उद्योगातून निर्माण होणाऱ्या वस्तूच्या किंमतीत वाढ केलेली आहे. परिणामत: महागाईत वाढझाल्याचे दिसून येते.

ISSN : 2278-9308
Fabruary, 2021

८) व्यापारात मंदी :—

भारत देशात जीएसटी लागू झाल्यामुळे हार्डवेअरची दुकाने, नास्ता फरसाणे, इलेक्ट्रानिक्स वस्तूची विक्री व दुरूस्ती करणारे व्यावसायिक तसेच किरकोळ किराणा, व्यापार व विक्री करण्याऱ्या व्यवसायावर जीएसटी भरल्यामुळे या व्यापारात मंदी आल्याचे दिसून येते.

**मूल्यमापन / निष्कर्षः—**

(१) GSTलागू करण्यासाठी केंद्र राज्यांनी तसेच विविध राज्यकीय पक्षांनी सर्व हेवेदावे विसरून विलंबाने का होईना पण १२२ वे घटनादुरूस्ती विधेयी संसदेत मंजूर केल्यामुळे कररचनेतील एका नव्या पर्वास सुरूवात झाली आहे.

(२) GSTच्या या लांब रस्त्यावर अजूनही बरेच अंतर कापणे बाकी आहे.१२२ व्या घटनादुरूस्ती विधेयकाला निम्म्या राज्य विधिमंडळाची संमती मिळवणे, केंद्राचे व राज्यांचे GSTविषयक विस्तृत कायदे मंजूर होणे, GST नेमका दर ठरविणे, GST लागूकरण्यासाठी सुसज्ज व दोषरहित यंत्रणा (तांत्रिक तसेच मानवीय) स्थापन करणे इत्यादी कामे केंद्र तसेच राज्य सरकारांना पूर्ण करण्यासाठी वेळेशी शर्यत करावी लागली.

(३) केवळ कायदे करून आर्थिक सुधारणा होणार नसून या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. GST च्या यशस्वी अंमलबजावणीसाठी GST बाबत जनजागृती, पायाभूत सुविधाची उभारणी, विविध स्तरावरील कर अधिकाऱ्यांना नवीन प्रणालीबाबत प्रशिक्षण, केंद्र राज्य यांच्याबाबत सुसंवाद इत्यादी स्तरावर काम करणे अत्यावश्यक आहे.

(४) VAT हे मूल्यवर्धित कर लागू होण्यापुर्वी विक्रिकर उत्पादन शुल्क या कराच्या बाबतीत करांवर कर आकरण्यात येत होता. त्यामुळे आपोआपच वस्तू व सेवांच्या किंमतीमध्ये वाढ घडून यायचीयालाच (Caseading Effect) म्हणतात.

**शिफारसी :—**

(१) जीएसटी आकारणीसाठी प्रशिक्षित व कुशल कर्मचाऱ्यांची उपलब्धता गरजेचे आहे त्या दृष्टीने पावले उचलण्यात यावी.

(२) जीएसटी अंतर्गत कर प्रणाली सुलभ केली जावी.

(३) इंटरनेट सुविधा नियमत करावी.

(४) जीएसटी लागण्यापूर्वीच्या (१ एप्रील २०१७) काळातील कर्ज कर देणी फेडणी यांवर जुनेच दर लागू करण्यात यावे.

(५) कर धोरणात पारदर्शकता आणण्याचे प्रयत्न केले जावे.

(६) जीएसटी परिषदांमधून सकारात्मक निर्णय घेतले जावे.

(७) कागदपत्रे व प्रमाणपत्रांची जाचक अट शिथिल करण्यात यावी.

(८) व्यापाऱ्यांना परतावा लवकर मिळण्याची तरतुद असावी.

(९) कालपर्यंत चैनीच्या असणाऱ्या वस्तू वर्तमानात आवश्यक ठरणाऱ्या आहेत. (मोबाईल) हे लक्षात घेऊन जीएसटी लावावा.

वरील शिफारसी लक्षात घेऊन जीएसटी संबंधी अभ्यासपूर्ण धोरण अंगीकारल्यास जीएसटीचे चांगले व यशस्वी प्रयोग परिणामांच्या स्वरूपात समोर येतील. जीएसटी अधिनियम यशस्वी होण्यासाठी सर्वच स्तरांच्या उत्पन्नात वाढ कशी करता येईल याकडे विशेष लक्ष देण्यात यावे, असे झाल्यास जीएसटीची कार्यपद्धती सुलभ वाटू लागेल.

**संदर्भ ग्रंथ सुची :—**

(१) प्रतियोगीता दर्पण — भारतीय अर्थव्यवस्था २०१८.

(२) वस्तू व सेवा कर. Wikipedia

(३) Internet Website

(४) भारतीय अर्थशास्त्र — डॉ. प्रभाकर देशमुख

(५) योजना मासिक

(६) भारताचा आर्थिक विकास आणि नियोजन— डॉ. विजय कवीमंडण.

# वस्तू व सेवा कर आणि परिणाम

प्रा. कु. प्रियंका रमेश येडे
वाणिज्य विभाग
लोकमान्य महाविद्यालय, वरोरा जि. चंद्रपूर (महा.), पिन. ४४२९०७

**गोषवारा :—**

वस्तू व सेवा पुरवठा व्यवहारातील करप्रणाली तसेच व्यवहारांची अफाट संख्या या सर्व बाबींची सुसंगत मांडणी करून एक देश एक करप्रणाली अस्तित्वात आली. यापूर्वी करप्रणालीतील दोष लक्षात घेवून म्हणजेच कर चुकवेगिरी. करावर कर या सर्व गोष्टी लक्षात घेवून नविन करप्रणाली स्विकारण्यात आली, ती म्हणजे जीएसटी. जीएसटीमूळे संपूर्ण व्यवहार ऑनलाईन संगणकाद्वारे होत असल्यामूळे त्यामध्ये अचूकता व पारदर्शकता स्पष्ट दिसेल.

देशाची अर्थव्यवस्था जीएसटीमूळे गतिमान होणार आहे. त्याने जीडीपी वाढेल. त्यामूळे देशाची प्रतिमा एकसंपन्न देश म्हणून होवू शकेल. या करप्रणालीमूळे केंद्र सरकारच्या तिजोरीत चांगले उत्पन्न मिळण्याची आशा आहे. यामधुन राज्याला त्याचा वाटा मिळणार आहे. या कररूपात जी रक्कम जमा होईल त्यातून देशाचा विकास होईल.

**प्रस्तावना :—**

संपूर्ण देशामध्ये एकसमान अप्रत्यक्ष करपद्धतीकरिता वस्तू व सेवाकर प्रणालीचा अवलंब करण्याचा निर्णय केंद्र व राज्य शासनाने एकमतांनी घेतला त्यानुसार वस्तू व सेवा कर १ जुलै २०१७ पासून लागू करण्यात आला. हा अप्रत्यक्ष कर लागू करून देशात एकसमान करप्रणाली असावी असा उद्देश यामागे होता. २०११ साली माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी सर्वात आधी वस्तू व सेवा कराचा प्रस्ताव लोकसभेत सादर केला. २०१७ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काळात याची अंमलबजावणी केली गेली.

जीएसटी लागू होण्याअगोदर सेल्स टॅक्स, एक्साईज ड्युटी असे विविध कर आकारले जात होते. ज्यातून राज्य सरकारांना मोठ उत्पन्न मिळत होत. जीएसटी आल्यानंतर पेट्रोलिअम पदार्थ आणि मद्य या गोष्टी वगळता बाकी सगळ्यांचा समावेश जीएसटी मध्ये झाला. कराचे प्रमाणही तुलनेन घटल आणि राज्याला GST मधून काही ठराविक वाटा मिळू लागल्या. GST च्या आधीच्या कररचनेच्या तुलनेत राज्याच उत्पन्न म्हणून मग २०१७ ते २०२२ या पाच वर्षाच्या व काही काळासाठी केंद्र सरकारने राज्य सरकारांना कर संकलनासाठी ही नुकसान भरपाई म्हणजेच कॅम्पन्सेशन द्यायच अस जीएसटी ॲक्ट २०१७ नुसार ठरल. केंद्र सरकारला ऑटोमोबाईल, कोळसा यासारख्या वस्तूवर लावण्यात येणाऱ्या सेसमधून मिळणाऱ्या पैशातून हे कम्पन्सेसन देण्याची तरतूद आहे.

वस्तू आणि सेवांवरील कर स्वतंत्ररित्या न आकारता एकत्रितरित्या आकारण्याची पध्दत म्हणजे जीएसटी होय. जीएसटी लागू करणारा जगातील पहिला देश फ्रान्स आहे (१९५४). सध्या १४० देशामध्ये जीएसटी लागू आहे.

**संशोधनाची पद्धती :—**

प्रस्तुत संशोधनात दुय्यम सामुग्रीचा आधार घेण्यात आला आहे. दुय्यम सामुग्रीतील इंटरनेटवरील माहिती, लेख, संशोधन, वर्तमानपत्रे, मासिके इत्यादींचा वापर केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :—**

१) वस्तू व सेवा कर आणि त्याच्या परिणामाचा अभ्यास करणे.
२) वस्तू आणि सेवा करप्रणालीतील करचुकवेगिरी आणि भ्रष्टाचार यांचा अभ्यास करणे.
३) वस्तू व सेवा करप्रणालीअंतर्गत देशातील करदाते आणि करसंकलन याचा अभ्यास करणे.
४) कोरोना काळातील लॉकडाऊनमूळे जीएसटीवरझालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.

**गृहिते :—**

१) वस्तू व सेवाकर हा अप्रत्यक्ष स्वरूपाचा कर आहे.

२) वस्तू व सेवाकर हा वापरासाठी वापरल्या जाणाऱ्या घरगुती वस्तू व सेवावरचा कर आहे.

३) जीएसटी हा जगातील बहुतेक देशाद्वारे वापरला जाणारा सामान्य कर आहे.

४) जीएसटीवर सामान्यत: देशभरात एकच दर म्हणून कर आकारला जातो.

**जीएसटीचा सकारात्मक परिणाम :–**

१) जीएसटीने सेवा आणि वस्तूच्या व्यवसायासाठी कर आकारणी सुलभ करून एका छताखाली बरेच अप्रत्यक्ष कर एकत्र केले आहेत.

२) जीएसटी लागू झाल्याने प्रॉडक्ट्स आणि सर्विसेसचे खर्च दीर्घकाळ कमी होतील असे तज्ञाचे मत आहे. कारण व्हॅट आणि करांच्या मालिकेच्या कॅसकेडिंग प्रभाव आता मिटविला गेला आहे.

३) २० लाख रूपयांपेक्षा कमी उलाढाल असलेल्या सर्व्हिस प्रोवायडर कंपन्याना जीएसटी भरण्यापासून सूट देण्यात आली आहे. पूर्वोत्तर राज्याच्या बाबतीत ही सीमा दहा लाख रू. आहे. यामूळे छोट्या व्यवसायांना कर आकारणीची लांबणी प्रक्रिया टाळण्यास मदत होईल.

४) जीएसटी करप्रक्रिया अंतर्गत ७५ लाख रूपयापर्यतची उलाढाल असलेल्या कंपन्यांना रचना योजनांचा फायदा होवू शकतो आणि त्यांच्या उलाढालीवर केवळ १% कर भरला जावू शकतो.हे त्यांना सोपी कर आकारणी प्रक्रियेचे अनुसरण करण्यास मदत करेल.

५) जीएसटीमूळे छोट्या कंपन्याना अबकारी कर, सेवा कर आणि व्हॅटचे पालन करण्याची गरज कमी केली आहे.

६) जीएसटीमूळे वस्त्रोद्योगासारख्या असंघटित क्षेत्रावर जबाबदारी आणि नियमन केले जाते.

७) जीएसटी एकाधिक राज्य आणि केंद्रीय करांच्या जागी घेतल्यास गोळा केलेला कर संपूर्ण देशभरात वितरित केला जावू शकतो ज्यामूळे भारतातील विकसनशील आणि अविकसित खिशांना विकासनिधी उपलब्ध होईल.

८) जीएसटीमूळे काही वस्तूवर २% आणि स्मार्टफोन आणि कारसारख्या वस्तूवर ७.५% कर कमी केले आहेत

९) जीएसटी कर आकारणी प्रक्रियेत एकसारखेपणा आणि केंद्रीयकृत नोंदणीत परवानगी देतो. हे छोट्या व्यवसायांना सोप्या ऑनलाईन यंत्रणेद्वारे दर तिमाहीत कर विवरण भरण्याची संधी देते. यामूळे करांचा बहुगूणीतपणा कमी होतो. कारण त्यांच्याकडे कर तज्ञांना घेण्याचे स्त्रोत नसतात.

१०) जीएसटी भारताच्या जीडीपीवर सकारात्मक परिणाम दर्शवितो. पूढील दोन वर्षात त्यात किमान ८०% वाढ अपेक्षित आहे.

**जीएसटीचा नकारात्मक परिणाम :–**

१) जीएसटी काईलिंग प्रक्रियेस मदत करू शकणाऱ्या सॉफ्टवेअर खरेदीचे वाढते खर्च बऱ्याच व्यवसायांसाठी उच्च ऑपरेशनल खर्च ठरवते.

२) जीएसटीमूळे देशभरातील अनेक व्यवसाय मालकांना गुंतागुंत निर्माण झाली आहे. एकूण ७५ लाख रूपये असणारे एसएमई कंपोजिशन योजनेचा लाभ घेऊ शकतात, उलाढालीवर फक्त १% कर भरून कमी अनुपालन करतात ते व्यापार बंदच्या स्थितित इनपूट टॅक्ससाठी क्रेडिट दावा करू शकत नाही.

३) जीएसटीला आता 'ब्रेल पेपर, व्हीलचेअर्स, श्रवणयंत्र यासारख्या लेखांवर कर लावल्यामूळे अपंगत्व कर म्हटले जात असल्याची टीका झाली आहे.

४) उत्पादनांसाठी कराच्या जटिलतेमूळे निर्मात्यांनी त्यांचे बक्षीस कार्यक्रम स्थगित केले आहेत. जे ग्राहकांवर निश्चितपणे परिणाम करतात.

५) वित्तिय क्षेत्रातील जीएसटी व्यवहारांची फी १५% वरून १८% पर्यत महाग झाली आहे.

६) जीएसटीमूळे विमा प्रिमिअम अधिक महाग झाले आहेत.

७) रिअल इस्टेट बाजारावर जीएसटीच्या परिणामामूळे रिअल इस्टेट किमतीत ८% वाढझाली असुन जून २०१७ मध्ये अंमलात आल्यानंतर १२% मागणी कमी झाली. हा तथापि अल्पमुदतीचा कल असू शकतो.

८) पेट्रोल जीएसटीच्या अधीन नाही, जे वस्तूच्या एकीकरणाच्या आदर्शाच्या विरोधात आहे.

९) छोट्या व्यवसायांसाठी खर्च वाढला आहे. कारण तज्ञांना कामावर घेण्याचा अतिरिक्त खर्च त्यांना सोसावा लागतो. तसेच व्यावसायिकांना त्यांच्या कर्मचाऱ्यांना जीएसटी अनुपालन प्रशिक्षण द्यावे लागते. त्यामूळे त्याचा ओव्हरहेड खर्च आणखी वाढला आहे.

**१ जुलै २०१७ रोजी जीएसटी सुरू केल्यापासून भारताने खालील कराचे दर लागू केले आहेत :—**

१) ठराविक खाद्यपदार्थ, पुस्तके, वर्तमानपत्रे, होमस्पून, सूती कापड आणि हॉटेल सेवावर ० % कर लागू आहे.

२) अर्ध—पॉलिश दगडांवर ०.२५% दर लागू आहे.

३) साखर, मसाले, चहा आणि कॉफी यासारख्या घरगुती वस्तूवर ५% कर.

४) संगणक आणि प्रक्रिया केलेल्या अन्नावर १२% कर.

५) केसांचे तेल, टूथपेस्ट साबण आणि औद्योगिक मध्यस्थांवर १८%कर.

६) रेफ्रिजरेटर, सिरेमिक टाइल्स, सिगारेट, कार आणि मोटारसायकलींसह लक्झरी उत्पादनांवर २८% कर आकारला जातो.

**कोरोनाचा जीएसटीवर परिणाम :—**

कोरोनाच्या लॉकडाऊनच्या काळात जीएसटीला फार मोठा फटका बसला आहे. हा ॲक्ट ऑफ गॉड आहे अस म्हणत चालू आर्थिक वर्षामध्ये जीएसटी संकलन २.३५ लाख कोटींनी कमी होण्याचा अंदाज अर्थमंत्री निर्मला सितारमन यांनी जीएसटी परिषदेत मांडला. तर कमी टॅक्स कलेक्शनमूळे आपण राज्यांना १४ टक्क्यांची जी नुकसान भरपाई देतो ती देवू शकणार नसल्याची फायनान्स सेक्रेटरी अजय भूषण यांनी म्हटले होते.

पेट्रोलिअम पदार्थ आणि दारू यांच्या विक्रीवर लावण्यात येणारा कर स्टॅम्प ड्युटी आणि जीएसटी मधील मिळणारा हिस्सा हे राज्य सरकारच्या उत्पन्नाचे स्त्रोत आहेत. त्यात जीएसटीचा वाटा मोठा आहे. जर समजा हे उत्पन्न राज्य सरकारला मिळाले नाही तर त्याचा थेट परिणाम सरकार करत असलेल्या खर्चावर होतो. यामध्ये मग इतर खर्चासोबत राज्य सरकार देत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या पगारावरही याचा परिणाम होवू शकतो.

**जीएसटीचा अर्थव्यवस्थेवरिल परिणाम :—**

**१) कर कोडचे सूलभीकरण :—**

देशातील जीएसटीपूर्व करसंरचना अत्यंत अवजड आणि गुंतागुंतीची होती. राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर अनेक कर आकारले जायचे. जीएसटीमूळे हे सर्व सुलभ करण्यात आले आहे.

**२) दुहेरी कर :—**

इनपुट टॅक्स क्रेडिट आणि सेंट्राली मेंनेन्ड टॅक्स सिस्टीमवर दावा करण्याचा कोणताही मार्ग नसल्यामूळे लोकांना हा कर भरावा लागत होता. परंतु जीएसटीमूळे ही रचना सुलभ झाली आहे.

**३) व्यवसायासाठी सुविधा :—**

एका जटिल करप्रणालीसाठी बरीच कागदपत्रे, वेळ आणि पैसा घेणाऱ्या विविध संस्थाना देयके आवश्यक असतात. जीएसटीने सर्व व्यवसायासाठी प्रमाणित आणि सुव्यवस्थित प्रक्रिया प्रदान केली आहे.

**४) सरकारचे अनुपालन व कर संकलन :—**

अनुपालन आणि करसंकलनावर कमी पैसे खर्च केल्यामूळे जेवढे पैसे उभे केले जातात त्याचा उपयोग सामाजिक गरजा भागविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या लोकांना मदत करण्यासाठी आणि अतिरिक्त खर्च शक्तिसह अर्थव्यवस्थेचा आकार वाढविण्यासाठी करता येतो.

**५) परदेशी कंपन्यांना प्रोत्साहन :—**

पारदर्शक गुंतवणूकीसाठी पारदर्शक कोड असणे ही मोठी आवश्यकता आहे. भविष्यात पाच ट्रिलिअन डॉलर्सची अर्थव्यवस्था साध्य करण्याचे भारताचे उद्दिष्टे असल्याने उच्च गुणवत्तेचे परकीय भांडवल आकर्षित करण्याला प्राधान्य आहे. जीएसटीने आणलेल्या व्यवसायात पारदर्शकता आणि सहजतेने परदेशी गुंतवणूकदारांना दिलासा मिळाला आहे.

**६) ग्राहकांना फायदा :—**

जीएसटीने केवळ ग्राहकांच्या आवश्यक असलेल्या वस्तूवरचे दर कमी केले नाहीत तर कर आकारणी देखील सुलभ केली आहे. जेणेकरून एखादे उत्पादन किंवा सेवा खरेदी करताना ग्राहकांना पारदर्शकता येईल.

**केंद्र आणि राज्यातला जीएसटी वाद :—**

आर्थिक वर्ष २०२०—२१ मध्ये जीएसटी महसूल २.३५ लाख कोटी रूपयांनी कमी होण्याचा अंदाज अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी व्यक्त केला होता. राज्यांना आतापर्यत १.६५ लाख कोटी जीएसटीची नुकसान भरपाई म्हणून देण्यात आले असून यापूढे राज्यांनी कर्ज घ्यावे आणि गरज पूर्ण करावी असे केंद्रानी म्हटले आहे.

राज्यांना आर्थिक संकटातून बाहेर काढणे केंद्राची जबाबदारी आहे. केंद्राने राज्याला जीएसटी भरपाई रक्कम द्यायला हवी असे राज्य सरकारचे म्हणणे आहे. तर कोरोनाचा जीएसटी कलेक्शनवर परिणाम झाला असून केंद्राचे २.३५ कोटीचे नुकसान झाल्याने राज्यांनी कर्ज घ्यावे असे केंद्रानी म्हटले. केंद्राला कर्ज कमी दराने मिळू शकते. परंतू राज्याने कर्ज घेतल तर त्यावर जास्त व्याजदर द्यावा लागेल त्याचा परिणाम सेसवर होईल. परिणामी ग्राहकांवर सगळा भार पडेल असा युक्तिवाद राज्यांनी मांडला.

**निष्कर्ष :—**

जीएसटीमूळे पुरवठा साखळीत एकच कर ठेवण्याची तरतूद आहे. जिथे प्रत्येक व्यक्ति आधीपासून भरलेल्या सर्व करांचा करलाभ घेण्यास सक्षम आहे. ग्राहकाने वस्तूवर किती कर भरला आहे हे समजते. जीएसटीला व्यापकव्याप्ती आहे त्यामुळे प्रत्येक टप्प्यात कर लाभाद्वारे जास्तीत जास्त मूल्यांकनाचा समावेश होतो आणि शेवटी ग्राहकांना त्याचा लाभ मिळतो.

एकूणच एक साधा कर कोड देशाच्या दृष्टीने अत्यंत फायदेशीर आहे. भारतीय अर्थव्यवस्थेसाठी ही वाढ कायम आहे. करप्रणालीची ही भरपाई लांबणीवर पडली होती. धोरणात अंमलबजावणी झाल्यामूळे धोरणात बदल आणि टॅक्स कर बदलले जाणे यासारख्या समस्या उद्‌भवल्या आहेत. परंतू एकूणच ही यंत्रणा रूळावर परत येत असल्याचे दिसते.

**उपाययोजना :—**

**घोटाळे रोखण्यासाठी बायोमेट्रिक पडताळणीचा आधार :—** बनावट पावत्या देवून वस्तू आणि सेवा करामध्ये होणारे घोटाळे रोखण्यासाठी ऑनलाईन नोंदणीसह आधार बायोमेट्रीक यंत्रणेचा वापर करण्याचा प्रस्ताव आहे. ही व्यवस्था बॅका, पोस्ट ऑफिस आणि जीएसटी सेवा केंद्रामध्ये पुरविण्यात यावे.

जीएसटीच्या प्रावधानामूळे विमाधारकाला जास्त प्रिमिअम भरावा लागत आहे व त्यावर मिळणारा परतावा कमी झालेला आहे. विमा सामाजिक सुरक्षेचा मान आहे त्यामूळे विमा सेवेवर लागणारा जीएसटीचा दर कमी करण्यात यावा.

अनेक सेवांसाठी पूर्वी १४% असणारा कर ह्या करप्रणालीमूळे १८% झाला आहे. त्याचा परिणाम चलनवाढीवर झाला आहे. म्हणून सेवांसाठी कराचा दर १४% वर करण्यात यावा.

करप्रणाली सुलभ आहे असे शासनाकडून सांगण्यात येत असले तरी प्रत्यक्षात वर्षाला अनेक विवरणपत्रे तयार करण्याचा त्रास करदात्यांना आहे. हि विवरणपत्रे कमी करावी.

**संदर्भ ग्रंथसुची :—**

१) भारताचा आर्थिक विकास आणि नियोजन डॉ. विजय कविमंडण

२) वस्तु व सेवा कर प्रा. पठीक शहा

३) इंटरनेट वेबसाईड

४) जीएसटी इंडिया इकॉनॉमी ॲण्ड पॉलिशी.

५) वस्तु व सेवा कर

६) दैनिक लोकसत्ता

ISSN : 2278-9308
Fabruary, 2021

# पिक विमा योजनेचा शेतकरी वर्गावर झालेला आर्थिक परिणाम

प्रा.विकास सुरेश ढुमणे
वाणिज्य विभाग
लोकमान्य महाविद्यालय, वरोरा जि. चंद्रपूर (महा.), पिन. ४४२९०७

**सारांश :—**

भारतीय अर्थव्यवस्थेत कृषीला अतीशय महत्व आहे. प्राचीन काळापासुन स्वत:च्या मुलभुत गरजांच्या पुर्ततेसाठी भारतीय लोक कृषीचा आधार घेत असल्याचे दिसून येते. देशात आज सुमारे ६९ टक्के लोक ग्रामीण भागात म्हणजेच खेड्यात राहतात आणि या लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हाच आहे. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा महत्वपुर्ण स्त्रोत म्हणून कृषी क्षेत्राकडे पाहीले जाते. सन २०११ च्या जनगणनेनुसार शेतीवर अवलंबून असणाऱ्या शेतकरी व शेतमजुरांचे प्रमाण हे ५८ टक्के आहे.

शेती क्षेत्रामध्ये कमालीची अनिश्चितता व मोठी जोखीम असते. अपुरे व अनिश्चित पर्जन्यमान, पुर, दुष्काळ, कीड आणि इतर अनेक कारणांमुळे शेतीतील उभी पीके नष्ट होतात. त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होते. शेतीतील पिकांसाठी शेतकऱ्यांनी आपले भांडवल आणि श्रम लावून वाढविलेले पीके कापणी होईपर्यत व्यवस्थित राहीलच याची शाश्वती कोणालाही देता येत नाही. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान तर होतेच परंतू पुर्ण उत्पादन होण्यासाठी लागणारी माणसिक शक्ती देखील शेतकरी घालवून बसतो, कारण पुन्हा पेरणी करून देखील पीक हाती येईलच याची खात्री त्याला नसते. या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी पीक विमा योजनेची संकल्पना समोर आली.

शेत जमीनीमधील उभी असणाऱ्या पिकांना अतिवृष्ठी, वादळ, आग, कीड इत्यादी धोक्यांपासुन होणाऱ्या नुकसानीचे भरपाई देऊन पीकांना आर्थिक संरक्षण प्राप्त करून देते. त्यासाठी एका निश्चित रक्कमेचा भरना करावा लागतो. यास विमा हप्ता असे म्हणतात. या विमा हप्त्याच्या मोबदल्यात पिकावरील संभाव्य जोखीमीमुळे उद्भवणाऱ्या हानीची जबाबदारी विमा कंपनी स्विकारते.

**प्रस्तावना—**

मानवी जीवनाच्या उपजिविकेचे साधन म्हणून कृषी व्यवसायाला आत्यंतिक महत्व दिसून येते. हजारो वर्षापूर्वी आदिमानव हा झाडांची फळे, कंदमुळे गोळा करून आपला उदरनिर्वाह करीत असे. सुमारे ११ हजार वर्षापूर्वी भटकणाऱ्या लोकांच्या लक्षात आले की, झाडावरून जमिनीवर पडणारे बियाणे पाऊस पडल्यानंतर योग्य वातावरण मिळताच रूजते व उगवते व त्या वनस्पतींची वाढ होते. यावरून अन्नधान्य प्रक्रियेची सुरूवात झाली. जगातील पहिली मानवी वसाहत इजिप्त मधील नाईल नदीच्या किनाऱ्यावर वसली. तेथेच कृषी व्यवसायास मानवाने सुरूवात केली. या व्यवसायात पाण्याचे सुध्दा महत्व लक्षात आल्यामुळे नाईल नदीवर पहिले धरण बांधण्यात आले. त्या पाण्याचा उपयोग शेतीसाठी करण्यात आला. भारत हा सुध्दा कृषीप्रधान देश असून प्राचीन काळापासून भारतीय शेतीला ऐतिहासिक व सांस्कृतिक असे महत्व प्राप्त झालेले आहे.

भारत देशातील मुख्य व्यवसाय कृषी हा आहे. भारतीय कुटूंबाचे उदरनिर्वाहाचे सर्वात महत्वाचा व्यवसाय शेती हा आहे. कृषी क्षेत्रामध्ये शेती बरोबरच पशुपालन हा जोडव्यवसाय म्हणून केला जातो. भारतातील कृषी उत्पादनाचा सकल देशीय उत्पादनातील १६% हिस्सा हा कृषी क्षेत्राचा आहे. भारतातील ६०% जमीन लागवडी योग्य आहे. जगातील एकुण लागवडीखालील क्षेत्रापैकी भारतीय लागवडीखालील क्षेत्राचा दुसरा क्रमांक लागतो. सकल देशीय उत्पादनाचा कृषी क्षेत्रातील हिस्सा कमी होत असताना दिसून येत आहे, परंतु कृषी देशातील अर्थव्यवस्थेचा मुख्य घटक आहे. भारत देशात मोठ्या प्रमाणात खाद्यान्न, तेलबीया, दाळी, उत्पादन केल्या जातात, परंतु त्यामध्ये मोठा हिस्सा १२१ करोड लोकांच्या घरेलु उपभोगासाठी वापरला जातो. भारत देशातून अधिशेष धान्य व कृषी उत्पादन निर्यात केले जाते. भारत देशातून मोठ्या प्रमाणात कृषी उत्पादन ज्युट, चहा, तंबाखू, कॉफी, मसाले, साखर इत्यादी निर्यात केले जातात. यामुळे विदेशी मुद्रा

वाढण्यास मदत होते. भारताचा कृषी उत्पादनाच्या निर्यातीबाबतीत जगात ७ वा क्रमांक लागतो. सन २०१३ मध्ये निर्यात केलेल्या कृषी उत्पन्नाची किंमत ३९ दशलक्ष डॉलर इतकी होती.

सन १९६० या दशकात हरितक्रांतीला सुरवात झाल्यानंतर खाद्यान्न उत्पादनात खूप मोठ्या प्रमाणात वाढझाली. हरितक्रांतीमुळे नवनविन तंत्रज्ञान, आधुनिक कृषी बीयाणे, रासायनिक खते इत्यादींचा वापर वाढला, यामुळे भारतीय कृषी अर्थव्यवस्थेला चालना मिळाली. हरितक्रांतीमुळे कृषी उत्पादनात सन १९७० ते २०१९ मध्ये मोठा वृध्दीदर दिसून येतो. प्रतिहेक्टर सरासरी उत्पादनामध्ये गहू, तेलबीया आणि कापुस यामध्ये १००% पेक्षा जास्त वाढझाली.

भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास कृषी क्षेत्रामध्ये दडलेला आहे. म्हणून या क्षेत्राचा सर्वांगिण विकास होणे गरजेचे आहे. मात्र गेल्या दशकातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येची आकडेवारी अभ्यासली तर असे दिसते की, या कृषी प्रधान देशातील शेतकरी हा अतिशय हलाखीची स्थिती जगत आहे. या व्यवसायात आर्थिक लाभ होणे तर दुरच त्यांच्या दैनंदिन आवश्यक गरज देखील पूर्ण होत नाहीत. यावरून असा संभ्रम निर्माण होतो की, या देशात कृषी क्षेत्राचा खरोखरच विकास होत आहे किंवा नाही. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी पंतप्रधान पॅकेज अंतर्गत विशेष आर्थिक व इतर साहाय्य देवून सुध्दा शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारलेली नाही. यावरून महाराष्ट्रातील शेतकरी कशा प्रकारे जीवन जगतो ? कृषी क्षेत्राचा विकास खरोखरच होत आहे का ? शासकीय योजनांचा लाभ किती शेतकऱ्यांना मिळतो ? शेतीमध्ये तुलनात्मक लाभदायक पीके कोणती ? शेतीच्या आद्यावत कोणत्या समस्या आहेत ? या सर्वांचा मागोवा घेणे व जलद विकासासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

जागतीक स्तरावर कोणत्या ना कोणत्या स्वरूपात पीक विमा योजना चालू आहेत. पीक विम्यामध्ये रशिया, जपान, अमेरिका हे देश प्रामुख्याने अग्रेसर आहेत. स्पेन देशात कृषी विमा योजना १९२० मध्ये सुरवात झाली. या देशात १९७० पर्यंत वेगवेगळ्या पीक विमा योजना लागू केल्या. स्पेन मध्ये सार्वजनिक क्षेत्र व खाजगी क्षेत्रातील गुंतागुंतीवर विमा योजना लागू केली गेली. यापध्दतीमध्ये शेतकरी व्यक्तिगत किंवा सरकारी संस्था आणि व्यावसायिक संघटनांद्वारे पीक विमा योजना घेऊ शकते. यामधील सहभाग ऐच्छिक स्वरूपाचा असतो. रशियामध्ये पीक विमा योजना १९२३ पासून अंमलात आली. रशियामध्ये नैसर्गिक जोखमेपासून होणाऱ्या नुकसानीसाठी विमा देण्यात येतो. सन १९२९ मध्ये दक्षिण आफ्रिकेमध्ये शेतकरी समुहाने एक मंडळ स्थापन करून पीक विमा सुरवात करण्यात आला. या पीक विमा योजनेत अनेक जोखमीचा समावेश करण्यात आला आहे नैसर्गिक / प्राकृतिक, मानवनिर्मीत इ. जोखमेचा समावेश केला गेला आहे. संयुक्त राज्य अमेरिकेमध्ये सन १९३८ मध्ये संघराज्य पीक विमा योजना अधिनियम मंजूर करण्यात येवून संघराज्य विमा महामंडळाची स्थापना करण्यात आली. या महामंडळामार्फत शेती उत्पादनातील आर्थिक संकटापासून शेतकऱ्यांचे संरक्षण केल्या जाते. जपानमध्ये पिक विमा योजनेची सुरवात १९४१ मध्ये करण्यात आली होती. जपानमध्ये सर्व पीकासाठी अनिवार्य स्वरूपाची पीक विमा योजना आहे. त्यामुळे तेथील काही प्रदेशामध्ये संकटाचा प्रभाव झाल्यास त्या क्षेत्रांना मोठी मदत करणे शक्य होते. फिलीपाईन्स देशामध्ये पीक विमा योजनेची अंमलबजावणी सन १९७८ मध्ये स्थापन केलेल्या फिलीपाईन्स पीक विमा महामंडळ (PCIS) मार्फत केले जाते. या योजनेत भात व मका या पीकांचा प्रामुख्याने समावेश केलेला आहे. शेतकऱ्यांना विमा हप्त्याचे ५० टक्यापर्यंत अनुदान दिले जाते. या योजनेत नैसर्गिक आपदापासून होणारे नुकसान व किडीपासून होणाऱ्या नुकसानीस संरक्षण दिले जाते. श्रीलंका या देशात सर्वप्रथम १९५८ मध्ये प्रायोगिक पीक विमा योजना पायलट स्वरूपात फक्त भाताच्या पीकासाठी सुरू केली, नंतर पीक विमा योजनेत भात आणि इतर पीकासाठी विमा संरक्षण देण्यात आले आहे.

भारतामध्ये पीक विमा योजना लागु करण्याची सुचना स्वातंत्र्यपूर्ण काळात करण्यात आली. मात्र स्वातंत्र्यानंतर लगेच पीक विम्याच्या कामास सुरवात झाली. पीक विमा विषयी संसदेमध्ये १९४७ ला चर्चा करण्यात आली. १९४८ मध्ये भारत सरकारच्या कृषी मंत्रालयद्वारे भारतातील पशु विमा व कृषी विमा स्थितीचा अभ्यास करण्यासाठी श्री. जी. एस. प्रियोलकर यांना नियुक्त करण्यात आली. त्यांनी आपला अहवाल १९४९ मध्ये मुंबईमध्ये देण्यात आला. त्यांच्या अहवालानुसार पायलट पीक विमा योजना सर्व राज्यासाठी सुरू करण्यासाठी सुचना देण्यात आली. यानंतर सन १९६५ मध्ये भारत सरकारने एक पीक विमा विधेयक संसदेत मांडले आणि एक मॉडल पीक विमा योजना सुरू केली. परंतु राज्यानी आर्थिक कारणामुळे त्यायोजनेस नाकारले. सन १९७२—७३ पासून मर्यादित स्वरूपात पीक विमा योजना भारतीय

जीव विमा महामंडळाच्या सर्व साधारण विमा विभागाने H४ कापसाच्या जातीसाठी एक पीक विमा योजना सुरू केली. ही योजना सन १९७८–७९ पर्यंत देशात चालु होती. खरीप १९७९ पासून पायलट पीक विमा योजना प्रायोगिक तत्वावर सुरू करण्यात आली. पायलट पीक विमा योजना ही १९८५ पर्यत चालू होती. यानंतर १९८५ पासून व्यापक पीक विमा योजना सुरू करण्यात आली. व्यापक पीक विमा योजनेमध्ये १५ घटक राज्य व २ केंद्रशासिक प्रदेश यात लागु करण्यात आले. ही योजना वित्तीय संस्थांकडून कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांसाठी अनिवार्य स्वरूपाची होती.

व्यापक पीक विमा योजनेमधील समस्या आणि त्यामध्ये असणाऱ्या सुधारणेच्या संधीतून भारत सरकाने १९९८–१९९९ च्या अर्थसंकल्पात नविन पीक विमा योजनेची घोषणा केली. माननीय प्रधानमंत्री यांनी २२ जून १९९९ रोजी राष्ट्रीय कृषी विमा योजनेची घोषणा करून शेती उत्पादनाच्या जोखीम व्यवस्थापन इतिहासात एक नविन अध्याय जोडून ही योजना देशाला समर्पित केली. १९९९–२००० च्या रब्बी हंगामापासून विद्यमान व्यापक पीक विमा योजनेचे विसर्जन करून राष्ट्रीय पीक विमा योजना भारत सरकाने १६ जुलै १९९९ रोजी शासकीय अध्यादेश काढून या योजनेची अंमलबजावणी सुरू केली.

राष्ट्रीय पीक विमा योजना सर्व शेतकऱ्यांसाठी लागू केली. ज्यांनी वित्तीय संस्थांचे कर्ज घेतले आहे अशा साठी आणि ज्यांनी कर्ज घेतले नाही अशासाठी ही योजना लागू केली. राष्ट्रीय कृषी विमा योजना, पीक विमा संरक्षण तथा संभावित धोरण याविषयी व्यापक पीक विमा योजनेपेक्षा अधिक जास्त संरक्षण देते. सरकारच्या विचारात सरकारी विमा महामंडळातंर्गत एक स्वतंत्र कंपनी स्थापन करणे होते व ते २००३ मध्ये कृषी पीक विमा महामंडळ मर्यादीत या नावाने स्थापना केली व तिला योजनेमध्ये सुधारणा करणे, योजना चालवणे, हे स्वातंत्र्य देण्यात आले.

**शेती व्यवसायाचे महत्व –**

भारतामध्ये पुरातन काळापासून व आजही कृषी क्षेत्राला अनन्यसाधारण महत्व आहे. कारण भारताची संपूर्ण अर्थव्यवस्थाच कृषीवर आधारीत आहे. अर्थव्यवस्थेचा कणा म्हणजे कृषी असे म्हटले जाते. राष्ट्रीय उत्पन्नात भारतामध्ये शेती व इतर प्राथमिक व्यवसायातून मिळणारा हिस्सा १९७५–७६ मध्ये ४३.०१ टक्के इतका होता. नैसर्गिक आपत्ती म्हणजे अवर्षण, दुष्काळ, अतिवर्षण यामुळे शेती उत्पादनात चढउतार दिसतात. तरीही शेती हा राष्ट्रीय उत्पन्नाचा सर्वात प्रमुख स्त्रोत आहे. प्रगत राष्ट्रात एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा २ ते ६ टक्क्या दरम्यान आढळतो. इंग्लंडमध्ये शेतीचा राष्ट्रीय उत्पनातील कृषी वाटा ३.१ टक्के तर अमेरीकेत तो ३.२ टक्के, ऑस्ट्रेलियामध्ये हे प्रमाण ७.६ टक्के इतके आहे. भारतात आजही राष्ट्रीय उत्पन्नातील कृषीक्षेत्राचा वाटा १४ ते १५ टक्क्यादरम्यान आहे. सन २०१०–११ मध्ये १४.२ टक्के इतका होता.[२] २०१४–१५ मध्ये हा वाटा १७.४ टक्के इतका होता. म्हणजेच कृषी क्षेत्र देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्वपूर्ण भूमिका बजावते. या क्षेत्राचे महत्व पुढीलप्रमाणे.

१) भारतासारख्या अतिरिक्त लोकसंख्येला अन्नधान्याची उपलब्धता शेतीमधूनच होते.
२) भारताच्या संपूर्ण औद्योगिक क्षेत्रासाठी लागणारा मोठ्या प्रमाणावर कच्चा माल हा शेतीमधूनच निर्मित होतो.
३) सर्वाधिक रोजगार निर्मिती क्षेत्र म्हणून कृषीकडे पाहिले जाते.
४) भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात पुर्वी ४५ टक्के वाटा तर आजही २७ टक्के वाटा हा कृषी क्षेत्राचा आहे.
५) देशातील विस्तृत बाजारपेठांचे अस्तित्व कृषी क्षेत्रावर आधारीत आहे.
६) भांडवल निर्मितीसाठी अलिकडे कृषी क्षेत्राचा वाटा दिसून येतो.
७) भारताच्या निर्यातीत कृषी क्षेत्राचा फार मोठा वाटा दिसून येतो.
८) भारतीय लोकसंख्येपैकी ७० टक्के प्रत्यक्ष व २५ टक्के अप्रत्यक्ष लोक या क्षेत्रावर अवलंबून आहेत.
९) भारतीय अर्थव्यवस्था अधिक गतिमान होण्यासाठी कृषी क्षेत्राची सर्वाधिक मदत होते.
१०) देशाच्या आर्थिक विकासात कृषी क्षेत्राला विशेष महत्व आहे.
११) भारत देशातील पर्यावरण संतुलनासाठी कृषी क्षेत्राची महत्वाची कामगिरी आहे.

शेतीक्षेत्राच्या विकासावरच जगातील काही राष्ट्र विकासाच्या अति उच्च शिखरापर्यंत पोहचले आहेत. इंग्लंड, जर्मनी, जपान, रशिया इत्यादी देशांच्या विकासामध्ये शेतीक्षेत्राने महत्वाची भूमिका बजावून जलद विकासासाठी सुदृढ आधार

निर्माण केला आहे. शेतकरी राष्ट्रीय आयोगाचे अध्यक्ष डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांच्या मते,'भारतीय कृषीक्षेत्र करोडो शेतकऱ्यांचे जिवन सफल बनवू शकले'.

**संशोधन विषयाचे महत्व –**

भारतातील कृषी उत्पादन आणि उत्पन्न बहुतेक प्राकृतिक आपदा म्हणजेच दुष्काळ, पुर, चक्रीवादळ, वादळ, मुद्रा, अपक्षय आणि भूकंप यावर अवलंबून आहे. आणि त्यामध्ये मानवनिर्मित आपदासुध्दा आहेत म्हणजेच आग, बनावट बीज विक्री, खते व किटकनाशं, किंमत युध्द इत्यादी हे सर्व शेतकऱ्यांच्या कृषि उत्पादन आणि उत्पन्न कमी करण्यावर प्रभाव टाकतात आणि एकूणच हे शेतकऱ्यावर नियंत्रण (मर्यादा) टाकतात. उत्पन्नातील अनिच्छितेमुळे शेतकरी शेतीमध्ये नविन सुधारणा करू शकत नाहीत. शेतकरी आपल्या आर्थिक गरजाची पुर्तता करण्यासाठी कर्ज घेऊन कळत–नकळत सावकारी कर्जाच्या विळख्यात अडकतो. म्हणून भारतीय शेतकऱ्यांच्या कर्ज विषयक जीवनाविषयी "भारतीय शेतकरी कर्जात जन्मतो, कर्जात जगतो, आणि कर्जात मरतो." असे वर्णन केले आहे. या स्थितीतून शेतकऱ्यांची सुटका करण्यासाठी शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शेतकऱ्यांना मदत करण्याच्या हेतुने भारतात पीक विमा योजना लागू करण्याची गरज भासू लागली.

शेतीचे वाढते व्यापारीकरण आणि शेतीच्या कमी आकारमानामुळे प्रतिकूल संभ्याावतेमध्ये वाढ होत आहे. या धोक्यापासुन शेतकऱ्यांचे कसे संरक्षण केले पाहिजे हा प्रश्न आहे. शेतकऱ्यांना काही पिकांना आधारभूत किंमत दिल्याने उत्पन्नात स्थिरता निर्माण करता येईल. परंतू बऱ्याच पिकांच्या बाबतीत आणि बहुतेक राज्यात हे लागू केले नाही. आधुनिककाळात करार शेती, आणि भावी व्यापार अस्तित्वात आहे. यामध्ये काही प्रत्यक्ष अप्रत्यक्ष अंदाजीत किंमतीवर विमा दिला जातो. परंतू कृषी विमा एक महत्वपूर्ण कार्य करते जे शेतकऱ्याच्या कृषी उत्पादन आणि उत्पन्न यांच्यातील नैसर्गिक आणि मानवनिर्मित जोखिमेतील अनिच्छितता दूर करत आहे. केंद्र व राज्य शासनाच्या सहयोगाने १९७९ साली 'पायलट पीक विमा योजना', १९८५ साली 'व्यापक पीक विमा योजना', १९९७–९८ साली 'प्रायोगिक पीक विमा योजना' राबविण्यात आल्या. वरील सर्व योजना विशिष्ट पीके आणि विशिष्ट प्रदेशापर्यंतच मर्यादित होत्या. ही कमतरता दूर करून राष्ट्रीय पातळीवर देशातील सर्व शेतकऱ्यांना कृषी उत्पादनातील जोखिमे पासून सुरक्षा देण्यासाठी १९९९–२००० च्या खरीप हंगामापासून सर्वसमावेशक अशी 'राष्ट्रीय पीक विमा योजना' १९९९–२००० प्रारंभ केला आहे.

भारताचे पीक विमा लागू करण्याची सुचना स्वातंत्र्यपूर्व काळापासून करण्यात येत आहे. अमेरिकेत जसा संघीय पीक विम्याचा उपयोग केला जातो. त्या आधारावर भारतात पीके व पशुविमा सुरू करावा असे डॉ. नायडू समितीने मद्रास प्रांतिय अभ्यासात सुचवले होते. सरेय्या समितीने प्रियोलकर समिती व इतर काही संस्थानीही पीक विम्याचे आग्रही प्रतिपादन केले होते. प्रा. दांडेकर यांनी १९७६ मध्ये क्षेत्र आधारीत पीक विमा योजना लागू करण्याची सुचना केली होती. व सरकारच्या सहयोगाने हे काम १९७९ असे जनरल इंशुरंस कार्पोरेशन ऑफ इंडीया (GIC) ही संस्था करत आहे. या योजनेचा सबंध निरनिराळ्या संस्थानी दिलेल्या पीकेकर्जाशी जोडण्यात आलेला आहे. जर एका समान भौगोलिक झाले तर त्या भागातील शेतकऱ्यांना विम्याचा लाभ मिळतो.

१९८५ च्या अंदाजपत्रकात सरकारने विम्याची व्यापक योजना (Comprehensive Crop Insurance Scheme) घोषीत केली व १९८५ च्या खरीप हंगामापासून राज्यसरकार व जी. आय. सी. यांच्याद्वारे ही योजना राबविली जाते. सरकारी संस्था, व्यापारी बॅंक, ग्रामीण बॅंक यानी दिलेल्या पीक कर्ज आणि विमा यांची सांगड घातली आहे. २३ जून १९९९ मध्ये मा. पंतप्रधानांनी राष्ट्रीय कृषी विमा योजना (आर.बी.वाय) ही राष्ट्रीय कृषी योजना (एन.ए.टी.एस.) अंतर्गत सुरू केली. राष्ट्रीय कृषी विमा योजना ही २५ राज्ये व केंद्रशासीत प्रदेशात सुरू केली. १९९९–२००० ते २०११–१२ या कालावधीत ३०१४३५ (हजार) शेतकऱ्यांच्या २६४३५ (हजार हेक्टर) शेतीवर विमा उतरण्यात आला होता.

शेती व्यवसायावर नैसर्गिक बदलाचा मोठ्या प्रमाणात परिणाम होतो. अनिच्छिततेमुळे शेतीच्या उत्पादनामध्ये अनिश्चितता येते. भारतीय शेती मान्सूनचा जुगार आहे. महापुर, दुष्काळ, अतिवृष्टी, आग, वादळ, रोगराई इत्यादी घटकांचा शेती उत्पादनावर प्रभाव पडतो. बऱ्याच वेळा शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. काही वेळा शेतकरी आपल्या उत्पादनाचा खर्च भरून काढू शकत नाही त्यामुळे शेतीतील उत्पनात आणि उत्पादनात अनिश्चितता होते. अशा वेळेस

शेतकरी आर्थिक गरजेची पुर्तता करण्यासाठी कर्ज घेवून तो कर्ज जाळ्यात अडकतो. या स्थितीतून सुटका करण्यासाठी शेतकऱ्यांना दिलास देण्याच्या हेतूने भारतामध्ये राष्ट्रीय पीक विमा योजना महत्वाची भूमिका बजावत आहे.

**संशोधन विषयाची निवड :–**

महाराष्ट्र राज्याची निर्मिती १९६० झाली तेव्हापासून महाराष्ट्रामध्ये कृषीवर विसंबून असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ७० टक्के आहे. तसेच सिंचनाचे अल्प प्रमाण आहे. त्यामुळे शेती उत्पादनच्या बाबतीत जोखीम मोठ्या प्रमाणात आहे. नैसर्गिक आपदामुळे शेत उत्पादनात अनिश्चितता आहेत. येथे शेती उत्पादनातील अनिश्चितता दुर करण्याची पीक विमा योजनेची आवश्यकता आहे. पडणाऱ्या पावसाचे प्रमाण कमी–जास्त असून शेती ही पुर्णपणे निसर्गावर अवलंबून आहे. शेतकऱ्यांकडे शेतीत सुधारणा करण्यासाठी पुरेसे भांडवल नाही. भांडवलासाठी त्याला खाजगी सावकाराकडे जावे लागते. त्यास कर्जाची परतफेड करण्यासाठी त्यास खुपदा जमीन विकावी लागते. अशा परिस्थितीत पुढील हंगामातील बीज, खते, किटकनाशक घेण्यासाठी सुध्दा त्याच्याकडे पुरेसे आर्थिक पाठबळ नसते. यासाठी पीक विमा योजना एक वरदान ठरते. पीक विमा योजना शेती उत्पादनातील जोखीम कमी करण्याचे काम करत आहे. ग्रामीण भागातील समस्यांचे निराकरण करून त्यावरील उपाययोजना या विविध सहकारी योजनाद्वारे केल्या आहेत. परंतू प्रत्यक्षात या योजनेत लाभार्थी व योजनेतील अंमलबजावणीत अडचणी आहेत. त्यावरील उपाययोजना सुचविण्याविषयक अभ्यास होण्याची गरज आहे. तसेच या योजने विषयी आजपर्यंत अभ्यास झाल्याचे दिसून येत नाही.

भारतातील इतर घटक राज्याशी तुलना करता पीक विमा योजना महाराष्ट्रामध्ये प्रभाविपणे राबविली आहे.

**संशोधन विषयाची उद्दिष्टे :–**

पीक विमा योजनेच्या यशस्वीतेचा अभ्यास करतांना पुढील उद्दिष्टे समोर ठेवलेली आहेत.

१) शासनाच्या पीक विमा योजनेचे कृषी विकासातील महत्व जाणून घेणे.
२) शासनाच्या पीक विमा योजनांचा सविस्तर अभ्यास करणे.
३) पीक विमा योजनेमुळे पिक उत्पादनातील अनिश्चितता कमी होणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.
४) पीक विमा योजनेचालाभधारक शेतकऱ्यांच्या कृषी उत्पनावरील परिणामाचा अभ्यास करणे.
५) पीक विमा योजनेमुळेलाभधारक शेतकऱ्यांवर झालेल्या आर्थिक व सामाजिक परिणामांचा अभ्यास करणे.
६) पीक विमा योजनेच्या लाभाच्या संदर्भात येणाऱ्या विविध अडचणींचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके :–**

संपुर्ण संशोधन प्रक्रियेत गृहीतकाला अत्यंत महत्वाचे स्थान असते. पीक विमा योजनेचा अभ्यास करण्यासाठी खालील गृहितकृत्ये निश्चित करण्यात आलेली आहेत.

१) पीक विमा योजनेचे कृषी विकासातील महत्व वाढत आहे.
२) पीक विमा योजनाने शेतकऱ्यांना लाभ होत आहे.
३) पीक विमा योजनेमुळे शेतकऱ्यांच्या शाश्वत उत्पन्नात वाढीसाठी सहाय्यभूत ठरत आहे.
४) पीक विमा योजनेमुळे शेतकऱ्यांच्या उत्पादन विषयक अनिश्चितता दुर होत आहे.
५) पिक विमा योजनेत शेतकऱ्यांच्या समस्या आहेत.

**संशोधन पध्दती :–**

प्रस्तूत संशोधन पध्दतीमध्ये पीक विमा योजनांचा शेतकऱ्यावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करतांना प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोत या दोन्ही पध्दतींचा वापर करण्यात आला आहे.

**अ) प्राथमिक स्त्रोत :–**

**अर्थ** – संशोधकाने स्वत:च्या अध्ययनातून प्राप्त केलेल्या तथ्यांना प्राथमिक तथ्ये असे म्हणतात. त्यासाठी ज्या पध्दतीचा अवलंब केला जातो त्यांना प्राथमिक स्त्रोत असे म्हटले जाते.

सदर संशोधन प्राथमिक स्त्रोताच्या आधारे प्रत्यक्ष निरीक्षण, अनुसुची व मुलाखतीच्या आधारे केलेले आहे.

**प्रत्यक्ष निरीक्षण** – या पध्दतीत संशोधकाने निश्चित केलेल्या संशोधन विषयाशी संबंधीत क्षेत्राला त्यांनी स्वत: जाऊन तेथील व्यक्ती, घटना, वस्तु आणि व्यवहार इत्यादिंशी प्रत्यक्ष संपर्क प्रस्थापीत करून त्यांचे प्रत्यक्ष निरिक्षण करून तथ्य संकलन केलेले आहे.

**अनुसूची** – अनुसूची म्हणजे प्रश्नांची संक्षिप्त यादी असून ती संशोधक स्वत: जवळ ठेवतो आणि जस जशी माहिती मिळते तसतशी ती त्यात भरत जातो. अनुसूचीचे एक वैशिष्ट म्हणजे अशिक्षीत व्यक्तिकडून तथ्ये संकलीत केलेली आहे.

**मुलाखत** – प्राथमिक तथ्ये संकलीत करण्याचे मुलाखत हे अत्यंत प्रभावी माध्यम आहे. संबंधीत व्यक्तीशी संभाषण करून संशोधन विषयासंबंधी तथ्ये गोळा करण्याच्या क्रियेला मुलाखत असे म्हणतात.

सदर संशोधन प्राथमिक सामग्रीच्या आधारे केलेले आहे. यासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केलेला आहे. सर्वेक्षणासाठी रब्बी २०१८–२०१९ या वर्षातील शेतकऱ्यांची निवड करण्यात आली आहे. निवड केलेल्या लाभार्थ्यांकडून अनुसुचीच्या आधारे मुलाखत घेवून विश्लेषण केलेले आहे. शेतकऱ्यांकडून अनुसुचीद्वारे लाभ्यार्थ्यांचे वयोमान, शिक्षण, कौटुंबीक माहिती, शेतीची स्थिती, पीक विम्याची स्थिती इत्यादी माहिती संकलीत केली आहे. पीक विमा योजनेमूळे शेतीच्या तंत्रज्ञानावर, उत्पादनावर व रोजगारावर काय परिणाम झाला याबाबतची माहीती प्राथमिक स्त्रोंताद्वारे संकलित केली आहे.

**ब) दुय्यम स्त्रोत :–**

**अर्थ** – जी तथ्ये स्वत: संशोधकांची नसून अन्य व्यक्ती आणि संस्था यांच्याद्वारे संकलीत केली जातात. संशोधकाने त्याचा उपयोग केला आहे. तसेच त्यांच्या संकलनासाठी ज्या पध्दतींचा अवलंब केला जातो त्यांना द्वितीय पध्दती असे म्हणतात.

पीक विमा योजनेसंदर्भात विस्तृत लिखाण आढळून आले नाही.यासाठी प्रामुख्याने भारत सरकारच्या कृषी मंत्रालयाचे अहवाल, शासनाची पुस्तके, विविध मासिकातील शोधनिबंध, महाराष्ट्र शासनाच्या कृषी मंत्रालयाचे अहवाल, ग्रंथ, नियतकालिके, जिल्हा सांख्यिकी अहवाल, भारतीय रिजर्व बॅंकेचे अहवाल, वेबसाईट इत्यादी, प्रकाशित व अप्रकाशित साहित्यावर अर्थसंवाद, वनराई, लोकराज्य योजना, अर्थमंथन, दै. वृत्तपत्रे तसेच पीकविम्याचे संदर्भात धोरण व कार्यपध्दती ठरविण्यासाठी देशात व महाराष्ट्र राज्यात विविध अयोग व समित्या स्थापन करण्यात आल्या त्यांचे अहवाल, विषयाशी संबधीत आंतरराष्ट्रीय जर्नल, बुलेटीन संकेतस्थळावरील पीक विम्यासंदर्भात वेगवेगळी माहिती यांचा आढावा तसेच विविध संशोधकांनी वेगवेगळ्या विद्यापीठात पीक विमा योजनेचे अध्ययन करून सादर केलेल्या प्रबंधातील निष्कर्ष व शिफारशींचे अध्ययन करून केलेले आहेत.

**पुर्व साहीत्याचा आढावा:–**

पीक विमा योजनेवर आजपर्यत अनेक अभ्यासकांनी आप–आपले स्वतंत्र विचार मांडलेले आहेत. पिक विमा योजने विषयी संशोधनात्मक लेख हे वेगवेगळ्या पुस्तकातून व मासिकातून प्रसिध्द केलेले आहेत. त्याचे अवलोकात्मक स्वरूपात स्पष्टीकरण खाली देण्यात आले आहे. पीक विमा योजना सर्वसामान्य शेतकऱ्यांना आधार देणारी योजना आहे.

प्रस्तुत प्रकरणात पीक विमा योजनेविषयी ज्या लेखक, संशोधक, अभ्यासकाने संशोधन केले आहे. तसेच त्यांनी मांडलेले विचार, मते त्याचा संक्षिप्त आढावा घेण्यात आलेला आहे.

१) बुटस आणि बोलेस (१९५८) :–यांनीBost and Boles use of Normal Curve theory in crop Insurance making या लेखात शेतकऱ्यांसाठी अनिश्चितता कमी करण्यासाठी पीक विमा लागू करावा. शेतकऱ्यांची जोखीम कमी होईल व संरक्षण मिळेल.

२) दांडेकर व्हि एम (१९७६) :– यांनी Crop Insurance In India या लेखातEconomic and Political weekly पीक विम्यासबंधी विवेचन केलेले आहे.

३) चंद्रकांत आणि रिबेलो (१९८०) :– यांनीCrop Insurance for Potatoes a Caise Study या लेखात पीक नुकसानीच्या धोक्यामध्ये दुष्काळ, महापूर, कीड आणि रोगराई यांचा समावेश विम्या अंतर्गत आला पाहीजे.

४) सुब्रमन्यम (१९८४) :– यांनी Economics teasibillity for crop Insurance for Coffee या प्रबंधात पीक रचनेतील खर्चा नुसार आणि दिर्घकाळातील सरासरी उत्पन्नानुसार पीक विमा हफ्त्यामध्ये परीवर्तन सुचविण्यात आले आहे.

५) दांडेकर व्हि एम (१९७६) :— यांनी Crop Insurance In India; A Review 1977-1985 या नव्याने सुरू करण्यात आलेल्या पीक विमा योजनेचे विवेचन केलेले आहे. १९७९—८० मध्ये सामान्य विमा योजनेने पीक विमा योजनाची क्षेत्र दृष्टीकोनानुसार किंवा क्षेत्र उत्पन्न, पीक विमा क्षेत्रात विशेष भर देऊन काही योजनांचा विचार करून दिलेला आहे.

**तथ्य संकलन, विश्लेषण व निर्वचन :—**

संशोधनामध्ये माहीतीच्या संकलनाला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. तथ्य संकलन म्हणजे संशोधन साधनाद्वारे माहीती मिळविली आहे.

कृती संशोधनामध्ये संशोधकाने तथ्य संकलन करूनच त्याचे विश्लेषण केलेले आहे. जोपर्यत माहीती संकलन होत नाही तोपर्यत तिचे विश्लेषण करून निष्कर्ष काढता येत नाही.

महाराष्ट्राचे भौगोलीक विभाजनाने एकूण सहा विभाग पाडले गेले आहेत. त्यामध्ये ते पुढीलप्रमाणे आहेत. कोकण, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र आणि खानदेश, मराठवाडा, विदर्भ (अमरावती), विदर्भ नागपूर

महाराष्ट्रातील भौगोलीक विभागानुसार पीक विमा भरणा क्षेत्र खालील प्रमाणे आहे. मागील पाच वर्षाचा कालावधी संशोधन विषयात दर्शविलेला आहे.

**तक्ता क्र. १**

| अ.क्र. | भौगोलीक विभागाचे नाव | वर्ष | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०१४ | २०१५ | २०१६ | २०१७ | २०१८ | |
| १ | कोकण | ५८ | ६० | ६४ | ७० | ७८ | **पीक विमा हप्ता भरणारे शेतकरी(टक्केवारी मध्ये)** |
| २ | पश्चिम महाराष्ट्र | ६० | ६३ | ७० | ७२ | ७९ | |
| ३ | उत्तर महाराष्ट्र आणि खानदेश | ५० | ५५ | ६८ | ७० | ७२ | |
| ४ | मराठवाडा | ६० | ६४ | ६८ | ७२ | ८१ | |
| ५ | विदर्भ (अमरावती) | ४२ | ४५ | ४८ | ५२ | ६० | |
| ६ | विदर्भ (नागपूर) | ४१ | ४२ | ४८ | ५० | ५५ | |

वरील तक्ता क्र. १ मध्ये असे लक्षात येते की, मागील पाच वर्षाच्या कालावधी मध्ये पीक विमा भरणा हप्ता टक्केवारी मध्ये प्रत्येक वर्षाला वाढता दिसुन येतो. संपुर्ण महाराष्ट्रातील प्रत्येक भौगोलीक विभागामध्ये विमा हफ्ता भरना वाढता आहे. पीक विमा भरना हफ्ता वाढता असल्याचे कारण की पिक विमा हफ्ता भरना केल्यास त्या वर्षात कोणतेही पीक जर नैसर्गीक आपत्तीत नुकसान दर्शवित असेल तर त्या नुकसानीची रक्कम या पीक विमा योजनेतुन पीक विमा कंपनी परतावा करते. यामुळे ही नुकसान भरपाईची बाब लक्षात घेत आज महाराष्ट्रातील जास्तीत जास्त शेतकरी पीकविमा हफ्ता भरना करीत आहे. यावरूनच असे लक्षात येते की, पीक विमा हफ्ता हा दरवर्षी मोठ्या प्रमाणात भरण्यात येतो व तो दर वर्षाला भरना करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या दिवस न दिवस वृध्दी होताना दिसते. वरील तक्त्यावरून असे लक्षात येते पीक विमा भरणा करणाऱ्या शेतकऱ्यांचा सहभाग प्रती वर्षे वाढलेला आहे.

**निष्कर्ष :—**

पीक विमा योजनेचा शेतकऱ्यावरील परीणामाचा प्राथमीक समग्री साहाय्याने सखोल अध्ययन करून काढलेले निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

१) पिक विमा योजनेचा हप्ता कोरडवाहू व बागयती पीकासाठी वेगवेगळा असल्याचे दिसून येते.

२) अभ्यास क्षेत्रातील निवडलेल्या लाभार्थ्यापर्यत शासनाच्या पीक विमा योजनेची माहीती विविध स्त्रोतांकडून समजलेली आहे. उदा. (ग्रामपंचायत, वर्तमानपत्र, दुरदर्शन, तलाठी इत्यादी)

३) पावसाची अनिश्चितता कमी आणि अती जास्त पाऊस पडणे हा नेहमीचाच भाग असल्यानेझालेल्या शेतमालाच्या नुकसान भरपाईसाठी शेतकरी मोठ्या प्रमाणात विमा उतरवित आहे.

४) रोग, कीड, पुर, गारपीठ, यासारख्या प्रादुर्भावापासुन संरक्षण करण्यासाठी पीक विमा उतरविण्याची प्रवृत्ती दिसून येते.
५) पीक विमा योजनेतील लाभार्थी शेतकऱ्यांची दरवर्षी विमा उतरविण्याची प्रवृत्ती दिसून येते.
६) पीक विमायोजनेतील शेतकऱ्यांना विमा हप्ता रक्कम वाजवी असल्याचे दिसून येते.
७) पीक विमा योजनेतील शेतकरी सर्वाधीक विमा हफ्ता १००१ ते १५०१ रूपये दरम्यान भरणारे लाभधारक मोठ्या प्रमाणात दिसुन येतात.

**शिफारशी / उपाययोजना–**

१) पिक विमा योजनेतील शेतकऱ्यांनी नविन नविन तंत्रज्ञान आणि कुशल श्रमीकांचा वापर करावा.
२) पिक विमा हा मुद्दतीपूर्वी भरावा जेणेकरून शेतकऱ्यांची एकाच वेळी गर्दी होणार नाही.
३) पिक विमा भरत असतांना सात बारा आणि पीकपेरा प्रमाणपत्र तलाठ्याकडून आणून तयार ठेवावे.
४) पीक विमा काढल्यानंतर शेतकऱ्यांनी आपल्या शेतात झालेल्या नुकसानाची नोंद घेवून तात्काळ तलाठी किंवा मंडळ अधिकारी यांना कळवावे. म्हणजेच तलाठ्यामार्फत विमा कंपनी पाहणी करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई प्राप्त होईल.
५) शेतकऱ्यांनी पेरणी ही योग्य मौसमा नुसार वेळेवर करावी. जेनेकरून शेतकऱ्यांना विमा भरण्यासाठी योग्य वेळ व मुदत मिळेल.

**संदर्भ ग्रंथसुची :–**

१) रामेश्वर भिसे (२००९) कृषी विकासातील बदलयश प्रकाशन अकोला.
२) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (२०१८) व सांख्यीकीय संचालनालय, नियोजन, विभाग महाराष्ट्र शासन मुंबई.
३) वसुधा पुरोहीत (२०१६) कृषी अर्थशास्त्र विद्या बुक पब्लीशर्स औरंगाबाद
४) सुधीर बोधनकर (२०११) सामाजीक संशोधन पध्दती श्री साई प्रकाशन नागपूर

**परिशिष्ठ :–**

१) W.W.W.MahapikViMA.Com
२) W.W.W.MahaGot.Com
३) W.W.W.P.M.India.Com
४) W.W.W.Mr.P.M.wikipedia.org.